पुणें मराठी ग्रंथालय
क्रमांक—

जुलै १९२४.

# 'केवळ त्यांसाठीं'

लेखिका:—श्री.
सौ. इंदिराबाई
सहस्रबुद्धे.

किंमत
रु. १॥.

# केवळ ध्येयासाठीं !

( सामाजिक कादंबरी )

लेखिका—

श्री. सौ. इंदिराबाई सहस्रबुद्धे.

प्रकाशक—

सखाराम गोविंद विरकुड, बी. ए.

" रवीन्द्र प्रिन्टींग वर्क्स " आंबेवाडी, गिरगांव-मुंबई.

किंमत १॥ रुपया.

कै. परमपूज्य **वासुदेव बळवंत पटवर्धन**, एम्. ए.

प्रिन्सीपाल, फर्ग्युसन कॉलेज पुणें,

यांस —

त्यांच्या खऱ्या कळकळीच्या समाजसुधारणेबद्दल

त्यांच्याविषयीं वाटत असलेल्या आदरभावाचें

द्योतक म्हणून त्यांच्या स्वर्गस्थ आत्म्यास

ही अल्पकृती

अर्पण केली आहे.

**ग्रंथ-कर्त्री.**

# प्रकाशकाची प्रस्तावना.

प्रस्तुत पुस्तकाला एका सुप्रसिद्ध समाजसुधारकांनीं प्रस्तावना लिहून देण्याचें कबूल केलें होतें, परंतु आयत्या वेळीं कांहीं अडचण आल्यामुळें म्हणा किंवा सदरील गृहस्थांची लेखणी प्रस्तावना लिहिण्यास न धजल्यामुळें ह्मणा, पुस्तकाचे सर्व फॉर्म छापून तयार होईपर्यंत ती त्यांच्या कडून मिळाली नाहीं. अर्थात् हें काम प्रकाशकालाच कसें बसें करणें भाग आहे. एका अर्थी हें वाचकांचें सुदैवच समजलें पाहिजे. सदरील गृहस्थानीं प्रस्तावना लिहिली असती तर लग्न या संस्थेचा इत्थंभूत इतिहास आणि हिंदुसमाजांतील तद्विषयक कल्पना व चालीरीती यां विषयींचें लांबलचक विवेचन त्यांत आलें असतें. प्रस्तुत सुंदर पुस्तकाच्या वाचनाला आरंभ करण्यास त्यामुळें थोडा व्यत्यय आला असता. अर्थात्, सदरील विद्वान् गृहस्थांकडून आयत्यावेळीं प्रस्तावना लिहून मिळाली नाहीं, ही एक प्रकारें इष्टापत्तिच समजली पाहिजे.

इंग्रजी भाषेंत Grant Allen (ग्रँट ॲलन) नांवाच्या एका नांवाजलेल्या लेखकानें लिहिलेली " The woman who did " नांवाची एक सामाजिक कादंबरी प्रसिद्ध आहे. ही कादंबरी पहिल्यानें प्रकाशित झाली त्यावेळीं तिकडे मोठी खळबळ उडून गेली होती. पुस्तकावर व त्याच्या लेखकावर चोहोंकडून टीकेचा भडिमार झाला होता. त्याच कादंबरीचें ' केवळ ध्येयासाठीं !" हें रूपांतर आहे. हें रूपांतर करून श्री. सौ. इंदिराबाई सहस्रबुद्धे यांनीं त्याच्या प्रकाशनाची कामगिरी आमच्याकडे सोंपविली याबद्दल आह्मी त्यांचे मनःपूर्वक आभारी आहों.

"The woman who did" या कादंबरीचा नुसता विषय सांगितला तर बहुतेक लोकांच्या काळजांत धस्स होतें, ती कादंबरी वाचतांना किंवा वाचून झाल्यावर त्यांचीं अंतःकरणें द्रवूनच जातात, असा अनेकांच्या बाबतींत अनुभव आहे. मराठी वाचकांचीहि तीच स्थिति होईल अशी आमची खात्री आहे. मूळ इंग्रजी भाषेंतील पुस्तक फार सुंदरच आहे आणि त्याच्या रूपांतराला श्री. सौ. इंदिराबाई सहस्रबुद्धे यांच्या कुशल लेखणीचा लाभ झाल्यामुळें मराठींतहि तशीच सुंदर कृति उतरलेली आहे.

शालिनीसारखी स्वतंत्र विचारांची स्त्री पौर्वात्य काय किंवा पाश्चात्यहि काय, समाजांत क्वचित्‌च निर्माण होत असते. समाजाविरुद्ध बंडाचा झेंडा उभारणाऱ्या अशा प्रकारच्या स्त्री-पुरुषांना समाज शासन करितो किंवा समाजांतील निर्बंधांमुळें कित्येक वेळां त्यांना आपोआपहि शासन भोगावें लागतें. शालिनी सारख्या धीरोदात्त, ध्येयैकशरण अबलेची प्रशंसा करण्यास जे वाचक तयार होणार नाहींत, त्यांच्या मनांत तिच्या विषयीं आदरयुक्त अनुकंपा तरी उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहीं, अशी आमची खात्री आहे.

शालिनीसारख्या व्यक्ति ध्येयांपुढें कशाचीही पर्वा करीत नाहींत; समाजरूपी जगन्नाथाचा रथ निराळ्या, स्वतःच्या दृष्टीनें योग्य व सरळ, मार्गावर नेण्याचा प्रयत्न करितांना त्याच्या वज्रप्राय चक्रांखालीं चिरडून जातात. समाजाला वळण देण्याचा हा प्रयत्न सद्यःफलश्रुतीच्या दृष्टीनें निरुपयोगी असला तरी समाजावर त्याचा शेवटीं कांहीं ना कांहीं परिणाम झाल्याखेरीज राहात नाहीं, हें खास !

‘प्रेमा जेथें शपथ लागते............प्रासावांचुनि कविता अडते,’

अशा प्रकारचें हें जग आहे. शालिनीचें तत्वज्ञान कितीहि उच्च असलें तरी या जगाचे व्यवहार तशा तत्वज्ञानानें चालले नाहींत म्हणूनच स्वार्थ, अन्याय, विषमता, दास्य यांचा जगांत सुळसुळाट झालेला आहे. समाजाच्या धर्मशास्त्राच्या किंवा फायद्याच्या नियमांत खऱ्या प्रेमाला क्वचित्‌च जागा मिळते. कन्याविक्रय, हुंडा, जरठ कुमारी विवाह यांत प्रेमाचा संबंध येत नाहीं, परंतु आपला समाज अशा विवाहांना शुभाशीर्वाद देण्यास कचरत नाहीं. हे सर्व हीन विवाह धर्मदृष्ट्या पवित्र (sacramental) म्हणून समजले जातात. विहिणींचें रुसणें फुगणें, करणी, वाजंत्रें वगैरे गोष्टी विवाहांतल्या अत्यंत महत्वाच्या गोष्टी समजल्या गेल्या आहेत. वधुवरांना आपण परस्परांशीं कोणत्या करारांनीं बांधलीं जात आहों हें कळत नसलें तरी भटजींच्या गडबडगुंड्याच्या मंत्रोच्चारांनीं विवाह पक्का केला जातो आणि कायदा तर असा निगरगट्ट कीं, मनुष्यस्वभावाच्या काळ्याकुट्ट बाजूकडेच त्याचें नेहमीं लक्ष्य असल्यामुळें ‘प्रेम’ ही वस्तु काय आहे हें त्याच्या गांवींहि नाहीं. प्रेमाला कायद्यानें बहिष्कार घातला आहे असें म्हटलें तरी चालेल. मृत्युपत्र, वारसा, प्रोबेट, कोडिसिल, वांटणी, जाहीरनामा, नोटीस दावा, फैसला, हुकूमनामा इत्यादींनीं जणूं काय

शुद्ध प्रेमाला कोठें जागाच ठेवलेली नाहीं. वाचक हो ! शालिनीच्या कृतीवर मत देण्याच्या पूर्वी या सर्व गोष्टी लक्ष्यांत आणा.

शालिनीचें ध्येयप्रेम अविचारीपणाचें ( impatient idealism ) होतें असें ज्यांना म्हणावयाचें असेल त्यांनी खुशाल म्हणावें, परंतु समाजाला क्षणभर तरी विचार करावयास लावण्यास शालिनीसारख्या व्यक्तींचे आत्मयज्ञ कारणभूत होतात, ही गोष्ट कोणालाहि नाकबूल करतां यावयाची नाहीं.

पाश्चात्य देशांत प्रौढ विवाह चालू आहेत, प्रेमविवाह नेहमीं होत असतात, असें असतांहि ' The woman who did ' या पुस्तकानें तिकडे प्रचंड खळबळ उडून गेली. अर्थात्, जेथें प्रेमविवाह केवळ अपवादभूत आहेत. आणि अद्यापि मुलीचें वय विवाहकाळीं चौदा असावें किंवा सोळा असावें याविषयीं जेथें कडाक्याचे वादविवाद होत असतात, बसु बिल किंवा पटेल बिल अथवा गौर बिल पाहून जेथें सुधारक म्हणविणारे लोकहि बुजतात, तेथें शालिनीचें प्रेमविषयक तत्त्वज्ञान कोण कानावर घेणार ?

प्रस्तुत पुस्तकानें शालिनीचें तत्त्वज्ञान वाचकांना पटो वा न पटो, चौदा-सोळांवर येऊन थांबलेल्या विवाहविषयक सुधारणेवर समाधान मानण्यास यापुढें ते तयार होणार नाहींत, अशी तरी आम्हांस आशा वाटते.

शालिनीची या नवीन सुधारणेंत जी आहुति पडली ती योग्यच होती असें मानणाऱ्यांना पुस्तकाचा शेवट पाहून कुरकुर करण्यास जागा नाहीं. उलट पक्षीं समाजाच्या अन्यायाबद्दल ज्यांना चीड येणें शक्य असेल त्यांना ती शालिनीचा शेवट पाहून अधिकच येईल.

एकाद्या प्रश्नचा साधक बाधक प्रमाणें घेऊन पद्धतशीर विचार करणें हें कादंबरीचें काम नाहीं. कादंबरीचा हेतु व्यवहारांतील गोष्टी घेऊन विचार जागृति करणें हाच आहे. अर्थात् वाचकाच्या ठिकाणीं थोडी जरी विचार जागृति झाली तरी कादंबरीच्या लेखनाचा हेतु सफल झाला असें मानलें पाहिजे. सांगोपांग विषयविवेचन करणें हें जसें कादंबरी लेखकाचें काम नव्हे तसें तें प्रस्तावना लेखकाचेंहि नव्हे. म्हणून, छपाईच्या बाबतींत घाईमुळें जे दोष राहिले असतील त्यांची सहृदय वाचकांनीं क्षमा करावी, अशी विनंति करून, येथेंच विराम घेतों.

महाराष्ट्र-साहित्य कचेरी,<br>आंबेवाडी, गिरगांव, मुंबई.<br>१–८–२४.

प्रकाशक.

# हृदयसंगम हाच सुसंगम.

कै. बळवंत जनार्दन करंदीकर.

प्रमव्यवहारास पाहिजे लग्न कशाला केलें ? ।
जखड बंधनीं आजवरी हित असें कोणतें झालें ? ॥ १ ॥

वळें बांधिली मोट सुखद ती व्हावी, हें विपरीत ।
प्रेमच बंधन असल्यावरती अधिक काय लग्नांत ? ॥ २ ॥

सामर्थ्य प्रेमाचें आहे अघटित, अद्भुत जोर ।
विवाह केवळ थट्टा वाटे प्रेमाची, अनिवार ॥ ४ ॥

प्रेमाभावी व्हाया न रुचे राणी शिकंदराची ।
प्रेम जयावर कलत्र-अंकित-व्हावें काय तयाची ॥१० ॥

पतिवेगळें स्वातंत्र्याचें सन्मानप्रद नातें ।
अन्य असें जरि, राजी आहें, तें मी जोडायातें ॥ ११ ॥

प्रेमस्वातंत्र्यास अनुसरे, नैसर्गिक धर्मानें ।
वागे, आत्मीं आत्मा मिळतो, राहे अभिन्नतेनें ॥ १२ ॥

प्रकट व्हावयापूर्वीं समजे अन्य मनांतिल भाव ।
ह्या हृदयीं जें तें त्या हृदयीं, प्रेम तयाचें नांव ॥ १४ ॥

# केवळ ध्येयासाठीं !

## प्रकरण १ लें.

डॉ. गोखले, आपल्या नवीन बंगल्यांत रहाण्यास येऊन आज फार तर चार पांच दिवस झाले असतील. पेन्शन घेतल्यावर आपले म्हातारपणचे चार दिवस पुण्यास घालवावयाचे, असा त्यांचा फार दिवसांचा बेत ! बडोदे सरकारची नोकरी करून त्यांनीं तेथल्या लोकांत बरीच मानमान्यता मिळविली होता. बडोदे सरकारची मर्जी पण त्यांच्यावर तशीच होती ! महाराजानीं डॉक्टरांच्या पगाराची लवकर लवकर बढती करून शिवाय त्यांना खाजगी धंदा करण्याचीही परवानगी दिली होती. इतकी सवलत मिळाल्यावर मग पैसा जमायला कितीसा वेळ लागतो ! ( आतां ) डॉक्टरांचे पेन्शनचे दिवस येऊन ठेपले, तेव्हां पुढें काय करावें ? कुठें जावें ? बडोद्यासच रहावें का पुण्यास जाऊन रहावें ? वगैरे वगैरे विचार डॉक्टरांच्या मनांत फार वेळ येत. शेवटीं एकदां पुण्यासच रहावयाचें असें ठरवून त्यांनीं बंगला बांधण्यासही सुरवात केली. आज बंगला पुरा बांधून झाल्याला काय ते सात आठ दिवसच झाले असतील. तोंच डॉक्टर तेथें येऊन राहिलेसुद्धां ! त्यांना आपला बंगला पाहाण्याची आतिशयच उत्कंठा झाली होती. ते दर पत्रागणीक आपल्या कारकुनाला " बंगला बांधून झाला का ? लवकर तयार होत नसला तर आणखी मजूर लावा. पैशाकडे पाहूं नका. कांहीं करा पण मेच्या सुरवातीला बंगला अगदीं रंगरोगण करून तयार ठेवा. आपल्याला या मे महिन्यांत पुण्यास स्वतःच्या बंगल्यांत राहण्यास मिळालें पाहिजे. " वगैरे वगैरे लिहित. कारकून तरी बिचारा काय करणार ! तो आपल्याकडून जितकें काम जलदी करवावयाचें तितकें करवीतच होता. बंगला ठरल्या दिवशीं तयार झाला. कारकुनाचा जीव खालीं पडला. त्यानें लगेंच दौत टाक घेऊन यजमानांना पत्र लिहिलें. यजमानही कारकुनावर खूष झाले. त्यांनीं दुसऱ्या दिवशींच पुण्यास जाण्याचा बेत केला. आपल्या नव्या बंगल्यांत येऊन चार दिवस आनंदांत घालविण्याकरितां डॉक्टरांनीं आपल्या मित्रमंडळींना पाचारण केलें होतें. डॉक्टरांनीं कोणाला बोलाविलें, आणि तें माणूस आलें नाहीं असें कधींच होत नसे. त्याचप्रमाणें आजही त्यांच्या बोलाव-

ण्याला मान देऊन त्यांची मित्रमंडळी बरीच आली होती. त्यांत कमलाकर नांवाचा एक पंचवीस सव्वीस वर्षांचा तरुण मुलगा होता. ही स्वारी सकाळींच मुंबईहून पुण्यास आली होती. रात्रीं गाडींत झालेल्या जागरणामुळें दुपारचें जेवण झाल्यावर कमलाकर जो निजला होता, तो संध्याकाळचे पांच वाजतां जागा झाला. आतां पुढें काय करावें ? एकाद्या मित्राकडे जाऊन गांवांत भटकी मारून यावें, कीं येथेंच बंगल्याच्या आवारांत हिंडून सभोंवतालची शोभा पाहावी ? असा आपल्याशींच विचार करीत कमलाकर पलंगावरून उठून आरशासमोर जाऊन आपले केंस ब्रशनें साफसूफ करूं लागला. इतक्यांत ' जावें त्या आपल्या बंडूकडे, असला घरांत तर पाहावा ' असें वाटून स्वारीनें खुंटीवरची टोपी उचलून आपल्या डोक्यावर ठेविली. थोडा वेळ कमलाकर तसाच ती नुसती टोपी घालून खिडकीबाहेर शून्य दृष्टीनें पहात व आपल्या डाव्या हाताच्या मधल्या दोन बोटांनीं आपल्या मिशीवरून एकदां या बाजूनें आणि एकदां त्या बाजूनें हात फिरवीत उभा राहिला. मग त्याच्या मनांत काय आलें कोणास माहीत ! त्यानें पुन्हां आपली टोपी काढून जागच्या जागीं ठेवली, आणि चप्पल घालून बाहेरच्या जिन्यानें ' आज नयेच जाऊं, उद्यां नाहीं तर परवांच जावें ' असे कांहींसें पुटपुटत तो खालीं गेला. बंगला नुकताच बांधून झाला होता. त्यामुळें बंगल्याच्या आवारांत अजून पुष्कळ धोंडे पडले होते. पलीकडे एक चुन्याची घाणीही होती. तरी पण बंगल्याच्या दारासमोरच्या बागेला बरीच शोभा आली होती. कमलाकर जिना उतरून खालीं आल्यावर प्रथम त्या दारासमोर असलेल्या कारंजाकडे गेला. कारंजाजवळ जाऊन, त्याची किल्ली फिरवून तें सुरू केलें. त्याबरोबर पाण्याचे तुषार जवळपास असलेल्या फुलझाडांवर पडूं लागले. जलबिंदू पडल्यामुळें झाडांचीं पानें व फुलें कशीं एकदम टवटवीत दिसूं लागलीं. कमलाकर कारंजें सुरूं करून तेथेंच जवळ असलेल्या एका बांकावर, ती पाण्याची मजा पहात बसला. जलसिंचनामुळें आनंदित झालेल्या व वायूच्या मंदलहरींत हेलकावे घेणाऱ्या त्या पुष्पांकडे पाहून कमलाकर अगदीं खूष झाला; आणि ' या कारंजाचें पाणी उंच तरी किती उडतें तें पहावें ' असें मनांत येऊन तो पुन्हां कारंजाजवळ गेला. त्यानें जितकी म्हणून किल्ली फिरावेणें शक्य होतें, तितकी सगळी दिली. मग कारंजाचें पाणी इतकें दूरवर पडूं लागलें कीं, कारंजाच्या दोन्ही बाजूला असलेलें गवत अगदीं पार भिजून गेलें. त्यामुळें तें ज्यास्तच हिरवेंगार दिसूं लागलें; आणि एकदम सगळी-

कडे अगदीं गारीगार झालें. कमलाकराचें मन फारच सुप्रसन्न होऊन तो त्या बागेंतल्या बागेंत इकडे तिकडे हिंडूं लागला. त्याची दृष्टी त्या कारंजांतल्या पाण्याच्या तुषाराकडे नव्हती. तो आतां समोरील टेकडीच्या पायथ्याशीं असलेले लहानमोठे टुमदार बंगले व भोंवतालचा रम्य प्रदेश पाहाण्यांत गुंतला होता. इतक्यांत त्याला पलीकडल्या टेकड्यांपैकीं एका टेंकडावर एक देवालय असावेंसें वाटलें, आणि "अरे, ती पर्वती तर नसेल ना? हो! पर्वतीच असली पाहिजे. नाहींतर दुसरें या बाजूला टेकडीवर कोणतें देऊळ आहे?" असें ह्मणत कमलाकर त्या टेकडीकडे जरा बारकाईनें पाहूं लागला. "ती पर्वतीच आहे यांत संशय नाहीं. आतां जर आपण तिकडे गेलों, तर काय बहार होईल! आपण जर या वेळेस तेथें गेलों, तर आपणास सनई ही खात्रीनें ऐकण्यास मिळणार! यांत मुळींच संशय नाहीं; सायकलवरून गेलों, तर फार झालें तर अर्धा तास लागेल तेथें पोहोंचायला. आणखी काय लागणार आहे?" असें आपल्याशींच म्हणत तो पर्वतीला जाण्याच्या उद्देशानें उभा असलेल्या जागेवरून दोन पावलें मागें सरकला. पण मागें सरकतो तोंच त्याच्या मनांत दुसरा कांहीं विचार आला, आणि तो तेथल्या तेथेंच एक एक पाऊल अगदीं मंद टाकीत हिंडूं लागला. त्याला असें वाटलें कीं, न जाणों आतां आपण गेलों, आणि परत यायला कदाचित् आपणास उशीर झाला, तर हरीकाका (डॉ. गोखले) 'कुठें गेला या वेळेस?' असें कांहीं ह्मणतील; आणि आज त्यांतून परकी मंडळी जेवावयाला यावयाची आहेत. आपण उशीर करणेंही बरोबर नाहीं. असें मनांत येऊन तो तेथेंच थोडावेळ गुटमळला. पर्वतीस जाऊन सनई ऐकण्याची तर त्याला अनिवार इच्छा झालेली! पण कदाचित् यायला उशीर होईल. असें मनांत येऊन, मन जरा मागें घेत होतें. इतक्यांत बंगल्याच्या पाठीमागल्या बाजूला कोणी तरी बोलत असावें असें कमलाकराला वाटलें. ह्मणून त्यानें सहज त्या बाजूला वळून पाहिलें, पण कोणीही दिसलें नाहीं. तेव्हां तो पूर्ववत् सृष्टीनिरीक्षण करूं लागला. पण पुन्हा त्याला बुटांचा वाळूवर होणारा करकर आवाज व बोलण्याचा मंजूळ ध्वनी ऐकूं आला. कमलाकरानें सहज मागें वळून पाहिलें. तेव्हां हरीकाका एका एकवीस बावीस वर्षांच्या मुलीबरोबर बोलत येतांना त्याला दिसले. आपण त्यांना जणुंकाय पाहिलेंच नाहीं; असें दाखवून कमलाकर आपली पाठ वळवून पुन्हां त्या समोरच्या टेकड्याकडे पाहात उभा राहिला. हरीकाका कमलाकराच्या अगदीं जवळ

येऊन ह्मणाले, " कमलाकर, ही बघ आमची शालिनी. मी जिच्याबद्दल तुझ्यापाशीं नेहमीं बोलत असतों ती हीच शालिनी. " डॉक्टर मग शालिनीकडे वळून ह्मणाले, " शालिनी, तुला मुंबईचे डॉक्टर सुपेकर माहीत असतील नाहीं ? " " हो. मला वाटतं ते आमच्या आबांच्या ओळखीचे आहेत. कारण, आमची आई असतांना, माझ्या अगदीं लहानपणीं मी त्यांच्या घरीं एकदां गेलेलें मला आठवतं. "

" डॉक्टर ? हो, ओळखीचे आहेत ह्मणजे ? आबा, कमलाकरचे बाबा, आणि मी अगदीं एका क्लासांतले ना ! पुढें आमच्या धंद्यामुळें आह्मीं निरनिराळ्या ठिकाणीं राहूं लागलों ह्मणून आमचें एकमेकांकडे एवढें जाणेंयेणें राहिलें नाहीं. दुसरं काय ? आबा तर आज लक्ष्मीवहिनी ( शालिनीची आई ) वारल्यापासून पांच सात वर्षें कलकत्यालाच जाऊन राहिला आहे ! माझ्या मनांतून तर आह्मीं तिघांनीं एका गांवांत जुळलं तर रहावं असं फार होतें, पण तें कांहीं जमलं नाहीं. "

इतक्यांत एक गडी निरोप घेऊन आला कीं, डॉक्टरसाहेबांना मोरोपंत तांब्यांनीं कांहीं जरूरीचें काम आहे, तेव्हां ताबडतोब बोलाविलें आहे.

निरोप ऐकल्यावर आपल्याशींच " असं का ? मग गेलंच पाहिजे तर. " असें ह्मणत डॉक्टरांनीं गड्याला आपली हॅन्ड-बॅग् आणावयाला सांगितली; आणि ते जावयालाच निघाले. जातांना ते त्या दोघांकडे पाहून ह्मणाले " जा तुम्हीं आतां घरांत जाऊन बसा. ती पण घरांत एकटीच असेल. तिकडेच जाऊन बसा. माझें काम झालें कीं, मी येतोच. असें म्हणून त्या गड्यानेंच येतांना गाडी आणिली होती तींत ते बसले आणि गेले. कमलाकर आणि शालिनी डॉक्टरांनीं सांगितल्याप्रमाणें बंगल्यांतल्या दिवाणखान्यांत गेलीं. सावित्रीकाकू ( डॉ. गोखल्यांची पत्नी ) गड्याकडून दिवाणखाना साफसूफ करून घेण्यांत व इतर कांहीं गृहकृत्यांत गुंतल्या होत्या. त्यांनीं शालिनीची विचारपूस केली; आणि तिला कोचावर बसावयाला सांगून म्हणाल्या, " बस जरा. मी तेवढं तें कपाट कुठें ठेवायचं तें त्या गड्यांना दाखवून येतें. " असें म्हणून त्या दिवाणखान्यालाच लागून असलेल्या खोलींत गेल्या. तेथें त्यांनीं गड्यांना कपाट कसें ठेवायचें तें दाखवलें; आणि परत दिवाणखान्यांत येऊन त्या शालिनीला म्हणतात " कालपासनं अशी ही माझी कामाची धांदल चालली आहे. अजून सामानाची लावालावसुद्धां झाली नाहीं. हो. कशी होणार ?

इतकं सामान तर लावायला पाहिजे ! आज आम्हांला बडोद्याहून येऊन चारच दिवस झाले असतील. हो चारच. आजचा रविवार ना ? आम्ही गुरुवारीं येथें आलों. गुरुवार एक, शुक्रवार दोन, शनिवार तीन, आणि आजचा हा रविवार चार. बरोबर चार दिवस झाले, आणि आज त्यांतून मंडळी जेवायला यायची, त्यामुळें फारच धांदल उडाली आहे बाई ! आणि स्वयंपाकी मिळाला आहे, तो असून नसून सारखाच. आमचा पूर्वीचा होता त्याला म्हटलें चल आमच्याबरोबर तर मेला येईना ! कित्ती कित्ती प्रकारानं त्याच्या आर्जवा केल्या, शेवटीं तुझा पगार चढवूं वर्षातून दोन महिन्याची रजासुद्धां देऊं म्हणून सांगितलें. पण त्याचा आपला नन्नाचा पाढा. तो म्हणाला " कांहीं झालें तरी आपण कांहीं बडोदं सोडणार नाहीं. " मग काय करायचं बाई ! हो ! त्याला काय लहान मुलासारखा पुढें घालून आणायचा आहे ? नाहीं तर नाहीं ! त्याची मर्जी ! म्हणून हा इथें आल्यावर नवीन ठेवला; तर तें काय सोंगच आहे मेलं. कांहीं येत नाहीं नी जात नाहीं. प्रत्येक गोष्ट सांगावी लागते. "

शालिनी आपली इतका वेळ नुसती ' हूं हूं ' करीत होती. शेवटीं सावित्री-काकूंचें बोलणें थांबून त्याच म्हणाल्या, " बरं पण अशी मी बोलत काय बसलें ! तुम्हाला कांहीं चहा हवा का ? "

शालिनी—"छे: आतां कशाचा चहा ! ही काय चहाची का वेळ ! सहासुद्धां वाजून गेले. "

काकू कमलाकराकडे वळून म्हणाल्या " कमलाकर तुलारे बाबा ? तूं काय मुंबईचा आहेस ! तुला काय किती वेळ दिला तरी तूं कांहीं नको म्हणायचा नाहींस. "

कमलाकर—" हो बुवा ! आहे खरी अशी स्थिती; मग उगीच नाहीं का म्हणा ? तुमच्या मनांतून आपला मला द्यायचाच असेल, तर खुशाल द्या. आपण कांहीं नाहीं म्हणत नाहीं. "

" मग सांगतेंच हो करायला. शालिनी तूं पण घे त्याच्याबरोबर थोडा. " असें म्हणतच काकू जिना उतरूं लागल्या. काकू चहा आणण्यासाठीं स्वयंपाक घरांत गेल्यावर शालिनीनें आणि कमलाकरानें टेबलावरचें एक एक वर्तमानपत्र उचलून वाचण्यासाठीं म्हणून आपल्या डोळ्यासमोर धरिलें; शालिनी कमला-कराला मधून मधून कांहीं प्रश्न विचारी, पुन्हां आपलें वर्तमानपत्र वाचूं लागे असें चाललें होतें. शालिनीचें वर्तमानपत्रांतल्या मजकुराकडे पूर्ण चित्त होतें,

पण कमलाकराची स्थिति तशी नव्हती. त्यानें डोळ्यांपुढें उगीच नांवाला कागद मात्र धरिला होता. खरें पाहिलें तर त्याचें सर्व लक्ष शालिनीकडे होतें; आणि तसें असलें तर त्यांत कांहीं विशेष नाहीं. कारण शालिनीला पाहिल्यावर कोणत्याही तरुण माणसाची अशी स्थिति होणें अगदीं साहजिक होतें. तिला पाहिल्यावर कोणीही थोडा वेळ आपलें भान विसरेल असेंच तिचें रूप होतें. तिची अंगकाठी उंच व सडपातळ होती. बांधा गोंडस होता. डोळे पाणीदार असून वर्ण केतकीसारखा होता. तिच्या काळ्याभोर केसांचा आंबाडा मानेवर सैलसा बांधलेला होता. ती आज बारीक कांठाची जरीची काळी चंद्रकळा नेसली होती. हातांत दोन दोन सोन्याच्या बांगड्या, आणि गळ्यांत एक मोहनमाळ या खेरीज दुसरे कोणतेही दागिने तिच्या अंगावर नव्हते. तिचा पोशाख साधा असून फार सुबक होता, त्यामुळें तिच्या सौंदर्यांत जास्तच भर पडली होती. असें असल्यावर कमलाकर शालिनीला पाहून थक्क झाला, यांत नवल तें काय ? सावित्रीकाकू आंत स्वयंपाकघरांत गेल्यावर शालिनीही त्यांच्या मागोमाग जाईल असें कमलाकराला वाटलें होतें. पण तशी ती त्यांच्या पाठोपाठ न जातां, टेबलावरचें वर्तमानपत्र घेऊन वाचीत बसली. हें पाहून कमलाकराला फार नवल वाटलें. वर्तमानपत्र वाचून झाल्यावर, दिवाणखान्यांत एका बाजूस दोन पुस्तकांचीं कपाटें होतीं. त्यांतील सर्व पुस्तकांवरून तिनें एकदां आपली दृष्टी फिरविली. शालिनी मधून मधून कमलाकराशीं बोलतच होती. हें तिचें सरळ आणि निर्भीडपणाचें वर्तन पाहून कमलाकराला फार आश्चर्य वाटलें; आणि त्याला जो इतका वेळ शालिनीशीं बोलण्यास संकोच वाटत होता तो आतां बराच कमी झाला. त्याला शालिनीच्या बोलण्यावरून तिच्या वर्तनांत एक तऱ्हेचा स्वतंत्रपणा आहे असें वाटलें. कमलाकराला प्रत्येक व्यक्ति मग ती स्त्री असो व पुरुष असो, पूर्ण स्वतंत्र असावी असें नेहमीं वाटे. त्याचें आज लहानसें उदाहरण त्याच्या दृष्टीस पडलें; आणि त्याला अगदीं मनापासून आनंद झाला.

कांहीं वेळानें सावित्रीकाकूनीं सांगितल्याप्रमाणें त्यांच्या स्वयंपाक्यानें दोन पेले चहा आणून टेबलावर ठेवला. इतक्यांत सावित्रीकाकूही त्याच्या पाठीमागून वर आल्या; आणि त्या स्वयंपाक्याला ह्मणाल्या, " अरे हे चहाचे पेले त्या पलीकडल्या खोलींत नेऊन ठेव पाहूं. इथें आतां मंडळी जमावयाला लागतील. तर ते त्या पलीकडल्या खोलींतच चहा घेतील. "

सावित्रीकाकूनीं असें सांगतांच ब्राह्मणानें चहाचे दोन्ही कप उचलून पलीकडल्या खोलींत नेऊन ठेवले.

सावित्रीकाकू खिडकीशी डोकावून पाहून म्हणतात—

"कमलाकर, शालिनी चला तुह्मीं त्या खोलींत पाहूं, तिकडेच चहा घ्या. आपण तिथेंच बसूं. ते केळकर का कोण ते आले वाटतें." कमलाकर व शालिनी दोघेही उठून पलीकडल्या खोलींत गेलीं. सावित्रीकाकूही त्यांच्याबरोबर जात होत्या, पण दारांत थांबून त्या गड्याला म्हणतात " अरे, ते केळकर बाहेर आले आहेत, त्यांना नीट वाट दाखव; आणि त्यांना म्हणावं आतांच घरीं येतील तर बसायला सांगितलें आहे. जा लवकर जा खालतीं. नाहीं तर ते दाराशींच चौकशी करून परतावरत जातील. "

एवढें गड्याला सांगून सावित्रीकाकू आंत गेल्या, व कमलाकराला उद्देशून ह्मणतात " अरे, तूं कशाला थांबलास ? चहा घ्यावास कीं नाहीं ? तुला कढत कढत लागतो ह्मणून मीं तुला आधीं आणून द्यायला सांगितला. "

कमलाकर ह्मणतो " मी थांबलोंही नसतों. पण शालिनीताई थांबल्या तेव्हां ह्मटलं आपणही थांबावें हें बरें. "

" आणि काकू, थोडा वेळ थांबले ह्मणून तरी हो काय झालं ? तेवढ्यांत कांहीं चहा अगदीं गार होत नाहीं. "

शालिनी आपल्या कपांतला निम्मा चहा काकूंना देऊन ह्मणते.

" अग, हें काय शालिनी ! तो आतां कांहीं लहान मुलगा नाहीं आहे. त्यांतून तो विलायतला जाऊन ब्यालिस्टर होऊन आलेला ! "

कमलाकर एकदम ह्मणतो " काकू, तुमचं ह्मणणं अगदीं बरोबर आहे. या अलिकडल्या बायकांना पुरुषांचा मान कसा ठेवावा, तें अगदीं कसं कळत नाहीं. "

" पण कायरे कमलाकर, शालिनीला पाहिल्यावर तूं तिला ओळखलेंस कां ? " सावित्रीकाकूंनीं कमलाकराकडे पाहून विचारलें.

" नाहीं बुवा. कसं ओळखणार ! मी त्यांना कधींच पाहिलेलें मला आठवत नाहीं; आणि त्यांतून लहानपणीं कधींकाळीं पाहिलं असलं तर आमच्या भारी टाळक्यांत राह्यचं आहे ? "

" का बरं ? हीं माणसं कलकत्त्याला राहायला गेलीं तेव्हां तूं कांहीं फार लहान नव्हतास. चांगला बारा तेरा वर्षांचा असशील. शालिनी बरीच लहान होती. फार तर सात वर्षांची असेल नसेल इतकीच. "

'हो ना ?' कमलाकर लगेच ह्मणतो " मग सात आठ वर्षांची मुलगी पुढें कधीं मोठी बाई झाल्यावर ओळखूं आली आहे का ?

" अहाहा ! न यायला काय झालं ? मी नाहीं कां ओळखली ? "

शालिनी, ह्मणते, " अहो, तुह्मीं ओळखलंत ह्मणून काय झालं ? पण सगळ्यांना कसं ओळखतां येईल ? "

" अगदीं बरोबर. " कमलाकर थोडीशी उसळी मारल्यासारखें करून ह्मणतो. " शालिनीबाई या वेळेस तुह्मीं काय पण माझी बाजू घेतली आहेत. नाहीं तर या माणसांनीं मला अगदीं मूर्खांत काढलं असतं. "

" आणि नाहीं तरी आतां काढायला सोडूं वाटतं ? अरे, शालिनी तरी तुझ्यासारखींच आहे. तिला तरी कोण मोठी शहाणी समजत आहे ! ती तर तुझ्यापेक्षां एक कांकणभर ज्यास्तच वेडी असेल, पण कमी नाहीं. " सावित्री काकू ह्मणाल्या.

" काकू, तुह्मीं आपलं कांहीं तरी माझ्याबद्दल लोकांना सांगतां झालं ! काय हो मी वेडेपणा करतें ? "

" वेडेपणा नाहीं तर काय ? याला काय शहाणपणा ह्मणायचा ? एकटी स्वतंत्रतेनें तर वागतेस ! वाटेल तिकडे जातेस ! मनाला वाटेल तें करतेस ! आणखी तें काय करावयाचं असतं ? नाहीं तुझ्याजवळ तुझे वडील, नाहीं दुसरं कोणी तुझं माणूस, असं असून तूं आपली एकटी मुलगी त्या झोंपडींत रहातेस हें गैर नाहीं का दिसत ! आणखी तो चमत्कारिकपणा काय करायचा ? तुझ्यासारख्या मुलीला असं एकटं दुकटं रहाणं चांगलं नाहीं. अग, चारचौघं हंसतात तें तुला कळत नाहीं. पण आबासाहेबांना सगळं चालतं मग आपण काय बोलायचं ? म्हणून आह्मी बोलत नाहीं एवढंच. "

शालिनी यावर कांहींच बोलली नाहीं. तिला मनांतल्या मनांत बरीक खूप हसूं येत होतें.

कमलाकराला सावित्रीकाकूंचें बोलणें ऐकून जरा नवल वाटलें. कारण हरीकाकांनीं शालिनीसंबंधी त्याला तुरळक माहिती दिली होती, पण त्यांत हें कांहींच सांगितलें नव्हतें.

असें त्यांचें बोलणें चाललें आहे, तों डॉक्टर धांदलीधांधलीनें खोलींत आले; आणि आपले कपडे खुंटीवर ठेवून सावित्रीकाकूंना ह्मणाले " जेवायची सगळी तयारी असूं द्या बरं का ! नाहीं तर सगळीच धांदल होईल. बहुतेक सगळी

मंडळी आलेली आहे. फक्त एक दोन कायती यायची आहेत, त्यांची वाट पाहूं आठ वाजेपर्यंत; नाहीं तर आह्मीं वसूं. " असें ह्मणून ते गर्दीगर्दीनें बाहेर दिवाणखान्यांत गेले. सावित्रीकाकूंही स्वयंपाक कुठंपर्यंत आला आहे तें पाहाण्यासाठीं स्वयंपाकघरांत गेल्या.

शालिनीनें " मला कांहीं काम करायचं असलं तर सांगा. " असें म्हटलें पण " आत्तां इतक्यांत आली नाहींस तों काम नको कांहीं करायला लागायला. " असें काकू म्हणाल्या. तेव्हां शालिनी तेथेंच कमलाकराशीं बोलत बसली. थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर त्या दोघांना अगदीं फार दिवसांची ओळख असावी इतका मनमोकळेपणा वाटूं लागला.

कमलाकराचा आणि शालिनीचा स्वभाव जवळ जवळ अगदीं सारखाच असल्यामुळें त्या दोघांचे जुळण्यास मुळींच वेळ लागला नाहीं पुढें त्या दिवशीं रात्रीं जेवण वगैरे होऊन शालिनी डॉक्टरांच्याच घरीं राहिली. दुसऱ्या दिवशीं सकाळचा चहा झाल्यावर शालिनी आपल्या घरीं जाण्यास निघाली; परंतु हरीकाकांच्या व सावित्रीकाकूंच्या आग्रहास्तव तिला तेथेंच रहावें लागलें. पुढें सात आठ दिवस शालिनी डॉक्टरांच्याच घरीं होती, कमलाकराची आणि तिची आतां चांगलीच ओळख झाली होती. मधून मधून त्यांचे निरानिराळ्या विषयांवर वादही होत. एक दिवस ते बागेंत संध्याकाळच्या वेळेला नेहमींप्रमाणें हिंडत असतां, कमलाकरानें शालिनीला सहज विचारलें. " आबासाहेब तर कलकत्त्याला असतात, आणि तुम्ही बोलपूरला असतां हें कसें ? "

" नाहीं. अलीकडे मी बोलपुराला नव्हतें; आणि पूर्वी होतें तीसुद्धां खुद्द बोलपुरला नव्हतेच. बोलपूर शेजारींच एका खेड्यांत एक वनिता-विद्यालय आहे, त्या विद्यालयांत मला आबानीं शिकण्यासाठीं ह्मणून ठेविली होती; आणि माझी पण तेथें चांगली जेवण्याची व रहाण्याची सोय झाल्यामुळें आबांच्याही पाठीमागची काळजी नाहींशी होऊन, त्यांना आपला सगळा वेळ आपलें काम करण्यांत घालवितां येऊं लागला. "

" त्या विद्यालयांतील विद्यार्थिनी कलकत्ता युनिव्हरसीटीच्या परीक्षेला बसत असतील ? " कमलाकरानें विचारलें.

" नाहीं ! नाहीं ! त्यांच्या स्वतंत्र परीक्षा असतात, तेथेंच कॉलेजचेंसुद्धां शिक्षण मिळतें. पहिल्या प्रथम ज्यांनीं ही संस्था काढली, त्यांच्या कल्पना अगदीं निराळ्या होत्या; आणि सध्यां जे चालक आहेत, त्यांच्या कल्पना

अगदीं निराळ्या आहेत. पूर्वीच्या चालकांच्या मनांतून मुलांच्या व मुलींच्या शिक्षणांत कोणत्याच प्रकारचा फेरबदल करावयाचा नव्हता. सर्व प्रकारचें उत्तम रीतीनें शिक्षण देऊन आम्हांला स्वतंत्र विचारी बनवावयाचें होतें. पण आतां तो संकल्प अगदीं मावळून जाऊन त्याचा तेथें मागमूस सुद्धां राहिला नाहीं. ती नुसती एक आतां घोकीव शाळा झाली आहे. " शालिनी ह्मणाली.

" तुमच्या तिथल्या मग कांहीं परीक्षा झाल्या असतील ? " असें कमलाकरानें विचारलें.

मीं त्यांच्या कॉलेजच्या चवथ्या वर्षांत होतें. ही शेवटची एवढी एक परीक्षा झाली असती म्हणजे सबंध कोर्स झाला असता. पण त्याच वेळेस संस्थेच्या कांहीं चालकांचें व माझें पटेनासें होऊन मी इकडे निघून आलें. "

" इतका अभ्यास झाला होता त्यासारखं परीक्षेला बसलां असतात म्हणजे वरं झालं असतं " कमलाकर म्हणाला.

" कमलाकर, खरं पाहिलंत तर कीं नाहीं मी या परीक्षांना मुळींच महत्व देत नाहीं. परीक्षेला नेमलेलीं पुस्तकं नीट चांगलीं वाचून झालीं पाहिजेत. त्याप्रमाणें मी तीं सगळीं वाचलीं आहेत. आतां परीक्षेला बसणारी मंडळी कितीशी नेमलेल्या पुस्तकांपैकीं पुस्तकें वाचतात ? परीक्षेला जाणाऱ्या मुलांचें लक्ष परीक्षेंत पास कसें होतां येईल याकडे लागलेलें असतें. आपल्याला अमुक एक विषयाचा चांगला अभ्यास करावयाचा आहे, तर त्यासंबंधीं आपण जितकीं पुस्तकं वाचावीं तितकीं थोडींच; असं खरं पाहिलं तर प्रत्येकाला वाटायला पाहिजे. पण या परीक्षांच्यामुळें खरा शिक्षणाचा उद्देश राहातो बाजूलाच आणि होतं भलतंच. परीक्षेंत तर कसंबसं पास झालं पाहिजे कारण आतांशा त्याखेरीज गत्यंतर राहिलं नाहीं. म्हणून मग परीक्षेच्या वेळेला विद्यार्थी एकसारखे ह्याच्या त्याच्या नोटा आण असं करीत असतात. यामुळें होतें काय ? कीं जन्मापासून आह्मीं अभ्यास केला तरी शेवटीं पंचवीशीच्या सुमाराला आमच्या हातीं येतें काय ? तर थोडंसं इंग्लीश वाचायला आणि अडखळत बोलायला ! एवढं आम्हांला आलें ह्मणजे झाली आमची इतिकर्तव्यता. "

" हो. आहे खरं असं. " कमलाकर ह्मणाला.

" आतां सांगितली अशीच बरोबर आमच्या वनिताविद्यालयाची स्थिति झाली आहे. अगदीं काडी इतका देखील फरक नाहीं, आणि त्यांतून ती मुलींची शाळा असल्यामुळें, मुलांना जो काय थोडा

स्वतंत्रपणा मिळतो तोही मुलींना मिळत नाहीं. आपण बाहेर फिरावयाला जाऊन सृष्टीशोभा पाहूं म्हटलें तरीसुद्धां कधीं आह्मांला जातां यावयाचें नाहीं. जणूं काय शाळेंतल्या मुली म्हणजे मेंढ्यांचा कळप ! कधीं एखाद्या रविवारी या मेंढ्यांना बाहेर काढल्यावर तर धनगरानें त्यांना वाटेल तिकडे हाकून न्यावें आणि परत पुन्हां मेंढवाड्यांत आणून सोडावें ! आणखी वर कोणी जर यासंबंधीं कांहीं अवाक्षर बोलेल तर ती मुलगी उद्धट ह्मणून जें तें ह्मणूं लागतें. जिथें एवढेंसुद्धां बोलण्याची सोय नाहीं, तिथें दुसऱ्या लोकांना न आवडणाऱ्या विषयावर बोलण्याची कोठली मोकळीक ! कमलाकर, मी तेथून निघालें ती निव्वळ तिथल्या बंदीवासामुळें आणि निरुपयोगी शिक्षणामुळें निघालें. ”

“ पण तुह्मी तिथून निघालांत हें आबांना कसें आवडलें ? ” कमलाकरानें विचारलें.

“ अर्थात् आबांना नाहींच आवडलं. त्यांना कसं आवडेल ? त्यांनीं मला साफ सांगितलं, कीं, तुला नाहींच ऐकायचं तर नको ऐकूं पण यापुढं मी तुझं नांवसुद्धां घेणार नाहीं. आबांच्या मनांतून मी तिथं राहावं असं फार. पण जिथें इकडं तिकडं वळण्याचीसुद्धां मुष्कील, तिथें राहून तरी करायचें काय ? स्वतंत्रतेनें अगदीं कोणत्याही विषयावर चर्चा करण्याची तर मुळींच मोकळीक नाहीं. बरं ह्यांच्या विद्यालयांत आपली कांहीं अक्कल खर्च करून सुधारणा करूं म्हटलें, तर तेंही शक्य नाहीं. मग तिथें राहून करायचें तरी काय ? स्वतंत्रता पाहिजे. स्वतंत्रताच नसल्यावर मनुष्य करणार काय ? ”

“ आणि त्यामुळेंच कोणत्याही शाळेंतल्या मुली पाहिल्या तर कशा अगदीं चरकांतून पिळून काढल्यासारख्या दिसतात. ” कमलाकर कपाळाला थोड्याशा आठ्या चढवून ह्मणतो.

“ बरोबर आहे. कां नाहीं तशा त्या दिसणार ? एकाद्या कोठडींत कोंडून ठेवलेला मनुष्य फिकट दिसलाच पाहिजे. बंदिवास तो बंदिवास ! आणि पुन्हां सदासर्वकाळ अभ्यास ! मग काय पाहिजे ! अभ्यासाशिवाय दुसरें कांहीं नाहीं. अभ्यास आणि परीक्षा, अभ्यास आणि परीक्षा याखेरीज दुसरें डोळयापुढें कांहीं दिसेंनासेंच होतें त्यांना. ”

“ आणि ह्मणूनच त्यांना दुसरी कोणत्याही प्रकारची माहिती नसते ती. पाहिलं तर मुलींना खेळण्याचासुद्धां कंटाळा ! कधीं बसल्याच तर बसतील आजीबाईसारख्या गोष्टी बोलत. आमचं मुलाचं अगदींच असं नसतं बुवा. आतां

आपलीं कांहीं असतात तशीं कीं जीं पहाटे दोन वाजल्यापासूनच घोकत बस-तात. पण अशीं मुलं फार थोडीं. आह्मीही परीक्षेला नेमलेलीं पुस्तकं वाचतों, पण त्याबरोबरच आमचं इतर वाचनही मुलींच्यापेक्षां ज्यास्त असतं असं मला वाटतं. त्याशिवाय पुन्हा आम्ही बोटिंगला जातों, क्रिकेट खेळतों, म्याचेसला जातों. रविवारीं मित्रमंडळींना बोलावून गप्पागोष्टी करण्यांत वेळ घालवतों. नाटकाला जातों, लेक्चर्सना जातों, वादविवाद करतों, पुष्कळ वेळेला अगदीं मूर्खासारखेसुद्धां वागतों, पण असं करण्यांतसुद्धां कांहीं स्वतंत्रता आहे, लाईफ आहे; नाहीं तर बसलं आहे सारा दिवस टाळक्याला पुस्तक लावून ! अशानें कधीं अभ्यास झाला आहे ? ”

शालिनी हिंडतां हिंडतां एका जाईच्या वेलीशीं थांबून, फूल तोडून म्हणते “ माझं तरी तेंच म्हणणं आहे. अगदीं बी. ए. ची परीक्षा पास झाली, आणि जगाचा जर मुळींच अनुभव नसला तर मनुष्यानें शहाणं व्हावं कसं ? घराच्या बाहेर पडण्याची कधीं संवय नसल्यामुळें फाजील लाजाळूपणा व भ्याडपणा अगदीं जशाचा तस्सा रहातो; आणि म्हणूनच शिकलेल्या मुलींना स्वतांच्या अंगावर जबाबदारी घेऊन कोणतेंही काम करतां येत नाहीं तें. जसें कोणत्याही मुलाला साधारण नेहमीं व्यवहारांत लागणारें घराबाहेरचें काम करतां येतें, त्याचप्रमाणें मुलींनाही आलें पाहिजे. म्हणजेच मुलांप्रमाणें मुलींना प्रत्येक बाब-तींत स्वतंत्रता पाहिजे. आतां कोणी म्हणेल, कीं, अशी जर स्त्रियांना वाटेल त्या वेळीं वाटेल तिथें जाण्याची मोकळीक दिली, तर त्यांचा चांगला परिणाम होणार नाहीं; पण तसं होण्याचं कांहीं कारण नाहीं. कारण, मुलांना स्वतंत्रता दिली असतां सगळींच मुलें वाईट निघतात असें नाहीं; मग मुलींच कां वाईट व्हाव्या ? ” शालिनी थोडा वेळ थांबून ह्मणते. “ हें असं तरी किती दिवस चालणार आहे ह्मणा ! या गुलामगिरीच्या चाली कधीं तरी अगदीं नाहींशा झाल्याच पाहिजेत; आणि स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य मिळालें पाहिजे. त्याशिवाय आतां गत्यंतर नाहीं. आणि केव्हांना केव्हां तरी शिक्षणाचा शेवट तिथेंच होईल यांत संशय नाहीं. ”

“ असं होईल यांत शंकाच नको. स्वतंत्रता पाहिजेच. स्वतंत्रतेशिवाय आतां चालावयाचें नाहीं. स्त्रियांना नुसतें लिहितां वाचतां आलें ह्मणजे पुरें झालें, असें आतां लोकांनीं समजतां कामा नये. ” कमलाकर थोडासा विसावा घेऊन ह्मणतो. “ पण खरं पाहिलं तर शालिनीबाई, यासंबंधीं आतां स्त्रियांनींच चळवळ करा-यला पाहिजे. निव्वळ पुरुषांवर विसंबून भागणार नाहीं. नागरीक या

नात्यानें पुरुषांना जे हक्क असतात, तेच स्त्रियांना पण असावेत. पण यासंबंधीं स्त्रियांनीं स्वतः कांहीं तरी खटपट केली पाहिजे, त्याशिवाय कसं होईल ?"

"हो करायला पाहिजे. पण अजून स्त्रियांना त्याचें महत्वच कळत नाहीं. तर त्या चळवळ कुठल्या करायला ? पुरुषांनींच त्यांच्या मनांत हे विचार भरवून दिले पाहिजेत. आतां शिकलेल्या स्त्रियांनीं राजकीय बाबतींतही मन घातलें पाहिजे, पण तें कसें होणार ?"

"तुह्मीं स्वतः राजकीय विषयांत कां नाहीं मन घालीत ?" कमलाकर ह्मणतो.

"आतां मी कां नाहीं घालीत ह्मणजे काय ? प्रत्येकाच्या आवडी निराळ्या असतात एवढाच त्याचा अर्थ. प्रत्येकाच्या मनाचा कल निराळा असतो. ज्याला जें काम आवडतें, तें त्याच्या हातून उत्तम होतें. माझं स्वतांचं पाहिलं, तर मला राजकीय विषयापेक्षां सामाजिक आणि नैतिक विषयांचा विचार करणेंच ज्यास्त आवडतें. स्त्रियांच्या हक्काची नेहमीं ओरड चाललेली असते. अर्थात् स्त्रीस्वातंत्र्य–संघ आणि त्यासारख्या इतर संघाची मी सभासद आहें; त्यांच्या यादीवर शिकलेल्या स्त्रियांचीं नांवें असल्याखेरीज त्यांना मुळींच महत्व येणार नाहीं. आम्हांला कौन्सिलच्या सभासदांच्या निवडणुकीमध्यें निवडून येण्याचा अधिकार असावा याबद्दल सध्यां चळवळ करणें जरूरीचें आहे खरें. तरी त्या चळवळींत मला विशेष भाग घेण्यास उल्हास वाटत नाहीं. कारण तो अधिकार गाजविण्यास स्त्रियांची अजून उन्नति झाली नाहीं. तो अधिकार गाजविण्यास त्यांचें शिक्षणही तसें झालेलें नाहीं. आज ज्यांना सभासदांच्या निवडणुकीमध्यें निवडून येण्याचा अधिकार असावा अशा फारच थोड्या स्त्रिया असतील. सध्यां स्त्रिया सामाजिक आणि धार्मिक निर्बंधाखालीं अगदीं दडपून गेल्या आहेत तें दडपण नाहींसें करणें हें आमचें पहिलें जरूरीचें काम आहे, असें मला वाटतें."

बोलतां बोलतां रात्र पडून बाहेर रस्त्यावर दिवे लागलेले सुद्धां त्यांच्या लक्षांत आले नाहींत. सावित्रीकाकू, रात्र पडली तरी अजून हीं दोघेजण घरांत कशी येत नाहींत असें वाटून बाहेर बागेंत आल्या तों मोठमोठ्यांदा बोलण्याचा आवाज त्यांच्या कानावर आला; आणि त्या शालिनीला हांक मारून ह्मणाल्या, "अग, शालिनी, रात्र झाली तरी अजून घरांत यायची वेळ झाली नाहीं का ? विंचू काट्याची वेळ ! कांहीं चावलें बिबलें तर !"

" सावित्रीकाकूंचा आवाज ऐकल्याबरोबर, दोघेंही भानावर येऊन चट्दिशीं घरांत आलीं. कमलाकरानें बंगल्याच्या पायऱ्या चढतां चढतां सावित्रीकाकूंना विचारिलें " हरीकाका आले कीं काय ?

" अरे घरीं अजून यायचं नाहीं झालं; पण रात्रीच्या वेळेला बाहेर तरी काय बसायचं ? "

शालिनी म्हणते " काकू वादांत किती वेळ झाला, हें आम्हांला कळलंच नाहीं हो. म्हणून आह्मी बाहेर बसलों. "

काकू आपल्या उजव्या हाताला जरा हिसका देऊन म्हणतात ' कसला नेहमीं डोंबल्याचा वाद घालतां कोणास ठाऊक ! आपला सदा सर्वकाळ वाद ! आहे तरी काय मेल्यांनो ! आमच्या वेळेस कधीं वाद नसत, आणि तुमच्याच वेळेस कोठून इतके वाद झाले आहेत !

कमलाकर डोळे मिचकावून म्हणतो, ' काकू हा सगळा कलीचा महिमा बरं !'

' खरंच, आतां तूं आपली पाहिजे तर कर माझी ह्यातारीची थट्टा, पण हा सगळा कलीचाच महिमा यांत मुळींच संशय नाहीं ' असें काकू बोलताहेत तोंच हरीकाका आले. त्यामुळें त्यांचा वाद तिथेंच राहिला. काकू स्वयंपाकघरांत पाटपाणी करायला गेल्या. रात्रींची जेवणें वगैरे होऊन थोड्याफार गप्पा झाल्यावर जे ते आपआपल्या खोलींत निजण्यास गेले. रात्रीं जेवायच्या वेळेसच शालिनीनें आपला दुसऱ्या दिवशीं झोपडींत जाण्याचा बेत सगळ्यांना सांगितला होता. त्या वेळेपासूनच कमलाकराची वृत्ति जरा बदलली होती. आतां शालिनी गेली ह्मणजे आपल्याला इथें मुळींच चैन पडणार नाहीं. असें त्याला एकसारखें वाटत होतें. शालिनीचा ममताळूपणा, मनमोकळेपणा आणि मनमिळावूपणा पाहून त्याच्या मनांत तिच्याविषयीं एक प्रकारचा आदर उत्पन्न झाला होता. त्याला एकदां असेंसुद्धां वाटलें कीं, आपण तिला तूं उद्यांच जाऊं नको. आणखीं चार पांच दिवसांनीं जा ' असें म्हणावें परंतु त्याच्याच्यानें तसें ह्मणवेना. कदाचित् शालिनीला आपण तसें ह्मटलेलें आवडणार नाहीं असें त्याला वाटलें; आणि शेवटीं शालिनी आपल्या खोलींत निजायला गेल्यावर, तसें तिला विचारणें तर अगदींच अशक्य झालें. तेव्हां कमलाकरही कसाबसा आपल्या अंथरुणावर जाऊन पडला.

दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं शालिनी आपल्या घरीं जाण्यास ह्मणून निघाली. जातांना तिनें हरीकाकांचा व सावित्रीकाकूंचा निरोप घेतला; आणि कमलाकराचा

निरोप घेण्यास ह्मणून ती त्याच्या खोलींत गेली. तेव्हां कमलाकर एक पुस्तक वाचीत आपल्या पलंगावर पडला होता. शालिनी खोलींत आल्यावर तो पलंगावरून उठून म्हणाला ' का तुह्मी चाललांतच मग ? '

' ह्मणजे मी इथेंच रहावें कीं काय आतां ! ' शालिनी म्हणाली.

कमलाकर यावर कांहींच बोलला नाहीं. थोडासा हंसला मात्र.

' बरं जातें मी आतां. तुह्मी आलां कधीं फिरायला त्या बाजूला तर या माझ्याकडे ' शालिनी म्हणाली. ' हो येईन. पण तुह्मी कुठें राहतां तें मला बरोबर माहीत नाहीं. ' कमलाकर ह्मणाला.

' एवढंच ना. मी सांगतें तुह्मांला खूण. गणेशखिंडचा रस्ता असेलच तुह्मांला ठाऊक. त्या रस्त्यानें आपण जाऊं लागलों ह्मणजे डाव्या हातालाच झाडींत मोडकळीस आलेला एक बंगला आहे. त्या बंगल्याच्याच पाठीमागल्या बाजूला जी झोपडी दिसते, तिथेंच मी रहातें. '

' मग आतांच तुमच्या बरोबर येऊन मी पाहून आलों तर तुमची झोंपडी ? '

' कांहीं हरकत नाहीं. तुह्मी येत असाल, तर फारच चांगलं. मला तरी इतक्या लांब एकटीला जायचा कंटाळाच आला आहे. '

शालिनीनें एवढें नुसतें ह्मणण्याचाच अवकाश तोंच कमलाकर आपली कोट टोपी घालून तिच्याबरोबर जाण्यास निघाला. तीं दोघेंजणें केव्हांच बोलत बोलत वाट चालून गेलीं, तें त्यांना कळलेंसुद्धां नाहीं. झोंपडीपाशीं गेल्यावर तेथेंच बाहेरच्या बाजूला अंबराईत एक बांक टाकलेलें असे त्या बांकावरच तीं दोघें बसलीं. कमलाकरानें एका आंब्याच्या झाडाच्या एक दोन कैऱ्या पाडल्या. शालिनीनें घरांत जाऊन मीठ आणलें. तीं दोघेंही कैऱ्या कापून खाण्यांत व बोलण्यांत अगदीं गर्क झालीं होतीं. त्या आंबराईच्या जवळच एक फुलांचा मळा होता. मळ्यांत मोट चालू होती. चार पांच कुणब्याच्या बायका एकमेकींशीं बोलत फुलझाडांना पाणी घालीत होत्या. शालिनीच्या झोंपडीजवळ चार पांच बंगले होते, तरी ते वरेंच दूर होते. ते पाहून कमलाकर ह्मणाला, "शालिनीबाई, तुह्मींच ह्मणून येथें एकट्या राहतां; नाहीं तर दुसरी कोणी बाई कांहीं इथें राह्यला धजायची नाहीं. हें इथें तर अगदीं निर्जन अरण्यासारखें आहे.

शालिनी ह्मणते " तशी मी कांहीं अगदींच एकटी नसतें. त्या कुणब्याच्या बायका, त्या मळ्यांत काम करताहेत त्या, त्या रात्रींच्या येथेंच माझ्या झोंपडींत

येऊन निजतात, आज दोन तीन वर्षें दर मे महिन्यांत मी येथें येऊन रहातें त्यामुळें त्यांची व माझी चांगलीच ओळख झालेली आहे. ” शालिनी आपल्या पायाच्या आंगठ्यानें जमिनीवर कांहीं तरी रेघोट्या काढीत कमलाकराला ह्मणते “ कमलाकर, मी येथें एकटी रहातें हें तुह्मांला जरा चमत्कारिक वाटतें, असं दिसतं. कारण तुमचा एकंदर विचारण्याचा रोख कांहीं निराळाच दिसला. ”

‘ नाहीं, नाहीं, तसं कांहींच नाहीं. तुमचा कांहीं तरीच समज झाला, मला तर मुळींच चमत्कारिक वाटलें नाहीं. उलट तुमच्या धीटपणाचें कौतुक वाटलें. कारण आपल्या मताप्रमाणें अगदीं तंतोतंत वागणारीं माणसं आपल्यांत फार थोडीं असतात. ’

शालिनी ह्मणाली, त्यांत मोठंसं कांहींच नाहीं. कारण तसं वागण्याचं वळण मला लहानपणापासूनच लागलं आहे. आमच्या आबांनीच मला तसें वागण्यास शिकविलें आहे; आणि म्हणूनच माझीं मतें जरी आबांना पटत नाहींत, तरी त्यांनीं त्याबद्दल मला कधींही त्रास दिला नाहीं. ते तसे फार विचारी आहेत; पण अलीकडेच त्यांची वृत्ति जरा बदलली आहे. त्यांनीं अलीकडे बहुतेक आपलें वाचन वगैरे सोडून दिलें आहे, त्यामुळें त्यांना असं वाटतं कीं, आपण जितकें सुधारणेंत पुढें गेलों आहोंत, तेथपर्यंतच बाकीच्या लोकांनीं जावें; आणि तितकें जाणेंच हितकर आहे. आमचे आबा प्रार्थनासमाजिस्ट कसे झाले, याचेंच मला आश्चर्य वाटतें. पण त्यांचें अगदींच व्यावहारिक लोकांच्यासारखें नाहीं, एवढें बरें आहे. नाहीं तर या लोकांना विचार ह्मणजे काय असतो याची जाणीवच नसते. पण ज्यांना एकदां विचार करण्याची संवय लागली आहे, ते नेहमीं जगाच्या आदितत्त्वांचा विचार करून खऱ्याच्या पाठीस लागतात; आणि त्यांतले कांहीं मग एकेश्वरी पंथाचे बनतात, तर कांहीं अगदीं स्वतंत्र विचारी बनतात. ”

“ मनुष्य विचारी असला ह्मणजे मग त्यांच्याशीं कोणाचेंही तेव्हांच पटतें. ” कमलाकर ह्मणतो.

“ हो. हो. मग पुष्कळ वेळां त्याची तीं आपलीं मतें अगदीं भिन्न असूनसुद्धां आपलें नी त्याचें चांगलें पटतें. पण अविचारी माणसाशीं सलगी होणें फार कठीण ! ” शालिनी म्हणते.

‘ तुह्मीं त्यांना मूर्ख समजतां, पण ते तुम्हांला मूर्ख समजून तुमच्यापासून होईल तितके दूर रहातात. त्यांना असं वाटतं कीं, न जाणो कदाचित् आपण यांच्या जाळ्यांत सांपडलों; आणि आपला सगळा सत्यनाश झाला तर काय करा ! तर आपले दोन पावलें दूर असलेलें बरें. ”

'पण असें ते आमच्यापासून किती दिवस दूर रहातील ? कधीं ना कधीं तरी ते आमच्या कक्षेंत आल्यावांचून रहात नाहींत.'

यावर कमलाकर कांहींच बोलला नाहीं; त्यानें पश्चिमेकडे पाहिलें, तेव्हां सूर्य अगदीं क्षितीजाखालीं चालला होता. फक्त सूर्याचा लाल प्रकाश काय तो आसपासच्या झाडांच्या फांद्यावर दिसत होता. इतकी संध्याकाळ झालेली पाहून कमलाकर ताबडतोब जायलाच निघाला. शालिनीनें कमलाकराला जातांना पाहून म्हटलें 'बरं पण आतां पुन्हां केव्हां याल ?'

कमलाकराला शालिनीचा हा प्रश्न ऐकून थोडेसें समाधानच वाटलें. तरी पण त्यानें तसें वर दिसूं दिलें नाहीं. शालिनीनें केव्हां याल ? असें विचारल्यावर त्यानें 'मी का ? येईन असाच केव्हां तरी.' असें उडवाउडवीचें उत्तर दिलें.

पण शालिनीचें या उत्तरानें समाधान न होऊन ती हलकेच म्हणाली 'असं का ? एकदां नेमका दिवस नाहीं का सांगतां येणार ?

'येईल. तसं सांगतां येणार नाहीं असं नाहीं कांहीं.' 'बरं पण तुह्मी आणखी येथें किती दिवस आहांत ?'

'मी का ? मी आणखी जवळ जवळ एक महिना तरी आहे.'

'हो ना ? मग काय लागेल तितक्या वेळां येईन. पण एवढंच कीं, मी नेमका दिवस सांगत नाहीं. कारण नेमका दिवस सांगितला, आणि नाहीं आलों तर ?

'बरं पण' शालिनी म्हणाली 'जेव्हां याल तेव्हां दुपारीच या, सकाळीं किंवा संध्याकाळीं येऊं नका. कारण त्या दोन्ही वेळेला मी कुठें तरी बाहेर जातें.'

'बरं मग मी परवां दुपारीच येईन; आणि मग आपण दोघेंही बरोबर फिरायला जाऊं, कमलाकर ह्मणतो. 'बरं कांहीं हरकत नाहीं. पण मी तुमची इथें वाट मात्र पाहीन हो. तेव्हां यायला विसरूं नका.' 'नाहीं. नाहीं. विसरेन कसा! बरं पण आतां जातों काकू वाट पहातील.' असें ह्मणतच कमलाकर निघून गेला. शालिनी तेथेंच दाराच्या फाटकाशीं किती वेळ तरी उभी होती. कमलाकर अगदीं दिसेनासा झाला, तरी ती आपली तिथेंच कमलाकर ज्या बाजूनें गेला त्या बाजूकडे पहात उभी होती. घरांत जाण्यास तिचें मन कांहीं घेईना. पण अगदींच जेव्हां काळाकुट्ट अंधार पडला, तेव्हां ती मोठ्या कष्टानें मंद मंद पावलें टाकीत आपल्या झोंपडींत गेली.



---

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
नं. १०१४

## प्रकरण दुसरें.

कमलाकर शालिनीकडून निघाला तेव्हां जवळजवळ रात्रच झाली होती असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. तो अगदीं झपाझप पावलें टाकीत घरीं चालला होता. या वेळेस घर गांठण्यापलीकडे त्याच्या मनांत दुसरा विचार नव्हता. काका घरीं येऊन आपली वाट पहात बसले असतील, असें एकसारखें त्याला वाटत होतें. आपण त्यांच्या आधीं घरीं असलेले बरें, त्यांना आपल्यासाठीं वाट पहायाला लागूं नये, अशी त्याची नेहमीं फार इच्छा असे. पण आज तसें होत नाहीं, असें वाटून त्याला एकसारखें वाईट वाटत होतें. त्याचें पावलापाठीमागून पाऊल झपाझप पडत होतें. तरी आपण सावकाशच चाललों आहों, असें त्याला एकसारखें वाटत होतें. आपला चालण्याचा वेग किती वाढवूं आणि किती न वाढवूं असें त्याला होऊन गेलें होतें. शेवटीं एकदां किती वाजले तें पहावें असें मनांत येऊन तो आपलें घड्याळ पहाण्यासाठीं रस्त्यावरच्या एका कंदिलापाशीं उभा राहिला. त्यानें आपलें खिशांतलें घड्याळ काढून तें कंदिलाच्या उजेडांत धरलें; आणि आपले डोळे थोडे आकुंचित करून तो त्या घड्याळांतल्या कांट्याकडे पाहूं लागला. इतक्यांत त्याच्या अगदीं शेजारून एका व्हिक्टोरियांतून कोणी आपल्याला हांक मारली, असें त्याला वाटलें. म्हणून त्यानें त्या व्हिक्टोरियांत कोण आहे हें पाहण्यासाठीं तिकडे जरा बारकाईन पाहिलें. इतक्यांत ती व्हिक्टोरियाच कमलाकर उभा होता त्या कंदिलापासून दोन पावलांच्या अंतरावर उभी राहिली. आणि आंतल्या गृहस्थानें आपलें डोकें अर्धवट बाहेर काढून कमलाकराला हांक मारली व म्हटलें,—“ चल, चल, लवकर आंत बैस. मी आपला सहज इकडे फिरायला आलों होतों ह्मणून बरं झालं ! नाहींतर आतां तुला घरीं यायला किती वेळ लागला असतां ! ” असें ह्मणून त्या गृहस्थानें हातानें खूण करून कमलाकराला सीटवर बसण्यास सांगितलें. कमलाकराला गाडींत कोण होतें तें दिसलें नाहीं; तरी त्यानें हरीकाकांचा आवाज तेव्हांच ओळखला. आणि तो झटदिशीं गाडीपाशीं गेला. कमलाकर गाडींत बसल्यावर हरीकाका ह्मणतात. “ माझं लक्ष तुझ्याकडे गेलं ह्मणून ! नाहींतर आतां किती चालत यावं लागलं असतं तुला ! सायकल आहे; मग असा पायीं कां जातोस फिरायला ? सायकलवर जावं, थोडा वेळ हिंडावं फिरावं, आणि पुन्हा सायकलवरूनच परत यावं. ”

हो. नेहमीं मी तसंच करतों. पण शालिनीबाईच्या बरोबर दुपारींच मी इकडे आलों होतो. त्यामुळें..."

"अरे हो! तें मी अगदींच विसरलों होतों. ' हरिकाका जरा हंसत हंसत ह्मणाले.' मग काय आमची शालिनी तुला पसंत पडली तर? पहा बुवा असलं मनांत तर घेऊं यंदां उरकून. सध्यां लग्नाचेच दिवस आहेत, मुहूर्ताला कांहीं तोटा नाहीं. बोल, असलं मनांत तर लाजूं नकोस. आमची शालिनी चांगली आहे. हुशार आहे. शिकलेली आहे. सुरेख आहे. कुठें नांव ठेवायला काडीइतकीसुद्धां जागा नाहीं. तुझं पण आतां शिकणं सवरणं सगळं झालं आहे. धंदा करूं लागला आहेस. आतां जम बसायचा तेवढा राहिला आहे. पण त्याचं कांहीं एवढं मोठसं नाहीं. तो बसतां बसतां बसेल आपोआपच."

कमलाकर यावर काय बोलणार! तो आपला गप्प बसला होता. इतक्यांत गाडी पण फाटकाच्या दाराशीं येऊन थांबली. त्यामुळें हरीकाकांचें बोलणें तेथेंच थांबलें. नाहींतर आणखीसुद्धां कांहीं वेळ चालू राहिलें असतें. कमलाकराचें शालिनीशीं लग्न व्हावें असें त्यांच्या मनांत फार होतें आणि त्याबद्दल त्यांची बरीच खटपटही चाललेली असे. मुख्य अडचण होती ती ही कीं, शालिनीचे वडिल तिच्या बाबतींत आतांसे मुळींच मन घालीत नसत. कोणी त्यांच्याजवळ शालिनीच्या लग्नासंबंधानें गोष्ट काढलीच तर ते साफ सांगत कीं, 'माझं तें काम नाहीं. तुह्मी तिला विचारा नी काय पाहिजे तें करा' असा आबांच्याकडून हरीकाकांनाच एकदां जबाब मिळाला होता. तेव्हां हरीकाकांनीं स्वतःच एक दिवस शालिनीजवळ ही गोष्ट काढली. त्या दिवशीं शालिनी कसलेसें पुस्तक कमलाकराला देण्याकरितां ह्मणून हरीकाकांच्या घरीं आली होती. तेव्हां परत जातांना तिनें सहज हरीकाकांच्या खोलींत डोकावलें. हरीकाका आपल्या खुर्चीवर स्वस्थ विचार करीत पडले होते. शालिनीला खोलींत डोकावतांना त्यांनीं पाहिलें. कारण ते अगदीं दारासमोरच बसले होते. त्यांनीं शालिनीला आंत हाक मारिली आणि "कां कोणीकडे आली होतीस?" वगैरे चौकशी केली.

शालिनीनें "कमलाकराला, एक पुस्तक द्यायला आलें होतें." ह्मणून सांगितलें,

"मग बैस. कांहीं लवकर जाण्याची घाई नाहीं ना?" असें विचारीत हरीकाकांनीं शालिनीला आपल्या शेजारच्या खुर्चीवर बसण्यास सांगितलें. शालिनीच्या पण मनांत आज हरीकाकाशीं गप्पा मारण्याचें आलें होतें. तेव्हां तीही कांहीं फारसें आढेवेढे न घेतां बसली.

" अलीकडे तूं कमलाकराकडे ह्मणून आमच्या इथें वारंवार येतेस, नाहींतर कांहीं आमच्या इथें यायचं नाहीं ना ? " हरीकाका जरा चेष्टा करण्याच्या उद्देशानें ह्मणाले.

" नाहीं. तसं नाहीं कांहीं. मी दोघांच्याहीकडे आलें होतें. "

" हो. हो. दोघांच्याहीकडे आली होतीस तर ! उगीच खोटं कशाला बोलींवं शालिनी ? "

" खरंच मी खोटं बोलत नाहीं. "

" बरं तें जाऊं दे. खरं किंवा खोटं तें तुझं तुझ्यापाशीं. आम्हांला काय त्याचं. पण कमलाकराची नी तुझी ओळख लवकर होईल ह्मणून मी ह्मटलं होतें तशी झाली कीं नाहीं ? "

" हो झाली खरीच आणि तुह्मी ह्मणत होतां त्याप्रमाणेंच त्यांचा स्वभाव पण आहे. माझं नी दुसऱ्या कोणाचं आजपर्यंत इतकं कधींच जमलं नव्हतं, तें ह्यांच्याशीं मात्र जमलं यावरून त्यांचा नी माझा स्वभाव तरी जवळ जवळ सारखाच आहे यांत संशय नाहीं. "

काका आपली मान थोडीशी हालवून ह्मणतात. " नाहीं. तो मुलगाच तसा गोड स्वभावाचा आहे. तो उगीचच्या उगीच कोणाचें कधीं मन दुखवणार नाहीं. कोणाला कधीं टाकून बोलणार नाहीं. कांहीं नाहीं. पुन्हा तो तसाच चांगला हुशार आहे. त्याचें घराणेंही चांगलें नांवाजलेलें आहे. सगळं कांहीं आहे. पण एक गोम आहे. आणि ती कुठें ह्मणशील तर थोडासा त्याचा स्वभाव चमत्कारिक आहे. कांहीं कांहीं मतं तर त्याचीं फारच चमत्कारिक आहेत. बाकी सगळं ठीक आहे. त्यांतून आतां विलायतला जाऊन ब्यारिस्टरही होऊन आला आहे. सगळं कांहीं चांगलं आहे. पण आजपर्यंत तुझ्या वडिलांनीं मनांत घेतलं नाहीं ना ? नाहीं तर आज कशी तूं आपल्या सासरीं चांगलीं नांदली असतीस. पण ते काय डोक्यांत राख घालून बसले आहेत कोणास ठाऊक ! ते आतां आपले मुळींच मुलीकडे लक्ष देतनासे झाले ! "

" काय लक्ष द्यायचं आहे ? शिक्षण द्यायचं तें दिलं त्यांनीं. आणखी तें काय करायचं ? "

" असं कसं ह्मणून चालेल ! " हरीकाका कपाळाला जरा आंठ्या चढवून ह्मणाले. " मुलींच्या लग्नाची जबाबदारी बापाच्याच अंगावर असते ना ! मुली

जात्याच फार भिडस्त स्वभावाच्या ! मग त्या आपल्या लग्नासंबंधीं आपण होऊ-नच कशी बरं गोष्ट काढताल ? ”

“ कां ? न काढायला काय झालं ? बाकीच्या मुली आपल्या लग्नासंबंधीं बोला-यला लाजत असतील; पण मी कांहीं तशी लाजत नाहीं. मी लाजतें, असं तुम्हांला वाटत असेल तर तें अगदीं चुकीचें आहे. माझे पुढचे बेत तुम्हांला माहीत नाहींत म्हणून उगीच तुम्हाला असं वाटतं. पण मी तुम्हाला सांगतें कीं माझा सध्यां तरी कोणाशींच लग्न करण्याचा विचार नाहीं. ”

असें शालिनी म्हणाली मात्र ! त्याबरोबर म्हाताऱ्यानें ज्या कांहीं कपाळाला आंठ्या चढवल्या ! ते एकदम तिच्या अंगावर ओरडून म्हणाले, “ सध्यां लग्न करण्याचा विचार नाहीं. मग काय म्हातारपणीं लग्न करायचं आहे ? तुम्हीं आतांच्या पोरी अगदींच कांहीं तरी बोलायला शिकलां आहांत. चांगल्या शिक-लेल्या सवरलेल्या म्हणतां आणि असं काय कांहीं तरी वेड्यासारखं बोलतां ? असं वेड्यासारखं बोलूं लागलांत म्हणजे तुम्हाला म्हणावं तरी काय हेंच समजत नाहीं. प्रत्येकाला सध्यां लग्न करायचं नसतें, आणि प्रत्येकाचे पुढचे बेत कांहीं निराळेच असतात आणि काय बेत आहेत म्हणून विचारलें तर ते सांगावयाचे नसतात. ” इतकें म्हणून त्यांनीं आपल्या डोक्यावरून हात फिरवून एक दीर्घ सुस्कारा टाकला, थोडा वेळ तसेच ते कपाळाला आंठ्या घालून दाराबाहेर पहात बसले. नंतर शालिनीकडे पाहून म्हणतात, “ तुझीच एकटीची अशी गोष्ट नाहीं कांहीं, अलकिडल्या सगळ्याच मुलांमुलींचें असें आहे. आणि मला मोठं नवल वाटतें तें हें कीं, आज लग्न करायचें नाहीं म्हणतात, आणि लगेच एक आठ दिवसांत लग्न ठरवून पार ! याला काय म्हणावं ! असं केल्यावर मग लोकांचा विश्वास तरी कसा बसावा ! ”

“ पण मी इतर मुलींप्रमाणें मला कधींच लग्न करायचें नाहीं असं म्हणत नाहीं. मला लग्न करायचं आहे; पण जगाचा लग्न करण्याचा मार्ग निराळा आणि माझा निराळा. ”

“ म्हणजे काय बुवा ? ” हरीकाकानीं एकदम दचकून मोठ्या आश्चर्यानें विचारिलें.

“ तें आतां कशाला सांगूं ? जेव्हां वेळ येईल तेव्हां कळेलच. ” असें म्हणून शालिनी आपल्या बोलण्याचा काय परिणाम होतो तें पाहण्यासाठीं हरीकाकांच्या चेहेऱ्याकडे जरा बारकाईनें पाहूं लागली.

" बरं. बरं. पुरे झालं आज. आतां जा. " असें ह्मणून हरीकाकांनीं तिला जाण्यास सांगितलें.

ह्मातान्याला आपण विनाकारण संताप आणला याबद्दल स्वतःला थोडासा बोल लावीत, तर लगेच ' बरं झालं एकदां. आतां पुन्हा पुन्हा हा विषय तरी काढणार नाहींत ' असें आपल्याशींच ह्मणून मनाचें समाधान करीत शालिनी निघून गेली.

इकडे हरीकाका ' मनू बदलला खास ' असें वाटून आपल्याशींच आश्चर्य करीत खुर्चीवर बसले होते. अखेर ' उगीच मूर्ख पोरगी आहे, कांहीं तरी बडबडते, अजून समज आली नाहीं ' असें ह्मगत ते खुर्चीवरून उठून फिरायला जाण्याच्या तयारीला लागले. असो.

शालिनीला आपल्या झोंपडींत राहण्यास जाऊन आज चार पांच दिवस झाले होते. पण ह्या चार पांच दिवसांत तिच्या जिवाला चैन ह्मणून कशी ती मुळींच नव्हती. ती हातांत वाचावयाला ह्मणून पुस्तक घेई, पण केव्हांच दहा पांच पानें वाचून जाई तें तिचें तिला समजत सुद्धां नसे. आणि मग मधेंच थांबून ' अरे ! मी हें करीत आहे तरी काय ! मी काय वाचलं कोणास ठाऊक ! ' असें आपल्याशींच ह्मणत ती पुन्हां मागील पानें चाळूं लागे. ती पुस्तक वाचावयाला ह्मणून घ्यावयाची पण तिचें लक्ष दुसरीकडेच कोठें तरी भटकत रहावयाचें. तिला निजायला सोबत येणाऱ्या माळणींच्यासुद्धां लक्ष्यांत ही गोष्ट आल्याखेरीज राहिली नाहीं. कधीं रात्रीच्या वेळेस त्या तिच्याशीं बोलत बसल्या तर हिचें मुळीं लक्ष्यच त्यांच्या बोलण्याकडे नसावयाचें. त्यांनीं कांहीं विचारलें तर ही त्यांच्या प्रश्नांचीं कांहीं भलभलतींच उत्तरें द्यावयाचीं; किंवा किती वेळ झाला तरी त्यांच्याशीं एक अक्षर सुद्धां बोलावयाची नाहीं. त्यांच्या तोंडाकडे अगदीं टक लावून पहात बसावयाची. आणि मग मध्येंच ' हें काय ह्मणतां ? ' ह्मणून विचारावयाची. एक दिवस एकीनें तिला विचारलें सुद्धां कीं, " शालिनीबाई, तुह्मी मागच्यावानी आतांशा बोलत कां व नाय ? बापाकडला कागुद बिगुद आला नाय वाटतं ? " तेव्हां तिनें ' माझं कपाळ दुखतंय, आज दोन दिवस झाले; ह्मणून नाहीं बोलत झालं. दुसरं कांहीं सुद्धां नाहीं ' असें सांगून वेळ मारून नेली. पण आज सकाळपासून बरीक तिची वृत्ति बरीच पालटली होती. तिचा चेहरा बराच आनंदित दिसत होता. आज सकाळपासून ती बऱ्याच गडबडींत होती. ठरल्याप्रमाणें आज दुपारीं कमलाकर फिरावयाला जाण्यासाठीं म्हणून

शालिनीकडे यावयाचा होता. त्यामुळें तिच्या वृत्तींत हा इतका फरक पडला होता. शालिनीची रहाणी नेहमींच फार टापटिपीची आणि नीटनेटकी असे. तरी पण आज तिच्या झोंपडींत जरा जास्तच व्यवस्थितपणा आणि टापटीप दिसून येत होती. झोंपडीच्या दारासमोरील बाग अगदीं स्वच्छ झाडलेली दिसत होती. कोठें ह्मटल्या कोठें इतकासुद्धां झाडाचा पाचोळा किंवा इतका कांहीं कचरा पडलेला दिसत नव्हता. झोंपडीच्या अगदीं दारासमोर पाण्याचा सडा टाकून त्यावर अनेकविध रंगांनीं युक्त अशी रांगोळी मोठ्या कुशलतेनें काढलेली होती. झोंपडीच्या दाराला एक फारच सुबक रीतीनें गुंफलेलें मोगरीच्या फुलांचें तोरण लटकत होतें. झोंपडीत शिरल्याबरोबर एक मोठी ऐसपैस खोली दिसे. या खोलीलाच डाव्या बाजूला एक दार असून, या दारांतूनच पलीकडे स्वयंपाकघरांत व निजण्याच्या खोलींत जाण्यास वाट असे. या खोलीच्या मध्यभागीं एक लहानसें राऊंड टेबल असून त्या टेबलाभोंवतीं चार पांच बेंटवुड चेअर्स नीट व्यवस्थीत रीतीनें ठेविलेल्या होत्या. टेबलावर एक स्वच्छ पांढरा रुमाल पसरला असून त्यावर एक चिनी मातीच्या नक्षीदार भांड्यांत एक सुंदर फुलांचा गुच्छ शोभत होता. शालिनी या टेबलाच्या डाव्या बाजूस असलेल्या खिडकीशीं एका कोंचावर बसली होती. या खिडकीपासून रस्त्यावरील फाटक अगदीं जवळ असून तें स्पष्ट दिसत होतें. शालिनी त्या कोंचावर बसून वर्डस्वर्थच्या कविता वाचीत होती. मधून मधून ती एकसारखी फाटाकाकडे पहात होती. पण पुन्हां कोणी न दिसल्यामुळें आपलें पुस्तक वाचण्यांत पूर्ववत् निमग्न होई; किंवा दुसराच कसला तरी विचार करीत स्वस्थ बसे. किंवा मधून मधून उठून फाटकापर्यंत जाऊन दूर रस्त्यावर लांबवर पाहून येई. पुन्हां पुस्तक घेऊन वाचीत बसे. कुठें जरा खुट्ट झालें, कीं, कमलाकर आला असें वाटून ती मोठ्या अतुरतेनें त्या बाजूस पाही. पण पुन्हां कोणी नाहीं, असें पाहून निराश होऊन कोंचावर डोकें टेकून पडे. असें किती वेळ तरी एकसारखें चाललें होतें. शालिनीला कांहीं सुचेना; मन कशाकडे लागेना. कोणाशीं घटकाभर बोलत बसावें तर तसेंही करावेसें वाटेना. वेळ जातां जाईना. अजून दोन वाजावयास वीस मिनीटें कमी होतीं. कमलाकर आतां येईल, मग येईल करतां करतां दोन तर वाजून गेले. आतां बरीक शालिनीच्यानें एका जागेवर बसवेना. ती कोंचावरून उठून इकडे तिकडे येरझारा घालूं लागली. ‘ दोन वाजून गेले. अजून आले नाहींत. कां बरं आले नाहींत ? तसंच कांहीं तरी कारण असेल, ह्मणूनच ते आले नसतील. नाहीं तर असें होणार नाहीं. तेव्हां आपणच तिकडे जाऊन

काय झालं, ते पाहून यावें. ' असें ह्मणून ती बाहेर जावयाला निघणार तोंच बंगल्याच्या फाटकाशीं सायकलच्या बेलचा घणघण आवाज ऐकूं आला. शालिनीनें खिडकीशीं डोकावलें आणि कमलाकर दिसतांच ती झटदिशीं फाटकाचें दार उघडण्यास गेली. कमलाकर घंटा वाजवीत शालिनीकडे पहात हंसत दाराशीं उभा होता. शालिनी फाटक उघडतांना हंसून लाजत म्हणाली, " किती वेळ तरी मी तुमची एकसारखी वाट पहात आहें. ह्मटलं कांहीं तसेंच कारण झालं असेल ह्मणून आला नसाल तर आपणच एकदां जाऊन काय आहे काय नाहीं तें पाहून यावं ह्मणून आतां ही मी निघणारच होतें, इतक्यांत तुह्मी आला.'

' पण मला कांहीं तसा उशीर नाहीं झाला यायला. हीं पहा दोन वाजून पांच मिनिटें झालीं आहेत ' असें ह्मणत कमलाकरानें आपलें खिशांतलें घड्याळ शालिनीच्यापुढें केलें.

' खरंच, मला तर अगदीं खूप वाजले असं एकसारखं वाटत होतें. '

असें बोलत तीं दोघें घरांत गेलीं. जातां जातां कमलाकराचें लक्ष्य दारावरच्या तोरणाकडे गेलें. त्यानें तें जरा न्याहाळून पाहिलें; आणि ह्मटलें ' फारच सुरेख आहे बुवा ! हीं फुलं अशीच जर सतत ताजीं राहतील तर काय बहार होईल ! ह्मणजे मग मला पण तुमच्यापासून एकादं करवून घेऊन खोलीच्या दाराला टांगतां येईल. '

यावर शालिनी कांहींच बोलली नाहीं. ती त्याच्या तोंडाकडे नुसती पहात होती. नंतर तीं आंत खोलींत गेलीं. तेथें उत्तम उत्तम देखाव्यांचीं चित्रें भिंतीला लावलेलीं होतीं. तीं पहाण्यांत कमलाकर अगदीं मग्न झाला. कमलाकराला स्वतःला चित्रकलेचा अतिशय नाद होता. तेव्हां त्यानें तीं सगळीं चित्रें मोठ्या बारकाईनें पाहिलीं. प्रत्येक नवें चित्र त्याला पहिल्या चित्रापेक्षां सरस वाटे. आणि तें पहाण्यांत तो अगदीं गुंग होई. एक चित्र पाहून झाल्यावर तो दुसऱ्या चित्रापाशीं गेला. हें चित्र समुद्राचें होतें. त्यांत समुद्र अगदीं खवळलेला दाखविला होता. त्याच्या उंच उंच लाटा खडकावर जोरानें आदळत होत्या. अशा खवळलेल्या समुद्रांत एक नौका वारा वाहील तिकडे जात होती. या नौकेंत एक सोळा सतरा वर्षांची बाला शांतपणें डोळे मिटून निजलेली होती. तिचे लांब सडक मोकळे केंस वाऱ्यानें भुरभुर उडत होते. तिच्या शेजारींच एक पंचवीस सव्वीस वर्षांचा तरुण आपली सगळी शक्ति एकवटून नौका सीध्या दिशेला नेण्याच्या हेतूनें आपलीं वल्हीं चालवीत होता. पण त्यांत त्याला फारसें

यश येण्याचा संभव दिसत नव्हता. हें चित्र पाहून कमलाकर फारच खूष झाला. आणि त्यानें 'तुह्मी फारच सुंदर चित्रें जमवलीं आहेत' असें ह्मणून शालिनीजवळ तीं कुठें घेतली कशी घेतलीं वगैरे चौकशी करूं लागला. शालिनी इतका वेळ अगदीं गप्प बसली होती. चित्त ठिकाणावर नव्हतें. तिला कमलाकराशी काय बोलावें तें सुचेना. कमलाकरानें कांहीं प्रश्न विचारला तर हिचें कान व गाल लज्जेनें एकदम लाल व्हावेत, त्यानें कांहीं विचारलें तर हिनें लगेच आपली मान वळवून, आपल्या चेहेऱ्यावरचा फरक न दिसावा म्हणून कांहीं तरी धडपड करावी. तिला आपल्याला असें कां करावेंसें वाटतें तेंच समजेना. ती आपल्याकडून कोणत्याही प्रकारची चलविचल झालेली दिसूं नये ह्मणून एकसारखी खटपट करीत होती. तरी पण तिला कांहीं फारसें यश आलें नाहीं. कारण तिच्या चेहेऱ्यावरचा फरक कमलाकराला दिसावयाचा तो दिसलाच. तिचे डोळे प्रेममग्न दिसूं लागले. तिचे गाल एखाद्या गुलाबाच्या फुलाप्रमाणें खुलूं लागलें. तिचा स्वर कंपीत झाला. कमलाकर चित्रें पहात आहे तोपर्यंत आपण चहा करून आणावा असें वाटून ती स्वयंपाकघरांत गेली व तिनें दोन पेले चहा व दोन बशांत थोडें फराळाचें घालून आणलें. नंतर त्या दोघांनीं पुष्कळ इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत चहा घेऊन झाल्यावर शालिनीनें आपल्या पुस्तकांच्या कपाटांतून एक फारच सुबक शेलेच्या कवितांची प्रत काढून त्यांतील कांहीं निवडक कविता मोठ्यांदा वाचल्या. कविता वाचून झाल्यावर, तिनें कमलाकराला आपली बाग पहाण्यास म्हणून बाहेर बागेंत नेलें. पहिल्या प्रथम तिनें आपल्या बागेंतलीं गुलछबूचीं फुलें दाखविलीं. ह्या फुलांना फारच बहार आला होता. प्रत्येक झाडाला पांढरे सफेत गुच्छच्या गुच्छ आले होते. आणि जिकडे तिकडे निशीगंधाचा वास दरवळला होता. शालिनी त्या फुलांच्या ताटव्यांत शिरली आणि तिनें कांहीं ताजीं फुलें तोडून कमलाकराला दिलीं. तीं फुलें हातांत धरून, त्यांचा वास घेत घेत कमलाकर शालिनीच्या पाठोपाठ चालला होता. शालिनी मधेंच म्हणाली, 'आतां इकडे या. इकडे माझीं बदकें आहेत. तीं मी तुम्हांला दाखवतें.' असें म्हणत ती पलीकडे एक तळें होतें त्या तळ्याकडे चालली. कमलाकर तिच्या मागोमाग गेला. शालिनी त्या तळ्याच्या काठांशीं जाऊन उभी राहिल्याबरोबर, तीं सगळीं बदकें पोहत पोहत तिच्या बाजूला झालीं. तें पाहून कमलाकराला फारच गंमत वाटली. तळ्यांत कांहीं कमळें पण उगवलेलीं होतीं. त्यांतली एक दोन शालिनीनें आपल्या स्वतःसाठीं

काढून घेतलीं. नंतर ती कमलाकराला म्हणाली ‘ चला आतां आपण त्या टेकडीवर फिरायला जाऊं. ’ ‘ पण ’ ती मधेंच थांबून म्हणाली, ‘ कमलाकर, माझ्या बागेतलं सगळ्यांत तुम्हाला काय आवडलं ? ’

‘ सगळ्यांत होय ? सगळ्यांत काय बरं ? ’ असें म्हणून त्यानें एकदां सगळ्या बागेवर नजर फिरवून म्हटलें ‘ सगळ्यांत मला हीं गुल-छबूचीं फुलें आणि तीं तळ्यांतलीं बदकें आवडलीं बुवा. संध्याकाळच्या वेळेस त्या तळ्याच्या काठीं बसण्यांत मोठी गंमत वाटत असेल नाहीं ? ’

‘ हो. फारच गंमत वाटते. एकादवेळेस मला फिरायला जायचा कंटाळा आला तर तिथेंच तळ्याच्या कांठीं बसून सगळीं संध्याकाळ काढतें. मुंबईस इतका एकांतवास कधींच मिळत नाहीं त्यामुळें इथें कांहीं दिवस सुटींत राह्यला फार बरं वाटतं. ’

‘ आणि त्यांतल्या त्यांत ही जागा पण फार निवांत आहे. या अंबराईनें आणि या तुमच्या बागेनें तर बंगल्याला फारच शोभा आली आहे. हरीकाकांचा बंगला गांवाबाहेरच आहे, पण तिथें इतकें शांत वाटत नाहीं ’ कमलाकर थोडा थांबून म्हणतो, ‘ बरं पण. आतां आपण फिरायला जायचं ना ? ’

‘ हो जाऊंच. मी घरांत जाऊन तेवढं कुलूप लावून येतें. मग आपण जाऊंच. ’ असें म्हणून शालिनी आपल्या झोपडींत गेली.

कमलाकर तिथेंच बाहेर उभा होता. त्याचें सगळें लक्ष्य शालिनीकडे होतें. ती गेल्यावर कमलाकर म्हणाला किती हिचा हा गोड स्वभाव ! आजपर्यंत तरी आपण इतकी सुरेख आणि सुशील मुलगी पाहिली नाहीं. शालिनी जात्याच सुरेख होती आणि त्यांत आज आनंदाची भर पडल्यामुळें तिचा तो मोहक चेहरा नुकत्याच उमललेल्या गुलाबाच्या कळीप्रमाणें टवटवीत दिसत होता. तिचा पांढरा शुभ्र पोशाख तिच्या निर्मळ व सरळ अंत:करणाची साक्ष पटवीत होता. तिचे विचार, तिचा शांत स्वभाव, तिचें सौंदर्य या सगळ्यांचा कमला-कराच्या मनावर इतका कांहीं चांगला परिणाम झाला होता कीं, तो केव्हांही शांत वेळ मिळाला कीं तिच्याबद्दलचाच एकसारखा विचार करीत बसे. त्या-प्रमाणेंच तो आतां तिच्या स्वभावाबद्दलचा विचार करीत आहे; तोंच शालिनी झोंपडीच्या दाराला कुलूप लावून आली. शालिनी आल्याबरोबर कमलाकर म्हणतो, ‘ चला, कोणीकडे जायचं ? ’

“ त्या पलीकडच्या डोंगरावर जाऊं या. ” असें शालिनीनें डोंगराकडे बोट दाखवून म्हटलें. माझ्या मनांतून आज किती दिवस तरी तिकडे जायचं आहे.

पण एकटं जायला मनच घेत नाहीं. आज अनायासें तुह्मी आलां आहांत तर तिकडेच जावं असं मला वाटतं."

" चला. तिकडेच जाऊं. डोंगरावर गेल्यानें हवा पण मिळेल; आणि व्यायामही आयताच होईल. "

शालिनी जरा हंसून ह्मणाली ' एवढासा डोंगर चढल्यानें व्यायाम तो काय होणार आहे !'

" आतां हें पहा ! कांहींच नाहीं त्याच्यापेक्षां तर बराना ? "

" हो, तें तर केव्हांही आहेच. "

असें बोलत बोलत तीं दोघेंही झोंपडीच्या पाठीमागल्या बाजूनें डोंगराकडे जायला वाट होती त्या वाटेनें जाऊं लागलीं. पायवाटेच्या दोन्ही बाजूला गुडघ्या एवढालें उंच उंच गवत उगवलेलें होतें. त्या गवतावर अस्तास जाणाऱ्या सूर्याचे किरण पडले होते; आणि त्या किरणांत वाळलेल्या गवताच्या लांब लांब पाती चकचक करीत होत्या. जातां जातां शालिनी त्या गवतांत उगवणारीं रानटी पिवळीं व पांढरीं फुलें तोडून घेत होती. आतां संध्याकाळचे साडेपांच वाजले होते. दुपारच्या उन्हाचा रखरख बरीच कमी होऊन सायंकाळच्या समयींचा मंद वारा सुटला होता. त्या वाऱ्यांत गवतांतलीं रानटी पिवळीं फुलें आपलीं डोकीं वर काढून अगदीं तल्लीन झाल्याप्रमाणें डुलत होतीं. अशा शांत वेळीं शालिनी व कमलाकर निरनिराळ्या विषयांवर गप्पा मारीत झपझप पावलें टाकीत चाललीं होतीं. बोलतां बोलतां हरीकाकांच्या विषयीं कांहीं गप्पा निघाल्या. तेव्हां कमलाकर ह्मणाला हरीकाका दुसऱ्यांच्या बाबतींत मन घालतात; आणि मग दुसऱ्यांनीं त्यांच्या मनासारखं केलं नाहीं, ह्मणजे उगीच वाईट वाटून घेतात. सध्यां तुमच्यावर ते बरेच रागावलेले दिसतात. ' शालिनी अगदीं कोणाचं ऐकत नाहीं. तिला आपल्या मनाप्रमाणें प्रत्येक बाबतींत वागायला पाहिजे. मोठीं माणसं म्हणजे कांहींच नाहींत. असें तिला वाटतें. वगैरे वगैरे बरीच आतांशीं त्यांची कुरकुर चाललेली असते. मग तुमचं नी त्यांचं सध्यां कांहीं विनसल्यसारखं झालं आहे कीं काय ! " कमलाकरानें विचारलें.

शालिनी जरा थोडी मान हलवून हंसत म्हणाली. " हं. परवां मी तुम्हाला पुस्तक द्यायला आलें होतें ना ? त्या दिवशीं मी त्यांच्या खोलींत थोडावेळ बोलत बसलें होतें. त्या वेळेस त्यांनीं लग्नासंबंधीं कांहीं गोष्टी काढल्या. तेव्हां माझा नी त्यांचा थोडा खटका उडाला."

" पण " कललाकर म्हणाला " तुम्ही त्यांना काय असं बोललांत तरी ? कीं त्यामुळें त्यांनी इतकं तुमच्यावर रागवावं ? "

" त्यांचा बोलण्याचा रोंख होता सगळा माझ्या लग्नावर. पण तसं कांहीं स्पष्ट बोलत ना. तेव्हां मीच त्यांना एकदां काय स्पष्ट सांगावयाचें तें सांगून टाकलें. म्हटलं पुन्हां पुन्हां त्यांनीं आपल्याला विचारायला नको; नी आपण टाळाटाळी करायला नको. या लोकांना असं वाटतं कीं, एकदां आपल्या मुलां-बाळांचीं लग्नें झालीं म्हणजे झालं सगळं, म्हणून म्हटलं सांगून टाकावं एकदां काय आपल्याला सांगावयाचं आहे तें. "

' तरीच बरं का ते इतके रागावले आहेत ते ! त्यांना स्वतःला मूलबाळ नाहीं. मग त्यांनी लग्न जुळविण्याची आपली हौस तरी कशी पुरवून घ्यावी ? "

" खरोखरच त्यांना माझ्याबद्दल फार कळकळ वाटते; आणि म्हणूनच ते माझं अगदीं आपल्या मुलीप्रमाणें करायला जातात. पण करायचं काय ! ह्या माणसांना स्पष्ट सांगितल्याशिवाय उपायच नसतो. ह्यांना प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याची अशी कांहीं किंमतच वाटत नाहीं. कसं तरी लग्न करायचं पैसा मिळवायचा नी राह्यचं. एवढं त्यांना माहीत. आपण करतों काय ? याचा परिणाम काय होईल ! हें ते मुळींच पहात बसत नाहींत. जें आपण करतों तें रूढीला धरून असलें ह्मणजे झालें. एवढेंच ते पहातात. बरं आपण त्यांना आपले विचार सांगावेत तर ते त्यांना मुळींच पसंत पडत नाहींत. मग करायचं तरी काय !

" तें असंच चालायचं. त्याला कांहीं उपाय नाहीं. पण तुह्मी त्यांना इतक्या स्पष्टपणांनं उत्तर द्याल असं त्यांना वाटलं नसेल. "

" त्यांनीं खरं पाहिलं तर माझ्यापाशीं या गोष्टी काढायच्याच नाहींत. कारण माझा स्वभाव कसा आहे तें त्यांना आज पुष्कळ दिवस माहीत आहे. माझ्या-कडनं असंच कांहींतरी उत्तर मिळेल असं त्यांना वाटायला पाहिजे होतं. "

" पण तुम्ही जशी प्रत्येक गोष्टीची शहानिशा करून मग जें काय करायचं तें करतां, तसे बाकीचे लोक करीत बसत नाहींत. त्यांचा आपला धोपट मार्ग असतो. जशा बाकीच्या मुली स्वतःच्या लग्नासंबंधानें कांहीं गोष्ट निघाली तर कांहींच बोलत नाहींत त्याचप्रमाणें फार झालं तर तुम्ही बोलणार नाहीं असं त्यांना वाटलं असेल. बाकी एवढं खरं कीं, तुम्ही फारच प्रत्येक गोष्टीचा कीस अन् कीस काढीत बसतां. तसं कांहीं बाकीच्या मुली करीत बसत नाहींत. त्या आपल्या वडील माणसं जसं सांगतील तसं करतात. "

"मी सोळा वर्षांची झालें तेव्हांपासून मला विचार करण्याची संवय लागली आहे तेव्हांपासून मी कोणतीही गोष्ट पूर्ण विचार केल्याखेरीज करीत नाहीं. एकदां मनाला अमकी गोष्ट बरोबर आहे असें वाटल्यावर मग मी मागें पुढें पहात नाहीं. जें काय करावयाचें असेल तें बेधडक करून टाकतें. अशा तऱ्हेनें वागायला पहिल्याप्रथम आमच्या आबानींच मला शिकविलें." शालिनी हें सगळें अगदीं सहज सांगत होती. आपली उगीच कांहींतरी बढाई सांगावी म्हणून ती बोलत नव्हती. या वेळेस ती दोघेंजण अर्धा डोंगर चढून वर आलीं होतीं. आपण किती दूर आलों हें पाहण्याकरितां शालिनी मधेंच थांबून मागें वळून पाहूं लागली. आतां त्यांना दूर फिरायला जाणारीं माणसें अगदीं लहान लहान बाहुल्याप्रमाणें नुसतीं इकडून तिकडे तिकडून इकडे चालतांना दिसत होतीं. मधून मधून वाऱ्याच्या झुळकी-बरोबर बोलण्याचा अस्पष्ट ध्वनी ऐकूं येत होता. तीं थोडा वेळ थांबून पुन्हां डोंगर चढूं लागलीं. कांहीं वेळानें तीं अगदीं डोंगराच्या टोंकावर येऊन उभीं राहिलीं, व निवांत बसण्यासाठीं जागा मिळावी ह्मणून इकडे तिकडे पाहूं लागलीं. तों त्यांना अगदीं मागल्या बाजूला गर्दी नाहीं अशा ठिकाणी एक भला मोठा खडक दिसला. त्या खडकाच्या मागें बसावयाचें ठरवून तीं दोघें तिकडे जाऊं लागलीं. खडकापलीकडे खरोखरच फार सुंदर जागा होती. जणूं काय बसण्यासाठीं मुद्दाम दोन दगडाच्या खुर्च्या तयार कराव्या त्याप्रमाणेंच खडक दोन बाजूला फुटला होता; आणि मनुष्याच्या रहदारीच्या बाजूला एक उंचच उंच सुळका गेला होता. बहुतेक लोक या सुळक्यांपर्यंत येऊन मागें फिरत. मुद्दाम त्या सुळक्यावर चढून पलीकडे उतरण्याची कोणी तसदी घेत नसे; आणि लगेच त्या सुळक्याच्या पलीकडेच एक खोल दरी होती. या दरींत खूप मोठमोठालीं बाभळीचीं, बोरीचीं वगैरे झाडें उगवलेलीं होतीं. कमलाकर व शालिनी त्या सुळक्यावरून उतरून त्या दगडाच्या खुर्चीवर जाऊन बसलीं. त्यांच्या समोरच असलेल्या बाभळीच्या फांद्यांमधून त्यांना पलीकडे असलेल्या विद्यालयांची तांबडी कवलारें व त्या तांबड्या कवलाराशीं स्पर्धा करणारीं, शोभेसाठीं लावलेल्या झाडांचीं लालभडक फुलें दिसत होतीं. हीं दोघें त्या डोंगराच्या खडकाआड बहुतेक लपून गेलीं होतीं. तीं कोणाला दिसत नव्हतीं व त्यांना कोणी दिसत नव्हतें. या दोघांचें मोठमोठ्यांदा बोलणें चाललें होतें, तरी तें कोणालाही ऐकूं जात नव्हतें. फार झालें तर त्या खडकापलीकडे असलेल्या

माणसाला येथें जवळपास कोणीतरी कुजबुजतें आहे एवढेंच वाटत असेल. कांहीं वेळ खडकावर बसून विश्रांति घेऊन झाल्यावर कमलाकर म्हणतो, 'तुमच्या त्या कॉलेजांत शिक्षण मोठं चांगलं मिळत असलं पाहिजे असं मला वाटतं.'

'कशावरून ?'

'तुमच्या वाचनावरून; तुमच्या विचार करण्याच्या पद्धतीवरून; आणि एकंदर सगळ्यावरूनच माझं असं मत झालं आहे.'

'माझ्या अंगीं हे गुण आले असले तर ते तिथल्या शिक्षणामुळें आलेले नाहींत. निदान मला विचार करण्याची संवय लागायला तरी निराळेंच कारण झालें आहे. मला अगदीं बरोबर आठवतं कीं, एके दिवशीं आमच्या आबांचं कुठं तरी व्याख्यान होतं; आणि त्या व्याख्यानाला मी गेलें होतें. व्याख्यानाचा विषय 'सत्याची कांस धरली तरच स्वातंत्र्य मिळेल' अशा अर्थाचा कांहीं तरी होता. मी नेहमीं त्यांचें कुठेंही व्याख्यान असलें तरी जात असे. त्याचप्रमाणें त्या दिवशींही गेलें होतें. पण तें व्याख्यान ऐकल्यानें माझ्या मनाला जो एक प्रकारचा हुरुप आणि उत्साह वाटूं लागला आहे तसा त्यापूर्वी कधींच वाटला नव्हता. त्यांच्या त्या दिवशींच्या व्याख्यानाचा ठसा माझ्या मनावर अगदीं पक्का उमटला. मी त्याच दिवसापासून माझें आयुष्यांतलें ध्येय ठरवण्याच्या मार्गाला लागलें. आबानीं आपल्या व्याख्यानांत सांगितल्याप्रमाणें मी सत्य शोधण्याच्या मागें लागलें. नंतर घरीं आल्यावर आबांचें नीं माझें पुन्हां त्याच विषयावर बोलणें निघालें. तेव्हां आबा ह्मणाले. " आपण प्रत्येक बाबतींत सत्य काय, आणि असत्य काय तें शोधून काढलें पाहिजे. एकदां आपण असें करूं लागलों, ह्मणजे आपल्याला या विचारसरणीची इतकी संवय लागते कीं, सत्य सांपडल्याशिवाय आपल्याला चैन पडणार नाहीं, निव्वळ लोक सांगतात त्यावरच विश्वास ठेवून राहूं नये. आपल्या बुद्धीला कांहीं तरी चलन द्यावें; आणि एकदां आपल्याला अमकी गोष्ट खरी आहे ती केलीच पाहिजे. त्या शिवाय उन्नति होणें शक्य नाहीं. असें वाटलें तर काय पाहिजे तें करावें. पण आपला मार्ग सोडूं नये. मग त्यासाठीं कितीही त्रास सोसावा लागला, तरी मी सोशीन आणि तें काम तडीस नेईन; असा आपल्या मनाचा निश्चय करावा; आणि मग आपल्या कामाला लागावें. " यानंतर त्यांनीं सत्य सांपडलें म्हणजे स्वातत्र्यं कसं मिळतें तेंही सांगितलें. मला त्यांचें म्हणणें अगदीं बरोबर वाटलें. कारण मला असें वाटलें कीं, एकदां आपल्याला सत्य सांपडलें कीं, सहजच आपले डोळे उघडून आपण चांगल्या मार्गानें जाऊं लागूं; त्यासाठीं आपल्याला कांहीं कांहीं सामाजिक बंधनें दूर झुगारून द्यावीं लागणार; आणि तसें एकदां आपण सामा-

जिक बंधनांतून मोकळे झालों, म्हणजे आपल्याला स्वातंत्र्य मिळेल असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. हें ज्या दिवशीं आमचें बोलणें झालें, त्या दिवशींच मीं असें ठरवून टाकलें कीं, जर एकादे वेळेस आपणास असें कांहीं कार्य करावेसें वाटलें तर तें मोठ्या नेटानें करावयाचें. हा माझा निश्चय पाहून आवांना फार आनंद झाला. मी वनितावियालयांत असेपर्यंत त्यांचें नीं माझें फार चांगलें जुळे. पण माझ्या इकडे येण्यानें त्यांना फार राग आला आहे. आतां तो केव्हां कमी होईल तो होवो ! मी तेथून विनाकारण निघालें असें त्यांना वाटतें. पण तसें मुळींच नाहीं. माझी खात्री झाली कीं, आतां येथें राहून आपला हेतु सिद्धीस जात नाहीं. तेव्हांच मी तेथून निघालें. मला तर तेथें जखडल्यारखें रहाणें मुळींच बरें वाटेना. म्हणून मी तेथून निघालें यांत मी वाईट तें काय केलें; आणि याबद्दल आवांना इतक राग तो कां यावा ? " असें म्हणून ती आपले दोन्ही हात गालावर टेकून सचिंत बसली. कमलाकर शालिनीचें दुःख कमी करण्याच्या उद्देशानें हलकेच ह्मणतोः—" उगीच कशाला पूर्वीच्या आठवणी करून मनाला वाईट वाटून घेतां; आणि जरी त्यांना राग आला असला तरी तो किती दिवस टिकणार आहे ? कांहीं झालें तरी ते तुमचे वडील आहेत ! केव्हांना केव्हां तरी तुमच्याबद्दल त्यांना प्रेम वाटणारच. " असें म्हणून कमलाकर तिच्या चेहऱ्याकडे पाहूं लागला. पण तो काय म्हणाला याकडे तिचें मुळींच लक्ष नसावें असें दिसलें. कारण ती तशीच पूर्वीप्रमाणें तटस्थ बसली होती. तिचें चित्त दुसरीकडे कोठें तरी भटकत होतें. ती कांहीं वेळ अशी स्वस्थ बसल्यावर एक दीर्घ उच्छ्वास टाकून म्हणते, " मी तुम्हाला उगीचच्या उगीच फार वेळ बोलून त्रास दिला; नाहीं ? माझ्या बोलण्याचा तुम्हांला कंटाळा आला असेल ? बोलतां बोलतां मी अगदींच भान विसरून कांहीं तरी बोलत सुटलें "

" छेः ! छेः ! तसं मुळीच नाहीं. मला कंटाळा तर मुळींच आला नाहीं. उलट तुमची सगळी हकीकत ऐकून बरंच वाटलें. माझ्यावर विश्वास ठेवून माझ्यापाशीं आपलं मन मोकळें केलेंत हें पाहूनच मला बरं वाटलं. "

" मग माझ्या वडबडीनें तुम्हाला कंटाळा नाहीं आला तर ? " शालिनी गद्गद स्वरानें म्हणाली.'

" छेः हो ! कंटाळा येण्याचें काय कारण ? ज्या माणसाबद्दल आपल्याला कांही वाटतं त्या माणसाच्या बोलण्याचा आपल्याला कधींच कंटाळा येत नाहीं. "

" बरं चला. आतां आपण घरी जाऊं. " असें म्हणून शालिनी जागची उठली. कमलाकर शालिनीला तिच्या झोपडीत पोंचवून घरी परत गेला.

———

## प्रकरण ३ रें.

त्या दिवशीं डोंगरावरून आल्यावर शालिनीला तिच्या झोंपडींत पोंचवून कमलाकर घरीं गेला. त्यानें दोन घास कसे बसे खाल्ले असतील नसतील एवढेंच; आणि लगेच तो आपल्या अंथरुणावर जाऊन पडला. डोळे मिटून अंथरुणावर पडल्याला पुष्कळ वेळ झाला; पण झोंप कांहीं येईना. त्याचें मस्तक विचारांनीं अगदीं भडकून गेलें होतें. त्याच्या डोळ्यापुढें शालिनीची मूर्ति तेवढी काय ती दिसत होती. ' आपलें जसें शालिनीवर प्रेम आहे, तसेंच तिचें आपल्यावर असेल का ? आपल्या मनांत जसे तिच्या संबंधीं विचार येतात, तसेच तिच्या मनांत आपल्यासंबंधीं येत असतील का ? हो. आपल्याप्रमाणेंच तिच्या मनांत विचार येत असावेत असें वाटतें. कारण काल आपण तिच्याकडे गेलों, ती आपल्या येण्याची मोठ्या उत्सुकतेनें वाट पहात होती. मला पाहिल्याबरोबर तिची चर्या कशी एकदम प्रफुल्लित झाली. नाहीं, मला वाटतें ती थोडी लाजली देखील. मी तिच्याशीं बोलूं लागलों ह्मणजे तिचे गाल लाल होत, डोळे सतेज, दिसत, ओंठ कापूं लागत, पण तें ती सर्व लपविण्याचा केवढा प्रयत्न करीत होती ! अहाहा ! मला वाटतें तशी तिची स्थिती जर खरीच असेल तर किती गंमत होईल ! पण हें आपल्याला कळावें कसें ? तिनें आपल्या मनांतले विचार स्वतःच सांगितले तरच कळणार. नाहींतर कसे कळणार ? पण तिनें जरी आपल्या मनांतली गोष्ट सांगितली नाहीं, तरी आपल्याला आपली इच्छा काय आहे ती तिच्याजवळ स्पष्टपणें सांगण्यास कोणती हरकत आहे ? तिच्या मनांत असलें तर ती हो म्हणेल; नसलें तर नाहीं म्हणेल. येऊन जाऊन भीति काय ती नाहीं म्हणेल याची. म्हणाली नाहीं तर नाहीं. आपलें नाहीं हें शेवटीं आहेच. पण विचारून पहावयाला कोणती हरकत आहे ? नुसतें मी असें विचारल्याबद्दल तर ती रागावयाची नाही हें खास. कारण, तिला तितकं समजतं आहे आणि त्यांतून मी कांही तिचं कोणत्याच प्रकारें नुकसान करीत नाहीं. मग काय विचारायला हरकत आहे ? ती नाहींच म्हणाली तर आपण आपलं तावडतोब मुंबईला जावं म्हणजे झालं. कारण ती एकदां नाहीं म्हणाली तर आपलं कांहीं मन पुन्हा तिच्याकडे जाण्यास घेणार नाहीं; आणि तसे आपण गेलों नाहीं, ह्मणजे अर्थातच या मंडळीच्या लक्षांत ही गोष्ट आल्याखेरीज

रहाणार नाहीं. आपण शालिनीकडे जाण्याचें सोडलें तर यांना सहजच शंका येईल कीं आतांपर्यंत कमलाकर अगदीं नेमानें शालिनीकडे येत जात असे. आणि आतांच काय झालें ? तर तसें नको. शालिनी ' नाहीं ' म्हणालीच तर ' पुष्कळ राहलों आतां. आला बुवा पुण्याचा कंटाळा. ' असें कांहीं तरी सांगून मुंबईला निघून जावें. पण एकदां शालिनीला विचारून सोक्ष का मोक्ष काय तो एकदां करून टाकावा. म्हणजे मनाची पुन्हा रुखरुख राह्यला नको. ती ' हो ' म्हणालीच तर चांगलेंच आहे. मग माझ्यासारखा सुखी मीच ! ’' अशा विचारांत कमलाकर अगदीं चूर झाला होता. त्यानें दुसऱ्याच दिवशीं शालिनीला विचारून काय तो निकाल लावण्याचें ठरविलें. आतां पुरे झाले हे विचार. आतां झोंप घेतली पाहिजे. असें म्हणून व पायगतचें ब्ल्यांकेट अंगावर ओढून घेऊन तो एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळला. तरी पण त्याला झोंप कशी ती लागेना. पुन्हां पुन्हां त्याच्या मनांत तेच तेच विचार घोळत. सकाळ होऊन आपण एकदां शालिनीकडे जातों केव्हां असें त्याला होऊन गेलें; ते विचार त्याच्या डोक्यांतून कांहीं केल्या जाईनात आणि झोंप कांहीं येईना. बारा झाले, एक झाला, दीड झाला तरी त्याच्या डोळ्याला डोळा म्हणून नाहीं. अखेर तो पलंगावरून उठून खिडकीपाशीं गेला. आणि आपल्या खोलीची खिडकी उघडून तो बाहेर डोकावून पाहूं लागला. बाहेर चांदणें अगदीं स्वच्छ पिठासारखें पडलें होतें. तें चांदणें पाहून कमलाकराच्या मनांत असें आलें कीं, एकदां आपण नुसतें शालिनीच्या झोंपडीपर्यंत जाऊन यावें. म्हणजे आपल्या मनाला जरा बरें वाटेल; आणि बाहेरच्या थंडगार वाऱ्यानें आपलें डोकें पण थोडें शांत होऊन आपल्याला कांहीं वेळ निवांतपणें झोंप येईल. हा विचार मनांत येतांच कमलाकरानें आपला कोट अंगांत घातला आणि डोक्याला टोपी घालून व गळ्याला मफलर गुंडाळून अगदीं पाय न वाजवितां बाहेरच्या जिन्यानें खालीं गेला. बाहेर वऱ्हांड्यांतच त्याची सायकल होती, ती घेऊन बंगल्याचें फाटक उघडून बाहेर पडला.

सुदैवानें काका किंवा काकू कोणीही जागे झाले नाहींत; आणि त्यामुळें कमलाकराला आपल्या मनाप्रमाणें सगळें करतां आलें. पहिल्या प्रथम त्यानें आपली सायकल खूप जोरानें चालविली. पण तो जसजसा शालिनीच्या झोंपडीपाशीं येऊं लागला, तसतसा तो आपल्या सायकलीचा वेग कमी करून

जाऊं लागला. तो शालिनीच्या झोंपडीच्या अगदीं नजीक आला, तेव्हां आपली सायकल एका आंब्याच्या झाडाला टेकून ठेवून, तो येथेंच पलीकडे असलेल्या एका शिळेवर बसला. त्याचें सर्व लक्ष शालिनीच्या झोंपडीकडे होतें. त्यानें पुष्कळ वेळ त्या झोंपडीकडे पाहिलें, पण अशा या अपरात्रीं तेथें बाहेरच्या बाजूस त्याला कोण दिसणार ! एकटी शालिनी ! ती आपल्या बिछान्यावर कमलाकराप्रमाणेंच पडली होती. पण तें कमलाकराला काय ठाऊक ! तो स्वस्थ त्या झोंपडीकडे पहात बसला होता त्याच्या मनांत निरनिराळे विचार येत होते. शेवटीं त्याला असें वाटलें कीं, आपलें जसें मन अवस्थ झालें आहें, तसें शालिनीचे खास झालें नसावें ? कारण, तसें जर झालें असतें, तर तिला खात्रीनें एवढी गाढ झोंप लागली नसती. यावरूनच ती आपल्यावर प्रेम करीत नाहीं. हें सिद्ध नाहीं का होत ? मी आपला वेडा. मला तिचें वेड लागलें आहे; तसेंच तिला पण माझें लागलें असेल असें माझ्या मनानें घेतलें. दुसरें काय ? मनीं वसे तें स्वप्नीं दिसे म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. मी वेडा, मला आतां वेड खास लागणार. असें म्हणून त्यानें एक दीर्घ सुस्कारा सोडला; आणि जड अंतःकरणानें उठून त्यानें आपली सायकल झाडापासून ओढून वर रस्त्यावर घेतली. पुन्हां एकदां शालिनीच्या झोंपडीकडे नजर फेंकली आणि आतां तो पेडलवर पाय ठेवणार, इतक्यांत त्याला आंत झोंपडीमध्यें दिवा लावलेला आहे असें वाटलें त्याबरोबर आपला पेडलवरचा पाय बाजूला घेऊन कमलाकर त्या दिव्याकडे पहात अचंबा करीत उभा राहिला. हें आहे तरी काय ? हिला पण आपल्याप्रमाणचें झोंप नाहीं वाटतं. नाहीं तर इतक्या रात्रींपर्यंत एवढा ढळढळीत दिवा कोण जळत ठेवील ? ती जागीच असली पाहिजे. तिचें मन आपल्याबद्दलच्या विचारांनींच व्याप्त झालें असलें पाहिजे. नाहीं तर त्याशिवाय असें होणार नाहीं. असा त्याचा विचार चालला आहे, तोंच त्याला झोंपडीचें दार उघडल्यासारखें वाटलें. म्हणून तो जरा बारकाईनें तिकडे पाहूं लागला. तों शालिनी त्याला बाहेर येतांना दिसली. त्याबरोबर कमलाकर मनांतल्या मनांत समाधान मानून, आपल्याला शालिनी कदाचित् पाहील, या भीतीनें सायकलवर बसून भरभर पेडल मारीत घरीं परत निघून गेला.

कमलाकरानें दुसऱ्या दिवशींच शालिनीला काय तें विचारून एकदां निकाल लावण्याचें ठरविलें होतें; आणि आतां त्याला शालिनी नाहीं म्हणेल याची पण विशेष भीति वाटत नव्हती. तरी पण दुसरा दिवस उजाडला मात्र; आणि त्याचा

सगळा बेत बदलला. काय होतें तें नुसतें पहावें असें मनांत म्हणून कमलाकरानें आपला विचारण्याचा बेत रहीत केला. यापुढें त्यांची एकमेकांची भेट वरीक वारंवार होऊं लागली. कमलाकराला चित्रकलेचा अतिशय नाद, तेव्हां तो पुष्कळ वेळ शालिनीच्या झोंपडीजवळ असलेल्या टेंकडीच्या पायथ्याशीं चित्रें काढीत वसे. शालिनी पण पुष्कळ वेळां त्याच बाजूला चुकून फिरावयास येई; आणि मग तीं दोघेंजणें किती वेळ तरी एकमेकांशीं बोलत बसत. पहिल्या प्रथम त्यांच्या अशा कधीं कधीं चुकून गांठी पडत. पण पुढें पुढें तीं दोघेजण मुद्दामच एकमेकांना भेटण्यासाठीं त्या टेंकडीवर येऊं लागली. शालिनीचें मन सरळ, तिला असें वाटे कीं, आपलं खरंच जर कमलाकरावर प्रेम आहे, तर तें उघड दाखविण्याची कसली भीति ? आणि प्रेम असून, नाहीं असें दाखविण्यांत तरी काय मतलब आहे; नसतें ढोंग उगीच करा कशाला ? असें वाटून रोज आपली कमलाकराला भेटण्यासाठीं म्हणून डोंगरावर जाऊं लागली. पण आपल्या भोंवतीं केवढा वणवा पेटला आहे, याची बिचारीला कोठें जाणीव होती ? आपल्याला लोक कशीं कशीं नांवें ठेवितात, आपल्यासंबंधीं काय काय नाहीं नाहीं ते बोलतात, याची बिचारीला कल्पनासुद्धां नव्हती. तिला कमलाकराला भेटून चार घटका गंमतींत वेळ घालविण्यास कांहींच हरकत वाटत नसे. पण लोकांना मात्र हें कांहीं तरी भयंकर होत आहे; आणि आतां ही गोष्ट कोणत्या थराला जाईल नी कोणत्या नाहीं असें वाटे; पण याची वार्ता शालिनीला कोठें होती ? आणि जरी यदाकदाचित् तिच्या कानावर ही कुणकुण गेली असती तरी लोक मूर्ख आहेत असें हंसून म्हणण्यापलीकडे ती काय करणार होती ? तरी पण एवढें खरें कीं, त्यानंतर शालिनी बहुतेक रोज कमलाकराला डोंगरावर भेटूं लागली. कधीं कधीं ती मुद्दामच त्याला भेटण्यास म्हणून जात असे. डोंगरावर निवांतपणें बसून ती दोघें पुष्कळ वेळ गप्पा गोष्टी करीत. शालिनीचे विचार कमलाकराला फार पसंत पडत आणि म्हणून तो तिच्याशीं पुष्कळ वेळ बोलत असे. आतांशा त्याला तर शालिनीशीं रोज गप्पा मारल्याशिवाय चैनच पडेनाशी झाली होती. कमलाकर स्वस्थ असला ह्मणजे त्याला शालिनीसंबंधींच्या विचाराखेरीज दुसरें कांहीं सुचतच नसे. आपल्याला तिचे विचार काय आहेत, इच्छा काय आहेत; आशा काय आहेत. तें सर्व कळून चुकलें आहें; असें त्याला वाटे. पण आतां फक्त उघड उघड काय तें कळायचें राहिलें आहे; आणि तें एकदां शालिनी आपल्याला

१९१४

केव्हां सांगेल. याचीच वाट कमलाकर पहात होता. त्याला आज कित्येक दिवस शालिनी आज नाहीं तर उद्यां आपल्या मनांतली गोष्ट आपल्याजवळ सांगेल, असें एकसारखें वाटत होतें. शालिनी आपल्या मनांतली गोष्ट आपल्याला सांगेल या आशेनें कमलाकर रोज सकाळीं आपलें चित्रकलेचें साहित्य घेऊन त्या डोंगराच्या पायथ्याशीं जाऊन चित्रें काढीत बसे. कमलाकर चित्र काढण्यास बसे खरा, पण त्याचें सारें लक्ष शालिनीच्या चाहुलीकडे असे. मधून मधून तो आपला ब्रश थांबवून जवळपासच्या टेकडीवर शालिनीची नाजूक सडपातळ मूर्ती कोठें दिसली तर पहावी, या आशेनें इकडे तिकडे पाही; कधीं कधीं नुसतीच त्याला शालिनी येत असल्याचा भास होई. आणि नुसत्या त्या विचारांनींच त्याची नाडी जोरानें उडूं लागे. हात थरथर कांपून ब्रशाचा फरपाटा कोणीकडच्या कोणीकडे जाई; आणि कपाळावर घर्मबिंदू उभे रहात. कधीं आयुष्यांत न घडलेली गोष्ट आज पहिल्या प्रथमच कमलाकराच्या आयुष्यांत घडत होती; आणि त्यामुळें तो अगदीं भांबावून गेला होता. त्याला अगदीं वेड्यासारखें झाले होतें. तो तरी काय एक मनुष्यप्राणीच; तेव्हां मनुष्यप्राण्याच्या ज्या कांहीं नैसर्गीक इच्छा असतात, त्यांचा केव्हांना केव्हांतरी उद्भव व्हावयाचाच, त्याचप्रमाणें त्याच्या अंतःकरणांत प्रेमाचें बी रुजून त्याला आतां अंकूर फुटूं लागले होते. त्याला आपण कोणावर तरी प्रेम करावें; आणि दुसऱ्या कोणीतरी आपल्यावर प्रेम करावें असें वाटे, आणि आज तो तसा अगदीं प्रेमानें वेडावून गेला होता. त्याला प्रेमाशिवाय दुसरे कांहींही दिसत नव्हतें. जिकडे तिकडे प्रेम ! प्रेम ! प्रेम ! हींच अक्षरें त्याला ठळठळीत अक्षरांत लिहिलेलीं दिसत; आणि "त्या प्रेमासाठीं आपणाला कितीही गरिबींत दिवस काढावे लागले तरी काढूं पण आपलें जसें शालिनीवर दृढप्रेम आहे तसें तिचें मात्र आपल्यावर असलें पाहिजे. तर ही सगळी गोष्ट ! नाहीं तर काय," असे उद्गार त्याच्या तोंडावाटे कधीं कधीं पडत. शालिनी आपल्या मनांतील गोष्ट आपल्याजवळ बोलेल याची कमलाकर आज एकसारखी आठ दिवस वाट पहात होता. पण शालिनी नुसती नेहमींप्रमाणें येऊन भेटे, इकडल्या तिकडल्या गप्पा मारी आणि जाई; झालें. पुन्हां कमलाकराला जें तिनें बोलायला हवें असे तें तसेंच राही; आणि तो निराश होऊन आपल्या घरीं जाई. बरें, आपली इच्छा शालिनीला कळविल्याशिवाय मुंबईस जावें तर तसें करण्यास त्याचें मन घेईना. आजपर्यंत कमलाकराचें कोणत्याही मुलीवर प्रेम बसलें नव्हतें आणि करावयाचा झाला तर प्रेमविवाहच करावयाचा,

नाहींतर लग्नच करावयाचें नाहीं, असा तर त्याचा निश्चय ! आपल्याला लग्न करावयाचें तें कांहीं आपल्या घरांत स्वयंपाक करून घालण्यास हक्काची स्वयंपाकीण असावी ह्मणून करावयाचें नाहीं, किंवा दुसऱ्या कोणत्याही स्वार्थीबुद्धीनें लग्न कसें तरी उरकून टाकावयाचें नाहीं. शालिनीवर आपलें निस्सीम प्रेम आहे, तिचें जर तसेंच आपल्यावर असलें तरच लग्नाची गोष्ट; नाहींतर...काय ?

कोणी आपल्याला असेंसुद्धां म्हणतील, कीं, हे अंगावर जबाबदारी घ्यावयाला भितात. लग्न न करण्याच्या मुळाशीं यांचा स्वार्थीपणाच असला पाहिजे. लग्न केल्यावर खर्च वाढेल. मग आपल्याला चैन करतां येणार नाहीं. आपल्या मागें मुलांचें लेंढार लागेल याची यांना भीति वाटत असावी; आणि म्हणूनच हे राजश्री लग्नाच्या भानगडींत पडत नसले पाहिजेत. नाहीं तर हो काय यांना लग्न न करायला झालें ? असतील झालं खुशालचंद ! दुसरं काय ? ते जसं म्हणतात ‘ आमचं लग्न झाल्यावर मग आमचा खर्च वाढेल. आम्हाला अप्‌टुडेट् फ्याशननें राहतां येणार नाहीं. आणि शेवटीं आमचे लग्नावांचून कुठें नडताहे ? ’ असें जसें ते म्हणतात तसेंच हे सुद्धां म्हणत असतील. कांहीं पाजी लोकांप्रमाणें मीही पाजी असेन, असें पुष्कळांना वाटत असेल. वाटलें तर वाटो बिचाऱ्यांना ! त्याला कोण काय करणार ! माझ्या तर अगदीं रोमरोमांत शालिनीबद्दल ओतप्रोत प्रेम भरलें आहे. माझ्या ध्यानीं, मनीं, स्वप्नीं एक काय ती शालिनी ! आणि तिला कोणत्या तऱ्हेनें सुखी करतां येईल, एवढाच काय तो माझा विचार. पण तिला सुखी करायचा प्रसंग मिळाला पाहिजे, तर हें सगळें; असें ह्मणून त्यानें एक दीर्घ सुस्कारा सोडला; आणि तो आपल्याशींच विचार करीत बसला. इतक्यांत गड्यानें दोन पत्रें आणून दिलीं. त्यांतलें एक शालिनीकडून आलेलें होतें; आणि दुसरें त्याच्या वडिलांचें होतें. कमलाकरानें घाईघाईनें आधीं शालिनीचें पत्र फोडलें. शालिनीचें पत्र खूप लांब लचक असेल; आणि त्यांत आपणाला जें काय समजावयाला पाहिजे तेंही असेल. असें वाटून त्यानें तें पत्र मोठ्या आशेनें फोडलें. पण काय ! पत्र फोडल्यावर त्याची फारच निराशा झाली. शालिनीनें फक्त ‘ आज दुपारीं चहालाच माझ्याकडे या. आपण येथूनच फिरावयाला जाऊं. ” असें लिहिलें होतें. पत्र हातांत धरून कमलाकर कपाळावरून हात फिरवीत तसाच उभा राहिला. थोड्या वेळानें त्यानें हलके हलके आपल्या वडलांचें पत्र फोडून

वाचण्यास सुरवात केली. दोन तीन ओळी वाचून झाल्या; आणि लगेच त्याच्या तोंडून ' काय करावं यांना ? किती वेळां यांना सांगावं, कीं, माझ्यासाठीं मुली पाहूं नका ह्मणून ! तरी यांचं आपलं आहे तें आहेच ! "

असे उद्गार बाहेर पडले. त्याच्या वडिलांच्या पत्रांत असें होतें कीं, ' एक चांगली मुलगी सांगून आली आहे; तर तूं एकदां मुंबईला येऊन मुलगी पाहून जा. ह्मणजे नक्की काय तो बेत करतां येईल ' पत्र वाचून झाल्यावर त्यानें आज दुपारीं काय तें शालिनीला नक्की विचारून वडिलांना पत्र लिहावयाचें असें ठरविलें. ती ' होय ' ह्मणाली, तर तसें लिहावयाचें. ' नाहीं ' म्हणाली तर आपल्याला लग्न करावयाचें नाहीं. तेव्हां मुली पहाण्याच्या भानगडींत पडूं नका; असें चकचकीत लिहावयाचें, असें त्यानें ठरविलें. कोणतीही मुलगी आणि ती कितीही चांगली असली, तरी मला काय करावयाचें आहे ! माझ्या शालिनीची कोणाला सर येणार आहे ! शालिनीचे आचार–विचार किती निराळे ! तिचें वाचन किती दांडगें ! तिच्याशीं लग्न करावयाचें तें निव्वळ सुखासाठीं नाहीं, तर तिच्याशीं लग्न केल्यानें आपली उन्नति व्हावी ह्मणून. आपल्या हातून कांहीं चांगलें काम झालें तर तें तिच्याच मदतीनें होईल, नाहीं तर कांहीं होणार नाहीं. हें मला पक्कें ठाऊक आहे. असे विचार कमलाकराच्या डोक्यांत शालिनीचीं ओळख झाल्या दिवसापासून कित्येक वेळां तरी आले असतील ! आणि शेवटीं या विचारांचेंच रूपांतर शालिनीबद्दलच्या शुद्ध सात्विक प्रेमांत झालें. त्यांत स्वार्थीपणाचा लवलेशही नव्हता. आपल्याला हवें तसें उत्तर मिळेल कीं नाहीं याच भीतीनें कमलाकर विचारूं कीं नको, विचारूं कीं नको असें करीत बसला होता. शालिनी किती शुद्ध अंतःकरणाची ! किती मोहक ! किती सुरेख ! आपण तिला पसंत पडूं का ? नाहीं तर आपण तिला विचारावयाला जावें, आणि व्हावें भलतेंच ! असें न होवो ह्मणजे झालें. आज कांहीं झालं तरी विचारायचंच, मग जें काय होणें असेल तें होईल. असें मनांत म्हणून, शालिनीनें बोलावल्याप्रमाणें कमलाकर दुपारीं तिच्याकडे गेला. चहाचा थाट सगळा गेल्या वेळेप्रमाणेंच होता. चहा घेत घेत कमलाकर शालिनीला ह्मणतो ' शालिनी, आज आपण जरा लवकरच फिरायला जाऊं. म्हणजे बराच वेळपर्यंत आपल्याला डोंगरावर गप्पा मारीत बसतां येईल; आणि रोजच्या-प्रमाणें लवकर परतण्याची घाईही होणार नाहीं.'

" खरंच. तें बरं; ह्मणजे आपल्याला परत फिरतांना नेहमीं कंटाळा येतो तसा कंटाळा तरी येणार नाहीं. चला तर मग आतांच जायचं का ? "

कमलाकर ह्मणतो " किती वाजले ? "

" चार वाजायला आले." शालिनीनें उत्तर दिलें.

चला तर मग आपल्याला बोलत बोलत जायला तितका वेळ लागेलच. शालिनीनें लगेच चहाचीं भांडीं लवकर लवकर धुवून पुसून कपाटांत नेऊन ठेवलीं; आणि तीं दोघें फिरायला जाण्यास निघालीं. आतां नुकते कोठें चार वाजले होते. रस्त्यावर माणसांची, गाड्यांची किंवा दुसरी कसलीच गर्दी नव्हती. आधींच गांवाबाहेरील रस्त्यावर गजबज कमी; आणि त्यांतून फिरायला येणारी मंडळीही अजून आली नव्हती. तेव्हां जिकडे तिकडे फारच सामसूम दिसत होतें. फक्त कोठें कोठें बैलाच्या गाड्या किंवा गुराख्यांचीं पोरें खुशाल आपलीं गुरें रानांत मोकळी चरत सोडून आंब्याच्या झाडावर चढून गाणीं गुणगुणतांना किंवा फांद्यावरून नाचतांना काय तीं दिसत होतीं. कमलाकराचा आणि शालिनीचा आज दूर फिरावयाला जाण्याचा विचार होता. त्याप्रमाणें ती एका दूरच्या डोंगराच्या पायथ्याशीं येऊन पोहोंचली. या बाजूला सहसा कोणीच लोक फिरावयाला येत नसत. डोंगरही चढावयास जरा अवघड होता, वर चढण्यास सुलभ अशी एकही वाट नव्हती. कमलाकरानें वर जाण्यास त्यांतल्यात्यांत सोपी वाट शोधून काढली. जेथें खडक फार उंच असे, तेथें तो प्रथम वर जाऊन शालिनीला हात देऊन वर येण्यास मदत करी. आधी ऊन बरेंच लागत होतें. आणि त्यांत चढण्याचें श्रम झाल्यामुळें शालिनीचा चेहरा अगदीं गाजरासारखा लाल झाला होता. तिचा चेहरा घामानें थबथबला होता. कमलाकराची स्थिती तशीच झाली होती. पण डोंगराच्या माथ्यावर आल्यावर त्यांना किती बरें वाटलें ह्मणतां ! डोंगरावर जिकडे तिकडे बारीक हिरवेंगार गवत उगवलें होतें. तें पहातांच दोघांनाही इतकें वर चढून आल्याचें सार्थक झालें असें वाटलें. तें गवत पहातांच कमलाकरानें तर एकदम त्यावर लोळणच घेतली. शालिनी बरीक तशीच उभी राहून रुमालानें आपल्या कपाळावरचा घाम पुशीत सभोंवार पहात होती; वारा छान सुटला होता. शालिनी किती वेळ तरी उभी राहून सभोंवतालचा रम्य देखावा पहात उभी होती. तें पाहून कमलाकर ह्मणाला, " शालिनी आतां खालीं बैस. डोंगर चढून तूं थकली नाहींस का ?

शालिनी थोडीशी गुटमळत " दमायला काय झालं आहे ?" असें म्हणत कमलाकरापासून थोड्या अंतरावर खालीं बसली.

बराच वेळ झाला तरी कोणीच कांहीं बोलेना. दोघांनाही काय बोलावें तें कळेना. कमलाकर आतां आपण हिला कशा तऱ्हेनें विचारावें ? पहिल्या प्रथम काय ह्मणावें ? असा विचार करीत आकाशाकडे पहात त्या गवतावर पडला होता. शालिनी पण आज कमलाकराची वृत्ति बरोबर नाहीं, त्याच्या मनाची बरीच चलबिचल चालली आहे हें जाणून आणि आतां आपल्याला कमलाकर प्रश्न विचारतील त्या प्रश्नाचें उत्तर कसें द्यावें याचा विचार करीत डोंगराच्या पायथ्यापासून जवळच वहात असलेल्या एका ओढ्याच्या पाण्याकडे पहात बसली होती. बराच वेळ कोणीच कांही बोललें नाहीं. कमलाकराच्या अगदीं ओंठावर शब्द येत, पण पुन्हा ते मागें जात; तो आतां अगदीं विचारायचेंच; आजचा दिवस फुकट घालवायचा नाहीं, असें मनांत ह्मणून शालिनीच्या मुखाकडे अगदी उत्सुक दृष्टीनें पाही. एक मिनीटभर तसाच पाही. पुन्हां मागें घेई. असें दोन तीन वेळां त्यानें केलें. शेवटीं तो घाबरत घाबरत कापऱ्या आवाजांत ह्मणाला, " शालिनी ! " एवढाच एक शब्द त्यानें उच्चारिला; आणि पुढें तो तसाच थांबला. शालिनीनें नुसतें त्याच्याकडे पाहिलें. पण कमलाकराची दृष्टी सगळी जमिनीकडे होती. तो पुढें बोलत नाहीं, असें पाहून शालिनी ह्मणाली "कमलाकर तुह्मी आज असं कां करतां ? मला तुह्मीं कशाला हाक मारलीत ? तुह्मांला कांहीं बोलायचं आहे का ? "

त्याबरोबर कमलाकर ह्मणतो, " हो. आज मला किती दिवसापासून तरी तुला एक गोष्ट विचारायची आहे. पण तूं विचार ह्मणत असलीस तर विचारतों."

शालिनीला कमलाकर आतां काय विचारणार आहे हें जवळ जवळ माहीतच होतें. निदान तिला अगदीं बरोबर जरी माहीत नव्हतें, तरी आपली जी कल्पना आहे तीच खरी ठरणार, असें तिला एकसारखें वाटत होतें. त्यामुळें तिचा श्वासोच्छ्वास जोरानें वाहूं लागला. कमलाकर आतां काय बोलतो हें ऐकण्यास तिचे कान उत्सुक झाले; आणि तिच्या वृत्तींत एकदम इतका फरक पडला कीं, ती थोडीशी भांबावली. त्या भांबावलेल्याच स्थितींत ती कमलाकराला आपल्या कंपीत आवाजांत म्हणाली " काय विचारायचं आहे तें खुशाल विचारा; त्याला माझी परवानगी ती कशाला पाहिजे ? "

" तूं रागावणार नसलीस तर ? "

" नाहीं रागावणार " असें शालिनीनें मान हलवूनच सांगितलें.

त्याबरोबर कमलाकर आपला हात पुढें करून ह्मणतो, ' मला आधीं वचन दे, नाहीं रागावणार ह्मणून, ह्मणजे सांगतों. '

' असं काय कमलाकर ? वचन बिचन कसलं आलं आहे ? मी रागावणार नाहीं असं ह्मटल्यावरसुद्धां माझ्यावर विश्वास नाहीं ? '

' शालिनी तुझ्यावर विश्वास नाहीं ह्मणून का ?...मग विचारूंच तर ? तूं माझी होशील का ? " असें ह्मणून कमलाकर शालिनीच्या उत्तराची वाट पहात बसला. शालिनी इतका वेळ खालीं मान घालून आपल्या समोरील गवत कुरतडीत होती. ती हलकेच आपले डोळे वर करून म्हणाली, ' कमलाकर, आजच काय ! पण आज आठ दहा दिवसापासूनच मी तुमची आहे. पण तुह्मी माझे आहांत कां नाहीं याचीच मला खात्री नव्हती. '

त्याबरोबर कमलाकर झट्दिशीं उठून शालिनीचा हात आपल्या हातांत धरून ह्मणतो " मग हा हात असा माझ्या हातांत घट्ट धरून ठेवण्यास मला कोणाचीच भीति नाहींतर ! "

शालिनीच्या गालावर गुलाबी रंगाची छटा उमटली; आणि ती लज्जित होऊन खालीं मान घालून जमिनीकडे पाहूं लागली. थोडा वेळपर्यंत तीं दोघें तशीच एकमेकाच्या हातांत हात घालून बसलीं होतीं. दोघेंही त्या अनुपम सुखाचा अनुभव घेत होतीं. नंतर थोड्यावेळानें शालिनीचा हात घट्ट आंवळून कमलाकर ह्मणतो " खरोखर शालिनी, आज तूं माझ्यावर केवढें उपकार केले आहेस ! आज तूं मला किती कृतकृत्य करून सोडलें आहेस ! हे दोन आठवडे मला कसं अगदीं वेड लागल्यासारखं झालं होतं. माझ्या डोक्यांत काय नानातऱ्हेचे विचार चालत. तूं मला आज नाहीं म्हणाली असतीस, तर माझी काय स्थिति झाली असती नी काय नाहीं. आज मी अगदीं धन्य झालों. आतां बाबांना नीट सविस्तर पत्र लिहायला हरकत नाहीं. कालच त्यांचं पत्र आलं आहे कीं, एक चांगली मुलगी सांगून आली आहे. तर एकदां येऊन पाहून जा. आतां ' मीच त्यांना सांगेन कीं, मला इकडे एक साक्षात देवताच मिळाली आहे ! तर तुह्मी मुलीबिली पाहण्याच्या भानगडींत पडूं नका; आणि त्यांनाही आपल्या मित्राचीच मुलगी आपली सून होणार हें पाहून फार आनंद होईल. ' पण तो एकदम मागें सरून म्हणतो, ' हें काय ? तुझ्या कपाळाला या अशा आंठ्या कां चढल्या ? '

शालिनी एक दीर्घ सुस्कारा सोडून म्हणाली; ‘ कमलाकर, काय तुम्हाला सांगू ! खरं सांगायचं म्हटलं म्हणजे माझी फार निराशा झाली हेंच खरें. ’

‘ कां निराशा झाली ? शालिनी मी इतक्यांतल्या इतक्यांत तुझी निराशा होण्याजोगं काय केलं ? ’

‘ कमलाकर, तुमचे विचार नुसते पुढें गेलेले आहेत. पण त्याचप्रमाणें आचरण करण्याचा तुमचा बेत दिसत नाहीं. तुमचें मन जर प्रत्येक व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असावें असें आहे; आणि तरी पुन्हा तुम्हाला मी तुमचें कायमचें दास्य स्वीकारावें असें वाटतें. मी मनानें तुमचीच आहे; पण तुमची होण्यासाठीं मी कोणत्याही तऱ्हेचा धार्मिक विधि करण्यास तयार नाहीं. खऱ्या निस्सीम प्रेमाला करारमदार लागत नाहींत. बाजारांत त्यांची गरज लागते. पण लग्न म्हणजे बाजार नाहीं; स्वयंवर आहे. पतिपत्नीना कायमचें एक करण्यास प्रेमच पुरतें. त्या प्रेमाचा जेव्हां अभाव दिसून येईल, तेव्हां तीं दोघें एक नाहींत. अगदीं निरनिराळ्या स्वतंत्र व्यक्ति आहेत. त्या कशाही प्रकारें एकमेकाशीं बांधलेल्या नाहींत. असेंच म्हणावयाचें. तेव्हां अगदीं स्पष्ट सांगावयाचें म्हणजे मी कोणत्याही चालू रीतीनें लग्न करण्यास तयार नाहीं. त्याशिवायच जर तुम्ही मला तुमची म्हणत असाल, तर मी पूर्ण तुमची आहे. ” असें म्हणून ती कमलाकराकडे पहात बसली. कमलाकर निराश होऊन स्वस्थ बसला होता. त्याच्या डोक्यांत आतां चांगला लख्ख प्रकाश पडला. जें विघ्न आड येईल कीं नाहीं याची त्याला कधीं नुसती शंकासुद्धां आली नव्हती, तेंच विघ्न दत्त म्हणून पुढें उभें राहिलें. शालिनीचें बोलणें ऐकून कमलाकर आश्चर्यानें अगदीं स्तंभित झाला. हा म्हणते आहे काय ? याचा हिनें कधीं कांहीं विचार तरी केला आहे का ? असें वाटून तो तिच्याकडे पहात बसला. कमलाकर कांहीं जुन्या मताचा माणूस नव्हता. एवढेंच नाहीं तर त्यांचीं मतेंही फार पुढें गेलेलीं आहेत, असें पुष्कळांना वाटे. तरी तोसुद्धां शालिनीचा बेत ऐकून अगदीं भयभीत होऊन गेला. शेवटीं तो शालिनीला म्हणतो, “ शालिनी, तूं काय हें म्हणतेस ? याचा कांहीं तूं विचार तरी केला आहेस का ? स्वतंत्रता प्रत्येक व्यक्तीला पाहिजे खरी, पण ते स्वतंत्रतेचे विचार तूं इतक्या भराला जाऊं देशील, असं मला नाहीं वाटत. हा विचार नाहीं. हा अविचार आहे. यानें केव्हांही हानीच होणार.”

शालिनीच्या हृदयाला हें कमलाकराचें बोलणें ऐकून चरका दिल्याप्रमाणें झालें. कमलाकराच्या तोंडून असे शब्द येतील अशी तिला नुसती शंकासुद्धां आली नव्हती. पण ती लगेच म्हणते; "कोणत्याही चालू रूढीनें मला लग्न करावयाचें नाहीं, हा माझा बेत काय आतांच्या आतां झाला आहे? का आपली माझ्या मनांत कांहीं तरी कल्पना आली; आणि मी ती तुह्माला बोलून दाखविली असं तर नाहीं? आज मी या गोष्टीचा कित्येक दिवस विचार करीत आहें. आणि या लग्नामुळेंच स्त्रियांना परतंत्रता आली आहे अशी माझी पक्की खात्री आहे. या लग्नामुळेंच स्त्रियांच्या अंगांतली सगळी कर्तबगारी, जोम, पाणी हीं नाहींशी झालीं आहेत. ज्याप्रमाणें इंग्रज सरकारांनीं आपल्या हिंदी प्रजेला प्रत्येक मर्दुमकीच्या कामापासून दूर ठेवून अगदीं निस्सत्व करून टाकलें आहे, त्याचप्रमाणें पुरुष जातीनें आह्मा स्त्रियांस अगदीं निःसत्व केलें आहे. त्यामुळें आमच्यांत इतका भ्याडपणा भरला आहे कीं तो एक स्त्री जातीचा जन्मतःच गुण आहे असें समजलें जातें. मी इतर मुलीप्रमाणें आपलें कांहींतरी लग्न करावयाचें ह्मणून करीत नाहीं. त्यांना जसा एक पाठिराखा लागतो तसा मला कोणी पाठिराखा नको आहे. तर पहा. माझें ह्मणणें तुह्मांला कबूल असले तरच मी तुमची आहे. नाहींतर......"

"पण शालिनी हें तूं काय कांहींतरी म्हणतेस? समज आपण लग्न केलं नाहीं तर आपल्याला एका ठिकाणीं कसं राहतां येईल?"

या प्रश्नानें तर शालिनीला हंसूच आलें. ती एकदम म्हणाली, "यांत तें तुह्मांला काय अवघड वाटलं? दोन मित्र एका ठिकाणीं नाहीं का रहात? तसेच राहावयाचें. तुम्ही पुरुष आणि मी स्त्री असल्यामुळें तर उलट आपल्या मैत्रींत प्रेमाची जास्त भरच पडेल; आणि त्यामुळें आपल्याला अगदीं जिवास जीव देणाऱ्या प्रिय मित्राप्रमाणें राहतां येईल." हें तिनें इतक्या सरळपणानें सांगितलें, कीं, त्याचा परिणाम कमलाकराच्या मनावर झाल्याखेरीज राहिला नाहीं. तिच्या शुद्ध निर्मल विचारांचें त्याला कौतुक वाटलें; आणि तो तिच्या ह्मणण्याचा विचार करूं लागला; पण लग्नाशिवाय रहावयाचं! असा मनांत विचार आला कीं पुरे! तो अगदीं भेदरून जाई; आणि लगेच आपल्याशींच म्हणे, "छेः! असं होणं अगदीं अशक्य; शालिनी कांहीं तरी बोलते आहे; तिचं

या बाबतींत मुळींच ऐकतां कामा नये. स्त्री-पुरुषांनीं लग्नाशिवाय एका ठिकाणीं राहण्याची कल्पना कमलाकराला अगदींच नवी होती. तो नुसता ही कल्पना ऐकूनच अचंबा करीत राहिला. त्याला असें राहण्यानें काय अनर्थ ओढवतील आणि काय नाहीं असें वाटलें. पण शालिनीची याच्या अगदीं उलट स्थिती होती. तिनें या गोष्टीसंबंधीं पूर्ण विचार केला होता. तिला असें राहिल्यानें पुष्कळ फायदाच होईल असें वाटत होतें. पण कमलाकराला कांहींच निश्चयात्मक सांगतां येत नव्हतें. तेव्हां तो कांहीं वेळ तसाच विचार करीत राहिला. नंतर थोड्या वेळानें तो पुन्हां शालिनीचा हात आपल्या हातांत घेऊन ह्मणतो, " शालिनी, तुझा विचार आहे त्याप्रमाणें तूं खरंच का करणार आहेस !"

" हो. माझा आज कितीक दिवसापासूनचा हा निश्चय आहे. "

" बघ बुवा. तूं रागावलीस तरी हरकत नाहीं. पण तूं खचित या गोष्टीचा चांगला विचार केला नाहींस. लोक तुला याबद्दल किती छळतील. किती त्रास देतील, तुझ्यासंबंधीं किती कुशंका काढून हिडीस बोलतील याची तुला कांहीं कल्पना तरी आहे ! हा सगळा त्रास निमूटपणें सोसण्याची तुझी तयारी आहे का ?"
" हो. एवढाच काय ! पण यापेक्षांही ज्यास्त त्रास सोसण्याची माझी तयारी आहे. लोकांनीं मला यासाठीं छळलें तर तो सर्व छळ मी मोठ्या आनंदानें सोशीन, एवढंच नाहीं तर स्त्रीजातीच्या उन्नतीसाठीं, स्त्रीजातीच्या स्वातंत्र्यासाठीं हा छळ सोसण्याचा मान पहिल्या प्रथम मला मिळाला याबद्दल मी देवाचे आभार मानीन. मला हें माझें कर्तव्य वाटत आहे. ते साधण्यासाठीं मला प्राण देण्याची जरी वेळ आली तरी मी देईन. पण मी आपल्या निश्चयापासून एक अणूभरही ढळणार नाहीं. असें म्हणून ती स्वस्थ बसली. कमलाकर पण यावर कांहीं बोलला नाहीं. नंतर एक दीर्घ उसासा टाकून शालिनी म्हणते !

" कमलाकर इतर लोकांनीं जरी मला दुराचारी म्हटलें तरी तुम्ही नुसती माझ्याबद्दल सहानुभूती बाळगाल अशी मला आशा आहे. " असें म्हणून शालिनी घरीं जाण्यासाठीं उठली. पण कमलाकरानें तिला लगेच थांबवून म्हटलें ? ' इतक्यांतच घरीं जाण्याची काय घाई आहे ? आतां कुठें सहा वाजताहेत. दिवस अजून बराच आहे, बस खालीं.' ती बसली पण तिचें तोंड हिरमुसलेंच दिसत होतें यांत तर शंका नव्हतीच. पण कमलाकराला ती आप-

त्यावर रागावली आहे असें वाटून त्यानें अगदीं गहिंवरून विचारिलें, 'शालिनी, तुला माझा राग आला होय?' कमलाकर राग येण्याचें काय कारण? हीं ज्याची त्याचीं मतं आहेत; पण तुमची मतं अगदीं माझ्याच मतासारखीं असून तुम्ही लोकापवादाला भीत आहां, हें काय तें वाईट आहे खरेंच तुम्हाला मी करीत आहे तें बरोबर नाहीं असें वाटतें असतें तर मग कांहीं विशेष हरकत नव्हती."

"नाहीं. शालिनी, मी लोकापवादाला भीत नाहीं. लोकापवादाला भिण्याचें काय कारण? मला काळजी वाटत आहे ती सारी तुझी. लोक तुला नानाप्रकारें छळतील, तुझे हाल हाल करून अगदीं दुर्दशा करून टाकतील, आणि तें सगळें मला मुकव्यानें पहावें लागेल. निमूटपणें सहन करावें लागेल. तें बरं का? सांग तूंच सांग. बरं तसं न करावं तर लोक तुझ्याविषयीं अमंगळ बोलल्याखेरीज रहाणार आहेत का? मग उगीच कां ही यातायात! मी सांगतो तें ऐक, उगीच कांहीं तरी भलतेंच करून बसूं नको. आतां हाल सोसावे लागत नाहींत तोंपर्यंत सगळं ठीक आहे. पण,"

"पण काय? माझ्याच्यानं ते हाल सोसावणार नाहींत असंच तुमचं म्हणणं कीं, नाहीं? पण तें प्रत्यक्ष कृतीनें दाखविल्याखेरीज तुमची खात्री कशी पटवून द्यावी! चांगल्या कामासाठीं कोणाला नाहीं हाल सोसावे लागले? कोणाचा छळ झाला नाहीं? सांगा माझ्या भगिनींनां दास्यांतून मुक्त करण्यासाठीं मला प्रथम या दास्यांतून मुक्त झालें पाहिजे. तेव्हां संकटें येतील तीं सोसलीच पाहिजेत. त्याशिवाय कसं होतं? तुम्हाला मी या फंदांत पडूं नये असं कां वाटतं तें मला माहीत आहे. तुम्हांला असं वाटतं कीं, हें नसतं संकट मीं कशाला अंगावर ओढून घ्यावं? हा नसता उपद्व्याप मी कशाला करावा? मी आपलं चैनींत सुखांत रहावं! फार झालं तर तेंच काम दुसऱ्या कोणाकडनं तरी करून घ्यावं! असंच कीं, नाहीं? हो, असंच अगदीं असंच! पण कमलाकर, दुसरं कोणी तरी हें काम करील म्हणून स्वस्थ बसणारी मी बायको नव्हे. तें काम मीच केलं पाहिजे. कोणत्याही गोष्टीला काय सुरुवात केल्याखेरीज होत नसते. तर कमलाकर, तुम्ही मला माझ्या कार्यांत मदत करा. माझी सगळी भिस्त तुमच्यावर आहे. तर तुम्ही मला मागें ओढूं नका. चालू रुढीप्रमाणें लग्न करावयाचं असतं तर काय हो! आज तसं करणं किती सोपं होतं हे तुम्हीच

पहा. आपल्याला कोणत्याही बाजूनें कांहीं कमी नाहीं. पुन्हां लोकही कोणी नांवें ठेवणार नाहींत किंवा निंदा करणार नाहीं. पण जें आपल्याला करूं नये असं वाटतं तेंच करायाचं ह्मणजे काय ?—आणि कशाकरितां ? तर निव्वळ सुखाकरतां ! शी ! ही नुसती कल्पना सुद्धां मला कशी ओंगळ वाटते. मन एक कर ह्मणून सांगत असतां सुखाकारितां मी दुसरेंच केलें तर तें मला नेहमीं डांचेल. माझ्या मनाला क्षणभरसुद्धां बरें वाटणार नाहीं. सध्यांचीं लग्नें ह्मणजे नुसता व्यापार आहे. त्या व्यापारांत मीं आपल्याला विकून घेतलें ह्मणजे झालेंच ! मग माझें आयुष्य फुकट वाया गेलें असें ह्मणण्यास मुळींच हरकत नाहीं. नुसता गोळाभर घांस मिळावा किंवा एकाद्या पदवीधराचं नांव आपल्या नावांपुढें लावावयास मिळावं, किंवा एकाद्या बड्या श्रीमंताची बायको होऊन गाड्याघोड्यांतून मिरवायाला मिळावं असं वाटणाऱ्या बायकांपैकीं मी नाहीं. मला हें कांहीं नको. मला स्वातंत्र्य पाहिजे. बस् ! दुसरं कांहीं सुद्धां नको. तें मिळाल्याशिवाय मला चैनही पडायची नाहीं. " असें ह्मणून तिनें एक दीर्घ सुस्कारा टाकला. थोडा वेळ थांबून पुन्हा ती एकदम ह्मणते, " या लग्नसंस्थेचा इतिहासच इतका किळसवाणा आहे, कीं, कांहीं पुसूं नये. ज्या संस्थेची उत्पत्तीच मुळीं गुलामगिरीच्या पायावर झाली आहे, त्या संस्थेबद्दल किती आदर बाळगावा हें ज्याचें त्यानंच ठरविलेलें बरें. या रूढीमुळें माझ्या कित्येक भगिनींना आपल्या देहाची आहुति द्यावी लागली असेल कोणास ठाऊक ! कित्येकींना नरपशूच्या बंदिवासांत दिवस काढावे लागले असतील ! छेः छेः ! जो जो त्यासंबंधीं मनांत विचार येतात तों तों मन ज्यास्तच क्षुब्ध होतें; आणि आतां काय करावं आणि काय करूं नये असं होऊन जातं. या संस्थेच्या हिडीस स्वरूपाची पूर्ण कल्पना होऊन अंगांत चेव आल्यासारखं होतं. माझ्यावर प्रेम करणाऱ्या माणसाला आनंद होईल, मला तो कुरवाळील, माझे लाड करील ह्मणून तेवढ्यासाठीं मला जी गोष्ट उचित वाटते ती सोडून देऊन अगदीं भलत्याच मार्गानं जावें असं मला मुळींच वाटत नाहीं. तेवढ्यासाठीं मी आपलं स्वातंत्र्य गमवावं असं माझ्या स्वप्नींही येत नाहीं. त्यापेक्षां नाहीं त्यानें माझं लाड केले तरी चालतील. आपल्या ध्येयाच्या आड कोणी येऊं लागलं तर त्याला दूरच सारलें पाहिजे. मग तो मनुष्य कोणीही असो. आतां या गोष्टीचा निकाल लावणं न लावणं सगळं तुमच्या हातीं आहे. तुह्माला माझं म्हणणं पसंत पडलं तर फारच उत्तम झालं नाहींतर......
नाहींतर—काय सांगूं ! '

‘ पण शालिनी नुसत्या, चालीरितीसाठीं साधा विधि करण्यास कोणती हरकत आहे ? त्यानं कायवरं आपलं जातं ? तूं आपली कांहीं तरी भलताच हट्ट धरून बसतेस. नुसता विधि, आतां त्या विधींत आणखी अर्थ तरी काय उरला आहे ! उलट विधीनं लग्न केल्यानें तुझे आणि तुझ्या मुलांचे हक्क कायम रहातील.’

‘ मला असे कायद्यानं बांधलेले हक्क नको आहेत. प्रेमानं बांधलेले हक्क मिळत असले तरच पाहिजे आहेत. कायद्यालाच धरून मला चालायचं असतं तर मीं तुम्हांला आपलं लग्न रजिस्टर करूं, असं म्हटलं असतं. पण कोणताही विधि केल्यानं विवाहाला व्यापारी स्वरूप येतें. निष्पाप शकुंतलेला तिच्याशीं प्रेमानें संलग्न झालेल्या दुष्यंताला विधीची जरूर भासली कां ? आज ती ज्यांना भासत आहे त्यांचं आर्यत्व लोपून अधःपतन झालेलं आहे, यांत तिळमात्र संदेह नाहीं. माझ्या मतें स्त्रीपुरुषांचं एकमेकांवर प्रेम नसतां त्यांचें लग्न करणें झाल्यास मात्र विधीची जरूरी आहे; पण प्रेम नसतां विधियुक्त लग्न झालं तर शास्त्रोक्त व्यभिचारच म्हणावं लागणार. आम्हीं एकमेकांवर सतत मरेपर्यंत प्रेम करूं, हें सांगणं अगदीं चुकीचं आहे. पुढं काय होईल याचं आज कोणासच कांहीं सांगतां येणार नाहीं. तेव्हां शहाण्या माणसानें भविष्यकालासंबंधीं भलतेंच वचन देऊं नये तेंच बरें. प्रेमाच्या भरांत आपलें एकमेकांवर कायम प्रेम टिकेल असेंच ज्याला त्याला वाटत असतें, आणि म्हणून त्यावेळेस तरी असें वचन देण्यांस कोणास कांहीं वाटत नाहीं, पण हीं वचनें कितीशीं पाळलीं जात असतील याची कोणास कांहीं कल्पना ! मनांत अमकी गोष्ट येणं किंवा न येणं हें कांहीं कोणाच्या स्वाधीनचं नाहीं. तेव्हां ज्या गोष्टीबद्दल आपली खात्री नाहीं अशा गोष्टीबद्दल वचन देणं म्हणजे निव्वळ पोरखेळ आहे. त्यांत यापेक्षां कांहीं सुद्धां ज्यास्त अर्थ नाहीं. आज माझें तुमच्यावर प्रेम आहे तसेंच उद्यां असेल असें कांहीं मला खात्रीपूर्वक सांगतां येणार नाहीं. कारण, समजा आज तुह्मी चांगले आहांत आणि उद्यां दुराचारानें चालूं लागलांत तर माझें तुमच्यावर प्रेम राहील का ? मुळींच रहाणार नाहीं. आणि मग प्रेम नसल्यावर तसेंच तुह्मी जन्मभर एकाठिकाणीं रहा असें सांगण्यांत तरी काय अर्थ आहे ! त्या दिवशीं आपला वादविवाद झाला. सगळें तुह्मीं माझं ह्मणणं कबूल केलंत, आणि आतां आपल्यावर ती गोष्ट करण्याची पाळी आली तर कचरतां ! मागें घेतां ! याला काय ह्मणावं ! ”

कमलाकर कांहीं झालें तरी शेवटीं हिंदू तो हिंदूच ! पुष्कळ गोष्टी चांगल्या आहेत असें वाटतें, पण स्वतः करण्याची वेळ आली कीं, उं हूं. त्यांतलीच गोष्ट कमलाकराची होती. आज आपल्या समाजांत मूर्तिपूजा करूं नये म्हणून व्यास-पिठावर बसून सांगणारे लोक थोडेथोडके आहेत ! पण तेच लोक घरीं आईच्या नाहीं तर बायकोच्या आग्रहावरून सत्यनारायणाची पूजा करतांना दिसतात. अशी जेथें एकंदर स्थिती तेथें कमलाकराला दोष देण्यांत तरी काय अर्थ आहे ! त्याचें आपलें एक ठाम मत कीं, शालिनी म्हणते तें सर्व खरें आहे. तरी पण व्यवहार दृष्ट्या तें चांगलं नाहीं, तेव्हां आपण तें करूं नये. कमलाकर पुन्हा एकदम म्हणाला "शालिनी मी नाहीं म्हणतों तें तुझ्याच हितासाठीं म्हणतों. त्यामुळें तुला फार त्रास होईल. आणि तसा तुला त्रास सोसावा लागूं नये याकरितांच मी नाहीं म्हणत आहे. आणि पुन्हा बुवा तूंच लोकांना उदाहरण घालून दिलं पाहिजे असं कांहीं नाहीं. आपण भिऊन मागें ध्यायचं असंच ना ? छे ! छे ! कमलाकर तुम्ही मला अशा तऱ्हेचा उपदेश कराल असं कधीं वाटलं नव्हतं. आज तुम्ही माझी अगदीं पूर्ण निराशा केलीत. इतके तुम्ही भित्रे असाल असं मला वाटलं नव्हतं. हाल हाल ते काय घेऊन बसलां आहांत ! मला तर हाल सोसून लोकांना उत्तम प्रकारचें उदाहरण घालून देतां आलें तर बरें वाटेल. आजपर्यंत ज्यांनीं म्हणून सुधारणेचें काम केलें आहे त्या कोणाला हाल सोसावे लागले नाहींत ? कित्येकांना तर प्राणांस मुकावें लागलें. त्याचप्रमाणें आपलेंही होईल. यापेक्षां तर ज्यास्त कांहीं होत नाहीं ! हालांना आणि संकटांना भिऊन कसं चालेल ! आपल्यापेक्षां जो पुढें जातो, त्याला लोक सहज कधींही पुढें जाऊं देणार नाहींत. ही आजपर्यंतची पद्धत आहे. मग तो साधू असो, संत असो, कोणी असो. त्या महात्म्याची किंमत त्याच्या मरणोत्तर कळूं लागते. अशी नेहमींचीच रीत आहे. त्याला कोण काय करणार ? आतां आपल्याला एवढंच पहावयाचं कीं, आपण क्षणभंगुर सुखाकडे धांव मारा-वयाचीच कां खडतर परंतु शेवटीं हितावह अशा मार्गानं जावयाचं ? आपल्या आयुष्याचं चीज करावयाचं असेल तर आपेष्टांना भिऊन उपयोगी नाहीं. कारण शेवटीं त्यांनींच आपलं नव्हे, तर मनुष्यजातीचं "कल्याण होणार आहे आणखी." मला, त्याच हालअपेष्टांपासून दूर ठेवावयाचें आहे. आणि तें कसें करावें याचाच मी मघांपासून विचार करीत आहे. तूं आपल्या निश्चयापासून तिळमात्रही ढळणार नाहींस हें मला माहीत आहे. तरी पण शालिनी, माझ्या-

साठीं एवढें तूं करूं नको." कमलाकर अगदीं गहिंवरून तिला विनवूं लागला. "सध्यां तूं आपल्या विचारांच्या भरारींत आहेस ह्मणून तुला पुढें ओढवणारीं संकटें कांहींच नाहींत असें वाटत आहे. तर तूं कृपाकरून असें करूं नको. माझें ऐक; तुझ्यावर माझें अतोनात प्रेम आहे म्हणून माझा जीव एवढा तिळतीळ तुटत आहे; आणि पुन्हा तुला असें सुद्धां सांगतों कीं, तूं असें करशील तर मी तुला असें करूं देणार नाहीं. मी त्या भयंकर संकटापासून तुझा बचाव करीन कारण तें माझें काम आहे."

मी आपल्या समोर सरळ मार्गानें जाणार; आणि त्यापासून तो माझा बचाव तुह्मी कसा करणार ? आणि तो पुन्हां कशासाठीं ? चांगल्या मार्गानें जाणाऱ्या मनुष्याचा बचाव तो कसा करावयाचा ? कमलाकर, माझा कोणी बचाव करण्याची जरूरी नाहीं. तुह्माला माझ्याबद्दल खरी कळकळ वाटत असेल, माझ्याबद्दल आदर वाटत असेल, माझ्यावर तुमचं प्रेम असेल तर तुह्मी माझ्यावर प्रेम करावेंसें मला वाटतें तें माझ्या गोऱ्यागोमट्या कातड्यासाठीं नाहीं. किंवा इतर स्त्रियांत आणि माझ्यांत असलेल्या साम्याबद्दल नाहीं, तर जो माझ्यांत कांहीं विशेष आहे त्या विशेषाबद्दल प्रेम बाळगून तुह्मी माझ्यावर प्रेम करावं असं मला वाटतं, माझ्यांत असलेल्या विशेषाबद्दल आदर वाटत नसेल तर माझ्यावर प्रेम करूं नका. मला विसरून जा. मीं तुह्माला विसरण्याचा प्रयत्न करीन." शालिनी थोडावेळ थांबून ह्मणतेः—" तुह्मी माझ्या रूपाला भुललां नाहीं. माझ्या विचाराला भुलतांत अशी माझी पक्की खात्री आहे. आणखी आतां त्याच विचारापासून मला मागें ओढूं पाहतां याला काय ह्मणावें ! मग काय ? ठरलं, नाहीं म्हणून ना ?"

" नाहीं, नाहीं, शालिनी तसं नाहीं." कमलाकर एकदम शालिनीचा हात घट्ट आपल्या हातांत धरून म्हणतो, " मला तुझे विचार पटतात. त्याबद्दल सहानुभूति वाटते; तरी पण मला एक दिवस विचार करण्यास फुरसत दे. उद्यां मी तुला नक्की काय तें सांगेन. ही गोष्ट अशी घाईनें करून उपयोगी नाहीं कारण ती एकदां झाली म्हणजे झाली. पुन्हा परत येणें नाहीं." शालिनीनें आपला हात कमलाकराच्या हातांतून सोडवून घेऊन एक उसासा टाकला आणि ती म्हणाली तुम्ही म्हणाल तर माझी कांहीं हरकत नाहीं. पण एवढें बरीक खरें, कीं, मी म्हणतें तसें झालें तर उपयोग. नाहीं तर कांहीं नाहीं. यापूर्वी एक दोन स्त्रियांनीं स्त्रीवर्गाच्या उन्नतीसाठीं असा प्रयत्न करून पाहिला होता

पण तो शेवटास गेला नाहीं. चालू पद्धतीनें लग्न करणें म्हणजे अन्यायाचें आहे असें त्यांना वाटत नसे. हें त्यांनीं स्पष्ट आपल्या कृतीनेंच दाखविलें आहे. जार्ज इलिएट लग्नाखेरीज लुई जवळ रहात असे खरी परंतु तसें रहाण्यांत कांहीं अर्थ नव्हता. कारण त्यावेळेस त्याची पहिली बायको जिवंत होती. तेव्हां तिला लग्न करणेंच शक्य नव्हतें. पण तो वारल्यावर जॉर्ज इलिएटनें दुसऱ्या एका माणसाशीं लग्न केलें तेव्हां ती त्या तत्वाला धरून वागत होती असें दिसत नाहीं. मी अगदीं शेवटपर्यंत अशीच वागणार आहे. मग माझी कोणी निंदा करोत, हेटाळणी करोत, नाहीं तर मला खुळी म्हणोत ! मी त्यांच्या म्हणण्याला मुळींच भीक घालीत नाहीं. ज्यांच्या अंगीं धैर्य आहे, ज्यांना लोकनिंदा करतील म्हणून भीति वाटते अशा माझ्या कितीतरी गरीब भगिनी मनाविरुद्ध लग्न झाल्यामुळें दुःखाच्या ज्वालाग्नींत होरपळत असतील ! पण करणार काय बिचाऱ्या !" थोडावेळ ती थांबली आणि नंतर म्हणते, " आतां ज्यास्त कांहीं न बोलणेंच बरें. आतां आपण घरीं जाऊं; उद्यां तुम्ही मला नीट विचार करून काय तें सांगा."

---

## प्रकरण ४ थें.

त्या रात्रीं कमलाकराचा मुळींच डोळा लागला नाहीं. घरीं गेल्यावर तो नेहमींप्रमाणें हातपाय धुवून जेवायला बसला, पण त्याचें जेवणाकडे मुळींच लक्ष नव्हतें. काकाकाकूंच्या ही गोष्ट लक्षांत आल्याखेरीज राहिली नाहीं. कारण कमलाकर कांहीं जिन्नस वाढावयाच्या आधींच पुरे म्हणे किंवा कांहीं ' अमकं हवं कां ? ' असें विचारलें असतां उत्तरच देत नसे. त्यांतून आज तो नेहमींप्रमाणें गप्पाही मारीत नव्हता. तेव्हां आज कमलाकराला कांहीं तरी होत आहे असें त्या दोघांना वाटलें. काकांनीं जरा चेष्टा करण्याच्या हेतूनें त्याला विचारिलें, ' कां—कमलाकर आज शालिनीशीं कांहीं भांडण बिंडण झालं वाटतं ? नाहींतरी तिचा आहेच तसा भांडखोर स्वभाव ! आपलं म्हणणं असेल तर तें खरं केल्याशिवाय ती कधीं राह्यचीच नाहीं. '

हें काकांचें बोलणें ऐकल्यावर कमलाकर भानावर आल्यासारखें करून म्हणाला, ' छे ! छे ! तसं कांहीं नाहीं. जरा डोकं दुखतंय्. दुसरं कांहींसुद्धां नाहीं. '

काकी लगेच ह्मणाल्या, ' दुखेल नाहीं तर काय होईल ? सारा दिवस वणवण करतोस. उन्हातान्हांतून हिंडतोस ह्मणून डोकं दुखतं ! सोन्यासारखा आला आहेस तर चार दिवस सुखाचा राहून जा ! कांहीं दुखणं बाणं आणून घेऊं नकोस बाबा ! '

कमलाकर पुढें कांहीं एक बोलला नाहीं. तो आंचवून तडक आपल्या खोलीकडे गेला. त्यानें आपलें अंथरूण पसरलें. आज त्यानें तें झटकलेंसुद्धां नाहीं. नाहींतर कमलाकर कधीं ह्मटल्या कधीं सुद्धां, असा निजावयाचा नाहीं. पण आज त्याचें चित्त ठिकाणावरच नव्हतें; तें एकसारखें भ्रमण करीत होतें. शालिनीच्या कल्पना बरोबर आहेत का चुकीच्या आहेत, आपण ती ह्मणते तसें करावें का स्पष्ट आपलें नाहीं ह्मणून सांगावें ? असे प्रश्न एकसारखे तो आपल्या मनाला विचारीत होता. एकदां त्याला वाटे, कीं, ती ह्मणते तसें केलें, तर तिचे पुसूं नये असे हाल होतील. तर तिला आपण साफ नाहीं ह्मणून सांगावें, ह्मणजे ती असल्या संकटांत सांपडणार नाहीं. आणि आपलें खरें तिच्यावर प्रेम असलें तर, आपल्याला असेंच करणें केव्हांही उचित होईल. लगेच दुसरें मन असें सांगे कीं असें करण्यांत तरी काय अर्थ आहे ? आपली व तिची कायमची मैत्री बरीक तुटेल, आणि तिला जें करावयाचें तें केल्याशिवाय तीं कधींही रहाणार नाहीं.

कमलाकराचें शालिनीवर अतोनात प्रेम. त्याला शालिनीशिवाय करमत नसे. तो कांहीं तरी बळेंच कारण काढून, दुपारचें जेवण झाल्याबरोबर शालिनीकडे जावयास निघे. आतां शालिनीला नाहीं ह्मणून सांगावयाचें ! तिची आपली कायमची ताटातूट करून घ्यावयाची ! एवढेंच नाहीं, तर कायमचें सुखाला अंतरायचें ! आजपर्यंत जी गोष्ट कधीं घडेल असें वाटलें नाहीं, ती इतक्या अचानक तऱ्हेनें घडून आली. आणि आतां त्या सुखाला आपण होऊन दूर लोटावयाचें ! कमलाकर कांहीं असामान्य विभूतीपैकीं नव्हता. तेव्हां त्याचा सुखाकडेच जास्त ओढा होता. यांत नवल तें काय ! आजपर्यंत त्यानें आईच्या किंवा बहिणींच्या सांगण्यावरून कांहीं मुली पाहिल्या होत्या, पण त्यांच्याबद्दल त्याला काडीइतकेंही प्रेम वाटत नसल्यामुळें मला ही मुलगी पसंत नाहीं, मी हिच्याशीं लग्न करणार नाहीं, असें सांगण्यास त्याला कांहींच वाटत नसे. एकदां घोडा किंवा गाय विकत घ्यावयाची कीं नाहीं, हें जसें मनुष्य ताबडतोब ठरवून टाकतो

तसें तो त्या वेळेस ताबडतोब करून टाकीत असे. परंतु ही वेळ तशी नव्हती. या वेळेस त्याच्या अंतःकरणांत प्रेमाचें साम्राज्य वसत होतें. तें साम्राज्य झुगारून देणें फार कठीण होतें. आतां पहिल्याप्रथमच त्याला प्रेमाची महती कळली होती. आजपर्यंत प्रेम, नुसतें गोष्टी कादंबऱ्यांतून वाचलेलें ! पण आज त्याचा त्याला प्रत्यक्ष अनुभव आला. त्याच्या अंगांत क्षणभर स्फुरण चढल्यासारखें झालें; आणि तो आपल्याशींच मोठ्या आवेशानें ह्मणाला " काय होईल तें होवो. येऊन जाऊन लोकांचीच भीति ना ! आणि तेवढ्यासाठीं शालिनीचें मन मोडावयाचें ? छेः ! बेहत्तर आहे ! नाहीं लोकांनीं मला पुसलें तरी ! शालिनीसाठीं ह्मणून आपण काय लागेल तें करूं. कधीं मागें घेणार नाहीं. हें सर्व करण्याचा कमलाकरानें विचार केला. तो तिच्या सुबक चेहऱ्याला किंवा गोऱ्यागोमट्या कातड्याला भाळून केला नाहीं, शालिनी ह्मणाली त्याप्रमाणें त्याचें प्रेम खरेंच तिच्यामध्यें असलेल्या विशेषाबद्दल होतें. कमलाकराला तिची पूर्ण माहिती होती तिचें शुद्ध अंतःकरण, तिचा शांत व गोड स्वभाव, तिची प्रेमळ मूर्ती, तिचे उदात्त विचार या गुणांना कमलाकर भुलला होता. तिला आज खरें पाहिलें असतां काय कमी होतें ? जगाच्या दृष्टीनें ज्या गोष्टी मिळणें जरुर आहे आणि ज्यासाठीं सर्व जग धडपड करीत असतें, त्या सर्व तिला लाभल्या होत्या. पैसा पुष्कळ होता, आई नव्हती. मात्र बाप, बहीण, भावंडें जीं हवीत तीं होतीं. आणि स्वतः पुन्हां शहाणी आणि शिकलेली अर्थात् या सर्व सुखावर पाणी सोडण्यास ती तयार झाली ती काय उगीच ? कमलाकराचें या गुणांमुळेंच शालिनीवर विशेष प्रेम होतें. हे गुण तिच्या अंगीं नसते, ती जर साधारण बायकांप्रमाणेंच कोत्या समजूतीची असती, तर कमलाकराला आज जो तिच्याबद्दल आदर वाटत होता तो खात्रीनें वाटला नसता. तिच्या त्या अजब गुणांमुळेंच आज त्याचें मन तिजकडे इतकें ओढलें जात होतें. लोहचुंबकाप्रमाणें शालिनी कमलाकराचें मन आपल्याकडे आकर्षून घेत होती. कमलाकर दिखाऊ स्वरुपाला भाळला नव्हता, म्हणून त्याला पुढें तोंडघशी पडण्याची पाळी आली नाहीं.

परंतु कमलाकराला दही खाऊं का मही खाऊं असें होऊन गेलें होतें. इतका स्वार्थत्याग आपल्या शालिनीला करून द्यावा का ? तिच्या कार्यांत आपल्याला मदत करतां येईल का ? तिच्यावर येणाऱ्या संकटांचा परिहार आपल्याला करतां

येईल का? वगैरे कितीतरी प्रश्न त्याच्या डोक्यांत गोंधळ करीत होते. ती आपल्या भगिनीवर्गासाठीं इतका स्वार्थत्याग करायला तयार झाली आहे, तर तो तिला आपण करूं द्यावा का? तिचे हेतु चांगले आहेत तरी पण तिच्यावर त्यापासून संकट येणार आहे, तर आपण तिचें संरक्षण करणें बरोबर नाहीं का? अबलांचें संरक्षण करणें, त्यांचें हित पहाणें, हें प्रत्येक चांगल्या सच्छील माणसाचें कर्तव्यच आहे, तसें जर आपण न करूं तर आपण आपलें कर्तव्य केलें नाहीं असें होईल. एकदां त्यास असें वाटे कीं, शालिनीसारख्या मुलीनें आपल्याला पसंत करावें, म्हणजे हा आपल्याला मोठा मानच आहे; आणि पुन्हा ती जो मार्ग स्वीकारणार आहे तोही मला पसंत आहे. मग? मग काय? हा असा प्रश्न माझ्या मनांत का इतका वेळ उद्भवतो? कमलाकर आतां आपलें डोकें दोन्ही हातानीं घट्ट दाबून बसला होता. त्याला आतां कांहीं सुचेना. त्याच्या मस्तकांतून कढत कढत वाफा निघत आहेत, असें त्यांस वाटलें. एकदां कमलाकराची मनोदेवता असें सांगे कीं, जर आतां आपण नाहीं म्हटलें तर आपण एक सत्कार्य करण्याची संधि वायां घालविली असें होईल. तरी पण त्याचें मन मागें घेई. आपण ती म्हणते तसें केलें तर लोक आपल्याला काय म्हणतील, आणि दर घटकेला जर लोक आपल्याकडे बोटें दाखवून 'ह्या ह्या मनुष्यानें अमक्या मुलीला फसविली,' असें म्हटलें तर तें आपणास कसें सहन करितां येईल! आणि ते असें म्हणणारच. त्यांनीं तरी कां असें म्हणूं नये? त्यांच्या दृष्टीनें मी तिला फसविलें असें होणार. त्यांना शालिनीचे उदात्त विचार कसे कळणार! आपल्या धंद्यांत, आपल्या कामांत जे ते अडथळा आणणार. आपली जिथें तिथें जे ते छीः थूः करणार. शालिनीबद्दल लोक भलभलतें बोलूं लागणार. आणि तसें झालें म्हणजे आपल्याला तें सहन करवणार नाहीं. आपल्याला अशा संकटसमयीं आपल्याबद्दल सहानुभूति बाळगणारा कोणी भेटणार नाहीं. सगळे आपल्याला नको नको करून सोडतील. आणि असें झालें म्हणजे मोठा आनंद मानतील. शालिनीवर असें संकट आणण्याला आपण कारण होण्यापेक्षां मेलों तर किती बरें होईल, असेंही त्याच्या मनांत आल्याखेरीज राहिलें नाहीं. आपल्याच मार्गांत अशी अडचण कां यावी हें त्याला कळेना. ठरलेल्या रीतीप्रमाणें लग्न केलें तर आपलें आयुष्य किती सुखाचें होईल. कशाचीही आपल्याला वाण पडणार नाहीं. पण तेंच जर शालिनी म्हणते तसें केलें तर आपले हाल कुत्रा खाणार नाहीं. आपल्याला अगदीं हीन स्थिति प्राप्त होईल. या दोन्ही स्थितींचे

दोन चित्रपट त्यानें आपल्या डोळ्यापुढें रेखाटले. या दोन चित्रपटांपैकीं चांगल्या दिसणाऱ्या चित्रपटांत शालिनी कुठें दिसत नव्हती. दुसऱ्या चित्रपटांत शालिनी शुद्ध प्रेमानें आपल्याला स्नान घालीत आहे असें दिसलें. पहिल्या चित्रपटांत सर्व कांहीं आहे, पण मुख्य हवें तेंच नाहीं, तर त्याचा काय उपयोग? बाकीच्या वस्तु असल्या काय नी नसल्या काय दोन्हीं सारखेंच. असे एक ना दोन, किती तरी विचार कमलाकराच्या मनांत येत होते. शेवटीं तो आपल्या अंथरुणावरून उठला, त्यानें काडी ओढून किती वाजले ते पाहिलें. चांगलें पहाटेचे ४–४॥ वाजावयाची वेळ झाली होती. पहाटेचा थंडगार वारा येऊन डोकें थोडें शांत व्हावें, म्हणून त्यानें आपल्या उशागतची खिडकी उघडी टाकली. झोंप येईना, विचार थांबेनात, आणि कांहींएक पक्का निश्चयही होईना. तो जों जों विचार करी तों तों त्याला असेंच वाटे कीं, आपण कांहीं शालिनीच्या दुःखाला कारण होऊं नये. आपल्याला शालिनीबद्दल कोणी एक वांकडा ब्रही काढलेला खपणार नाहीं; आणि जरी यदाकदाचित् लोक तिच्यासंबंधीं वाईट बोलले नाहींत–तसें ते करायला कधींच रहाणार नाहींत–तरी आपल्याला दोष देतीलच. ते केव्हांही झालें तरी असेंच ह्मणणार कीं, हा गृहस्थ पाजी आहे, यानें तिला कुमार्गाला लावली, मग मी त्यांना कितीही जीव तोडून खरें खरें काय आहे तें सांगितलें, तरी माझ्यावर कोण विश्वास ठेवणार? ते केव्हांही असेंच ह्मणणार कीं, त्या पोरीनें त्याच्यावर विश्वास ठेवला, आणि ह्या माणसानें तिला गोड गोड थापा देऊन शेवटीं तिच्या गळ्याला फास लावला.

सकाळ झाली. घरांतलीं माणसें उठून इकडे तिकडे वावरूं लागलीं. तरी कमलाकर आपल्या अंथरुणावर विचार करीत पडला होता. शेवटल्या कल्पनेनें तर त्याला फारच घेरलें. त्याच्या डोक्यांतून कांहीं केल्या तो विचार जाईना. तो स्वतःशीं पुन्हां पुन्हां म्हणे कांहींही होवो पण मी नाहीं असलें साहस शालिनीला करूं देणार. तिला दूरदर्शित्व नाहीं, हेंच खरें. ती सध्यां विचाराच्या भरारींत आहे; तेव्हां तिला भावी संकटाचें कांहीं वाटत नाहीं; इतकेंच. आपण तिला असें करूंच देतां कामा नये. तिचें संरक्षण करणें, हें आपलें कर्तव्य; तें आपण करणार. सध्यां आपण तिच्या मनाविरुद्ध वागल्यानें तिला दुःख होईल खरें. पण तसें झालें तरी हरकत नाहीं. कारण तेंच परिणामीं तिच्या हिताचें होईल. आपण तिला ठराविक मार्गानेंच जावयाला लावूं. आणि त्या दुःखमय आत्मत्यागापासून

तिचा बचाव करूं. असें म्हणून तो आपल्या अंथरुणावरून तडक उठला. आणि आपली नित्याची कामें करूं लागला. आतां दुपारची वेळ येते केव्हां आणि आपण आपला निश्चय शालिनीला ज़ाऊन सांगतो केव्हां असें त्यास झालें. आज आपल्या हातून कांहीं तरी चांगलें काम होणार असें वाटून त्याला जरा बरें वाटलें.

---

## प्रकरण ५ वें.

होतां होतां दुपारची वेळ झाली. शेजारच्या खोलींतल्या घड्याळाचे ठण-ठण ठण–ठण असे चार ठोके कमलाकराला ऐकूं आले. लगेच आपल्या हातांतलें वाचीत असलेलें पुस्तक फेकलें, आणि तो शालिनीकडे जाण्यास निघाला, ' आज शालिनीला आपण आपला पक्का निश्चय सांगावयाचा; मुळींच डगमगायचें नाहीं. नानातऱ्हांनीं तिची आपण समजूत घालण्याचा प्रयत्न करूं. मला जशी तिची मैत्री मोडण्यास नको आहे तशी तिलाही माझी मोडण्यास नको असणारच. तेव्हां आपण हट्टच धरला तर ती आपलें खात्रीनें ऐकेल. ' असेच किंवा असल्यास तऱ्हेचे विचार कमलाकराच्या डोक्यांत एकसारखे चालले होते. तो भराभर पावलें टाकीत चालला होता. ठरावीक ठिकाणीं एका विस्तीर्ण आंब्याच्या झाडाखालीं शालिनी उभी होती. कमलाकर जवळ आला तेव्हां तिनें हंसत हंसत आपला हात हस्तांदोलनाकरितां कमलाकरापुढें केला. कमलाकरानें तिचा कोमल हात घट्ट आवळून खूप जोरानें हलविला. तो एवढेंच करून राहिला नाहीं तर त्यानें तिला पुढें ओढून तिचें चुंबनही घेतलें. कमलाकरानें तिचा हात धरून तिला कालव्याच्या कांठीं नेलें. तीं दोघे दोन चांगले धोंडे पाहून त्यावर बसलीं. शालीनीनें आपले पाय कालव्याच्या झुळझुळ वाहणाऱ्या पाण्यांत सोडून दिले. त्यांच्या डोक्यावर जांभळीच्या झाडाच्या फांद्या पसरल्या होत्या. मधून मधून पिकलेलीं जांभळें टपकन त्या वहाणाऱ्या पाण्यांत पडत होतीं. चोहींकडे शांत होतें. आसपास कोणी चिटपाखरूं नव्हतें. कमलाकर शालिनीजवळ बसून, तिचा एक हात आपल्या हातांत घेऊन त्याच्याशीं खेळत होता. शालिनी हें सगळें त्याला करूं देत होती; कारण तिनें त्याला मनानें केव्हांच वरिलें होतें. हळूं हळूं समोरच्या टेकडीवरील सूर्यप्रकाश कमी कमी होत चालला; पक्षांचा थवा

आकाश मार्गानें आपल्या घरट्याकडे जाऊं लागला. शालिनी आपली दृष्टी समोरील टेकडीकडे लावून अगदीं स्तब्ध बसली होती. एकदां दोनदां कमलाकरानें तिच्याशीं बोलायचा प्रयत्न केला. पण शालिनीनें त्याचा हिरमोड केला. ती जरा त्रासून म्हणाली, "कमलाकर नको. इतक्यांतच त्यासंबंधीं नका बोलणें काढूं ! आतां या वेळेस मला कितीतरी गंमत वाटते आहे ! ही असली निवांत शांतता किती आल्हादकारक आहे ! मला इथेंच तुमच्या मांडीवर डोकें ठेवून झोंप घ्यावी असें वाटतें. यावर कमलाकर कांहीं बोलला नाहीं. शालिनी आपलें डोकें कमलाकराच्या गुढग्यावर टेकून डोळे मिटून बसली होती. कमलाकर तिचे वाऱ्यानें भुरभुर उडणारे केस मागें सारीत शालिनीचें मुख न्याहाळीत होता. असो, तीं दोघें किती वेळ तरी बसलीं होतीं. शेवटीं कमलाकरानें त्या शांततेचा भंग करून बोलण्यास सुरवात केली. शालिनीनें एक उसासा टाकला. तिनें आपले मिटलेले डोळे चांगले उघडले. तिच्या मनांतून असेंच किती वेळ तरी बसावयाचें होतें. पण कमलाकरासाठीं ! शालिनी काय करणार नाहीं ? किती झालें तरी ती स्त्री ! तिचें अंतःकरण कोमलच असावयाचें. ते इतर स्त्रियांच्यापेक्षां जास्तच कोमल असेल पण कमी नाहीं.

मग कमलाकरानें हलकेंच आपले एक एक विचार शालिनीपुढें मांडण्यास सुरुवात केली. त्याचें सारें लक्ष शालिनीच्या चेहऱ्याकडे लागलेलें होतें. त्यानें आपल्या कडून तिचें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण व्यर्थ. त्यानें तिला आपली किती दुःस्थिती होईल ते नीट समजावून सांगितलें. एकदां आपण तो मार्ग स्वीकारला, लोकांच्या दृष्टीनें वाईट ठरलों म्हणजे पुन्हां आपली पूर्वस्थिती मिळविण्यास किती कठीण जाईल. नाहीं, मुळींच मिळणार नाहीं. असेंही त्यानें सांगितलें. एकदां गेलेली अब्रू परत मिळणें फार कठीण. मग पश्चाताप होऊन मुळींच उपयोग नाहीं. अशा नानातऱ्हांनीं त्यानें तिचें मन वळविण्याचा प्रयत्न केला पण ज्याचें नांव तें ! शालिनी अगदीं स्तब्ध होती. ती कमलाकराचें बोलणें मुकाट्यानें ऐकून घेत होती. तो तिला पुन्हां ह्मणाला, माझं जर तुझ्यावर इतकं प्रेम नसतं तर मी तुझ्याशीं त्यासंबंधानें इतकी वाटाघाट केलीच नसती. एकाद्या पाजी माणसाप्रमाणें तूं ह्मणतेस तसें मला केव्हांही करतां आलें असतें. परंतु तुझ्या निष्कलंक वर्तनासंबंधीं लोकांनीं उगीच भलते समज घेऊं नयेत असें मला वाटतें. लोकांना तुझा सद्धेतु कसा बरें

कळावा ? " इतके कमलाकर बोलला तरी शालिनी एक अवाक्षरही बोलली नाहीं. तिला आपलें बोलणें रुचत नाहीं हें पाहून त्याला फार वाईट वाटलें. तो पुढें म्हणाला, ' शालिनी, तुला माझें बोलणें आवडत नसेल तर मी बोलत नाहीं. पण माझी तुला एवढीच विनंति आहे कीं, तूं असल्या काट्याकुट्याच्या मार्गांत शिरूं नको. असलें कांहीं भलतें सलतें करूं नको. ' त्याच्यानें पुढें बोलवेना. त्याचा कंठ दाटून आला. त्याच्या डोळ्यापुढें भावी दुःस्थितीचें चित्र उभें राहिलें, आणि तो तिच्या विचारी चेहऱ्याकडे पहात बसला. शालिनी आतांपर्यंत कमलाकराचें बोलणें शांतपणें ऐकून घेत होती. कमलाकराचें आपल्यावर किती प्रेम आहे हें तिला स्पष्ट दिसून आलें. आपल्याला कमलाकराच्या मताप्रमाणें करतां येत नाहीं ह्मणून तिलाही वाईट वाटत होतें. तरी पण ती आपल्या निश्चयापासून तिळभरही ढळली नाहीं. जाऊंद्या. उगीच कमलाकराचं मन कशाला दुखवा ! त्याच्या मनाप्रमाणें केलं ह्मणून तरी काय झालं ! असा विचार शालिनीच्या मनाला नुसता शिवला देखील नाहीं. शेवटीं ती ह्मणाली, ' कमलाकर मी काय करूं तुमची अजून समजूत पटत नाहीं त्याला ? तुह्माला अजून असंच वाटतंय, कीं, हा सगळा विचार मला अगदींच नवा आहे ह्मणून. पण कमलाकर खरी गोष्ट अशी नाहीं. मी तुह्माला एकदां सांगितलं होतं आणि पुन्हां सांगतें, कीं, माझं सगळं आयुष्य या संबंधींचे विचार करण्यांत गेलं आहे. जवळ जवळ असंच ह्मणाना, कीं, मला विचार करतां येऊं लागला तेव्हांपासून मी या एकाच गोष्टीचा विचार केला ह्मणून या विषयासंबंधीं दुसरा तिसरा विचारच कधीं माझ्या मनांत आला नाहीं. या विचाराचें मूळ माझ्या अंतःकरणांत रुजून खोल गेलें आहे. त्याला मी रोज विचाररूपी पाणी घालून त्याची जोपासना केली आहे. चांगलें वाढीस लावलें आहे. आतां फक्त फुलें आणि फळें यावयाचीं राहिलीं आहेत. आणि तीं येणें बहुतेक अंशीं तुमच्यावरच अवलंबून आहे. तुमचें माझ्यावर वर प्रेम आहे. माझें तुमच्यावर आहे; मग तुह्मी मागें कां घ्यावें हेंच मला कळत नाहीं. पण जर तुह्माला असं करावयाचं नसेल तर आपण एकमेकांपासून दूर राहिलेलेंच बरें. मात्र तुमचा जो हेतू आहे तो कधींही साध्य व्हावयाचा नाहीं, एवढें बरीक ध्यानांत ठेवा. लग्न करण्याची वेळ आली तर मी ह्मणते तसंच लग्न करण्याचा माझा निश्चय आहे आणि मला संधी मिळाली तर मी आपला निश्चय शेवटास नेल्याखेरीज कधींही रहावयाची नाहीं. तुह्माला असं कदाचित् वाटत

असेल कीं, आपण नाहीं ह्मटलें ह्मणजे हिच्यावर येणारीं सर्व अरिष्टें टळतील म्हणून. पण तसं मुळींच नाहीं. त्यामुळं एवढंच होईल, कीं, दुसरा जो मनुष्य माझ्या पसंतीस पडेल तो कदाचित् तुमच्यापेक्षां कमी चांगला असेल आणि असा तो असला म्हणजे तुम्ही नाहीं म्हणून काय मिळविलंत ? ” इतकें बोलून झाल्यावर तिच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. ती तें आंतल्या आंत दाबून टाकण्याचा प्रयत्न करीत होती. आपलें चित्त स्वस्थ झाल्यावर ती पुन्हा ह्मणाली, “ सगळ्याच गोष्टी किती चमत्कारिक तऱ्हेनें घडून आल्या ! खरं पाहिलं तर दर मे महिन्यांत मी येथें येते, पण आजपर्यंत माझी कोणाशींही इतकी दाट ओळख झाली नव्हती. किंवा माझें ज्याच्यावर प्रेम बसेल असा एकदा मनुष्य या जगांत असेल, असें मला वाटलें सुद्धां नव्हतें. आणि आतां मला तुमच्याविना एक क्षण जाण्याची मारामार पडतें. सारावेळ तुमचं नांव माझ्या कानांत गुणगुणत असतं. सारी रात्र मी तुझ्याबद्दलचा विचार करीत असते. आणि सारा दिवस मी भावी सुखाच्या आशेंत निमग्न झालेली असते. मला सध्यां तरी असं वाटतंय, मग पुढं काय वाटेल तें वाटो, कीं,—तुह्मीं मला नाहीं ह्मणालांत म्हणजे सारं जग मला नाहीं असं वाटेल. माझें पहिलें कांहीं दिवस अतिशय दुःखांत जातील, मला अन्नपाणी गोड लागणार नाहीं, मन अगदीं उदास होईल, पुन्हां आपलें कोणावर इतकं प्रेम बसणार नाहीं असंही वाटेल. याप्रमाणें जरी दुःखाच्या पहिल्या घटकेस आपल्याला असें वाटतें तरी कोणाचीच ती स्थिति जशी कायम टिकत नाहीं त्याप्रमाणें माझीही टिकणार नाहीं. सृष्टीनियमा-प्रमाणें आपल्याला मागल्या गोष्टीचा विसर हा पडत जातोच. असें झालें म्हणजे माझें दुसऱ्या एकाद्या माणसावर प्रेम बसण्याचाही जास्त संभव. अशा वेळेस जर त्या माणसानें माझें म्हणणें कबूल केलें तर माझ्यावर काय कमी प्रसंग ओढवणार आहेत ! किंवा माझी काय कमी हेटाळणी होणार आहे ? मग तुमच्या अशा वाग-ण्याचा काय फायदा होईल ? तुमचा उद्देश आहे तो साध्य होईल कीं नाहीं ? मग उगीच माझ्या मनाला तुम्हीं विनाकारण दुःख देणार आणि उगीचच्या उगीच आपली जन्मा-ची ताटातूट करून घेणार ! मला तर तुह्माला पाहिल्या दिवशींच असं वाटलं, कीं आपला उद्देश तडीस नेण्यास जर ईश्वरानें कोणी मनुष्य या जगांत निर्माण केला असेल तर तो हाच. त्याशिवाय माझें मन तुमच्याकडे इतकें ओढत नाहीं;

त्याखेरीज असा योगायोग घडून यावयाचा नाहीं. असं आहे तर कमलाकर उगीच तुह्मी नाहीं कां म्हणतां ? ”

कमलाकर शालिनीकडे नुसता टक लावून पहात होता. त्याचा पक्का निश्चय होईना. तो थोडावेळ थांबून ह्मणतो “ इतकं तुझं माझ्यावर प्रेम आहे, तर माझ्याशीं तूं विधिपूर्वक विवाह करून घेण्यास तरी तयार कां असूं नयेस ? ”

“ कमलाकर, तुमच्यासाठीं मी काय करणार नाहीं ? काय वाटेल तें करीन. पण ही गोष्ट माझ्यापुरतीच नाहीं. आज जरी ती दिसण्याला माझ्या एकटीसंबंधाची दिसत आहे, तरी त्याचा परिणाम माझ्या एकटीवर होत नसून सर्व समाजावर होत आहे. मला चांगल्या वाईटाचा निवाडा करावयाचा आहे, मला सगळ्या जगाचें हित कशांत आहे तें पहावयाचें आहे; आज ज्यामुळें तुम्हाला मी अमक्याच मार्गानें जावें असें वाटतें, त्या वाटण्याचें मूळ कारणच माझ्या मनांतून समूळ नाहींसें करावयाचें आहे. माझ्या मनांत असल्या कल्पना येतात त्या उगीच येत नाहींत. त्यांत पुष्कळ अर्थ आहे. त्यामुळें माझ्या हातून एक मोठें सत्कार्य घडावयाचें आहे आणि तुह्माला आनंद व्हावा, तुमच्या इच्छा तृप्त व्हाव्यात, ह्मणून अनेकांच्या हिताचें जें काम तें सोडून द्यावें, असें मला वाटत नाहीं. व्यक्तीच्या हितापेक्षां समाजाच्या हिताकडे ज्यास्त लक्ष पुरविणें हें केव्हांही श्रेयस्कर आहे. तुमच्या प्रेमपाशांत गुरफटून जाऊन मी आपल्या मनाविरुद्ध वागलें, तर माझें जीवित व्यर्थ असेंच मी समजेन. त्यामुळें मला कधींही सुख लागणार नाहीं. भित्रेपणा व भेकडपणा माझ्या अंगीं येऊन मी कुचकामाचा ठरेन. मग तें जीवित असून नसून सारखेंच. ” कमलाकराचं मन डळमळूं लागलें, त्याला शालिनीचें ह्मणणें अगदीं तंतोतंत पटलें. तो आपल्या मनांत ह्मणाला, आपण शालिनीशीं लग्न केल्यानें आपला कांहींच फायदा होणार नाहीं. ती ह्मणते त्याप्रमाणें दुसऱ्या एखाद्या माणसाशीं लग्न करील, आणि तो मनुष्य तिच्या विचाराचें महत्व जाणणारा असेलच असें नाहीं. एवढेंच नाहीं, तर तो पाजीही असूं शकेल. त्याचें आंत एक आणि बाहेर एक असेंही वर्तन असेल. असें असलें ह्मणजे तो शालिनीला ऐन अडचणीच्या वेळेस सोडून गेल्याखेरीज रहाणार नाहीं. अशा अडचणींत ती सांपडली ह्मणजे तिचें कसें होईल ? ती कोणाकडे जाईल ? तिला मदत कोण करील ? वगैरे प्रश्न त्याच्या डोळ्यापुढें उभे

राहिलें. त्यानें एक सुस्कारा सोडला. आपल्या तापलेल्या मस्तकावरून त्यानें आपला हात फिरविला; एकदां शालिनीच्या निस्तेज मुखाकडे पाहिलें आणि पुन्हां तो आपल्याशीं ह्मणतो, " छे ! असें मुळींच होतां कामा नये. शालिनी असल्या दुष्ट नराधमाच्या तावडींत सांपडतां उपयोगी नाहीं. आपण तिच्याशीं लग्न केल्यानें असला कांहीं त्रास तर तिला खात्रीनें होणार नाहीं. आपल्या हातून तिला निष्ठूरपणें वागविणें तर कधींच होणार नाहीं. एकदां तिला आपण आपली ह्मटलें ह्मणजे आपण तिला किती सुख देऊं, तिच्यावर किती प्रेम करूं, पण एवढी एक अट शालिनीनें सोडली तर कितां चांगलें होईल ! मग आपल्यासारखे सुखी आपणच ! " तो जरा पुढें होऊन शालिनीला म्हणाला " शालिनी, तूं ह्मणतेस तसा मी वागलों तर लोक मला काय ह्मणतील ? याचं तुला कांहींच वाटत नाहीं कां ? "

" काय ह्मणतील ? आणि ह्मणाले तरी तुह्माला त्यांच्याशीं करायचं काय ? "

" असें ह्मणून कसं चालेल ? तुला त्याबद्दल विशेष दोष देणार नाहींत. पण माझ्याकडे बोट करून ह्मणतील, कीं, हा तो पाजी मनुष्य. यानें त्या गरीब मुलीला कुमार्गाला लावली. " शालिनी आपले अश्रुपूर्ण नेत्र कमलाकराडे वळवून ह्मणाली " लोकांनीं तुह्माला वाईट ह्मटलें, ह्मणून तुह्मी वाईट होत नाहीं ना ? मग त्यांची एवढी तुम्हाला भीति कशाला वाटावी ? लोक मुर्ख आहेत ह्मणून सोडून द्यावें. " कमलाकरानें पुष्कळ सांगून पाहिलें. त्यानें हट्ट धरला, विनवणी केली, तिच्या हृदयाला पाझर फुटेल असें बोलून पाहिलें, नाना तऱ्हेचे उपाय योजून पाहिले, पण कांहीं नाहीं. सगळें आळवावरलें पाणी. ती कांहीं केल्या आपला निश्चय सोडीना. ती पुन्हा पुन्हा कमलाकराला मान हलवून ' नाहीं, नाहीं, मी तुमचें ऐकणार नाहीं. एकदां माझा निश्चय झाला तो कायम. त्यापासून मी तिळमात्रही हलणें शक्य नाहीं. मग उगीच कां नाहीं नाहीं ते भलतेंच उपाय करून पाहतां ?" असें ह्मणाली. शालिनीचें अंतःकरण द्रवलें. तिला कमलाकराचें आपल्यावर किती अढळ प्रेम आहे, हें पूर्ण कळून चुकलें. पण त्यासाठीं ती आपलें अंतिम ध्येय सोडण्यास तयार नव्हती.

सत्याची कास धरल्यामुळें तिला पूर्ण स्वातंत्र्य मिळालें होतें आणि त्यामुळें तिला कसलीच भीति वाटत नव्हती. सरतेशेवटीं सर्व उपाय हरल्यावर कमलाकराचा एकच उपाय ठरला; आणि तो ह्मणजे आणखी कांहीं दिवस ही गोष्ट

लांबणीवर टाकणें हा होय. तसें केलें तर फार बरें होईल असेंही त्याला वाटलें. इतक्या महत्वाची गोष्ट घाईघाईनें ठरवूंच नये असें त्याला वाटलें. तेव्हां तो शालिनीला म्हणाला, " शालिनी आपल्याला या गोष्टीचा ताबडतोबच निकाल लावून टाकला पाहिजे असें कांहीं नाहीं. तर दहा पंधरा दिवस वाट पाहून मगच काय तें ठरवूं. म्हणजे मग मला तरी कदाचित् तुझें मन वळवितां येईल; नाहींतर तुला तरी माझें मन वळवितां येईल. इतकी घाई तरी करून करावयाचें आहे काय ? " कमलाकराला वाटलें होतें, कीं, शालिनी हें तेव्हांच कबूल करील. किंवा फार झालं तर ' एवढेंच कशाला आणखीसुद्धां कांहीं दिवस विचार करा; ' असें म्हणेल. पण तिनें तसें उत्तर मुळींच दिलें नाहीं. ती लगेच म्हणाली ' छे, तसें मुळींच नाहीं चालावयाचें, आतां या घटकेला त्याचा काय तो निकाल लागूं द्या. हीच वेळ चांगली आहे. आणि आतांच आम्हाला आमच्या बंदिवासांतून मोकळे होण्याच्या मार्गास लागूं द्या. आतां आणखी थांबून विचार करण्याची मुळींच जरूरी नाहीं. झाला इतका विचार पुरे झाला. माझें मन वळेल असें तुम्हाला वाटत असेल पण तसें होणें अगदीं अशक्य. आणि जर आपली मैत्री तुटावयाची असेल, तर " निदान पंधरा दिवस ती लांबणीवर जाऊं द्या ! " असें तुम्हाला वाटत असेल तर त्यांत कांहीं अर्थ नाहीं. जो एक निश्चय करावयाचा तो ताबडतोबच केलेला बरा. मला मग त्यांत टंगळमंगळ केलेली मुळींच आवडत नाहीं. जें काय करावयाचें तें सरळ सुव्यवस्थीत केलेलें बरें. मग त्याच्यांत लपवालपव नी छपवाछपव ती कशाला ? मी म्हणतें तसें पसंत असेल तर ठीकच आहे. नाहींतर आपली जन्माची ताटातूट झाली म्हणूनच समजायला हरकत नाहीं. मी आपलें मन मोकळें करून तुम्हाला सर्व सांगितलें आहे. मी तुमची आहे; आतां तुम्ही माझें होणं न होणं सर्वस्वी तुमच्यावर अवलंबून आहे. पण माझ्यासाठीं तुह्मी काय निकाल लावावयाचा तो तावडतोब लावून टाका. "

कमलाकर शालिनीकडे निश्चय दृष्टीनें पहात होता. शालिनीचा चेहरा लज्जेनें आरक्त झाला होता. परंतु तिनें आपली लाज, आपले विकार दाबण्याचा किंवा लपविण्याचा मुळींच प्रयत्न केला नाहीं. मनुष्यमात्राच्या सुखाकरितां या प्रश्नाचा एकदां निकाल लवणेंच श्रेयस्कर होतें. पण लाजून स्वस्थ वसल्यानें हा निकाल थोडाच लागतो आहे ! एकदां समाजाची सुव्यवस्थीत

पायावर घटना झाली, ह्मणजे शालिनीवर आले, त्याप्रमाणें कठीण प्रसंग तरुण मुलीवर येणार नाहींत. शालिनीला जसें सगळी लाजलज्जा सोडून देऊन, हें बोलूं नये, असें बोलणें बरें दिसणार नाहीं, असें वाटूनही कित्येक गोष्टी स्पष्ट बोलाव्या लागत होत्या त्या पुढल्या तरुण मुलींना बोलाव्या लागणार नाहींत. आणि त्यापासून घटकोघटकी मनाला होणारा त्रासही होणार नाहीं. आपल्याला जें करणें भाग आहे तें सगळें केलें पाहिजे. त्याबद्दल खेद वाटून घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं. हें शालिनीनें अगदीं ठाम ठरवून टाकलें होतें. स्त्रीजातीच्या स्वातंत्र्यासाठीं तिनें आजपर्यंत पुष्कळ विचार केला होता. आणि आतां त्याचा निकाल होण्याची वेळ जवळ येऊन ठेपली होती. अशा प्रसंगीं ती लाजून बसली तर तिला जें करावयाचें होतें, तें कधींच झालें नसतें.

कमलाकर शालिनीकडे कांहीं प्रेमानें कांहीं कौतुकानें असा पहात होता, त्याला तिचा निश्चय पाहून खरोखरच फार अभिमान वाटत होता. शालिनीचें अंतःकरण पूर्णपणें आपल्याला कळलें आहे असें त्याला वाटलें. जों जों तो शालिनीच्या अंतःकरणाचा थांग लावून पाहूं लागला, तों तों शालिनीनें अंगावर घेतलेलें काम तडीस नेणें फार कठीण आहे, याबद्दल त्याची खात्री होऊं लागली. शेवटीं तो म्हणाला, “ शालिनी तूं मला कचाटींत धरूं पहातेस. जवळ जवळ मला नाहीं म्हणतां येऊं नये असेंच कांहीं तरी तूं बोलतेस. मी पुरुष आहे, त्यामुळें मला तुझ्याशीं कठोर होणें अशक्य आहे. माझ्याच्यानें तुला नाहीं म्हणवणार नाहीं. तरी पण ही अशी भलतीच गोष्ट मी कशी कबूल करूं ? माझ्या प्रेमाचा फायदा तूं असा घेणार का ? माझी आहे यापेक्षां जर तुझ्यावर कमी ममता असती तर मी कदाचित् तुला हो म्हणून तेव्हांच म्हटलें असतें. पण माझं तसं वरपांगी प्रेम नाहीं. म्हणून तर तुला अगदीं कांहीं झालें, तरी नाहीं ह्मणावयाचें असा माझा निश्चय झाला आहे. ”

शालिनी झटदिशी रागानें दूर सरली. तिच्या कपाळाला आठ्या चढल्या. डोळे आकुंचित झाले, ओंठ थरथर कापूं लागले. आपली यांना मुळींच किंमत नाहीं; आपले मनोविकार म्हणजे कांहींच नाहींत, आपलें प्रेम त्यांच्यावर असलें काय नी नसलें काय, असेंच त्यांना वाटतेसें दिसलें. असें ती ह्मणाली. आणि लगेच उठून उभी राहून ती जाण्यासाठीं आपला पदर सावरूं लागली. पाऊल टाकण्यापूर्वींच शालिनी जरा आढ्यतेनें म्हणाली, “ कमलाकर हेंच तुमचें उत्तर ना ? ”

कमलाकर तिच्या हात धरून तिला खालीं बसवून ह्मणतो " छे, छे. हें नाहीं शेवटचें. "

आपल्याला पुन्हा शालिनीशीं एक शब्दही बोलूं ह्मटल्यानें बोलतां येणार नाहीं. ती आपल्याला एक नीच माणूस समजेल. आपल्याकडे कधीं ढुंकूनही पहाणार नाहीं. असें कमलाकराला वाटलें आणि त्यांत तो राग पाहून तर त्याचें मन अगदींच विरघळलें. तो ह्मणाला " शालिनी, तूं इतकी सुंदर, शहाणी, विचारी; बुद्धिवान अशी असतांना माझ्याच्यानें तुला दूर तरी कशी करवेल ? मी पुरुष आहे म्हणून तुझ्याकडे सहजगत्या वळणाऱ्या माझ्या मनाचा तूं फायदा घेऊं नकोस. "

शालिनी आपल्या तेजस्वी डोळयांनीं कमलाकराकडे रोखून पहात होती. जणूं काय ती कमलाकराच्या अंतःकरणांत शिरून खरा प्रकार काय आहे तेंच पहात होती. तिचा राग जरा शांत झाला होता. ती जास्त गंभीरपणानें पण जरा ठासून म्हणाली. ' मला तुमच्या कोमल अंतःकरणाचा मुळींच फायदा घ्यावयाचा नाहीं. तुमच्या मनाला, बुद्धीला, विचाराला पटलें तरच कबूल करा. उगीच भीड धरून माझ्या मताप्रमाणें उत्तर मिळालेलें मला मुळींच नको आहे. पुष्कळ वेळां आपलें यासंबंधीं बोलणें झालें होतें, आणि प्रत्येक वेळेस तुमचें मत माझ्याचप्रमाणें होतें, असें असून आज तीच गोष्ट करायची वेळ आली तर तुह्मी मागें कां घ्यावें ? लोकांनां कां भ्यावें ? सुखाची आशा कां धरावी ? सुख भोगणें हीच काय जन्माची इतिकर्तव्यता आहे ? '

" हो माझींही मतं तुझ्याचप्रमाणें आहेत. नाहीं कुठें ह्मणतो ? त्याबद्दल मुळीं वादच नाहीं, आणि ते विचार बोलून दाखविण्यासही मी कचरत नाहीं. तुमची ओळख होण्यापूर्वींचेच हे माझे विचार आहेत पण ते फक्त विचारच होते. आपण होऊन तें काम अंगावर घ्यावें, ते विचार अंमलांत आणावेत असें कधीं माझ्या मनाला शिवलें देखील नाहीं. स्त्रीजातीला पूर्ण स्वातंत्र्य मिळण्यास पुरुषजातीचा स्त्रीजातीवरचा आधीं ताबाच नाहींसा झाला पाहिजे. आणि तो सुद्धां असा नुसता वरवर नाहींसा होऊन उपयोगी नाहीं. सध्यांचीं लग्नं, म्हणजे लग्नंच आहेत. त्यांत जितका अमंगलपणा असणें शक्य आहे तितका आहे. सध्यांच्या लग्नानें जितका स्वार्थ साधता येईल तितका पुरुषानें साधला आहे. तेव्हां हें काम कोणीतरी एकदां केलेंच पाहिजे, असेंही मला वाटतें; त्याशिवाय गत्यंतर

नाहीं. पण शालिनि ज्या स्त्रिया ही गोष्ट करूं पहातील, त्यांच्या जिवावर बेतलीच म्हणून समज. त्यांना या जगांत तरी कुठें थारा मिळणार नाहीं, त्यांना लोक नुसतें त्राही भगवान करून सोडतील, त्यांचे अनन्वीत हाल होतील आणि तसें तुझे हाल होऊं नयेत असें मला वाटलें तर यांत माझा काय दोष? असले दुःखाचें प्रसंग तुझ्यावर आणण्याला निदान मी तरी कारणीभूत होऊं नये असें मला वाटतें. आणि तसें मला कांहीं वाटलें तर त्यांत माझी कांहीं चूक आहे असें मला वाटत नाहीं.”

शालिनी पूर्वीप्रमाणेंच कमलाकराकडे अगदीं निश्चल दृष्टीनें पहात होती. पण यावेळेस तिच्या नेत्रांतून अश्रू उभे राहिले. हृदय भरून आलें. कंठ दाटून आला. कमलाकराच्या अगदीं जवळ जाऊन आपलें दोन्हीं हात त्याच्या खांद्यावर ठेवून, त्याच्याकडे केविलवाण्या दृष्टीनें पहात म्हणाली “कमलाकर तुम्ही असं काय बरं करतां ? माझी काळजी करूं नका, ह्मणून मी तुह्माला कितीतरी वेळां सागितलं नाहीं कां ? माझा जन्माचा मित्र कोण असावा ह्याच काय तो प्रश्न आहे. मग तो तुमच्याच सारखा असणं बरं नाहीं का ? तुह्माला माझ्याबद्दल खरी कळकळ वाटते; तुमचें माझ्यावर खरें प्रेम आहे, ह्मणूनच मी तरी तुह्माला विचारलें ना ? तसं जर मला तुमच्याबद्दल वाटलं नसतं तर संगळाच ग्रंथ आटपला होता. मग मी तरी तुह्माला विचारायला कशाला आले असते ? मी जर वाटेल त्या संकटांना तोंड द्यायला तयार आहे तर तुम्ही का असें मागें घ्यावें ? ”

‘ कारण माझें खरें प्रेम आहे. ’ कमलाकरानें जरा जोरानें उत्तर दिलें. शालिनी पुन्हा उठून उभी राहिली. तिचा श्वासोच्छ्वास जोरानें चालला होता. ती आतां ताबडतोब निघून जाण्याच्या विचारांत होती. जातां जातां ती कमलाकराला ह्मणाली “ बरं, मग मी आतां जातें. कमलाकर, ही आतां आपली शेवटचीच भेट ह्मणायची ! ’ असें ह्मणून ती चालूं लागली. पण कमलाकरानें तिला जाऊं दिली नाहीं. त्यानें तिचा हात धरून तिला आपल्या शेजारीं बसविली. आणि तो तिला अगदीं हलकें ह्मणाला “ मी तुला कधींही आपल्या जवळून जाऊं देणार नाहीं. ही अशी घट्ट धरून ठेवीन. ” असें ह्मणून त्यानें तिला दृढ आलिंगन दिलें. “ तूं स्वतः तुझें माझ्यावर किती प्रेम आहे हें व्यक्त केलें आहेस. अशी मौल्यवान देणगी दिल्यावर कोणत्या पुरुषाला ती नाकरणें शक्य

आहे ? तुझ्यासारखी बायको मिळणें मोठेंच भाग्य ! आणि तीसुद्धां तूं आपल्या स्वतःच्या आवडीनें मला पसंत केल्यावर मला कां बरें आनंद होऊ नये ? शालिनी, मी आजपासून तुझा आणि तूं माझी—माझी आहेस. दुसऱ्या कोणाचीही नाहींस. आपण असेच जन्मभर सुखानें राहूं. ”

शालिनी आपले दोन्ही हात कमलाकराच्या खांद्यावर ठेवून व त्याच्या तोंडाकडे मोठ्या उत्सुकतेनें पहात ह्मणाली, ‘ मग तुमची संमती आहे तर ? ’

‘ हो, आहे. तूं मला दुसरा मार्गच ठेवला नाहींस तर काय करायचें ? ’ शालिनी पुढें कांहींच बोलली नाहीं. ती आपलें डोकें कमलाकराच्या खांद्यावर ठेवून स्वस्थ बसली होती, थोड्या वेळानें ती हलकेंच ह्मणाली ‘ कमलाकर, तुह्मी माझ्या ह्मणण्याला संमती दिली, याबद्दल मला किती आनंद होत आहे ! मी किती सुखी झाले ! हें मी कसें सांगूं ? ”

---

## प्रकरण सहावें.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें कमलाकरानें अर्धवट मनांत असून आणि अर्धवट नसून शालिनीच्या म्हणण्यास रुकार दिला. त्या वेळेस त्याच्या मनाची स्थिति कांहीं विलक्षण झाली होती. त्याला धड होयही म्हणतां येईना आणि धड नाहींही ह्मणतां येईना.

या पुढची पायरी तर फारच कठीण होती. आतां ठरलेला निश्चय अमलांत आणावयाचा होता. तो कसा आणावा याविषयीं विचार एकसारखे त्याच्या मनांत घोळत होते. शालिनीचा रहाण्यासंबंधाचा बेत कसा काय होता हें अजून त्याला समजलें नव्हतें. दोघांनीं एके ठिकाणीं एका घरांत रहावयाचें, असेंच त्याला वाटत होतें, फक्त लग्नाचा विधि तेवढा करावयाचा नाहीं. बाकी नेहमीं जसे सगळे लोक रहातात तसेच रहावयाचें असें त्याला वाटलें. कमलाकराच्या मनांत असाच विचार येणें बरोबर होतें. कारण आजपर्यंत जग जसें चालत आलें तसेंच आपण जावयाचें असें त्याला वाटलें तर मोठेसें आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. कोणत्याही साधारण माणसाला असेंच वाटलें असतें. कमलाकरानें नवी जागा पहाण्याची गोष्ट शालिनीजवळ काढली तेव्हां शालिनीला

हंसूच आलें. ती त्याला हंसत हंसतच ह्मणाली, ‘ कमलाकर, तुमच्या आपल्या जुन्या कल्पना पुन्हा आहेत त्या आहेतच. ’ कमलाकराला तिच्या बोलण्याचा अर्थच कळला नाहीं. तो तिच्याकडे पहातच राहिला. जणुं काय ‘ ह्यांत कसली आली आहे बुवा जुनी आणि नवी कल्पना ? ’ असेंच तो विचारीत आहे. ती ह्मणाली “ आजपर्यंत जशी आपली मैत्री होती तशीच ती पुढें रहाणार. मग त्याला जागा बदलण्याचें काय कारण ? लग्न झाल्याबरोबर बायकोला आपल्या घरीं आणून ठेवण्याची जुनी पद्धत आहे तीच आपण कायम ठेवली पाहिजे असें नाहीं. पूर्वी लग्न करतेवेळीं तरी स्त्रीचें मत विचारीत होते कोण ? लग्न झाल्याबरोबर स्त्रीही पुरुषाची मालमत्ताच बनते. मग जसें एकादें टेबल विकत आणून आपल्या घरीं ठेवावयाचें, त्याचप्रमाणें बायकोला घरीं आणावयाची, तिच्याकडून गुलामाप्रमाणें काम करून घ्यावयाचें आणि पोटापुरतें अन्न तिला द्यावयाचें, पण तशी कांहीं आपली स्थिति नाहीं. आपण दोघेही स्वतंत्र आहों. माझें घर निराळं असणं, माझ्या घरांत माझ्या मनाप्रमाणें सर्व कांहीं असणं हेंच चांगलें नाहीं का ? या व्यवस्थेनें आपल्या दोघां मधलें प्रेम अगदीं कायम टिकेल. आणि नवीन लग्न झालं आसतां स्त्रीपुरुषांत जें अप्रतीम प्रेम असतं तेंच प्रेम सदासर्वदा राहील असं मला वाटतें. पुन्हा एका घरांत नेहमीं राहून जितकें स्वातंत्र्य मिळण्यास पाहिजे तितकं कधींच मिळत नाहीं. मग दोघांपैकीं कोणाला तरी आपल्या आवडी नावडी बाजूला साराव्या लागतात. आणि त्याही बहुतेक स्त्रीलाच. तर तसं होऊं नये अशी माझी फार इच्छा. ” शालिनीनें ही गोष्ट पूर्वींच विचार करून ठरविलेली होती. तेव्हां तिनें कमलाकराला आपल्या रहाण्याच्या पद्धतींत मुळींच फेरफार करावयाचा नाहीं असें तेव्हांच सांगून टाकलें. कमलाकराशीं लग्न केल्याची वर्दी समाजाला आधीं दिली पाहिजे, नाहीं तर सर्व ब्रह्मघोंटाळा होईल, असें तिला वाटलें नाहीं. उलट असली दवंडी पिटण्याचें कारण तिच्या शुद्ध सरळ मनाला समजेना. लग्नाची गोष्ट खरी पाहिली तर इतकी नाजूक आहे, कीं, त्याची सगळ्या गांवभर दूमदूम करून दवंडी पिटविणें कोणत्याही सुशिक्षीत माणसास आवडणार नाहीं. लग्नासारख्या प्रसंगीं जी गंभीरता असावयास पाहिजे ती लांबच राहते. आणि नुसताच आरडाओरड आणि गाजाबाजा जिकडे तिकडे ऐकूं येतो. बरोबरच आहे. कोणाच्या मनांत त्या शुभप्रसंगाचें महत्व येत असेल तर ना ! पण जो तो तेथें

नुसती मजा पाहाण्यासाठीं किंवा आपला कांहीं तरी कार्यभाग साधण्यासाठीं आलेला असतो. तेव्हां असं ठुमठुम, ढुमढूम करणें किंवा आपल्या राहणींत फेरफार करून आपल्या लग्नाचें प्रदर्शन करणें शालिनीला अगदीं पसंत नव्हतें. ती असें करणें हें एक रानटीपणाचें द्योतक आहे असेंच समजत असे. लग्नाच्या वेळेस जो येतो तो साहजीकच नवरानवरीकडे जरा बारकाईनें पहातो, आणि मग आपल्या मताप्रमाणें तें जोडपें शोभतें का वाइट शोभतें, याची आपल्या मित्र-मंडळींत चर्चा करूं लागतो. अशीं बोलणीं सुरू झालीं म्हणजे नवरीला तरी या प्रसंगांतून आपण एकदां केव्हां सुटतो असें होतें. तिच्या बिचारीच्या त्या वेळच्या नाजूक मनोविकारांना या लोकांच्या पहाण्यानें किती धक्का बसतो याची तिलाच एकटीला कल्पना करतां येईल. या सर्व रानटी रूढींना अजीबात फाटा देण्याचें शालिनीनें ठरविलें तर त्यांत काय आश्चर्य ?

रूढीमुळें मनुष्याची दृष्टी किती अंध बनते, ही गोष्ट लग्नाच्या चालीवरून चांगली कळून येते. ज्या गोष्टीचें प्रदर्शन करूं नये असें सहज मनाला वाटेल त्याच गोष्टीचें प्रदर्शन स्त्रिया किती उल्हासानें करितात, याचें नवल वाटतें! जी गोष्ट तरुण मुलीला आपल्या आईबापाजवळ सांगण्यासमुद्धां ‘कशी सांगूं काय सांगूं’ असें वाटत असतें, त्याच गोष्टीची विचक्षणा त्या मुलीला भर मंडळांत आणून करावयाची, यासारखा हिडीस प्रकार तो कोणता? हा सर्व प्रकार चालला असतां त्या मुलीला मेल्यापेक्षां मेलें होऊन जातें. पण करते काय बिचारी! कुठें तरी पळून जाऊन लपून बसावेंसें वाटतें; लोकांच्या अगदीं दृष्टीस पडूं नये असें सुद्धां पुष्कळ वेळां मनांत येतें, पण तसें करणें शक्य नसतें. म्हणून ती आपली मुकाट्यानें जें काय करायला सांगतील तें करीत असते. कधीं एकदां हे विधि आटोपून लोक आपआपल्या घरीं जातात असें तिला होऊन जातें. शालि-नीच्या बाबतींत अशी गोष्ट होणें मुळींच शक्य नव्हतें. आणि त्याबद्दल तिला मनापासून आनंद होत होता.

शालिनी कमलाकराला म्हणाली, “आतां मला लवकरच मुंबईस जावें लागेल. आमची शाळा दादरला आहे. मी शाळेपासून अगदीं जवळच रहातें. त्यामुळें माझ्या जाण्यायेण्यांत मुळीं वेळ जात नाहीं. मला तिथें राहिल्यानें सर्व कांहीं सोयीचें पडतें. पुन्हा माझी तेथें बरीच ओळख आहे. भोंवतालची वस्ती साधारण गरीब लोकांचीच आहे. त्यामुळें मला तेथें रहाणें सोयीचें वाटतें. आतां

आपली मैत्री झाली म्हणून नेहमींचे आपले व्यवसाय बंद ठेवण्याचें कांहीं कारण नाहीं. तुम्ही मुंबईसच रहातां तेव्हां तुम्हाला माझ्याकडे सहज जातां येतां येईल. मी आपलें काम करीन. तुम्ही आपलें करा. ”

कमलाकर, शालिनीचें हें बोलणें ऐकून बुचकळ्यांत पडला. तो थोड्या वेळानें ह्मणतो. “ शालिनी, तूं कोणालाच कां आपलं नातं कळविणार नाहींस ! ”

“ छे मुळींच नाहीं. त्यांना आपण होऊन मुद्दाम जाऊन सांगण्याचें काय कारण ? त्यांनीं कोणी विचारलें तर गोष्ट निराळी. ”

“ तूं आपल्या हेडमास्तरणीला सुद्धां नाहीं. सांगणार ? ” कमलाकरानें जरा अचंबा वाटून विचारलें. “ छे; मुळींच नाहीं. तुमची माझी मैत्री झाली याच्याशीं हेडमास्तरणीचा काय संबंध ! उगीच आपणच त्यांना कांहीं जाऊन सांगावयाचें वाटतें ? ”

यावर कमलाकर कांहींच बोलला नाहीं. तो आपल्याशींच स्वस्थ विचार करीत बसला होता. शालिनी पण आपल्या भावी आयुष्याचा विचार करीत स्वस्थ बसली होती. शालिनीची एक एक गोष्ट ऐकून कमलाकराच्या छातींत धस्स होत होतें. शालिनीचें एक एक विचार ऐकून तिची आत्म-त्याग करण्याची किती तयारी आहे, याबद्दल कमलाकराची पुरी खात्री झाली. कमलाकराला आतां शालिनीच्या दुःस्थितीची कींव करण्यापलीकडे कांहींच उरलें नाहीं. तो मधून मधून वाईट वाटून सुस्कारे मात्र टाकीत होता.

शालिनी पुढें ह्मणाली, माझ्या मनांतून कोणाचीच गोष्ट चोरून ठेवायची नाहीं. तसं करणं माझ्या अगदीं स्वभावाविरुद्ध आहे. पण तशीच वेळ आल्या-खेरीज उगीच कोणती गोष्ट सांगण्यासही मला आवडत नाहीं. ” शालिनीला तिच्या हेडमास्तरणीनें विचारलें असतें तर तिनं सर्व कांहीं उघड सांगितलें असतें. पण उगीचच्या उगीच विचारली नाहीं ती हकिगत आपणच सांगणें तिला बरें वाटलें नाहीं, खरें पाहिलें तर या गोष्टींत कमलाकराशिवाय दुसऱ्या कोणाचाही संबंध नव्हता. असल्या नाजुक संबंधांत दुसऱ्या कोणाला आपलें मत देण्याचा किंवा मधें मधें तोंड घालण्याचा मुळींच अधिकार नव्हता. जोंपर्यंत कोणत्याही व्यक्तीच्या वर्तनानें समाजाच्या हिताला बाध येत नाहीं तोंपर्यंत समाजाला त्या व्यक्तीच्या बाबतींत ढवळाढवळ करण्याचा मुळींच हक्क पोंचत नाहीं.

आणखी दुसऱ्या कांहीं बाबींसंबंधीं कमलाकरानें तिला एक दोन प्रश्न विचारले. त्याचीं उत्तरें तिनें आपल्या नेहमींच्या सरळ स्वभावानुरूप दिलीं. जी गोष्ट वाईट ती कधींच ती करीत नसे. ' आजपर्यंत जशी मी आपली ' उपजीविका केली तशीच पुढेंही करावी, असें मला वाटतें. स्वतंत्रता मिळवावयाची असेल तर स्त्रियांनीं सध्यां तरी निदान आपल्याला लागणारे पैसे मिळविले पाहिजेत. दुसऱ्यावर अवलंबून असलें, ह्मणजे आपल्या मताप्रमाणें आपल्याला वागतां येत नाहीं. आपले विचार, आपल्या मनाचा कल, आपल्या इच्छा, सर्व कांहीं तेवढ्यासाठीं आपल्याला बाजूला ठेवाव्या लागतात. चाकरी नोकरी करावयाची ह्मणजे मनाला अतिशय त्रास होतो; नाहीं नाहीं त्या काळज्या उत्पन्न होतात. असा त्रास संततीच्या दृष्टीनें मातेस होणें इष्ट नाहीं आणि याकरितां स्त्रियांना नोकरीसारखे दगदगीचें काम करावयास लागूं नये हें चांगलें. तरीपण जोंपर्यंत स्त्रियांना परावलंबनामुळें आपल्या मताप्रमाणें वागतां येत नाहीं, तोंपर्यंत तरी निदान प्रत्येक स्त्रीला आपल्या पायांवर उभें रहातां आलें पाहिजे. जसजसें जग सुधारत जाईल तसतशी स्त्रियांना स्वतंत्रता मिळेल. स्त्रियांची किंमत जाणून पुरुष त्यांच्याशीं वागूं लागतील. आपण जसें समाजाचें जरूरीचें आणि महत्वाचें काम करतों, त्याचप्रमाणें स्त्रियाही एका तऱ्हेनें आपल्याच इतकें महत्वाचें किंबहुना कांकणभर जास्तच महत्वाचें काम करतात असें पुरुषांना वाटूं लागेल. त्या वेळेसच स्त्रियांना बरेंच स्वातंत्र्य मिळेल, असें वाटतें. जोपर्यंत अशी स्थिति नाहीं, तोंपर्यंत तरी निदान प्रत्येक स्त्रीला आपली उपजीविका करितां येईल असा एकादा तरी धंदा येणें अवश्य आहे. नाहींतर जगण्यास जी गोष्ट अवश्यक तिच्यासाठींच जर आपल्याला लोकांच्या तोंडाकडे बघावें लागलें, तर कोणतें काम स्वतःच्या हिंमतीवर आपल्याला काय करितां येईल ? आणि नुसती पोटाची खळगी भरावी ह्मणून जर आपल्याला जो अन्न देतो त्याच्या पाठीमागून कुत्र्याप्रमाणें जावें लागलें तर यासारखी खेदाची आणि लाजीरवाणी गोष्ट ती कोणती ? स्वावलंबनाखेरीज स्वातंत्र्य मिळणें शक्य नाहीं. एवढ्यासाठींच शालिनीनें जोंपर्यंत शाळेचे अधिकारी काम करूं देतील तोंपर्यंत तें करावयाचें ठरविलें. थोडा वेळ गेल्यावर आठवल्यासारखें करून कमलाकरानें विचारिलें " आपण असें वागल्यावर आपल्या मुलाबाळांचें कसें व्हावयाचें ? त्यांची का आपल्याला काळजी करायाला नको ? "

हा मोठा कठीण प्रश्न लोक नेहमीं तो टाळीत असतात. कमलाकराला या गोष्टीचें मोठेंच गूढ पडलेलें दिसलें. त्याला या अडचणींतून कसें पार पडावें तें सुचेना. पण शालिनीची स्थिति अगदीं याच्या उलट होती. जशी बाकीच्या विषयवार शालिनी स्पष्टपणें बोले त्याचप्रमाणें ती याही विषयावर उघडपणें बोलत असे. हा प्रश्न नैतिक आणि सामाजिक दृष्ट्या मोठा महत्वाचा होता. त्याचा विचार केल्याखेरीज एकादी गोष्ट करणें अगदीं गैर होतें. परंतु शालिनी अविचारानें वागणारी मुलगी नव्हती. तिनें यासंबंधीं पूर्ण विचार केला होता, ती लगेच म्हणाली, "माझ्या मुलांना असा जन्म झाल्याबद्दल तर मुळींच वाईट वाटणार नाहीं. आजपर्यंत कोणाचा जन्म झाला नाहीं असा त्यांचा समज होईल. त्यांचा खऱ्या तात्त्विक आणि धार्मीक तत्वाला धरून होईल. तीं प्रेमजन्य मुलें होतील. तेव्हां आपल्यासारख्या आईबापांच्या पोटीं आल्याबद्दल त्यांना मुळींच वाईट वाटणार नाहीं." "तें सर्व खरं" कमलाकर मध्येंच म्हणाला, "पण त्यांना नीट वाढवून योग्य शिक्षण तर दिलं पाहिजे नां ? पण तसं आपण करूं म्हटलं तर समाजाकडून पुष्कळ अडथळा येण्याचा संभव. आणि आपल्याला हवें तसें शिक्षण त्यांना देतां आलें नाहीं तर मग दोष कोणाचा ?" "अडथळा, अडथळा असा तो काय येणार आहे ? फार झालं तर आपल्या मुलांना शाळेंत घेतलें नाहीं म्हणून त्यांचें फारसें नुकसान होईल असें मला वाटत नाहीं. शाळेचें शिक्षण तर निदान आपल्याला त्यांना घरींच देतां येईल. पुढें कॉलेजांत तुम्हीं म्हणतां तशी अडचण पडेल असें मला वाटत नाहीं."

याप्रमाणें शालिनीचे विचार कमलाकरापुढें मांडल्यावर त्याची बरीचशी समजूत पटली. शालिनीला आपल्याला बरोबर काय पाहिजे, आणि काय केलें पाहिजे हें पूर्ण माहित होतें.

पुढें कांहीं दिवसांनीं तीं दोघें मुंबईस गेलीं. एक आठवडा गेल्यावर कमलाकर एक दिवस संध्याकाळीं शालिनीकडे आला. शालिनीनें आपल्या घराची खूण त्याला सांगून ठेवली होती. तो त्या खुणेप्रमाणें एका बंगल्यापाशीं येऊन थबकला. हा बंगला मुख्य रस्त्याला मिळणाऱ्या एका लहान रस्त्यावर होता. कमलाकर आला तेव्हां संध्याकाळचे पांच वाजले होते. रस्त्यावर अगदीं शांतता दिसत होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूला लहान लहान बंगलेच होते. दुकानें

वगैरे कांहीं नव्हतीं. त्यांतून संध्याकाळची वेळ असल्यामुळें बहुतेक बंगल्यांतील मंडळी फिरावयास गेली होती. फक्त लहान मुलें काय तीं आपापल्या बंगल्याच्या बाहेर येऊन खेळताना दिसत होती. बाहेर शालिनीच्या नांवाची पाटी पाहतांच आपण अगदीं बरोबर आलों असें कमलाकराला कळलें. तेव्हां त्यानें कांहीं एक संशय न घेतां दाराला असलेली घंटा वाजविली. त्याबरोबर खोलींतील पावलांचा आवाज कमलाकराला ऐकूं आला. लवकरच दार उघडलें, आणि “ कमलाकर आंत या. ” असे मंजुळ शब्द त्याच्या कानीं पडले. कमलाकरानें वळून पाहिलें तों शालिनी अर्धवट दार उघडून त्याकडे हंसत पहात उभी असलेली दिसली. कमलाकर आंत गेला. शालिनीनें दार लावलें. नंतर कमलाकराचा हात धरून ती त्याला आपली एक एक खोली दाखवूं लागली. प्रत्येक खोली फारच व्यवस्थित होती. बाकीच्या खोल्या दाखवून झाल्यावर शालिनीनें त्याला आपल्या अभ्यासाच्या खोलींत नेलें. या खोलींत प्रख्यात पाश्चात्य कवी कीट्स, शेले वगैरेचीं काव्यें शेल्फवर झळकत होतीं. भिंतीवर प्रतिभाशाली कवी आणि मोठे ग्रंथकार यांचे फोटो लावलेले होते. शालिनीनें स्वच्छ पांढरा पोशाख केला होता. तिच्या काळ्याभोर केसांत एकच गुलाबाचें फूल होतें. आणि तें पांढऱ्याच रंगाचें होतें, तिच्या टेबलावर एक कांचेच्या भांड्यांत पुष्पगुच्छ ठेवलेला होता. त्याच्या शेजारीं एका चांदीच्या तबकांत दोन सुंदर हार होते, ते दिसतांच कमलाकरानें शालिनीकडे जरा हंसून पाहिलें. शालिनीनें लगेच एक हार घेऊन कमलाकराच्या गळ्यांत घातला. कमलाकरानें उरलेला दुसरा शालिनीच्या गळ्यांत घातला. त्याबरोबर शालिनीच्या अंगावर रोमांच उठले. ती लाजत आनंदानें कमलाकराकडे पाहूं लागली. कमलाकरानें तिला आपल्याजवळ ओढून घेऊन दृढ आलिंगन दिलें. याप्रमाणें शालिनीच्या लग्नाचा पहिला दिवस पार पडला.

---

## प्रकरण सातवें.

या पुढले सहा सात महिने शालिनीचे फारच सुखांत गेले. ती आपलें रोजचें शाळेचें काम मन लावून करी. त्याचप्रमाणें तिचीं इतर नित्याचीं कामें पण अगदीं वेळेवर होत. कमलाकर रोज संध्याकाळीं बहुतेक शालिनीकडे येऊन

गप्पा गोष्टी करीत असें. शालिनीचें मन फार शुद्ध होतें. आपण कांहीं पाप करतों आहों, असें तिला कधीं सुद्धां वाटलें नाहीं. एवढेंच नाहीं तर त्यासंबंधीं अशी नुसती शंकासुद्धां आली नाहीं. आपण वागतों या रीतीनें वागणें लोकांच्या दृष्टीनें फार वाईट. तेव्हां आपले शेजारीपाजारी आपल्यासंबंधीं नाहीं नाहीं तें बोलत असतील असेंही विचारीला कधीं वाटलें नाहीं. परंतु आसपासच्या बहुतेक लोकांची दृष्टी अलिकडे शालिनीच्या वर्तनाकडे लागलेली होती. शालिनी त्यांचा एक बोलण्याचा विषयच होऊन बसली होती. कमलाकर शालिनीकडे नेहमीं येतो जातो तें पाहून हा माणूस कोण असावा ? तो या मुलीकडे इतक्या वेळां कां येतो ? वगैरे साहाजिक मनांत येणारे प्रश्न शेजाऱ्यांच्या डोक्यांत येऊं लागले आणि या बिकट प्रश्नाचा उलघडा होण्यासाठीं ते लहान लहान सभा भरवूनच जणूं काय त्यांत हा प्रश्न पुढें कढीत. कोणी म्हणत, ' असेल तिचा भाऊबिऊ ! कोणी म्हणत, असेल तिच्या ओळखीचा, म्हणून येत असेल. कोणी कांहीं, कोणी कांहीं जें ज्याला सुचेल तें तो सर्वांना सांगे. पण त्यांतल्या एकाद्याला हें सर्वांचें म्हणणें अगदीं नापसंत पडून तो म्हणे ' कसला आला आहे भाऊबिऊ ? भाऊ असता तर तो येथेंच रहतां नाहीं का ? आणि त्याला तिचा भाऊ म्हणायला त्या दोघांच्या रुपांत कांहीं साम्य तरी ! कांहीं तरी तुम्ही बोलतां झालें. छत ! भाऊबिऊ मुळींच नाहीं. कांहीं तरी पाणी मुरताहे खास ! दुसरें काय ! त्या शिवाय का रोज कोणी हेलपाटे घालील ? असें किंवा याहीपेक्षां पाचकळ भाषणें झाली म्हणजे सर्वांच्याच मनाला बरें वाटून ते आपली सभा बरखास्त करीत. आसपासच्या मोलकरणी गडीमाणसें सुद्धां शालिनीचें वर्तन पाहून फार अचंबा करीत. त्यांना वाटे या बाईची चालचालणूक तर बरी दिसतें आणि हें काय हें ? त्यांना काय बिचाऱ्याना ! नवरा असला म्हणजे मग तो कसला दारुड्या नाहीं तर पाजी भामटा असेना, त्याच्या बरोबर दिवस कंठणें, हीच चांगली स्थिति, आणि यांतच सर्व कांहीं नीति आहे असें त्यांना वाटे. ही बाई सगळं कांहीं चांगलें असून, अशी आपली छीः थूः का करून घेते हेंच त्यांना समजेना. गडी माणसें नुसतीं अचंबाच करून होतीं. पण जरी माणसें देव-धर्माचा तसला आव घालून मोठेपणानं गांवांत हिंडत तरी त्यांना काय थोडेच मुकाट्यानें बसवतें ! असा कांहीं विषय त्यांना बोलण्यास लागतच असतो. मग शालिनीचें वर्तन पाहून त्यांच्या जिभा लवलवायला लागल्या तर काय नवल ! शालिनी शाळेंत जाण्यास निघाली किंवा दुसऱ्या कांहीं कामानिमित्तानं घराबाहेर

पडली कीं, यांनीं तिच्याकडे पाहून डोळे मिचकावेत, नाहींतर तिला ऐकूं जाईल अशा खड्या स्वरांत पाणचटपणानें बोलण्यास सुरवात करावी. पण गाढव किती ओरडलें तरी त्याकडे लक्ष कोण देतो ? फार तर लहान अजाण मुलें त्याच्या ओरडण्याला हंसतात पण तितकी सुद्धां यांच्या बोलण्याला किंमत नाहीं असेंच शालिनीच्या वर्तनावरून दिसे. या लोकांनीं किती आरडाओरडा केला तरी ती नुसती मागें सुद्धां वळून पहात नसे. ते मोठमोठ्यांदा आपआपसांत बडबडत, "अहो, ती आहे सुधारकाची मुलगी ! तिला कसली आहे लाज नी लज्जा ! कोणाचा तरी हात धरून गेलें म्हणजे झालें.' असें ते बडबडत. तरी प्रत्येकाच्या मनांत तिच्या वर्तनाबद्दल थोडा फार आदर वाटे यांत कांहीं शंका नाहीं. कारण कांहीं गोष्टींत जरी त्यांच्यात आणि तिच्यांत जमीन अस्मानाचें अंतर होतें तरी तिच्या गोड स्वभावामुळें त्यांच्या मनावर चांगलाच परिणाम झाला होता यांत शंका नाहीं. कधीं कधीं बायकासुद्धां असें म्हणत. तिनी काय असं गैर तें केलें आहे ? एक नांवाला लग्न केलं नाहीं काय तें ! बाकी कांहीं तिची वर्तणूक वावगी नाहीं हो ! उगीच काय एकाद्याला निंदायचं म्हणून निंदावं ! या भाषणावरून शालिनीबद्दल त्यांचें मत किती चांगलें झालें होतें, तें दिसून येतें. शालिनीच्या उच्च कल्पना सगळयांनाच कोठून येणार ? जसें, आपले वाडवडिल वागले तसेंच आपण वागावयाचें एवढें त्यांना ठाऊक. शालिनीला आपल्या वर्तनामुळें आसपास इतकी खळबळ उडून राहिली असेल अशी नुसती शंकासुद्धां आली नाहीं. चांगल्या माणसाला सगळेंच कांहीं चांगलें दिसत असतें. शालिनीची दृष्टी अशा तऱ्हेचीच असल्यामुळें तिच्या मनाला लोकांच्या निंदेमुळें कधीं त्रास झाला नाहीं. एवढेंच नाहीं तर तिचे दिवस फारच मजेंत आणि सुखांत गेले.

इतकी बाहेर खळबळ उडाली होती तरी शालिनी ज्या शाळेंत शिकविण्यास जात असे तेथें याबद्दल कधीं नुसती कुणकुण सुद्धां ऐकूं येत नसे. कधीं कोणी तिची नालस्ती करीत असे, कीं कधीं कुणी तिच्या संबंधीं अधीक उणें बोलत नसे. एवढेंच नाहीं तर तिच्या शाळेच्या हेडमास्तरीणीनेंही तिला कधीं त्या संबंधानें विचारिलें नाहीं. आपले दिवस इतके सुखांत जातील अशी शालिनीला कल्पनाही नव्हती. दर रविवारीं शालिनी कमलाकराबरोबर हँगिंग गार्डन्सवर नाहींतर राणीच्या बागेंत जाई. तेथील बागेची शोभा पाहून झाल्यावर तीं दोघें एकाद्या झाडाच्या छायेखालीं बसून इकडल्या तिकडल्या गप्पा गोष्टी करीत.

नंतर तीं दोघें मिळून एकादें पुस्तक वाचीत, कविता ह्मणत, फराळ करीत आणि मग संध्याकाळच्या वेळेस आपआपल्या घरीं जात. याप्रमाणें शालिनीचे दिवस मोठ्या सुखांत चालले होते. दिवसेंदिवस त्यांचें एकमेकावरील प्रेम वृद्धिंगत होत होतें. कमलाकराला जों जों शालिनीच्या साध्या सरळ स्वभावाचा अनुभव येऊं लागला तों तों. त्याच्या मनांत शालिनीबद्दल असलेला प्रेमा वाढूं लागला. शालिनीच्या संगतींत बहुतेक वेळ घालविल्यानें त्याच्या मनाचा कल बदलूं लागला. आपण केलें तें अगदीं बरोबर केलें. असेंच त्याचें मन त्याला सांगूं लागलें. याप्रमाणें त्याचें मन बदललें नसतें तरच नवल होतें. चांगल्या माणसाच्या सहवासांत सतत राहिल्यानें मनावर चांगला परिणाम घडत नाहीं, असें कधींच होत नाहीं. समाजांत बळावलेल्या अनिष्ट रूढीपासून कमलाकराचें मन शालिनी हलकें हलकें वळवीत होती. असत्याचा मार्ग धरून चैनींत किंवा ऐषारामांत दिवस कंठण्यापेक्षां सत्याचा मार्ग धरून हालअपेष्टांत दिवस कंठण्यातच मौज आहे, खरें सुख आहे, एवढें तत्व शालिनीनें कमलाकराच्या मनावर छान बिंबवून टाकलें होतें. आपला आत्मत्याग करण्याची एवढी धडपड कां ? हें तिनें कमलाकराला नीट समजावून सांगितलें. तिचा हेतू कमलाकराला पूर्ण पटला. त्याबद्दल त्याला पूर्ण सहानुभूति वाटूं लागली आणि शालिनीच्या आत्मत्यागाबद्दल त्याला आतां मुळींच वाईट वाटेनासें झालें. खरें पाहिलें तर अजूनपर्यंत शालिनीवर तशीं संकटें कांहींच आलीं नव्हतीं. शालिनीचे दिवस अत्यंत शांततेंत आणि सुखांत चालले होते. घरामध्यें नेहमीं होणाऱ्या लहानसहान तंटेबखेड्यांनीं किंवा रुसवाफुगवींनीं जें पतीपत्नींत वितुष्ट येतें आणि मनाला त्रास होतो, तो देखील त्या दोघांना कधीं झाला नाहीं. कमलाकर संध्याकाळीं थोडावेळ येत असे तेवढाच ! मग रुसायचं आणि भांडावयाचें कशावरून ? असें आपलें एकाद्या जीवलग मित्राशीं वागणें असतें तसेंच त्या दोघांचें एकमेकांशीं असे, प्रत्येकाला आपल्या मताप्रमाणें वागण्याची मोकळीक असे. त्यांत दुसऱ्याला " तूं असंच कर आणि तसंच केलं पाहिजेस ! " असें अधिकारयुक्त वाणीनें सांगण्यास कोणी नसे. बरें, तशीच एकमेकांची सल्लामसलत घेऊन काम करण्याची गरज वाटली तर तसेंही त्यांना करितां येत असे. लग्न झाल्याबरोबर पहिल्या कांहीं दिवसांत जी गंमत वाटते तीच गंमत सदोदित रहावी एवढ्याचकरितां शालिनीनें निरनिराळे रहाण्याची युक्ति काढली होती. प्रत्येक दिवशीं कमलाकर यावयाची वेळ

झाली म्हणजे शालिनी मोठ्या आतुरतेनें त्याची वाट पहात बसे. कमलाकर भेटल्यावर तिला पहिल्या भेटीप्रमाणेंच नेहमींच आनंद होई; एकसारखें जवळ राहिल्यानें एकमेकाला भेटण्याची उत्कंठा कमी होते असें शालिनीला वाटे, आणि म्हणूनच तिनें वेगळें रहावयाचें ठरविलें होतें. याप्रमाणें पहिले सहा महिने शालिनीचे फार सुखांत गेले. आणि या सहा महिन्यांत जें तिला सुख मिळालें, जे सुखाचे प्रसंग घडले त्या प्रसंगाच्या आठवणीवरच तिला बहुतेक आयुष्य कंठावें लागलें. लग्न होऊन सहा महिने झाले. शालिनी माता होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं, शालिनीनें यापुढें आतां शाळेंत जाऊन काम करणें बरोबर नाहीं असें कमलाकराला वाटूं लागलें. शालिनीची हेडमास्तरीण एकादे वेळेस संशय येऊन कांहीं तरी विचारावयाची आणि मग आपलीं मतं तिला सांगून गोष्ट विकोपाला गेल्यावर शाळा सोडायची त्यापेक्षां, आधींच सोडलेली बरी असें कमलाकराला वाटलें. पण शालिनीच्या मतें जोंपर्यंत प्रकृतीच्या दृष्टीनें रजा घेण्याचें कारण नाहीं तोंपर्यंत शाळा सोडूं नये, असें होतें.

'मला तशी गरज वाटली तर तसें कारण सांगून मी रजा घेईन' असें ती कमलाकराला ह्मणे. शालिनीच्या मनांतून हेडमास्तरणीनें सगळी चौकशी करून 'तूं आमच्या शाळेंतून जा. तुझ्यासारखी बाई आमच्या शाळेंत नको,' असें सांगेपर्यंत निघावयाचें नव्हतें. पण यावेळेस कमलाकरानें फारच हट्ट धरिला, तेव्हां तिचा इलाज चालेना. शालिनी इतकी निश्चयी होती तरी अलिकडे कमलाकराचें तिच्यावर बरेंच वजन पडूं लागलें होतें. कमलाकराच्या मनाला ज्यागोष्टीमुळें दुःख होईल अशी कोणतीच गोष्ट तिला कराविशी वाटत नसे. आणि ह्मणूनच तिनें यावेळेस त्याच्या मनाप्रमाणें वागण्याचें ठरविलें. शालिनीमध्यें असा फरक पडणें अगदीं साहाजिक होतें. कारण आजपर्यंतचे संस्कार एकदम कसे नाहींसे होणार ? अझून आणखी कांहीं दिवस तरी पुरुषाला स्त्रीवर ताबा चालवावासा वाटेल, आणि स्त्रीलाही आपल्या स्वभावानुसार पतीच्या अनुरोधानें वागण्यांतच धन्यता वाटेल. आणि पुन्हां जेथें मोठमोठ्या स्वार्थत्यागी पुरुषाना देखील अगदीं चिकाटीनें आपल्या तत्वाला धरून वागतां येत नाहीं, तेथें शालिनीसारख्या मुलीची काय गोष्ट !

आपल्याला वारंवार परिस्थितीला नमावें लागतें, याचा अनुभव बहुतेकांना असतोच. त्याचप्रमाणें शालिनीची स्थिती झाली. आपल्या मनांत असतें एक

व आपल्याला करावें लागतें भलतेंच, असें किती वेळां तरी घडतें. आपण स्त्रीजातीला स्वातंत्र्य केव्हां मिळवून देऊं, याची शालिनीला एकसारखी तळमळ लागून राहिली होती. स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं वाटेल तीं संकटें सोसूं, वाटेल तसे हाल काढूं, एवढेंच नाहीं तर त्यासाठीं आपले जीवसुद्धां खर्ची घालूं. इतका जिचा निर्धार, इतका जिचा स्वभाव करारी, त्या शालिनीला आपल्या परिस्थितीला थोडें तरी नमावें लागलें. कोणती एक विशिष्ट गोष्ट सिद्धीस न्यावयाची म्हटलें, तर त्यासाठीं पुष्कळ वेळां आपल्याला क्षुल्लक गोष्टींत माघार घ्यावी लागते. त्याप्रमाणेंच शालिनीला करावें लागलें. कमलाकरानें मुख्य गोष्टीला अनुमती दिली होती, तेव्हां या लहानसहान बाबतींत आपण हेका चालविणें बरें नाहीं, असें शालिनीला वाटलें. शालिनी होतां होई तों आपल्या तत्त्वाविरुद्ध वागावयाची नाहीं. तरी पण कांहीं कांहीं वेळां तिला तसें वागण्याचा प्रसंग आला. जेथें समाजाचे मार्ग भिन्न, आणि त्यांतल्या एका व्यक्तीचे मार्ग भिन्न, तेथें त्या व्यक्तीला आपल्या मनाप्रमाणें अगदीं तंतोतंत वागूं म्हटलें तर मुळींच जमत नाहीं. आणि आत्मत्यागी मनुष्य अगदीं क्षुल्लक बाबतींत सुद्धां आपलें म्हणणें तेंच खरें, बाकी सर्वांचें कुचकामाचें असें म्हणेल तर त्या मनुष्याला आपल्या कार्यांत यश येणें फार कठीण. तेव्हां शालिनीनें कमलाकरासाठीं त्याच्या म्हणण्याप्रमाणें वागावयाचें ठरविलें. 'मी एक महिन्याची नोटीस देतें आणि मग काम सोडतें, म्हणजे यमुनाबाईंना (हेडमास्तरीण) वर्गांची व्यवस्था लावायला बरें पडेल. असें एकाएकीं शाळेंत न गेल्यानें मुलींचेंही बरेंच नुकसान होईल. त्यांची परीक्षा जवळ आली आहे, तर त्यांचा ठरलेला अभ्यास करून घेतला पाहिजे वगैरे वगैरे पुष्कळ सांगून, शालिनी ती गोष्ट एक महिना लांबणीवर टाकूं पहात होती. पण कमलाकर कांहीं केल्या ऐकेना. तेव्हां नाइलाज म्हणून शालिनी एक दिवस शाळेंत गेली नाहीं. निदान आपल्या विद्यार्थिणींना एकदां भेटून तरी यावें, असें तिच्या मनांत पुष्कळ वेळां आलें! 'पण तूं आतां तिकडे मुळींसुद्धां फिरकूं नकोस' असें कमलाकर म्हणे. असो. याप्रमाणें एक दिवस शालिनी शाळेंत गेली नाहीं त्या दिवशीं तिनें आपल्या हेडमास्तरणीला एक पत्र लिहिलें. यमुनाबाई शालिनीच्या मानानें बऱ्याच पोक्त होत्या. दोघींचा स्वभाव, दोघींचे आचारविचार फार भिन्न, तरी देखील त्या दोघींचे फार चांगलें पटे. यमुनाबाई जुन्या मताची होती, तरी तिचा स्वभाव फार सच्छील होता. कोणाची मतें आपल्यापेक्षां वेगळीं म्हणून त्या माणसाला अगदीं तुच्छ मानायचें, किंवा त्या

माणसाशीं जरा ज्यास्त कडकपणानें वागायचें, किंवा उगीच तो आपल्या सारखा नाहीं म्हणून त्याच्याशीं वाईट वागायचें, अशा तऱ्हेचा तिचा स्वभाव नव्हता. त्यांचे शिक्षण शालिनीच्या मानानें फारच कमी झालेलें होते, तरी आज बरेंच दिवस त्या हेडमास्तरणीचें काम करीत असल्यामुळें तें त्या चांगल्या तऱ्हेनें पार पाडीत. शालिनीच्या वडिलांची आणि त्यांची पहिली थोडीबहुत ओळख होती, म्हणून शालिनीवर त्यांचें बरेंच प्रेम होतें. आणि त्यांत शालिनी त्यांच्या शाळेंत काम करूं लागल्यापासून तर तें ज्यास्तच वाढलें. शालिनीचा पुष्कळसा विक्षिप्तपणा यमुनाबाईना आवडत नसें, पण शालिनीचे कांहीं कांहीं गुण त्यांना फार आवडत असत. शाळेच्या कामांत शालिनी जितकी त्यांना उपयोगी पडत असे, तितकी दुसरी कोणतीच मास्तरीण त्यांना कधीं उपयोगी पडली नाहीं. किती काम पडलें तरी शालिनी तें अगदीं मन लावून करते हें त्यांच्या कित्येक वेळेस नजरेस आलें होतें. अशा अनेक गुणांमुळें शालिनीवर त्यांची अगदीं भक्ती होती. कोणीही शाळा पाहाण्यास येवो; त्याच्याजवळ यमुनाबाईनीं शालिनीच्या शिकविण्याची तारीफ केली नाहीं; असें कधींच होत नसे. जसें यमुनाबाईचें शालिनीवर प्रेम होतें, तसेंच शालिनीचेंही त्यांच्यावर होतें. आणि म्हणूनच आज शालिनीला त्यांना पत्र लिहितांना ती एकसारखे सुस्कारे सोडीत होती. यमुनाबाईचा व आपला आतां कायमचा वियोग होणार असें वाटून शालिनीला रडूं येत होतें. डोळ्यांतील अश्रू पदरानें एकीकडे पुशीत ती नोटपेपरवर नोटपेपर लिहीत होती. आपण असें कां केलें? असें केल्यानें पुढें आपल्याला काय होईलसें वाटतें? वगैरे गोष्टी तिनें यमुनाबाईना पटाव्यात अशा तऱ्हेनें लिहिल्या होत्या. पण शेवटीं यमुनाबाईना तिचें म्हणणें पटलें नाहींच. आणि शालिनीचें मत असें असेल, हेंही त्यांना खरें वाटलें नाहीं. शालिनी आपली भोळीभाबडी पोर! तिच्या मनांत कोणी तरी हें फसवावयाच्या हेतूनें भरवून दिलें असेल! असेंच त्यांना वाटलें. त्यांनीं शालिनीचें पत्र एकदां दोनदां तिनदां वाचून पाहिलें. तें वाचल्यावर त्यांना कांहीं सुचेनासें झालें. या पोरीला कशी या संकटांतून वांचवावी, हें त्यांना समजेना. आधींच मला ही गोष्ट कळती, तर मी शालिनीची चांगली कानउघाडणी करून तिला या दुराचारापासून वळविली असती. पण आतां कसें करावें! होणारी गोष्ट ती होऊन गेली. आतां परत येणें शक्य नाहीं. पोरीनें आपल्या आयुष्याचा सत्यनाश करून घेतला. कशी हुशार पोर! पण व्यर्थ गेली. असे किंवा अशा

तऱ्हेचे विचार करण्यांत त्यांनीं सारा दिवस घालविला. आपण करतों ही गोष्ट चुकीची आहे, यापासून मनुष्य प्राण्याची झाली तर अवनतीच होईल, अशी जरी शालिनीला नुसती शंका येती तरी तिनें ती गोष्ट कधींच केली नसती. मी जें काय केलें तें अगदीं जाणूनबुजून चांगला विचार करून केलें आहे, असें शालिनीनें आपल्या प्रत्येक पत्रांत कित्येक ठिकाणीं तरी लिहिलें होतें. यमुनाबाईंना ती गोष्ट खरी वाटली नाहीं. पोर कोणाच्यातरी गळ्यांत सांपडून फसली असें वाटून त्या हळहळत राहिल्या. साधारण लोकांपेक्षां एखाद्या व्यक्तीचे विचार श्रेष्ठ असण्यांत हेंच तें वाईट असतें. आत्मत्याग करणारा मनुष्य जो मार्ग बरोबर उन्नतावस्थेला नेणारा म्हणून स्वीकारतो, तोच मार्ग त्याच्या इष्टमित्रांना, नातेवाईकांना नापसंत होतो. त्यामुळें नातेवाईकांना वाईट वाटतें, त्याची एकएक अचाट कृत्यें पाहून त्यांच्या मनाला त्रास होतो. ह्मणून त्या व्यक्तीला कधीं कधीं आपल्या कोणी नात्याचें नसलेलें बरें, असें एकादवेळेस वाटतें. त्याचप्रमाणें शालिनीला आज आपली आणि यमुनाबाईची इतकी दाट ओळख नसती तर एकप्रकारें बरें झालें असतें असें वाटलें. आपल्या अशा वागण्यानें आपल्या मंडळींना फार दुःख होतें हें तिला ठाऊक होतें. आणि त्यासाठीं तिला फार वाईट वाटे. शालिनीनें यमुनाबाईंच्या पत्रांत एका ठिकाणीं असें लिहीलेंसुद्धां होतें कीं, माझ्या या अशा वर्तनाबद्दल तुम्हांला फार वाईट वाटेल, पण तसें मुळींच वाटून घेऊं नका. माझ्या सदसत्‌बुद्धीला पटणारी अशीच गोष्ट मी करीत आहें. त्याबद्दल मला कोणी वाईट म्हणणार नाहीं. तसेंच तुह्मीही वाईट वाटून घेऊं नका. माझें जें कर्तव्य तेंच मी करीत आहे. त्यांत जरी पुष्कळ संकटें आलीं तरी जोंपर्यंत मी सत्याची कास सोडणार नाहीं, तोंपर्यंत मला भीति नाहीं. पण संकटें येतील ह्मणून मागें घेणें बरोबर नाहीं. अशीं कांहीं संकटें सोसल्याशिवाय स्त्रियांना स्वातंत्र्य मिळणार नाहीं, याबद्दल माझी खात्री आहे. आपला समाज उन्नतावस्थेला नेण्याची जबाबदारी समाजांतील प्रत्येक व्यक्तीवर साधारणतः असते. आणि ह्मणून हें कार्य तडीस नेण्याचें श्रेय प्रथम मला मिळावें, असें मला वाटतें. वगैरे वगैरे पुष्कळ शालिनीनें लिहिलें होतें. पण यमुनाबाईंना त्यांतली एकही गोष्ट पटली नाहीं. शालिनीसारख्या तरुण मुलीनें गोळाभर घासाची आशा धरून आपलें शरीर न विकतां लोकनिंदा सहन करून स्वतंत्रपणानें राहण्याची इच्छा धरावी यासारखा मूर्खपणा कोणताच नाहीं, असें यमुना-

बाईना वाटलें. असो. तीच गोष्ट एकसारखी मनांत घोळल्यामुळें यमुनाबाईंचें डोकें दुखूं लागलें. काम आटोपल्यावर त्या खोलींत जाऊन स्वस्थ पडल्या. यापुढें शालिनीसंबंधानें कधीं बोलणें निघालेंच तर गरीब बिचारें पोर! एवढेंच त्या ह्मणत असत.

दुसऱ्या दिवशीं जिकडे तिकडे एकच वदंता ऐकूं येऊं लागली. काय? तर मास्तरीण पळून गेली. सगळ्यांचा बोलण्याचा विषय तोच झाला. साधारण कोणत्याही घरापाशीं उभें राहून पहावें तों अगदीं एखाद्या महत्वाच्या विषयावर वाद व्हावा त्याप्रमाणें मोठमोठ्यांदा बोलणें चाललें होतें. आपल्या रंगी चिंगीच्या शाळेंतली मास्तरीण पळून गेली. आज कितीक दिवस तो माणूस तिच्याकडे येत होता. पण कोणी ह्मणत तो तिचा भाऊ असेल! अशावरी ते गेले. असें होणार तें मी तेव्हांच ताडलें होतें. त्याच्या वागण्यावरूनच दिसतं तें? यांना कांहीं चालरीत तरी! इश्श! अगदींच निर्लज्ज बनतात हो या पोरी! पण मी ह्मणतें, नाहीं मनाची लाज! तरी जनाची खरी! बरें झालें बाई, परवांच आह्मी रंगीला व चिंगीला शाळेतून काढल्या ह्मणून हो! नाहीं तर दिसायला कशी अगदीं साळसूद दिसायची! पण पाहीलंत ना काय केलंन तें? या असल्या बायकांची शिकवणींत चांगलें तर व्हावयाचें नाहींच, पण यांच्या संगतींत राहून मुली बरीक बिघडायच्या! उगीच का आम्हीं मुलींना शाळेंत धाडूं नका म्हणून म्हणतो! पण आमचं ऐकतं कोण? या मडमा नी मास्तरणी असलींच शिकवणी शिकवतात तिथं! दुसरं काय? असें किंवा अशा तऱ्हेचें बोलणें जिकडे तिकडे ऐकूं येत होतें. प्रत्येकाला आपल्या सारखें जग दिसत असतें. आपल्या पेक्षां कोणी कांहीं चांगलें काम करीत असला, तर तें तो कांहीं वाईट बुद्धीनेंच करीत असला पाहिजे, असें लोकांस वाटतें. त्याचप्रमाणें आज जी गोष्ट निंद्य म्हणून ठरली त्यांत कांहीं असेल म्हणून शालिनी अशा तऱ्हेनें वागते असें साधारण माणसाला कसें वाटावें?

---

## प्रकरण ८ वें.

कमलाकरानें आपल्या मनाशीं नीट सगळा विचार केला. शालिनीनें आतां कांहीं दिवस तरी मुंबईंत राहूं नये. दूर कोठें तरी जाऊन रहावें असें त्याला वाटलें. शालिनी मुंबईत बाळंत झाली तर तिचे अतिशय हाल होतील म्हणून तिनें येथें राहूंच नये दूर कोठें तरी परक्या गांवा जावें म्हणजे सगळीच कट-कट मिटेल. तिथल्या लोकांना तिचें लग्न झालें आहे असेंच वाटेल, त्यामुळें तेथें कोणत्याच प्रकारचा त्रास होणार नाहीं. " आली आहे चार दिवस हवा पालट करायला " असेंच त्यांना वाटेल. कमलाकराच्या मनांत शालिनीला घेऊन दिल्लीस जावें असें फार होतें. त्यानें आपला बेत शालिनीस कळविला; परंतु शालिनीच्या मनांतून दिल्लीस मुळींच जायचें नव्हतें. यामुळें कमलाकराचा बेत ऐकून तिला फार वाईट वाटलें. ती क्षणभर कांहींच बोलली नाहीं.

" माझा बेत पसंत नाहींसा दिसतो ? " शालिनी बोलत नाहींसें पाहून कमलाकर म्हणाला.

" भलतीच गोष्ट सांगूं लागलांत तर कशी पसंत पडावी ? दिल्लीला जाण्यांत खरी गोष्ट लपवायची एवढाच तुमचा हेतू ना ? दुसरं काय ? मी करितें ही गोष्ट वाईट आहे, असें वाटून कांहीं ती केलेली नाहीं, मग मला एवढी त्याची भीति कशाला ? लोक छळतील अशी मला मुळींच भीति वाटत नाहीं. त्यांनीं माझे हाल केले तर मला काडीइतकं वाईट वाटणार नाहीं. उलट जितके असे माझे हाल होतील तितके ते सोसण्यांत मला एकप्रकारचा आनंद वाटेल. मन आपल्याला चोरी करूं नको, असें सांगत असतां आपण चोरी करतों आणि मग ती चोरी लपली कशी जाईल याची आपल्याला काळजी पडते. पण तसा कांहीं अपराध मी केला आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. मग उगीच त्यासाठीं धावपळ करा कशाला ? "

" बरें तें जाऊं दे. त्यासाठीं तुला नसलं यायचं तुला दिल्लीला तर नको येऊं. माझा कांहीं आग्रह नाहीं. पण तुझें बाळंतपण धडपणें पार पडावें असें तर तुला वाटते ना ? "

" हो वाटतें. तसें कोणाला नाहीं वाटणार ? "

" मग आपल्यामार्गांत जितक्या कमी अडचणी येतील, आपणास जितके कमी हाल सोसावे लागतील, तितकें बरें नाहीं का ? आणि एवढ्यासाठीं तरी आपण दिल्लीस जावें असें मला वाटतें. मग तुला काय वाटत असेल तें खरें ! "

शालिनीला मुंबईंत राहूनच काय होतें तें पहावयाचें होतें तरी पण या नव्या विचारांनीं तिचा दिल्लीस न जाण्याचा बेत डळमळूं लागला. एकदां वाटे जावें; एकदां वाटे जाऊं नये. अशी कांहीं तिची चमत्कारिक स्थिति झाली. तेव्हां "नाइलाजानें ह्मणूनच कदाचित् आलें तर मी येईन. पण नक्की कांहीं सांगतां येत नाहीं" असें ती ह्मणाली. शालिनीचा दिल्लीला जाण्याचा बेत नक्की नव्हता तरीसुद्धां कमलाकरानें दिल्लीला जाण्याचा बेत मुक्रर करून टाकलाच.

आतां दिल्लीला जायचं, तेव्हां वडिलांना एकदा समक्ष भेटून खरी खरी हकीकत सांगितली पाहिजे, असें कमलाकराला वाटलें. अजून शालिनी कोण ? तिचा व कमलाकराचा संबंध काय ? हें कमलाकराच्या वडिलाना किंवा इतर नातेवाईकांना मुळींच माहीत नव्हतें. त्यांच्या कानावर कधीं कधीं अशी कुणकुण जाई, पण लोक कांहीं तरी बातम्या उठवतात; तेव्हां असल्या बातम्याकडे लक्ष मुळींच दण्यांत अर्थ नाहीं असेंच त्यांना वाटे. " त्याला लग्न करायचं असतं तर तो आमच्यापाशीं बोलला नसता का ? तसें तो म्हणाला असता तर त्याला कोणी मनाई करणार होतें ? " असें डॉक्टर बातमी सांगणाऱ्यांना विचारीत; तेव्हां तो आपला गप्प बसे. डॉक्टरांचा असल्या बातम्यावर विश्वास बसत नसल्यामुळें त्यांनींही कधीं त्यासंबंधीं कमी अधिक चौकशी केली नाहीं. कमलाकरसुद्धां आजपर्यंत कितीही क्षुल्लक गोष्ट असली ती वडिलांना कळविल्याशिवाय रहात नसे; परंतु ही गोष्ट फार नाजूक. ती वडिलांना कळली तर शालिनीला उगीच त्रास व्हावयाचा, म्हणून त्यांना ती न कळलेलीच बरी, असें वाटून कमलाकरानें ती बापापासून लपवून ठेवली होती. पण आतां परगांवीं बरेच दिवस जावयाचें तेव्हां सर्व कांहीं सांगितल्याखेरीज जाणें बरोबर नाहीं, असें वाटून त्यानें खरी हकीकत वडिलांना सांगण्याचा बेत केला. कारण आज नाहीं उद्यां, ती गोष्ट त्यांना कळणारच. तेव्हां आपण स्वतःच ती सांगितलेली बरी असें वाटून त्यानें एक दिवस सर्व हकीकत त्यांना सांगण्याचा विचार केला.

डॉक्टर सुपेकर मुंबईतल्या प्रसिद्ध डॉक्टरांपैकीं एक होते. त्यांच्या धंद्याला साजेशी अशीच अगदीं अपटुडेट फ्याशनची त्यांची रहाणी होती. त्यांची वर्त-

णूक पाहिली तर अगदीं धुतलेल्या तांदुळाप्रमाणें स्वच्छ होती. त्यांना काडीचें व्यसन नव्हतें. त्यांची शरिरयष्टी चांगली उंच आणि सुदृढ होती. म्हाताऱ्याची साठी उलटली होती तरीपण अजून तो कसा काटक होता; कमरेंत इतका म्हणा-वयाला इतकासुद्धां वांक आला नव्हता कीं डोक्याचे केंस पिकले नव्हते. आज-पर्यंतचे दिवस साधारणतः सुखासमाधानांत गेलेले. कधीं कोणत्या प्रकारचा त्रास नाहीं कीं दगदग नाहीं, त्यामुळें त्यांची प्रकृती इतकी खणखणीत होती. कपाळावर वरिक क्वचित् कोठें कोठें म्हातारपणाच्या सुरकुत्या पडल्या होत्या. बाकी चालण्याची रोजची त्यांची सकाळची दोन कोसांची रपेट असे, असें ह्मणतात. दांत तर अजून एकहि पडला नव्हता. डॉक्टरांचें आपल्या मुलावर प्रेम होतें, यांत तिळमात्र शंका नाहीं. पण मुलांशीं कधीं ते लडिवाळपणानें बोलतील किंवा हंसतील याचं नांव नको. त्यांच्या कोणत्याच मुलाची बापापुढें जाण्याची छाती नसे. तशीच एकादी गोष्ट वडिलांना कळवायची झाली तर ते ती आपल्या आईकडून त्यांना कळवीत. डॉक्टर फारच क्वचित् हांसत. त्यांचा चेहरा सदा गंभीर असे.

एक दिवस दुपारचें जेवण झाल्यावर डॉक्टर आराम खुर्चीवर पडले आहेत असें पाहून कमलाकर हलकेच भीत भीत त्यांच्या खोलींत गेला. डॉक्टरांनीं आपले डोळे किंचित् वर करून रेकत रेकत ह्मटलें ' काय ' ? कमलाकरानें " कांहीं नाहीं " असें उत्तर दिलें. पुढें पुष्कळ वेळ दोघांपैकीं कोणीच कांहीं बोललें नाहीं. शेवटीं " तुह्मांला कांहीं सांगायचं आहे " असें कमलाकर हळूंच ह्मणाला. डॉक्टर आपले दोन्ही हात छातीवर ठेवून डोळे मिटून स्वस्थ पडले होते. मुलाच्या तोंडून वरील शब्द बाहेर पडल्याबरोबर त्यांनीं आपले डोळे ताठ उघडून कमलाकराकडे निरखून पहाण्यास सुरवात केली. जणूं काय कांहींएक न बोलतांच आपल्या मुलाच्या मनांत काय आहे आणि त्याला काय सांगायचें आहे तें कळून घेतां आलें तर घ्यावें, अशीच त्यांची इच्छा असावीसें दिसलें. आपले वडिल कांहीं बोलत नाहींत, स्वस्थ पडले आहेत, तोंच आपण एकदां सगळें सांगून येथून चटकन् निघून जावें असें कमलाकराला वाटलें. आणि त्यानें आपली हकीगत सांगण्यास हलके हलके सुरवात केली. डॉक्टर मध्यें एक अक्षरही बोललें नाहींत, ते सर्व कांहीं, एक चित्तानें ऐकून घेत होतें; फार झालें तर मधून मधून ' हूं ' असें म्हणत. हकीकत सांगतां सांगतां

" शालिनी आली तर माझा दिल्लीला नाहींतर दुसरीकडे कोठें तरी जाण्याचा बेत आहे. " असें कमलाकर म्हणाला. डॉक्टर सुपेकरांनीं आपला चेहरा आणखी थोडा गंभीर केला, आणि आपल्या आवाजांत कठोरपणा आणून ते म्हणाले, " बरें पण ही मुलगी तरी कोणाची ? का आहे एकाद्या वेश्येची ? "

हें ऐकल्याबरोबर कमलाकराच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन भिडली. पण करतो काय बिचारा ! बापच असें बोलला तेव्हां त्याचा नाईलाज झाला. आपला सगळा राग गिळून तो शांतपणें ह्मणाला, " छेः ! छेः ! बाबा असें कांहीं बोलूं नका. शालिनी तशी नाहीं. चांगल्या सद्गृहस्थाची मुलगी आहे ती. "

" हो. हो. सद्गृहस्थाची आतां ती असावयाचीच ! पण सद्गृहस्थाच्या मुलीं कधींच अशा वागत नाहींत हें तूं विसरलास आणि आतां तूं मला ती किती जरी चांगली आहे ह्मणून सांगितलेंस तरी, माझा कांहीं त्यावर विश्वास बसणार नाहीं. "

" नसला तुम्हाला माझ्यावर विश्वास ठेवायचा तर नका ठेवू. पण शालिनी खरोखरच तुम्हाला वाटते तशी नाहीं. ती एका चांगल्या माणसाची मुलगी आहे. तुम्हांला पाहिजे असेल तर हरीकाकांना विचारा. त्यांच्याच इथें माझी नी तिची ओळख झाली. ती त्यांच्या मित्राचीच मुलगी आणि तिचे वाडिल तुमचेही एकदां मित्र होते असें त्यांच्या इथंच मला कळलें. त्यांचें नांव आबासाहेब कीर्तने ते कलकत्त्याकडे रहातात. "

डॉक्टरांनीं यावर आपल्या भिंवया थोड्या वर चढवून कपाळावर हात फिरवीत म्हटलें. " आबांची मुलगी ? आबांची ! अंः ! आबांची मुलगी कधींच अशी वागायची नाहीं, आणि ती आबांचीच मुलगी असली तर थोडीबहुत चांगली असेल असें समजायला हरकत नाहीं. ती मुळची अशा स्वभावाची मुलगी नसेल. तिच्या डोक्यांत कोणी तरी या वेड्या कल्पना भरवून दिल्या असल्या पाहिजेत. "

" तसें वेडबीड कोणी नाहीं भरवून दिलेलें. तिचेच तसे विचार आहेत. "

डॉक्टर सुपेकरांनीं पुन्हा आपल्या भिंवया वर चढविल्या आणि डोळे आकुंचित करून ते विचार करूं लागले, ' झाली ही गोष्ट आपल्या धंद्याच्या दृष्टीनें अगदीं वाईट झाली, असें त्यांना वाटलें. आपल्या धंद्याला ही गोष्ट कितपत

विधातक होईल ' याचा विचार करीत असतां आपल्याला इंगित कळलें असें वाटून ते मध्येंच म्हणाले " हं, आतां मला समजलें, तुझी दिल्लीला जाण्याची इतकी घाई कां ती ! बहुतकरून ती पोरगी गरभार असेल ! आणि आतां तें लपवायचं असेल ! हो ना ? "

कमलाकरानें पूर्वींप्रमाणेंच अगदीं संथपणानें उत्तर दिलें. " छे. लपविण्यासाठीं नाहीं. लपवायचं कशाला ? पण इथें तिला उगीच त्रास होईल म्हणून तिला दिल्लीला न्यावसं मला वाटतं. "

' अस्सं. अस्सं.' एकंदर तूं मुर्ख आहेस हें मला आधींपासूनच माहित होतें. पण इतका अगदीं शंभू असशील असें वाटलें नव्हतें. इतक्या थराला गोष्टी जाईपर्यंत आम्हांला कांहीं कळविलं नाहींस ! काय, तुला म्हणावं ! फार चांगलं केलंस, मोठा प्रताप गाजविलास, फार छान झालं. असेंच करीत जावं. [थोडा वेळ थांबून] पण तुला ही दुर्बुद्धि सुचली तरी कशी ? का कुणी तुझें लग्न करीत नव्हतें ? का मुली तुला सांगून येत नव्हत्या कां काय होतें तरी काय ? पुन्हा तुला कोणी हीच मुलगी कर आणि तीच करूं नको, असें पण कोणी म्हणत नव्हतें. मग ही दुर्बुद्धि तुला कोठून आठवली ? आतां तुम्ही शिकलेले ! तेव्हां जें कराल तें चांगलेंच ! असं झालं आहे तेव्हां आमच्या सारख्यांनीं तुमच्या पुढें बोलण्याची कांहीं प्राज्ञा राहिली नाहीं. तरुण मुलींना फसवून कुमार्गाला लावणं हीच नव्या पिढींतील सुधारणा असली तर कोणास ठाऊक ! "

" कुमार्गाला कोणी लावली ! " कमलाकर एकदम रागावून म्हणाला. " उगीच कांहीं तरी बोलतां म्हणजे काय ? मी तिला फसविली नाहीं. मी तिला कुमार्गाला लावली नाहीं. मी तिला कांहीं केलें नाहीं आणि ती मुलगी पुन्हा अशी फसून कुमार्गानें जाणारी नाहीं. तिला कोणी कसली लालूच दाखविली तरी ती आपला सीधा मार्ग कधीं सोडायची नाहीं अशी पैशाची लोभी आणि भुलथापाला फसणारी ती असती तर कशाला पाहिजे होतें ! तिनें मग केव्हांच एकादा मठ्ठ जहागीरदार पाहिला असता आणि लग्न करून स्वस्थ बसली असती. "

" अरे मी म्हणतों तसें तिनें केलें असतें तरी फार बरें झालें असतें, समजलास. " डॉक्टर सुपेकर मधेंच ओरडून म्हणाले, " एवढेंच नाहीं तर तिनें एकाद्या थेरड्याशीं लग्न केलें असतें तरी देखील यापेक्षां बरें झालें असतें. तुझ्या

सांगण्यावरून तर ती बाई गरोदर आहेसें दिसतें. पुन्हा तिचें लग्न झालेलें नाहीं. एवढ्यासाठीं तिची विटंबना किती होईल याची कांहीं तुला कल्पना ! ही विटंबना असाह्य होऊन तिनें मुलाच्या किंवा आपल्या जिवाला कांहीं दुखापत करून घेतली तर तें पाप कोणाच्या टाळक्यावर आदळणार ? तुझ्याच ना ? तें मूल तुझंच ना ? मग तूं तिला फसवलं नाहींस तर कोणी ? "

आपण फसवलें नसून प्रत्यक्ष आपला बाप एकसारखा 'तूं फसवलंस, तूं फसवलंस' असं म्हणतो, हें पाहून कमलाकराला विलक्षण राग आला. त्याच्या कपाळाला बोटा एवढ्या आठ्या चढल्या–नाकपुड्या आपोआप फुगल्या. ओंठ एखादें सणसणीत उत्तर देण्यास फुरफुरूं लागले. शेवटीं तो अगदीं निकरावर येऊन म्हणाला "शालिनीला मूल होईल तें माझें नसेल कशाला ! तें माझेंच आहे. पण त्यावरून मी तिला फसविलें असें कांहीं होत नाहीं. चालू पद्धतीनें लग्न करून रहाण्यांत तिला गुलामगिरी वाटते, आपलें स्वातंत्र्य जातेंसें वाटतें. एवढ्यासाठींच तिनें लग्नाचा विधि करण्याचें नाकारलें. मी तिला तूं असें कर म्हणून सांगितलें नाहीं मग मी तिला कसें फसविलें ? ह्याच मुलीशीं एकाद्या श्रीमंत पाजी माणसानें लग्न केलें असतें तर तुम्ही तो मनुष्य हलकट आहे असं मनांत सुद्धां न आणतां मोठ्या प्रतीष्ठितपणानें तेथें गेला असतां आणि वर एकादें जंगी प्रेझेंटही दिलं असतं. आणि मी नुसता विधी केला नाहीं म्हणून तुम्हाला मी हलकट वाटूं लागलों ! मी तिला फसविली नाहीं आणि पुन्हा तुम्ही असें म्हणूं नका. माझी मतं तिच्या सारखीं आहेत हें खरें. तिच्या स्थितीचा विचार करून तिला मी असं न करण्या-बद्दल पुष्कळ बजावलें पण ती आपला हट्ट सोडीना, तेव्हां माझा नाइलाज झाला. "

अस्सं अस्सं ! लग्न करून तुझी बायको होण्यापेक्षां तिला हा वेश्येचा धंदा बरा वाटला ना ? फार शहाणीच दिसते आहे ती मुलगी ! " डॉक्टर कुत्सित बुद्धीनें म्हणाले.

कमलाकर पुन्हा रागावून खुर्चीवरून उठला. त्याच्या मनांत खूप बोला-वयाचें होतें पण एक शब्दही त्याच्या तोंडाबाहेर येईना. ओंठ नुसते किती वेळ तरी थरथरत होतें; शेवटीं " असेंच तुम्हाला बोलायचें असेल तर हा मी चाललों तुम्हाला काळजी वाटली असतीं, म्हणून तसा गेलों नाहीं. म्हटलं

एकदम सगळं समक्षच सांगून जावं म्हणजे बरं. पण तुमची ऐकण्याची इच्छा दिसत नाहीं तेव्हां मला आतां येथें ज्यास्त राहण्याची गरज नाहीं. ''

'' पहा बुवा. '' डॉक्टरांनीं आपलें दोन्ही हात आपल्या पुढें पसरून ह्मटलें. '' मला कुठें नसत्या गोष्टीचा खल करायला वेळ आहे ! माझीही आतां दवाखान्यांत जाण्याची वेळ होत आली. मला आतां माझ्या तयारीला लागलेंच पाहिजे. तुला आणखी कांहीं सांगायचं असलं तर चटकन् सगळं सांगून टाक. ''

कमलाकरानें पुन्हा एकदां बोलण्याचा प्रयत्न केला. त्यानें या वेळेस आपल्या बापाची समजूत पटेल अशा तऱ्हेनें सांगण्याचा यत्न केला. पण व्यर्थ. कमलाकरानें एक दोन वाक्यें उचारलीं असतील नसतील तोंच डॉक्टर एकदम '' बस्स् बस्स.'' ज्यास्त ऐकण्याची माझी इच्छा नाहीं. तुला काय पाहिजे तें कर. माझं तुला एवढंच सांगणें आहे, कीं, झालं तें पण दिल्लीला जायच्या आधीं तिच्याशीं लग्न करून जा आणि यापुढें माझ्याकडून तुला खर्चायला एक छदामही मिळणार नाहीं हें ध्यानांत ठेव. तूं व तुझी ती बाई काय वाटेल तो गोंधळ घाला आणि आतां या घरांत पुन्हा पाऊल टाकूं नको; जा आतां, माझी डिस्पेन्सरींत जायची वेळ झाली. '' असें ते आपल्या रिस्टवॉचकडे पहात ह्मणाले.

'' बाबा, मला म्हणतां लग्न कर म्हणून पण लग्न मी कसें करणार ? तिला लग्नाचा विधी करावयाचा नव्हता म्हणून ना लग्न केलं नाहीं. ? मग तेंच तेंच सांगण्यांत काय हशील आहे ? मला एक कपर्दीकही देणार नाहीं, अशी भीती घालतां पण त्याची मला इच्छा नाहीं आणि तुम्ही दिलीत तरी शालिनी कधीं घ्यायची नाहीं. ''

'' हो, हो, ती कशी घेईल ! ती मोठी सावकारीणच असेल कीं नाहीं ! आणि सध्यां नसली तरी असले धंदे करून तर होईल. वा ! काय पण रत्न पाहिलें आहेन् बाब्यानं ! एवढा हेका होता तिचा लग्न न करण्याचा तर तुला तरी मूर्खाला कोणी सांगितलें होतें तिच्या मनाप्रमाणें वागायला ! तुला स्वतःला कांहीं अक्कलच नाहीं कीं काय ! तुला दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी कशाला प्यायला पाहिजे ! तुला काय दुसरी कोणी मिळाली नसती ? कां तेवढीच अप्सरा या जगांत निर्माण झाली आहे ! छे ! छे ! अगदींच स्वताचा विचार करायचा नाहीं ह्मणजे काय ! आतां तूं लग्न केल्याशिवाय तिला घेऊन

रहाणार ! फार छान ! फार छान ! लग्न केल्याखेरीज तिला आपल्या घरीं आणून ठेवायची ह्याच तुझ्या सगळ्या बोलाचा अर्थ ना ? आमच्या कुळांत कोणी कधीं केली नाहीं ती गोष्ट केलीस, एका मुलीला नाडलीस फार झालें. ”

“ बाबा, मी तिला नाडलें नाहीं, मला तिला नाडण्याची जरूर नाहीं, पण कांहीं केलें तरी शालिनी लग्न करायची नाहीं तेंच तेंच मी आणखी आतां किती वेळां सांगूं ?

“ शालिनी लग्न करायाची नाहीं तिला तसें करणें पाप वाटतं, खरं तत्व झुगारून देणें आहे असं वाटतं. आजपर्यंत जी गोष्ट करायची नाहीं म्हणून निश्चय केला, तीच ती आतां कशी करील ? तिचा मुख्य हेतू स्त्रीस्वातंत्र्य मिळविण्याचा आहे. आणि तसें स्वातंत्र्य मिळवावयाचें असेल तर चालू पद्धतीनें लग्न करणें योग्य नाहीं, असें तिला वाटतें. ”

“ तिला असें वाटत असलें म्हणून तूं तिला वाईट मार्गानें जायला मदत करणार ! तुला कांहींच लाजलज्जा नाहीं कीं काय ? तुला कांहींच स्वाभिमान उरला नाहीं ? अरे, तुझी अक्कल गेली तरी कुठें ? तुला तिच्या अक्कलेनें कशाला चालायला पाहिजे ? तुला नीति, नीतितत्व कांहींच कळत नाहींत कीं काय ? तुझी आतां जिकडे तिकडे नाचक्की होईल ती ! त्याचें काय करायचे ? नाचक्की होण्याची भीति मला वाटत असती तर असें मी कधींच केलें नसतें. माझेही मत तिच्याच प्रमाणें आहे आणि पुन्हां मी तिला माझी छीः थूंः होईल म्हणून माझ्यामताप्रमाणें वाग असें कधींच सांगणार नाहीं. ”

“ बरें नको सांगू तुझी मर्जी ! ” असें म्हणून त्यांनीं आपल्या घड्याळाकडे पाहिलें आणि एकदम “ गोंद्या अरे गोंद्या इकडे ये पाहूं ” अशी हाक मारली. गोंद्या घरांत काम करीत होता. तो येत होता, इतक्यांत सुपेकरांनीं पुन्हां आपल्या खणखणीत आवाजांत ‘ कोण आहे रे तिकडे ? त्या गोंद्याला पाठवून दे बरं ” ? असें म्हटलें.

‘ इतक्यांत जी जी ’ करीत गोंद्या आलाच. त्यांनीं गोंद्याला बजावून सांगितलें, हा, हा पहा माझा कारटा. नीट पहा हा; ह्याला पुन्हां माझ्या घरांत पाऊल टाकू देऊं नको. समजलास. आणि आतांच्या आतां सगळ्यांना घरांत जाऊन सांग, कीं, याच्याशीं एक चकार शब्द कोणी बोलायचा नाहीं अशी माझी ताकीद आहे. समजलास ? आणि [ कमलाकराकडे पाहून ] आतां आपण या क्षणींच कोठें ते चालते व्हा. मला माझ्या मुलीबाळींना जपलं

पाहिजे. नाहींतर त्या लवकरच तुमच्या संगतीनें सुधारावयाच्या ! "असं कां" तर मग हा मी आतांच चाललों. तुम्हाला तशी भीति वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. " असें ह्मणून कमलाकर निघून गेला. त्या वेळेपासून कमलाकरानें पुन्हा कधींही आपल्या बापाचें तोंड पाहिलें नाहीं. कमलाकर आपल्या बापाच्याघरून निघाला तो तडक आपले कपडे ब्यॅगमधें घालून शालिनीकडे जाण्यास निघाला. यापूर्वी रूढीचें प्राबल्य किती आहे हें कमलाकराला नाटसें कळलें नव्हतें, असेंच ह्मणावें लागतें. आपले बाबा आपल्याला घराबाहेर जा ह्मणतील असें त्याला कधींच वाटलें नव्हतें. आपले बाबा इतके रागावतील. ज्यांत कांहीं तथ्य नाहीं अशा गोष्टीनां महत्व देतील असें त्याला मुळींच वाटलें नव्हतें.

ज्यांचा भटांभिक्षुकांवर विश्वास नाहीं, ज्यांच्या घरांत देवाची पुजा होत नाहीं, एवढेंच नाहीं तर जे ह्या सगळ्या गोष्टी सब झूट मानतात, तेच आपले बाबा ज्याला कांहीं कळत नाहीं अशा अडाणी ब्राह्मणाच्या तोंडून मंगळाष्टकें ह्मणवून घेतली नाहींत ह्मणून आपल्याला घरांतून हांकलून देण्याइतकी मजल आणतात ! सध्यांच्या काळांत संध्यापूजा केली नाहीं तर कोणी हंसत नाहींत, तेव्हां ती नाहीं केली तरी चालेल. पण यापुढें वरीक आपण एक पाऊलही जातां कामा नये ह्मणजे काय ! ज्यांना हे मूर्ख समजतात त्यांच्यापेक्षां हे स्वतःच जास्त मूर्खपणानें वागतात. ज्यांच्या खरा जुन्या चालीरितीवर विश्वास असतो त्यांनीं हें असें केलें तर एक शोभतें तरी, कारण त्यांच्या ह्या गोष्टींवर अगदीं मनापासून विश्वास असतो; पण ज्यांचा त्यावर कांहींचा विश्वास नाहीं त्यांनींच अशा गोष्टी केल्या म्हणजे त्यांचा मूर्खपणा पाहून हंसूं आल्याखेरीज रहात नाहीं. डॉक्टर सुपेकराचा एकादा मुलगा जुगार खेळून कर्जबाजारी झाला असता, तर त्याला त्यांनीं ऋणमुक्त केलें असतें; तो दारू पिऊन गटारांत लोळला असता तरी देखील त्याला घरीं आणून त्याची निगा राखली असती; व्यभिचारामुळें तो सडला असता तर त्याला औषधपाणी देऊन त्याची शुश्रूषा केली असती व बरा झाल्याबरोबर अग्नि-ब्राह्मणांना साक्ष ठेवून त्याचे शुभमंगल केलें असतें ! मग त्या वधुवरांचा स्वभाव कितपत जुळतो, त्यांच्या अंगीं काय गुण आहेत, काय दोष आहेत हें बघण्याची सुद्धां त्यांना जरूर वाटली नसती; मुलगी साधारण दिसण्यांत बरी असली म्हणजे झालें ! एक वेळ

मुलगी दिसण्यांस चांगली नसली किंवा तिच्यावर मुलाचें प्रेम नसलें—लग्न करायचं ह्मणजे प्रेम असण्याची थोडीच जरूरी असते—तरी चालेल. फक्त मुलीच्या बापाकडून पुष्कळसें डबोलें मिळालें म्हणजे झालें. मग त्या मुलाची वाहवा कांहीं विचारावयाला नको. जे ते चांगली मुलगी मिळाली, चांगलें लग्न झालें असेंच ह्मणूं लागतें. कमलाकराच्या बाबतींत सगळें फसलें कोठें? तर त्यानें जिच्यावर आपलें प्रेम होतें, जी विचारानें, ज्ञानानें आपल्या बरोबरीची, किंबहुना अधिकच होती; अशी मुलगी पसन्त करून आपल्या समजुतीनें खऱ्या नीतितत्वाला धरून तिच्याशीं प्रेमसंबंध जोडला; पैशाची किंवा नांवलौकिकाची मुळींच आशा धरली नाहीं. येथें सगळें बिघडलें; नंदीबैलाप्रमाणें मान हालवून बाप म्हणेल तसें करण्यास तो तयार झाला नाहीं, हा त्यानें मूर्खपणा केला. नीतीच्या मार्गानें जाण्याची कोणाची इच्छाच नाहीं. आपल्या स्थितींतले चार लोक करतील, तें आपण करावयाचें हें तत्व पाळायला सगळें कसे मेंढराप्रमाणें एका पायावर तयार असतात. विचार म्हणून करावयाचा नाहीं. हें सर्वांचें ब्रीद! मग ते जाडे विद्वान असोत कीं एकादा फाटका अशिक्षीत असो! सगळे एका माळेचे मणी! असल्या विद्वानांनीं कितीही लोकोपयोगीं मोठमोठालीं कामें केलीं तरी त्यांच्या स्वतःच्या घरांत कधीं म्हणून काडीचीही सुधारणा झालेली दृष्टीस पडावयाची नाहीं. घरांतल्या सगळ्याच गोष्टींकडे दुर्लक्ष्य! त्याचप्रमाणें लग्नाच्या बाबतींत! मुलाला एकादी मुलगी पाहून दिली म्हणजे झाले. मग त्याचें तिच्यावर प्रेम असले काय! दोन्ही सारखेंच! प्रेम असलें तरी संसार होतात आणि प्रेम नसलें तरी कांहीं व्हायचे रहात नाहीं. मग प्रेमाचीच जरूरी काय? पण एकमेकांवर प्रेम असणाऱ्या जोडप्यांच्या संततींत तसें नसतें. त्यांच्या संततींत कांहींच फरक पडणार नाहीं कीं काय? डॉक्टरांच्या अद्वातद्वा बोलण्यानें कमलाकराला शालिनीबद्दल जास्तच पूज्यबुद्धि वाटूं लागली. तिच्याइतकी सद्गुणी, प्रेमळ व निर्मळ अंतःकरणाची मुलगी आजपर्यंत आपण कधींच पाहिली नाहीं, असें त्यास वाटूं लागलें. अशा स्त्रीबद्दल बाबानीं असें उद्गार काडावें! अंः! ते पुष्कळ काडतील. पण मला तसें वाटले पाहिजेना! वाईट माणसाला सगळें जग वाईटच दिसतें. शालिनीबद्दल कोणी कांहीं ह्मटलें तरी तिचा पवित्रपणा लवलेशही कमी होत नाहीं. ती तर एक पावित्र्याची पुतळीच आहे. घरीं गेल्यावर शालिनी

आपल्याला बाबा काय ह्मणाले ह्मणून विचारील तर आपण तिला काय सांगावें ? खरा प्रकार मुळींच सांगू नये. आपल्या वडलांचे असले अपशब्द ऐकून तिला काय करायचं आहे. उगीच तिला वाईट वाटेल. त्यापेक्षां न सांगितलेलेंच बरें. असें वाटून त्यानें शालिनीला खरा प्रकार मुळींच सांगितला नाहीं.

---

## प्रकरण नववें.

मागल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें कमलाकर जो निघाला तो तडक शालिनीकडे गेला. नेहमीं कमलाकर फार झालें तर एकादा दिवस शालिनीकडे राहून घरीं परत जात असे. पण आज तसा तो गेला नाहीं. त्याच्या मनांतून शालिनीजवळ पुन्हा दिल्लीला जाण्याची गोष्ट काढावयाची होती. आपल्या ह्मणण्याला नकार मिळेल हें तो पूर्ण जाणून होता. तरी पण एकदां विचारून तर पहावें. नाहीं म्हणाली तर आपले आहेच. असें वाटून तो आपल्या हातांतलें पुस्तक बाजूला ठेवून शालिनीच्या खोलींत गेला. शालिनी नुकतेंच आपलें घरांतलें कामकाज आटोपून आपल्या खोलींत जाऊन पडली होती. तिचा किंचित् डोळा लागला असेल नसेल तोंच कमलाकर अगदीं हलकेंच दार उघडून आंत आला. शालिनीला चांगली झोंप लागली आहे असें पाहून कमलाकर मागें फिरणार, इतक्यांत त्याच्या चाहूलीनें शालिनी जागी झाली. कमलाकराला पहातांच ती चटकन् उठून बसून म्हणाली, कोण ? कमलाकर ? या. मी जागी आहे. मला झोप नाहीं लागली.

"हो का ? मला तर वाटलं तुला चांगलीच झोप लागली आहे असं. माझ्या खडबडीनें तूं जागी झाली असशील." असें म्हणत म्हणत कमलाकर शालिनी बसली होती त्या खाटेवर जाऊन बसला. "मी उगीच तुला उठवली. पुन्हां तूं नीज मग मी तुझी झोंप झाल्यावर येईन. असें म्हणत कमलाकर शालिनीची उशी जागच्या जागेवर ठेवून तिला निजण्याचा आग्रह करूं लागला."

" नाहीं, तशी नाहीं मला झोप येत हो. आत्तांच घरांतलं काम आटोपलं, ह्मणून अंमळ लवंडलें होतें. इतकंच कायतें. तुम्हाला वाटतय् तशी झोप मला मुळींच येत नाहीं. मींच मगाशीं तुमच्या खोलींत येणार होतें. पण ह्मटलं तुह्माला झोप लागली असेल, तेव्हां आतांच जाऊं नये. मग चहाची वेळ झाली

कीं चहा करूनच तुह्मांला उठवायला यावं. पण आतां तुह्मीच आलां, तर आपण इथेंच गप्पा मारीत बसूं. नाहींतर शेलेची एकादी मजेदार कविता वाचूं."

"वाचूं. वाचायला काय हरकत आहे. पण आधीं मला एक वचन देशील तर. नाहीं तर,–नाहीं तर,–नाहीं वाचणार."

"शालिनी थोडावेळ थांबून मान हलवून हंसून ह्मणते " हं आहे आह्मांला ठाऊक. कसलं आमच्यापासून वचन घेणार तें ! पण मी कांहीं अशी फसायची नाहीं. मनुष्यापासून वचन घ्यायचं नी मग त्याला जाळ्यांत गुंतवल्यासारखं करायचं. आधीं कशाबद्दल वचन द्यायचं तें सांगा. मग ती गोष्ट करायला हरकत नाहीं असं वाटलं तर वचन देऊं, नाहीं तर नाहीं देणार.

"शालिनी मी काय विचारणार आहे तें तुला माहीत आहे. मग का उगीच ! तूं नाहीं ह्मणशील ह्मणूनच माझें मन विचारायला घेत नाहीं." असें कमलाकर टेबलावरला पंखा उचलून अर्धवट वारा घेत अर्धवट समोरील खिडकी-बाहेर पहात निराशेनें ह्मणाला.

"आतां आलं माझ्या ध्यानांत तुह्मी काय विचारणार आहांत तें. दिल्लीला चलण्याविषयीं ह्मणत असाल ना ?"

कमलाकरानें यावर कांहींच उत्तर दिलें नाहीं. शालिनी थोडावेळ स्वस्थ बसली. कमलाकराची झालेली भयंकर निराशा पाहून तिला फार वाईट वाटलें. प्रत्येक बाबतींत आपलाच हेका चालविणें बरें नाहीं. त्यामुळें कमलाकराला फार वाईट वाटेल. म्हणून त्याच्या म्हणण्याप्रमाणें एकदां दिल्लीस जावें असें वाटे, पण पुन्हा तिचेंच मन तिला सांगे कीं, कमलाकर लोकापवादाला फार भितो तेव्हां त्यानें आपल्या पाठीमागें ही भुणभुण चालविली आहे. आपण असलें भागूबाई सारखें वर्तन करण्यांत मुळींच अर्थ नाहीं. येऊन जाऊन लोक करणार करणार तें काय ? अगदीं त्यांच्या दुष्टपणाची परमावधीच झाली तर आपल्याला ठार मारतील. यापलीकडे तर कांहीं करीत नाहींत ना ! हें सगळें लिहीण्यास इतका वेळ लागला पण तिच्या मनांत ते केव्हांच येऊन गेले. कमला-कराच्या भित्रेपणाला दुजोरा देण्यांत कांहींच अर्थ नाहीं. त्यांना वाईट वाटलें तरी हरकत नाहीं. सगळयांना दुःख देण्याचें कामच आपण पत्करलें आहे. तर आतां मागें घेऊन काय उपयोग ? असें वाटून ती ह्मणाली, "कमलाकर,

हाच प्रश्न तुह्मी मला दोन तीनदां विचारला होतात. तेव्हां मी जें उत्तर दिलें तेंच आज देणार. तुह्माला लोकांची इतकी भीति का वाटते तें नाहीं मला समजत."

"तुला नाहीं समजायची कशी भीति वाटते ती. तूं मोठी निर्धाराची बायको आहेस. तुझं इथें राहून चालेल. पण मी स्पष्ट सांगतों बुवा कीं आपल्याच्यानीं कांहीं ती निंदा सहन करवणार नाहीं." शालिनी हंसत हंसत ह्मणते, " तुह्मी घराच्या बाहेरच जात जाऊं नका कसे. ह्मणजे लोकांनीं केलेल्या निंदा ऐकायलाही नको, आणि वाईट वाटायलाही नको. हो, पण काल तुम्ही बाबांना सगळं सांगून मग दिल्लीला जायचं ठरवणार होता ना ? मग त्याचं काय झालं?" "कांहीं नाहीं. ते एवढंच म्हणाले कीं, पुन्हा माझ्या घरांत पाऊल टाकूं नको. नको टाकूं येथें कोणाचं आडलाहे ! बरं झालं. मला तरी तेंच पाहिजे होतं. माझ्या मनांतून तूं बाळंत होईपर्यंत तुझ्याजवळच रहावयाचें आहे. तें बाबांच्यापाशीं राहून कधींच साधलं नसतं. बरं झालं. आयतंच काम झालं. तुला अशा स्थितींत एकटीलाच राहूं देणं बरोबर नाहीं. वेळ आहे. प्रसंग आहे. मी तुझ्याजवळ सतत असलेला बरा. हो कीं नाहीं ? का मी मुळीं नकोच राहूं तुझ्यापाशीं ?"

" पहा बुवा. मी तुह्माला त्रास देतें. तुमचं ऐकत नाहीं, ह्मणून तुह्मांला आवडत नसलें तर नका राहूं."

" तूं ह्मणशील मला पुष्कळ जा ह्मणून पण मी गेलों पाहिजे ना ! "

" मग ? मग कशाला एवढ्या ऐटीनें विचारलं तर ? "

'मूर्ख ह्मणून ! झालं आता. तुह्मी बायका ह्मणजे फार हट्टवादी बुवा ! कोणाचं कधीं ऐकणार नाहीं. आपलं ह्मणणं तें शेवटीं खरं कराल. बरं पण दिल्लीला नाहीं तर नाहीं पण सिंहगडला तर जायची कीं नाहीं हवा बदलायला ?'

" हो सिंहगडाला न जायला काय झालं ! सिंहगडाला यायला माझी केव्हांच हरकत नाहीं. सिंहगडाला मला बरं वाटेल. तेथली हवा चांगली असते ह्मणतात. आणि पुन्हा मला सिंहगड एकदां पहायचाच आहे. पण पुण्यास चार दिवस राहून मग सिंहगडाला जाऊं."

" कांहीं हरकत नाहीं. " कमलाकर आनंदून ह्मणाला. कमलाकरानें हवेच्या सबबीवर शालिनीला एकीकडे नेण्याची ही दुसरी युक्ति योजली.

शालिनी लगेच 'ह्मणते आपण पुण्यास गेल्यावर मी पूर्वी रहात होतें त्याच झोपडींत राहूं. आतां हरीकाका आपल्याशीं बोलणार नाहींत. मी त्याना पूर्वीं

किती आवडत असले तरी आतां खचीत आवडत नसेन. त्यांच्या कानावर ही बातमी केव्हांच गेली असेल.'

'असेल. गेली असली तरी आपल्याला काय!' इतक्यांत घड्याळांत चाराचे ठोके पडले. शालिनी चहा करण्यास उठली. कमलाकर पण तिच्या मागोमाग स्वयंपाकघरांत जातां जातां शालिनीस म्हणतो "शालिंनी आतां सिंहगडाला जायचं खात्रीनें ठरलं ना?" "हो, त्याला केव्हांच माझी ना नव्हती. पण तुह्मी मला दिल्लीला म्हणत होता; आणि तें सुद्धां सहज दिल्ली पाह्यला नको म्हणून. आणि मला तर लोकांना भिऊन कोठेंच जायचं नाहीं. एवढ्यासाठींच मी दिल्लीला येत नाहीं म्हणते. नाहीं तर दिल्लीला जायला हो काय झालं? माझ्या मनांतून एकदां दिल्लीला नाहीं तरी जायचंच आहे."

"तसं जाऊं एकाद वेळ. पण पुण्याला कधीं नक्की जायचं?"

'तुम्हीं म्हणाल तेव्हां.'

'जाऊं परवां. जितकं लवकर जाऊं तितकं बरं.'

'हरकत नाहीं. केव्हां, परवां सकाळीं जायचं एक्सप्रेसनें?'

'हो. एक्सप्रेसनेंच जाऊं. स्टेशनाजवळच्याच एखाद्या खाणावळींत जेवण आटपूं. आणि मग झोपडींत जाऊं. परवांच त्या झोपडीच्या मालकाचं पत्र आलं कीं, तह्मी वाटेल तेव्हां या. झोपडी रिकामी आहे. तुह्मी येत असला तर दुसऱ्या कोणाला देत नाहीं.'

'मग तुम्ही आधींच तजवीज करून ठेवली होती तर?'

'हो. नको करायला? बरं पण आटप. ती बघ पाण्याला उकळी सुद्धां आली. आज माझी एकाशीं अपॉइंटमेंट आहे. मला तिकडे लवकरच गेलं पाहिजे.' असें म्हणून कमलाकर चहा झाल्यावर गर्दीगर्दीनें कपडे घालून बाहेर गेला.

---

## प्रकरण दहावें.

ठरल्याप्रमाणें मे आठ तारखेला शालिनी व कमलाकर सकाळीं एक्सप्रेसनें पुण्यास जावयास निघालीं. या वेळेस पुण्यास चांगले पांच सहा महिने काढावयाचे होते, नेहमींप्रमाणें कांहीं एक नाहीं तर दोन महिने राहूनच परत

जावयाचें नव्हतें. तेव्हां सगळें अवश्य लागणारें सामान बरोबर घेतलेंच पाहिजे. नाहींतर तेथें आपली फार अडचण होईल, असें वाटून शालिनीनें नेहमीं लागणारें सामान तेवढें भराभर काढून देऊन कमलाकराला बांधाबांध करावयास सांगितलें. कमलाकराला आजपर्यंत कधीं म्हटल्या कधीं सुद्धां इतकें सामान घेऊन कुठें जाण्याचें ठाऊक नाहीं. फार झालं तर एकादी ट्रंक आणि ह्यांड ब्याग घेतली म्हणजे झालें. पण आज किती तरी सामानाची आवराआवर करून निघावयाचें होतें. आणि पुन्हा हाताशीं मदत करायला कोणी गडी माणूस नाहीं. कमलाकराला त्या सामानाची बांधाबांध करायला सबंध रात्र पुरवली. रात्रीचे तीन वाजल्यावर तो अंथरुणावर पडला. रात्रभर झालेल्या श्रमानें त्याला चांगली झोप लागली. पण सकाळीं लगेच सहा वाजतां शालिनी "चहा झाला. उठता ना ? नाहींतर मग आपल्याला एक्सप्रेस मिळणार नाहीं." असें म्हणत उठवावयास आली. 'काय ही संसाराची दगदग !' असें म्हणून कमलाकर एकदाचा अंथरुणावरून कसाबसा उठला. आजपर्यंत आपल्याला कधीं अशी दगदग करण्याचें माहीत नाहीं त्यामुळें हें सर्व करायचें मोठें जिवावर आलें. नाहींतर लोक नाहीं का करीत. अशी मनाची समजूत घालीत तो बिछान्यावरून उठून तोंड धुण्यास गेला. शालिनी केटलमध्यें चहा टाकून आधण ओतून कमलाकराची वाट पहात बसली होती. तोंडबींड धुतल्यावर कमलाकराला हुशारी वाटूं लागली; आणि थोड्यावेळा पूर्वी मनांत आलेले कष्टी विचार नाहींसे झाले. तो शालिनीशीं पुन्हा पूर्ववत् आनंदानें बोलूं लागला. चहा घेऊन झाल्यावर मंडळी दादरच्या स्टेशनवर गेली. गाडी सुटायला अद्यापी वीस एक मिनिटें अवकाश होता. शालिनीला गाडीची गदगद होऊं नये ह्मणून कमलाकराच्या मनांतून सेकंड क्लासची तिकीटें काढावयाची होती. पण शालिनीनें तसें न करण्याविषयीं बजाविलें. ती ह्मणाली "आतां आपण असे पैसे उधळून चालावयाचें नाहीं. आतां आपल्यावर एक नवी जबाबदारी येणार आहे. त्याकरितां आपण एव्हांपासूनच जितकी काळजी घेतां येईल तितकी घेतली पाहिजे. तिसऱ्या क्लासांत बसलं म्हणून काय झालं ! थोडीशी गर्दी झाली तर झाली; इतर मंडळी नाहीं का बसत ? कमलाकराच्या मनांतून दुसऱ्या क्लासचींच तिकाटें काढावचीं होतीं. पण शालिनीच्या आग्रहास्तव त्यास तसें करतां येईना. त्यानें मधल्या क्लासची तिकीटें काढून आणिली. इतक्यांत एक्सप्रेस भण्भण् करीत स्टेशनांत शिरली. प्रवाश्यांचीं एकच गर्दी उसळली. ब्राह्मणांच्या बाया आपआपलीं बोचकीं खाकुटींस मारून

व एका हातानें लहान मुलांना ओढीत आगगाडीच्या डब्याकडे धांव घेऊं लागल्या. पोर्टरलोक आपआपल्या डोक्यावरच्या ट्रंका डब्यांत ठेवून मालकापासून पैसे घेण्याच्या धांदलींत होते. प्रत्येक माणसाला डबा गांठून सुरक्षीत जागा मिळेपर्यंत भोंवताली काय चाललें आहे हें साधारण कळतच नाहीं. डब्यांत जागा मिळून बसल्यावर प्रत्येकाचा जीव खालीं पडल्यासारखा होतो. त्याप्रमाणें आमच्याही प्रवाशांचे थोड्याबहुत प्रमाणांत झालें. बरोबर आठ—अठरा झाले. स्टेशनावरची घंटा आपल्या घणघण आवाजानें लोकांना इतक्यांत गाडी सुटेल, असा इशारा देऊं लागली. गाडीच्या बाहेर लोक उभे होते ते आंत शिरले. गाडी कूऊंऊ असा एक दीर्घ आवाज काढून स्टेशनवरच्या लोकांचा निरोप घेऊन निघाली. स्टेशनावरले लोक तिच्या मंद गतीकडे व मधून मधून डब्यांतील लोकांकडे पहात उभे राहिले. गाडी लवकरच भक् भक् सर, सर करीत वेगानें जाऊं लागली. शालिनी पुरुषांच्याच डब्यांत बसली होती.

ह्या डब्याला दोन्ही बाजूस दोन दोन माणसें बसण्याच्या सीटस असून मधें जाण्यायेण्यास वाट ठेवलेली होती. शालिनी व कमलाकर शेजारी शेजारी बसलीं होतीं. आणि त्यांच्या समोरच्याच सीटवर एक पन्नास वर्षांचा म्हातारा व त्याची आई अशीं दोघे बसलीं होतीं. कमलाकरानें गाडींत वाचण्यासाठीं एक इंग्रजी कादंबरी बरोबर घेतली होती. ती तो वाचूं लागला. शालिनी डब्याच्या खिडकीशी बसली होती. तिला प्रवास करतांना वाचण्यास आवडत नसे. खिडकीजवळ बसून वाटेनें लागणारे पर्वत, नद्या, पूल, झाडें, झोपड्या, रानांत चरणारीं गुरें गुराखी वगैरे पहाण्याची तिला फार फार गंमत वाटे. मग तेच तेच पर्वत आणि त्याच त्याच झोपड्या किती वेळां कां पाहिल्या असेनात ! आतां मुंबईहून पुण्यास, आणि पुण्याहून मुंबईस ती किती वेळां तरी गेली आली असेल ! पण अगदीं लहान मुलासारखी तिची वृत्ति असे. असो. शालिनीनें आपल्या डाव्या हाताचें कोपर खिडकाच्या चौकटीवर टेकलें होतें. आणि आपली हनुवटी त्याच हाताच्या तळव्यावर टेकून ती खिडकीबाहेर पहात होती. तिचें लक्ष डब्यांतील एकाही माणसाकडे नसावें. कमलाकरासमोर बसलेला म्हातारा एक वर्तमानपत्र वाचीत होता. त्याची आई शालिनीकडे जरा कुतुहल दृष्टीनें पहात होती. मग तिला कसलें एवढें आश्चर्य वाटत असेल तें असो. ती शालिनीकडे पाहून कमलाकराकडे पाही, आणि हंसल्यासारखे करी. शालिनीच्या गळ्यांत मंगळसूत्र नव्हतें. तें

तिच्या लक्षांत आल्याखेरीज राहिलें नाहीं. या गोष्टीकडे बायकांचें फार बारीक लक्ष असतें. तेव्हां ही गोष्ट तेव्हांच तिच्या लक्षांत आली आणि मनांत संशय उत्पन्न झाला. पण ती कांहीं बोलली नाहीं. आपली डोळे मिटून तोंडानें देवाचें नांव घेत बसली. परंतु शेवटीं तिला अगदीं बोलल्याखेरीज रहावेना. तिनें थोड्या वेळानें शालिनीजवळ 'कोणत्या गांवाला जायचं तुह्माला?' असें विचारून चौकशी करण्यास सुरवात केलीच. "पुण्यास जायचं." असें शालिनी ह्मणाल्यावर "हो. हो. आह्माला पण पुण्यासच जायचं." असें ह्मणून तिनें आणखी कोणत्या पेठेंत रहातां? वगैरे विचारण्यास सुरुवात केली. शालिनी आपली जेवढ्या प्रश्नाचें तेवढेंच उत्तर देऊन स्वस्थ बसे. पण म्हातारी कुठली स्वस्थ बसायला! तिनें पुढें आपल्याला भाऊ किती आहेत? आईबाप कुठें असतात? प्रत्येक भावाला व बहिणीला किती मुलं आहे? शेवटीं हे तुमच्याबरोबर आले आहेत हे कोण? तुमचे यजमानच ना? इतक्यावर येऊन ठेपली. तेव्हां शालिनी जरा घोटाळली. तिला या म्हातारीला काय सांगावं तें कळेना. आपण आपल्याकडून पुष्कळ प्रयत्नानें हिला समजेल अशा तऱ्हेनें आपलें नातें सांगितलें तरी तिला तें कसें कळणार! असें तिला वाटलें. इतक्यांत शालिनी कांहीं बोलायच्या आधींच कमलाकरानें "हो. ती माझी पत्नीच असें म्हटलें. व डोळ्यानें कांहीं एक न बोलण्याविषयीं शालिनीला खूण केली. पण शालिनीला कमलाकराच्या खोटें बोलण्याचा फार राग आला. तिला त्याचें तें करणें मुळींच पसंत पडलें नाहीं. कमलाकराचें उत्तर ऐकल्यावर ह्मातारी पुन्हा आपले पाय सीटवर घेऊन देवाचें नांव घेऊं लागली. शालिनी पण पूर्ववत् पर्वताचे उंचच्या उंच सुळके, खोल दरींतलें चकाकणारें पाणी, गाडी पहाण्यासाठीं झोंपडीबाहेर आलेली कुणब्याची मुलें पहाण्यात गुंतून गेली. एक देखावा पाहिल्यावर त्यासंबंधीं कांहीं विचार डोक्यांत घोळूं लागताहेत, तों दुसरा एकादा चित्तवेधक देखावा पुढें यावा, आणि पूर्वीचे विचार लोपून जाऊन, दुसरेच विचार मनांत यावेत. असें एकसारखें चाललें होतें. गाडी लोणावळ्याच्या स्टेशनांत शिरली. इतका वेळ कमलाकर आपलें पुस्तक वाचण्यांत चूर झाला होता. कमलाकरानें चहा मागवला, व कांहीं फळें पण विकत घेतली. फळें कापून त्यानें त्यांतली कांहीं समोरच्या ह्मातार्‍याला व त्याच्या आईला दिली. त्यांनीं पहिल्याप्रथम 'नको. नको. कशाला?' वगैरे ह्मणून शेवटी ती घेतली. तेव्हां ह्मातारीनें पण आपलं बोचकं सोडून एकएक लाडवाची गोळी त्या दोघांच्या हातावर ठेविली. अशा रीतीनें या तिघांचा यथास्तीत फराळ

झाला. ह्मातारीनें बरीक कमलाकरानें दिलेली फळें तेवढी खाल्ली. फराळ झाल्यावर ह्मातारेबुवां ह्मणाले ' चला आपण पाणी पिऊं आणि याना पण थोडेंसें आणूं असें ह्मणून त्यांनीं आईपासून तांब्या मागून घेतला. ही दोघें पाणी पिऊन डब्यात येऊन बसतात तों गाडी चालूं झाली. कमलाकरानें आपलें वाचोत असलेलें पुस्तक ब्यागमध्यें ठेवून दुसरें शेलेच्या कवितांचे काढलें. तें पाहून, आपले डोळे मोठे व भिवया उंच नेऊन ह्मातारेबावा ह्मणतात ' अरे वा ! शेले वाचतां का ? फार छान ! शेले सारखा दुसरा कवी नाहीं.. असें बोलतां बोलतां शेवटीं बोलणें शेलेच्या इटली मधल्या प्रवासावर गेलें. तेव्हां कमलाकर ह्मणाला " शेले ह्या कवी मोठा खरा, पण त्याचं वर्तन चांगलं नाहीं हो. नाहींतर त्याची चहा काय आज प्रत्येकानें केली असती. पुष्कळाना तो आवडत नाहीं, तें त्याच्या वर्तनामुळेंच. " " पण लोकांनीं त्याच्या चुकाबद्दल त्याला दूषण देतां कामा नये. कारण हें पहा मोठ्या माणसांच्या हातून अशा कांहीं चुका घडावयाच्याच. त्याचें ज्ञान, त्यांची बुद्धि वगैरे पाहून आपण त्यांच्या बारीक सारीक चुक्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे. कारण असं आहे, ही अशी हुशार जी माणसं असतात, त्यांचीं ज्ञानेंद्रियें बुद्धिपेक्षां फार चलाख असतात. त्यांची कल्पना दांडगी, त्यांचे विचार दांडगे, त्यांचं सगळंच कांहीं मोठ्याप्रमाणावर. तेव्हां शारीरिक किंवा मानसिक सौंदर्याचा त्यांच्या मनावर तेव्हांच परिणाम होतो. ज्या चुका असल्या माणसांच्या हातून होऊं नयेत असें आपणांस वाटतें त्याच चुका यांच्या हातून होणं अगदीं सहाजिक असतें. त्यांत त्यांचा कांहींसुद्धां दोष नसतो. असें जेव्हां तो गृहस्थ म्हणूं लागला, तेव्हां बरीक शालिनीच्यानें बोलल्याखेरीज रहावेना. आतांपर्यंत तिनें आपली बोलण्याची इच्छा कशी तरी आंतल्या आंत दाबून ठेविली होती. यावर चांगलें सणसणीत उत्तर देऊन या ह्माताऱ्याला गप्प बसवावें असें तिला पुष्कळ वेळां वाटलें. तरी पण ती आपली जाऊं दे. पुढें काय म्हणतो तें तर पाहूं. " असें मनांत ह्मणून स्वस्थ मनानें त्याचें बोलणें ऐकून घेत होती. पण आतां बरीक तिच्यानें बोलल्याखेरीज रहावेना. तेव्हां एकदम आपल्या सीटवरून जरा सरकून ती ह्मणाली, " चांगली बुद्धि असणें आणि ज्ञान असणें, या काय वाईट वर्तन असायला सबबी झाल्या ? साधारण माणसाच्या हातूनसुद्धां ज्या चुका घडत नाहींत, त्याच जर मोठमोठ्या माणसांच्या हातून होऊं

लागल्या तर ते मोठे कसचे ! प्रत्येक मनुष्य आपआपल्या बुद्धीप्रमाणें चांगल्या वाईट गोष्टींचा निवाडा करून, ज्या इष्ट दिसतात त्यांचा समाजांत प्रसार करीत असतोच. मग ज्याना ईश्वरानें उत्कृष्ट बुद्धि, उत्तम प्रकारचें ज्ञान आणि शहाणपण दिलं आहे, अशानीं कांहीं जास्त करून दाखवायला नको का ? यानीं तर प्रत्येक लहान सहान बाबतींतसुद्धां फार जपलं पाहिजे. हे लोक लोकांचे पुढारी असतात, ते लोकांचे मार्गदर्शक असतात, तेव्हां त्यानीं प्रत्येक गोष्ट फार काळजीपूर्वक केली पाहिजे. कोणतीही गोष्ट करायच्या आधीं नीट विचार केला पाहिजे. सत्याला धरून चाललें पाहिजे. वाईट गोष्टींचा तिरस्कार केला पाहिजे. नुसता तिरस्कार करूनही उपयोग नाहीं, तर अजीबात त्यांचा त्याग केला पाहिजे. जगांत ज्ञानानें व बुद्धीनें दुर्बल असणारे पुष्कळ लोक असतात. त्यांनां स्वतःला विचार करितां येत नाहीं. ते आपल्या भोंवतालचे लोक जे करीत असतात तेच ते करतात. समाजांत रूढ असलेल्या मार्गानें जावयाचें एवढेंच त्यांना माहीत. मग तो मार्ग चुकीचा असो, चांगला असो, वाईट असो, कसाही असो त्याचा ते कधींही विचार करीत बसत नाहींत. परंतु शेले काय, किंवा जॉर्ज इलीएट काय, यांच्याकडून आपण कांहीं निराळीच अपेक्षा करीत असतों. आतां जॉर्ज इलीएटचेंच पहाना. तिनें चांगलें काय वाईट काय तें ठरवून आपल्या स्वतःसाठीं स्वातंत्र्य मिळविलें. एवढेंच नाहीं तर ती पूर्ण स्वातंत्र्यतेनें आपल्या आयुष्यांत वागली सुद्धां. असें असून तिनें आपल्या पुस्तकांतून समाजांतील अनिष्ट रूढीवर जसा तडाखा उडवायला पाहिजे होता तसा मुळींच उडाविलेला दिसत नाहीं, तर उलट अनिष्ट रुढींची तरफदारीच केलेली दिसते. हें असें केल्यावर कोण यांना नांवें ठेवणार नाहीं ? आपल्याला चांगली वाटणारी गोष्ट, आपण लोकांना स्पष्ट रीतीनें समजावून दिली पाहिजे. नाहीं तर आपण करीत असायचं एक आणि तरफदारी करायची भलत्याच गोष्टीची. म्हणजे आपली चूक आपणच कबूल करण्यासारखं आहे. पण शेलेचं असं नाहीं. त्यानें गुलामगिरीच्या दिवसांत लोकांना न भीतां स्वातंत्र्यांची तरफदारी केली. आतां या वेळेस जसा तो धैर्यानें वागला. तसाच तो मरेपर्यंत वागला. आतां या गुणाबद्दल त्याची वाहवा केली तर हरकत नाहीं. पण त्याच्या दुर्गुणाबद्दलही त्याला दोष द्यावयाचा नाहीं म्हणजे काय ! असली अंधश्रधा काय कामाची ! ”

तो म्हातारा शालिनीकडे अगदीं चकीत मुद्रेनें पहात होता. नंतर तो कमलाकराकडे वळून ह्मणतो. " आपल्या कुटुंबाचं बरंच वाचन दिसताहे."

शालिनीनें कुटुंब शब्द ऐकला आणि तिच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन भिडली. ' मी कोणाचं कुटुंब बिटुंक नाहीं ' असें तिच्या मनांत सांगावयाचें फार आलें होतें. हा गृहस्थ आणि मी अगदीं जिवलग मित्र आहों. असें तिला एकसारखें ह्मणावेंसें वाटे. पण करते काय ? अगदीं ओंठावर आलेले शब्द कमलाकरासाठीं तिला मागें घ्यावें लागले. कारण कमलाकराला आतां ही असें कांहीं तरी बोलणार असें वाटल्यावरून त्यानें शालिनीच्या हाताचें बोट हलकेंच दाबून गप्प बसण्यास खुणाविलें. कमलाकर आपल्याला खरी गोष्ट बोलूं देत नाहीं; या ह्मातार्‍याला उगीच भलतेंच सांगून फसवीत आहे, हें पाहून शालिनीला कमलाकराचा थोडासा राग आला. पण प्रेमासाठीं तिला तो सगळा आंतल्या आंत गिळून टाकावा लागला. तरी पण ही गोष्ट तिच्या मनाला लागल्याखेरीज राहीली नाहीं. त्यामुळें तिला आपलीं खरीं मतें जगापुढें केव्हां मांडूं, आणि आपल्या मताप्रमाणें आपण अगदीं तंतोतंत वागत आहों, हें जगाला केव्हां दाखवूं असें होऊन गेलें होतें. आणि त्याच वेळेस तिला आपल्या वडलांची आणि त्यांच्या एका व्याख्यानाची आठवण होऊन तिच्या डोळयांत आसवें उभीं राहिलीं. त्याबरोबर आपली मान खिडकी बाहेर काढून, दुसरीकडे कोठें तरी पहाण्याचा बहाणाकरून तिनें आपले अश्रू पदरानें हलकेंच पुसले. बोलतां बोलतां खडकीचें स्टेशन आलें. लोक आपआपल्या सामानाची आवरासावर करूं लागले. शालिनी केसबीस सावरून शाल अंगावर घेण्यासाठीं ह्मणून शालिची घडी मोडूं लागली. कमलाकर हॅट घालून व सामान जरा पुढें सरकवून पुण्याचें स्टेशन येण्याची वाट पहात बसला. तो ह्मातारा पण आपलें सामान पुढें काढून, डोक्याला रुमाल गुंडाळीत आपल्या आईला ह्मणतो: " आई, पुणं आलं हो." त्या बरोबर ह्मातारीला थोडीशी डुकली लागली होती, त्या डुकलींतून ती एकदम खडबडून जागी होऊन ह्मणते इतक्यांत पुणं आलं ? आतां इतक्यांत ना आपण लोणावळ्याच्या स्टेशनावर होतो ? " त्यावर ह्मातारे बुवा जरा हंसून उपरणें अंगावर घेत ह्मणतात. " अग आई, तुला झोप लागली होती. किती वेळ तरी झाला लोणावळं गेल्याला.

"बरं बाबा. चल. आलं ना पुणं ? आपले नीट पाहून घेतलेस ?" असें म्हणत म्हातारी बाकाखालीं इकडे तिकडे चाचपूं लागली.

तूं स्वस्थ बैस. सगळं पाहून घेतलं आहे. आपले किती डाग चारच ना ? ”

“ हो ते चार. आणि माझी ही मंडळी ”

“ हो मग तितके आहेत. ” असें म्हणत ह्मातारेबुवानीं खिडकीबाहेर डोकावून पाहून ह्मटलें “ हें पहा, हे आलं स्टेशन. चला. ( कमलाकराकडे पाहून ) बरं आतां आह्मी येतो. पुन्हां भेटूं तें खरं. असें ते म्हणतात तो गाडी स्टेशनवर थांबली. पोर्टर भराभर गाडीच्या खिडक्याना धरून “ पोटर, पोटर, पोटर हवाय का” ? असें ह्मणत डब्यांत शिरूं लागले. ह्या गोंधळांत ह्मातारेबुवा केव्हांच गेले ते कमलाकराला कळलें सुद्धां नाहीं. असो.

कमलाकर शालिनीनें स्टेशन जवळच्याच एका खाणावळींत जेवण आटोपून घेतलें. नंतर तीं दोघें सावकाशपणें ठरलेल्या झोपडींत गेलीं. येथें पंधरा एक दिवस राहून पुढें सिंहगडला जाऊन रहाण्याचा कमलाकराचा विचार होता. तेथें राहिल्यानें शालिनीच्या प्रकृतीस बरें वाटेल. तेथली हवा चांगली थंड व स्वच्छ आहे. तेव्हां तीं शालिनीच्या प्रकृतीस बरी. पुन्हा आपल्यालाही आज कित्येक दिवस पडून राहिलेलें चित्रकलेचें काम निवांतपणें संपावितां येईल, असें वाटून कमलाकरानें सगळा हा बेत केला होता. पुण्यास त्यांचे पंधरा दिवस हं हं म्हणतां निघून गेले. ते पंधरा दिवस ! ह्मणजे शालिनीच्या आयुष्यांतील सुखाची नुसती परमावधीच होती. तिचा तो त्या वेळचा आनंद पुन्हां तिला कधींही अनुभवावयास मिळाला नाहीं. तोच तिच्या सुखाचा शेवट विजणाऱ्या दिव्याची ज्योत जशी अगदीं शेवटीं एकदां लख्ख प्रकाशीत होऊन मग कायमची निजते, तसेंच शालिनीच्या सुखाचें झालें. इच्छित वस्तु मिळण्यासाठीं एकसारखी धडपड चालली असावी. आणि ती हातीं लागते आहे न लागते आहे तो निसटून जावी, त्याप्रमाणेंच शालिनीचें झालें. या पुढलें आयुष्य शालिनीला भयंकर हालांत काढावें लागलें. ह्या पंधरा दिवसांची आठवण हीच काय ती तिला तिच्या दुःखमय आयुष्यांत मनाला आराम देण्यास कारणीभूत होत असे. त्या पंधरा दिवसांत, त्या दोघानीं नित्य सकाळीं उठावें. आधल्या रात्रीं झोप वगैरे कशी काय लागली याची चौकशी एकमेकांनीं एकमेकाजवळ करावी. नंतर प्रातरविधी आटोपून शालिनीनें आपल्या मधूर आवाजांत तुकारामाचे कांहीं वेचक अभंग म्हणून दाखवावेत. शालिनीला कोणतीही गोष्ट दोघांनीं मिळून करावी असें फार वाटत असे, पण कमलाकराला आवाज नव्हता. आणि शालिनीला कमला

कराची चित्रकला अवगत नव्हती. ह्या व्यंगामुळें तिला फार वाईट वाटे, तरी पण उपाय नसल्यामुळें ती कमलाकरासाठीं एकटीच अभंग म्हणे. तिच्या त्या गोड आवाजानें झोंपडी सभोंवतालचें प्रशांत वातावरण अगदीं दुमदुमून जाई. अभंग ह्मणून झाल्यावर, अरुणोदयाची मजापहात, एकमेकाच्या हातांत हात घालून तीं दोघें एक दोन मैल फिरून येत. घरीं आपल्यावर शालिनी स्वयंपाक करण्यास लागे. तिला आतांशा स्वयंपाक करण्यास फारच मजा वाटे. कारण तिचें सर्व लक्ष कमलाकराला काय आवडेल इकडे लागलेले असे. कमलाकराला आवडणारे पदार्थ ती फार काळजीपूर्वक करी. आणि कमलाकर पण स्वयंपाकाची पुष्कळ तारीफ करून शालिनीनें घेतलेल्या श्रमाबद्दल तिला प्रेमाचें पारितोषक देई. कमालाकर शालिनीला स्वयंपाक करण्यास मदत करूं लागे, परंतु शालिनीच त्याला तसें करूं देत नसे. तो ह्मणे मला सर्व गोष्टी आपण दोघांनीं मिळून केलेल्या आवडतात, पण चित्रें काढण्यास मला येत नाहींत, आणि मला त्याची आवडही नाहीं. तेव्हां ते काम तुह्मी याच वेळेस केलेलें बरें. कमलाकर शालिनीला सोबत करण्यासाठीं स्वयंपाकघरांतच चित्रें काढीत बसे. कधीं कधीं चित्र काढतां काढतां तो आपला रंगाचा ब्रश तसाच हातांत धरून व वाकडी मान करून त्या आपल्या चित्राकडे नीट न्याहाळून पाही. आणि चित्रांतली कांहीं एक पोझीशन मोठी बहारीची साधली आहे असें वाटलें ह्मणजे ‘ सखे ’ ह्मणून मोठ्या प्रेमानें शालिनीला हाक मारून आपलें चित्र पहाण्यास तो तिला बोलावी. शालिनीला चित्रकलेसंबंधीं कांहींच माहिती नव्हती, तरी ती तशीच आपलें हातांतलें काम अर्धवट टाकून चित्र पहाण्यास जाई. आणि कमलाकराच्या खुर्चीवर आपल्या दोन्हीं हाताचे कोपरे टेंकून ती चित्र पाहूं लागे. मग कमलाकर तिला कुठें कुठें अगदीं बरोबर चित्रकलेसंबंधीं तिला पुष्कळ माहिती देई. कमलाकरानें एक तसबीर काढून दूर भिंतीशी ठेविली होती. ती तसबीर तिला फारच आवडली फार मनोवेधक वाटली. आणि ती त्या तसबिरीकडे किती वेळ तरी पहात उभी राहिली. एकदम तिच्या मनांत कांहीं विचार येऊन ती कमलाकराच्या गळ्याला मिठी मारून ह्मणाली, “ कमलाकर किती सुंदर तसबीर ही ! मला जर अशी तुमच्यासारखी कला अवगत असती तर कित्ती कित्ती चांगलं झालं असतं नाहीं ? ह्मणजे मी पण चित्रकलेंत तुमच्या इतकीच दंग होऊन गेलें असते. बरं पण शालिनी तूं आपली तसबीर केव्हां मला देणार ? तुझी एक तसबीर माझ्याजवळ नको का ?”

" हो. नको कोण म्हणतो ? "

" मग केव्हां देणार तर ? "

केव्हां सांगूं ? केव्हां—बरं ? मला कमलाकराची छोटी शालिनी मिळाली म्हणजे.

अशा तऱ्हेच्या प्रेमसंवादांत किंवा आपआपल्या व्यवसायांत त्यांचे पंधरा दिवस केव्हांच निघून गेले.

---

## प्रकरण ११ वें.

दिवस केव्हांच निघून जातात, तें आपल्याला चट्दिशी लक्षांत येत नाहीं. आणि त्यांतल्यात्यांत ते सुखाचे आनंदाचे दिवस असले म्हणजे मग तर कांहीं विचारायलाच नको. त्याचप्रमाणें शालिनीला हें आत्तां आपण मुंबईहून आलों, आणि लगेच सिंहगडाला चाललों, असें वाटलें. कमलाकर यापूर्वी पुष्कळ वेळां सिंहगडाला जाऊन राहिलेला होता. आणि त्याला तेथें रहाण्यास मनापासून आवडत पण असे. त्याचें सिंहगडावर फारच प्रेम असे. तेथल्या प्रत्येक दगडावर, गडाच्या प्रत्येक कोनाकोपऱ्यावर त्याचें प्रेम होतें आणि आपल्याला सिंहगड किती आवडतो याबद्दल त्यानें शालिनीजवळ बोलून दाखविलें होतें. शालिनी आजपर्यंत कधीं सिंहगडला गेली नव्हती. तेव्हां कमलाकराच्या सांगण्यावरून तिलाही गड पहाण्याची इच्छा झाली. सामान वगैरे बरेंच न्यावयाचें असल्या-मुळें कमलाकरानें बैलगाडीच आणविली. सर्व सामान गाडींत भरून तीं दुपारीं बारा एकाच्या सुमाराला सिंहगडाला जाण्यास निघालीं. संध्याकाळच्या चार वाजेपर्यंत शालिनीला अतिशयच त्रास झाला. आधीं उन्हानें जीव कासावीस होत होता, आणि त्यांत बैल गाडीचे एकसारखे धक्के बसून अंग अगदीं खिळे-खिळें होत होतें. पुढें पांच वाजल्यानंतर शालिनीला थोडे बरें वाटूं लागलें. उन्हाची तिरीप कमी होऊन, गार मंद वारा सुटला होता. रस्ताही पूर्वीइतका खडखडीत नसून बैल जरा जलद चालत होते. गाडीवान बैलांना गाणें म्हणत होता. गाडीच्या दोन्ही बाजूला मोठमोठाले उसांचे मळे दिसत होते. कोठें कोठें पेरूंच्या बागा लागत तर कोठें कोठें हिरवीं गार शेतें लागत कोठें कोठें शेतकरी मोट हाकीत तर कोठें नुकतेंच बैलांना मोकळे सोडून त्यांच्या पाठोपाठ तमाखू खात गप्पा गोष्टी करीत घरीं

परत जात होते. आतां सूर्य अगदीं अस्तास गेला होता. केवळ संधिप्रकाश तेवढा राहिला होता. त्या प्रकाशांत शालिनीला एक पांढरा दगड दिसला. तिनें त्याकडे जरा बारकाईनें पाहिलें तो आठवा मैल होता. अजून दोन मैल त्याना जावयाचें होतें. दोन मैल जायला निदान त्याना अर्धा पाऊण तास तरी लागला असता. आणि त्यापुढें गड चढावयाचा ह्मणजे तर मुळींच शक्य नव्हतें. तेव्हां त्यानीं ती रात्र खडकवासल्यास काढण्याचा विचार केला. शालिनी बैलगाडीच्या प्रवासानें अगदीं थकून गेली होती. तेथें पोहोंचल्यावर धर्मशाळेंत आपलें सामान सुमान ठेवून निजण्याचाही तेथेंच बेत केला. थोडेंसें खाऊन मग निजलेलें बरें, असें वाटून शालिनीनें फराळाचें काढलें, पण तांब्यांत पाणी मुळींच नव्हतें. पाणी गाडींत पिऊन संपलें होतें. तेव्हां कमलाकर तांब्या घेऊन जवळच एक झोपडी होती, त्या झोपडींत एक लहानसें रॉकेलचें डबडें जळत होतें. त्याच्या उजेडांत एक कुणब्याची म्हातारी चार काटक्या पेटवून त्यावर भाकरी भाजीत होती. कमलाकरानें पाणी मागितलें तेव्हां ती जरा कांकूं करूं लागली. आणि "त्या शेजारच्या बामनाकडं जा." असें म्हणूं लागली. पण कमलाकरानें 'मला चालेल तुमच्याइथलं पाणी.' असें सांगितलें. तेव्हां तिनें आपलें पाण्याचें गाडगें त्याच्यापुढें केलें. कमलाकरानें तांब्या भरून घेतला आणि म्हातारीचे आभार मानीत तो धर्मशाळेंत गेला. कमलाकर परत येईपर्यंत शालिनीनें आपल्या निजण्यापुरती जागा चांगली स्वच्छ झाडून काढली. आणि दोघांच्या दोन पथाऱ्या टाकून ती स्वस्थ एका पथारीवर बसली होती. कमलाकर आल्यावर थोडथोडें खाऊन तीं दोघें झोपीं गेलीं. दुपारच्या दगदगीमुळें दोघांना चांगली स्वस्थ झोप लागली. पहाटेच्या चार वाजेपर्यंत शालिनी एकदांही जागी झाली नाहीं. पण कमलाकर बरीक सामान कोणी नेईल का काय या धास्तीनें मधून मधून जागा होत होता. सामान सुरक्षीत आहे असें पाहून आपली चादर डोक्यावरून घेऊन पुन्हा तो गुरपटून निजे. पहाटेची वेळ असल्यामुळें बाहेर थंडी बरींच पडली होती. पहाटे चार वाजतां शालिनी जागी झाली. तिनें कमलाकराला ( तो जागा आहे का नाहीं तें पहाण्यासाठीं ) सहज हाक-मारून पाहिलें. तों कमलाकर जागाच होता. कमलाकरानें नेहमींप्रमाणें तिला अभंग ह्मणायला सांगितले. शालिनीनें लागलींच आपल्या सुस्वर आवाजांत अभंग ह्मणण्यास सुरवात केली. तिच्या गाण्यानें कमलाकराला निवांत झोप लागली. तें तिच्या लक्षांत आलें नाहीं. कारण ती अभंग ह्मणण्यांत अगदीं तल्लीन होऊन गेली होती. चांगले फटफटीत

उजाडेपर्यंत ती अभंग ह्मणत होती. कांहीं वेळानें तिचें लक्ष कमलाकराकडे गेलें. तों त्याला चांगली झोप लागली आहे असें तिला कळून आलें. तेव्हां तिनें अभंग म्हणण्याचें बंद केलें. आणि तोंड वगैरे धुऊन चहासाठीं दूध मिळालें तर पहावें म्हणून बाहेर गेली. ती चार पांच घरें टाकून गेली तों तिला एक गवळी चरवींत म्हशीचें दूध काढताना दिसला. ती तेथेंच जरा दूर उभी राहिली. दूध काढून झाल्यावर मग दूध मागावें असा तिचा विचार होता. गोठ्याच्या बाहेरच्याच बाजूला अंगणांत एक कुत्रा बसला होता. त्याच्या पलीकडे चार पांच कुणबी आपली धोतरें डोक्यावरून लपेटून घेऊन शेकोटीजवळ शेकत बसले होते. त्यातल्या एकानें त्या दूधवाल्याला हाक मारून या बाईला दूध हवं आहे वाटतं. तर तिला दूध दे. असें सांगितलें. त्या माणसानें तिला दूध दिल. आणि ' आम्हीं रोज रतीबानं पण घालूं ' असं तो ह्मणूं लागला. तेव्हां शालिनीनें आपल्या इथें रहावयाचं नाहीं सिंहगडला जावयाचं आहे. असें सांगितलें. त्यावर तो " असं काय मला बी गडावरच जायाचं हाय. तुमासनी कवा जायचं " म्हणून विचारूं लागला. तो माणून सात साडेसातच्या सुमारास गाडी जोडून सिंहगडला जाणार होता. तेव्हां " आह्मी पण तुझ्या गाडींत येऊं. तूं गाडी जोडून धर्मशाळेपाशीं घेऊन ये. " असें तिनें सांगितलें. शालिनी धर्मशाळेंत येऊन, ती कमकराला आतांच आपण निघूं म्हणजे ऊन लागणार नाहीं, असें ह्मणूं लागली. कमलाकराला तिचा बेत पसंत पडून तीं दोघें चहा घेऊन गाडी आल्याबरोबर गाडींत बसली. सकाळच्या वेळीं त्या दोघांना प्रवास करण्यास बराच उल्हास वाटला. त्यांत त्यांचा गाडीवानही मोठा बोलका आणि गमत्या होता. त्यामुळें त्यांची वाटेनें बरीच करमणूक झाली. रस्त्यानें दोन्ही बाजूंनीं मधून मधून सुंदर झाडी होती. जों जों रस्ता संपू लागला तों तों आपण डोंगरांच्या रांगांत अगदीं गुरपटून जात आहोंत कीं काय असें शालिनीला वाटू लागलें. जिकडे पहावें तिकडे डोंगरांचे कडेच्या कडे दृष्टीस पडत. आपण चाललों आहोंत तेवढींच काय ती सपाट जमीन. बाकी चहूंबाजूंनीं उंचच उंच डोंगर गडावर चढण्यास सुलभ अशी वाट शालिनीला कोठें दिसेना. तेव्हां तिनें डोंगराकडे पहात विचारिलें, ' कमलाकर या इतक्या सरळ डोंगरावर लोक चढतात तरी कसे ?' इतक्यांत तिला दोन मराठ्याचीं मुलें गडावरून खालीं धांवत येतांना

दिघली. त्यांच्या पळण्याचा वेग पाहून तिला त्यांच्या सुरक्षततेविषयीं भीति वाटली. इतक्या भयंकर वेगानें तीं दुडकी चालीवर पळत होती. शालिनीला तीं पडतील अशी भीति वाटली. पण ती भीति निरर्थक होती. कारण तीं मुलें सावकास चालली असती तरच ती पडण्याचा पुष्कळ संभव होता. असो. थोड्याच वेळांत त्यांची गाडी अगदीं गडाच्या पायथ्याशीं येऊन थडकली. शालिनी गर्भवती असल्यामुळें तिला पायीं गड चढणें अशक्य होतें. तेव्हां तीं दोघेंही खुर्चीवर बसून वर गेलीं.

वर येईपर्यंत शालिनीची गडासंबंधींची कल्पना अगदीं निराळी होती. तिला वर गेल्यावर शिवकालीन वैभवाची कांहीं तरी साक्ष पटेल, असें वाटलें होतें. पण तसें कांहींच दिसेना. जिकडे तिकडे अगदीं रुक्ष प्रदेश दिसत होता. गडाच्या दरवाज्याशीं येतांच, त्या टोलेजंग दरवाजावरून तिला गतवैभवाची किंचित् आठवण झाली तेवढीच कायती. पण शिवाजींच्या काळची व्यवस्था आंत थोडी बहूत तरी राखिली असेल असें जें तिला वाटत होतें, तें खोटें ठरलें. गडावर गेल्यावर तीं एका बंगल्यावर जाऊन उतरलीं. शालिनीला अजून आपल्यास कांहीं जास्त चांगलें पहाण्यास मिळेल असें वाटत होतें. हे बंगले येथें रहावयाला येणाऱ्या लोकांसाठीं असतील, पण गडावर जें काय पहावयाचें तें आणखी दुसरीकडेच कोठें तरी असेल असा तिचा समज होता. थोड्याच वेळांत हा तिच्या भ्रमाचा भोपळा फुटला. संध्याकाळीं कमलाकर तिला गड दाखविण्यासाठीं घेऊन गेला. तेव्हां तिची फारच निराशा झाली. कमलाकरानें तिला तानाजीचें थडगें, देवटाकें, दक्षिण दरवाजा, तानाजी घोरपड लावून चढला ती वाट, त्याचप्रमाणें गडावरून दिसणारे रायगड, शिवनेरी इत्यादि किल्ले दाखविले. पण तिचें एकाही गोष्टीनें समाधान झालें नाहीं. तिची फार निराशा झाली. कमलाकर येथें एवढ्या उत्सुकतेनें रहाण्यास कां आला हेंच तिला समजेना. तिला तर त्या गडावर जिकडे तिकडे मोडकळीस आलेले दरवाजे, मातीचे ढीग आणि शेवाळ्यानीं भरलेली टाकीं यापलकिडे कांहींच दिसत नव्हतें. गडावरील सर्व ठिकाणें पाहून झाल्यावर तीं दोघें देवटाक्यावर जाऊन बसलीं. आतां दिवस मावळून चंद्रप्रकाश चांगला पडला होता. ती रात्र शुक्र पक्षांतल्या अष्टमीची होती. कमलाकर शालिनीच्या अगदीं शेजारी बसला होता. त्याचा एक हात तिच्या खांद्यावर होता. त्यांचे प्रतिबिंब त्या टाक्यांतल्या पाण्यांत

पडलें होतें. वारा गार सुटला होता. शालिनी आपली शाल गुरफटून चंद्राकडे पहात बसली होती. कमलाकराच्या सगळ्या गोष्टी गडासंबंधीं चालल्या होत्या. त्याच्या प्रत्येक वाक्याला शालिनी नुसतें हूं हूं करीत होती. तिचें लक्ष कमलाकराच्या बोलण्याकडे मुळींच नव्हतें. कुठल्या रुक्ष प्रदेशांत आपण येऊन पडलों आहोंत असें वाटून तिच्या मनाला बरें वाटत नव्हतें पण आपली उदासीनता कमलाकराच्या लक्षांत येऊं नये ह्मणून तिची एकसारखी धडपड चालली होती. ' येथें आह्मी लहानपणीं उन्हाळ्यांत किती वेळां तरी राह्यला आलों आहोंत ! त्या वेळची आठवण झाली म्हणजे अजून मला मोठी गंमत वाटते. अरे बापरे ! आम्ही त्या वेळेस काय खेळायच ! किती मजा करायची ! ते दिवस आमचे मोठे मजेंत गेले. येथें घोडवाटेला आवळीची खूप झाडें आहेत. तेथून आवळे तोडून आणून ते बाबाना न दाखवता खायचे. कधीं कधीं आमच्यापैकीं कोणी तानाजी कोणी सूर्याजी कोणी उदयभानू बनावयाच, आणि खोट्याच पत्त्याच्या तलवारी करून लढाई सुरूं करायची. मग लढाई करतां करतां खरोखरीच आमचे कधीं कधीं तरवारींनीं हात कापावयाचे आणि मग आई रागावून आमच्या तरवारी दूर कोठें तरी फेकून द्यावयाची. त्या सगळ्या आठवणी होऊन आज मला त्या वेळच्या इतकाच आनंद होत आहे " पण " कमलाकर मधेंच म्हणतो ' शालिनी तुला, खरंच सांग कसं काय वाटलं इथें आल्यावर ? त्याबरोबर शालिनीला काय उत्तर द्यावें तें न कळून ' चांगलं वाटलं ' असें खोटेंच उत्तर तिनें दिलें. कमलाकर आपल्याच आनंदाच्या भरांत होता. त्याच्या लक्षांत शालिनीची झालेली निराशा आली नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं कांहीं सामान आणण्यासाठीं ह्मणून तो गडाखालीं गेला. शालिनी बंगल्यांत एकटीच होती. कमलाकर गेल्यावर ती आपल्या बिछान्यावर जाऊन पडली, आणि कालपासून दाबून ठेवलेल्या अश्रूंना तिनें वाट दिली. तिला अतीशय कंटाळा आला होता. जिकडे तिकडे अगदीं सुन्न वाटत होतें. आणि आपल्या अजून येथें चार महिने रहावयाचें आहे हें पाहून तर तिला फारच वाईट वाटलें. अशा तऱ्हेनें आपल्या दुःखितावस्थेचा परिणाम एकसारखा चार महिने आपल्या घडणार हें पाहून तर तिला अतोनात वाईट वाटलें येथें आलों ही अगदीं चूक केली. पण आणखी आपल्या निराशेनें कमलाकराच्या आनंदाचा विरस होऊं नये ह्मणून तिनें चटकन् आपले डोळे पुसून आनंदी होण्याचा प्रयत्न केला.

## प्रकरण १२ वें.

——:०:——

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें शालिनी आपले डोळे पुसून कामाला लागली. इतक्यांत कमलाकर सामान घेऊन आला. तरी पण शालिनीची वृत्ति बरोबर नाहीं, किंवा ती कांहीं वेळांपूर्वी रडली असावी अशी त्याला शंका सुद्धां आली नाहीं. तो आपल्या नेहमींच्या सवयीप्रमाणें चित्रकलेचे सामान घेऊन चित्रें काढीत बसला. संध्याकाळच्या वेळेस त्यानें शालिनीला मोठ्या उल्हासानें विचारिलें " शालिनी, फिरायला चलायचं ना ? शालिनीनें तात्काळ ' हो ' म्हटलें. बंगल्याच्या बाहेर पडल्यावर कोणीकडे जावयाचें तें न समजून तिनें इकडे तिकडे पाहून " कोणीकडे जावयाचे " म्हणून विचारिले.

" कोणीकडेही चल. या गडावरील प्रत्येक बाजूचा देखावा अप्रतीम आहे. कोणीकडे गेले तरी सारखेंच ' असें कमलाकर मोठ्या अभिमानानें म्हणाला.

शालिनीनें अगदीं आपल्या ओंठावर आलेले शब्द मागें घेतले, आणि ती मुकाट्यानें आपली कोणात्या तरी एका दिशेला जाऊं लागली. पण आज ज्या बाजूला ते फिरावयाला गेले होते ती बाजू शालिनीला खरोखरच फार आवडली. आणि ती कमलाकराचा हात एकदम घट्ट धरून ह्मणाली, ' कमलाकर, तो पहा किती रमणीय देखावा तो अहाहा ! आत्तां मजजवळ क्यामेरा असतां तर मी फोटोच काढून घेतला असता. पण........

कोणता तो ? कमलाकरानें घाईनें विचारलें अहो, त्या त्या गाई पहा. कशा त्या पलीकडल्या उतरंडीवरून धांवताहेत त्या. त्यांचीं वांसरें पण त्यांच्या मागोमागच आहेत, तरी पण त्या वांसरें अगदीं जवळ येईपर्यंत आपल्या माना वळवून त्यांच्याकडे प्रेमानें पाहून मधून मधून थांबत आहेतच.

खरंच. फारच छान दिसताहेत येथून त्या. तूं दाखवीपर्यंत माझें तिकडे लक्षच गेले नाहीं.

त्या गाईंचें आपल्या वांसरांवरचें प्रेम पाहून शालिनीच्या मनोवृत्ति उचंबळून गेल्या आणि ती आपल्या भावी मातृपदाविषयींचे विचार मनांत घोळवूं लागली. आपल्याला मूल होईल तें मुलगा असावा का मुलगी असावी, असें तिनें आपल्या मनाशीं विचारून विचारून पाहिले. तेव्हां ती मुलगी असावी असेंच

तिला वाटलें. कारण मुलगी झाली तर स्त्रीजातीला बंदीवासांतून मुक्त करण्याकरितां, प्रयत्न करण्याचे आपल्याला तिला शिक्षण देतां येईल. आणि ज्या गोष्टी आपल्याला साधणार नाहींत त्या आपल्या मुलीकडून करवून घेतां येतील असें तिला वाटत होतें. असो. अशा तऱ्हेनें आठ पंधरा दिवस गेल्यावर कमलाकर रोज कपाळ दुखतें म्हणून कुरकुरूं लागला. पहाणाऱ्याला चेहऱ्यावरून तो कसा चांगला बरा दिसे. पण रोज त्याला बरें नसे. कोणतेंही काम करावयास घेतलें तरी करूं नयेसें वाटे. रोज उन्हांत बसून बसून चित्रें काढल्यामुळेंच डोकें दुखूं लागलें असेल असें वाटून शालिनीनें कमलाकराला विश्रांति घेण्यास सांगितले. त्यानें तसें करूनही पाहिले, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. डोकें एकसारखें दुखत होतें तें होतेंच. एक दिवस तर त्याला अगदीं बसवेना. अंथरूण पसरून निजण्याची पाळी आली. ताप भयंकर चढला. तेव्हां शालिनी घाबरली. ती तावडतोब गडाखालीं गेली. तिनें एका कुणब्याला पैसे देऊं करून जवळच एक डॉक्टर रहात असे. त्यास बोलावण्यास सांगितलें. या डाक्टरांची सिंहगडाजवळ थोडी फार शेती असल्यामुळें ते कधीं कधीं मजेनें चार दिवस इकडे रहाण्यास येत असत त्याचप्रमाणें याही वेळेस ते आले होते. अर्थात् त्यांना फारसें काम नसल्यामुळें ते ताबडतोब गडावर आले. डाक्टरांनीं नाडी पाहून काय होतें, काय नाहीं, तें विचारिलें. कमलाकराला पाहिल्यावर त्यांनीं फार वाईट तोंड केलें. पण कमलराच्यादेखत 'फारसें कांहीं नाहीं, मी औषध धाडून देतों, त्यानें गुण येईल.' असें ते म्हणाले, तरी त्यांनीं शालिनीला एका बाजूला नेऊन सांगितलें 'हा टायफॉईड फीव्हर आहे. तेव्हां आजाऱ्यांची चांगली व्यवस्था झाली पाहिजे. तशी 'इथें' होणार नाहीं. तेव्हां तुह्मी टांगा करून तावडतोब पुण्यास जावें. हें बरं कारण कोणतीही गोष्ट लागली तर इथें ती मिळण्यास फार कठीण जाईल, तेव्हां पुण्यास जाणं बरं. शालिनीला पुण्यास जायला पाहिजे हें तर उघडच दिसत होतं ती एकदम या कोसळलेल्या संकटामुळें घाबरून गेली आपल्याला कोणी मदत करण्यास नाहीं याची जाणीव भासली. पण ती अशी डगमगणारी स्त्री नव्हती. क्षणभरच ती हताश झाली. पण लगेंच कमलाकराला पुण्यास नेण्याच्या व्यवस्थेस ती लागली. पुण्यास गेल्यावर सर्व कांहीं ठीक होईल. असें तिला वाटत होतें. गरीब बिचारी ! पुण्यास गेल्यावर आपण अमका डॉक्टर बोलावूं. तो सांगेल त्यांत काडी इतके देखील अंतर पडूं देणार नाहीं. अगदीं रात्रंदिवस शुश्रुषा

करूं म्हणजे सर्व कांहीं ठीक होईल असें आपल्या मनाशीं ती म्हणत होती. तिनें कमलाकराला गर्दीगर्दीनें पुण्यास नेले. बंगल्याच्या फाटकाशी येतांच तिला कांहीं संशय आला. बंगल्याच्या फाटकाशीं दोन मनुष्यें बोलत होती. ती माणसें दुसरी कोणी नसून एक स्वतः त्या बंगल्याचा मालक आणि दुसरा बंगल्याची देखरेख पहाण्यास ठेवलेला नोकर होता. त्यांचें चाललेलें संभाषण तिच्या कानीं पडलें. तें असें. मी असल्या वाईट चालीच्या बायकांना कधीं राह्यला जागा देत नसतों. मला आजपर्यंत येथें कोण रहातें काय रहातें तें माहीत नव्हतें. नाहींतर मीं त्यांना याच्या आधींच जा ह्मणून सांगितलें असतें. तर आतां त्यांना ताबडतोब जागा खालीं करायला सांगा मग त्यांच तें पाहून घेतील. एक क्षणाचासुद्धां विलंब लावूं नका आणि यापुढें मला विचारल्याशिवाय भलत्या सलत्याला जागा देत जाऊं नका. असें ह्मणून तो गृहस्थ मागें वळला. तों त्याला शालिनी दिसली. तिला पाहिल्यावर तो चपापला नाहीं, तर उलटा त्याचा राग ज्यास्तच दुणावला. आणि तो मोठ्या त्वेषानें म्हणाला. आतांच्या आत्तां आमची जागा खालीं करून द्या. नाहींतर तुमच्यावर मोठा प्रसंग ओढवेल तुह्मी असल्या चालीच्या अहांत हें आह्माला माहीत नव्हतं. नाहींतर आह्मी तुह्माला कधींच जागा दिली नसती. तेव्हां आत्तांच्या आत्तां आपलं सामान काढा. नाहीं तर मी तें काढवून फेकून देईन. त्या निष्ठुर माणसाच्या तोंडचे ते दुष्ट शब्द ऐकून कमलाकराला या माणसाला काय करूं आणि काय नाहीं असें होऊन गेले. त्याला दोन गुद्दे देण्यासाठीं त्याचे बाहु फुरफुरूं लागले. आणि तो गाडींत उठण्याची धडपड करूं लागला. पण त्याला उठवत नव्हतें. त्याच्या अंगांत त्राण राहिला नव्हता. तेव्हां त्याला जागच्या जागीं तळमळत रहावें लागलें. शालिनीनें त्याची ती धडपड पाहिली. आणि लगेच ती गाडीपाशीं गेली. कमलाकराचे दोन्ही हात आपल्या हातांत धरून त्याला मन शांत ठेवण्यास सांगितलें. तो निराशेनें आपल्या क्षीण आवाजांत म्हणाला, " शालिनी माझ्या अंगांत शक्ति नाहींग नाहींतर त्याची मी ती अमंगळ शब्द उच्चारणारी जीभच कापून टाकली असती. पण काय करूं ! देवा ! अं !

" चला. चला. पुरे झाली तुमची ही सोंग. आधीं आपलं सामान काढून जागा रिकामी करून द्या. आणि मग बसा बोलत. " असें लगेच मालक ओरडला. तेव्हां शालिनीनें शांतपणें त्याला कमलाकर आजारी

असल्याचें सांगितलें. पण त्या नीचाला तिची काडी इतकीही कींव आली नाहीं.

उलट ‘छे ! तें आह्माला काय सांगतां ! पापाचीं फळं अशींच भोगावीं लागतात. हीच काय पण याहीपेक्षां जास्त भोगावी लागतील असें म्हणाला. शेवटीं यांच्याकडून जागा खालीं करून घ्या आणि उद्यां सकाळीं येऊन मला त्याचा रिपोर्ट द्या. असें सांगून मोठ्या ऐटीनें तो गाडींत बसून निघून गेला. शालिनी मोठ्या चिंतेंत पडली. तिला पुढें काय करावें ? जागा ताबडतोब कुठें शोधावी ? आणि कमलाकराचें काय करावें ? याची मोठीच पंचाईत येऊन पडली. कमलाकराला असा इकडून तिकडे आणि तिकडून इकडे हलविणें बरें नाहीं हें तर तिला स्पष्टच दिसत होतें. पण करणार काय ! संकटं यायला लागलीं ह्मणजे हात धुवून पाठीस लागल्यासारखी येतात. ती थोडा वेळ त्या नोकराकडे आणि गाडीवानाकडे पहात उभी राहिली. तिचा चटादिशी कांहींच निश्चय होईना. गाडीवान तरी गाडी किती वेळ थांबविणार ! त्यानें आत्तापर्यंत कशी तरी थांबविली. पण तोही आतां कुरबुरूं लागला. आणि शालिनीला तर काय करावं तें मुळींच सुचेना. इतक्यांत सुदैवानें तिला निजण्यास सोबत येणारी माळीण तेथें आली. तिनें हा प्रकार पाहून ताबडतोब कमलाकराला गाडींतून खालीं उतरवून आपल्या झोंपडींत नेले शालिनीचा हात धरून ती तिला आंत घेऊन गेली. कमलाकर अगदीं निपचित पडला होता. त्याच्याकडे बघून शालिनीच्या हृदयाचें पाणी झालें. तिचे डोळे अश्रूंनीं भरून आले. तिनें पुष्कळ वेळ हुंदका आवरला. मन घट्ट केले. पण डोळ्यांवाटे पाणी यावयाचे राहिना. शेवटीं ती तेथून उठून झोंपडीच्या मागल्या बाजूला तुळशीवृंदावनाशीं एक दगड होता त्या दगडावर जाऊन बसली तेथें कांहीं वेळ मनसोक्त रडून, ती आपल्या मनाशीं कांहीं निश्चय करून घरांत गेली. तेव्हां कमलाकराचा ताप ज्यास्तीच वाढला होता. दुसऱ्या दिवशीं सकाळीं कुठें तरी जागा पाहून कमलाकराला तेथें नेण्याचें तिनें आपल्या मनाशीं ठरविलें. कमलाकराला असें एकसारखें हलविणें बरोबर नाहीं हें तर तिला दिसतच होतें. पण करणार काय ! गजाबाईची झोपडी अगदींच लहान ! तेथेंच ती, तिचा नवरा, तिची दोन मुलें निजायचीं ! आणखी त्यांत हीं दोघे गेल्यामुळें त्या गिचडीला कांहीं पारावारच नाहींसा झाला. पुन्हा जमीनीला ओल

कोण भयंकर ! कमलाकराचं दुखणं तेथें ज्यास्तच झालं असतं यांत तिळमात्र संशय नव्हता. ठरवल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं शालिनी गजाबाई बरोबर जाऊन जागा तर पाहून आली. जागा गांवातच मध्यवस्तीला होती. त्यामुळें शालिनीला जरा बरें वाटलें. तिला सहजच असें वाटलें कीं आतां केव्हांहीं डॉक्टर लागला किंवा दुसरी कांहीं जिन्नस लागली तरी अडचण पडणार नाहीं. चट्दिशी जाऊन स्वतः ती आणता येईल. पण कमलाकराच्या धांदलींत बाकीच्या अडचणी तिच्या ध्यानांत आल्या नाहींत. तिनें कमलाकराला नव्या घरांत नेऊन डॉक्टरला दाखवून औषध पाणी सुरूं केलें. पण कमलाकराचा ताप म्हणून हटेना. दिवसेंदिवस त्याची स्थिति फारच वाईट होत चालली. तेव्हां शालिनीला कमलाकराच्या वडलाना तार करणं अगदीं जरूर आहे असें वाटलें. तिनें लगेच कमलाकर अतिशय आजारी आहे. टॉयफॉईट झालेला आहे. तेव्हां तावडतोब निघून यावें. अशा अर्थाची तार केली. त्या दिवशीं दुपारींच तारेचा उलट जबाब आला. तार कमलाकराच्या नांवानें केलेली होती. मी तावडतोब निघून येतो. पण हिंदुधर्माप्रमाणें लग्न करणं शक्य नसल्यास निदान लग्न रजिस्टर तरी करा. म्हणजे मूल बिनवारशी होणार नाहीं. त्याचे हक्क कायम रहातील. असें लिहिले होतें. कमलाकर आपल्या बापाच्या कांहीं कांहीं गोष्टी सांगे त्यावरून त्यांचा स्वभाव फार कडक असावा असें शालिनीला समजून आलें होतें. त्यामुळें तारेंतला मजकूर वाचून तिला जरा आश्चर्य वाटलें. कमलाकराचे वडील इतके कडक आहेत तेव्हां कांहीं झालें तरी येणार नाहींत असें तिला वाटत होतें. पण तसें मुळींच न होतां त तारें-तल्या मजकुराप्रमाणें आलेंही त्यांच्या तारेवरून मुलावरचा राग कमी झाला असावा असें तिला स्पष्ट दिसलें. किती झालें तरी तें पित्याचें अंतःकरण ! पुत्राचा अंतकाळ जवळ आल्यावर तें द्रवल्याखेरीज कसें राहील ! तें येणार ही आनं-दाची बातमी असून सुद्धां शालिनीला डॉक्टर सुपेकरांची तार कमलाकराला दाखवावीशी वाटेना. कमलाकराचें मन तापामुळें अशक्त झालें होतें. वडील भेटणार ह्मणून त्याच्या मनाला आनंद वाटेल हें तर खरेंच होतें. पण दुसरा मजकूर होता त्यामुळें काय होईल याची तिला भीति वाटत होती. वड-लांच्या इच्छेप्रमाणें त्यानें लग्न रजिस्टर करण्याचा हट्ट धरला तर आप-

त्याला या वेळेस त्याचें मन मोडतां येणार नाहीं, तेव्हां तर न दाखविणेंच बरें. असें तिला वाटलें. पण लगेच तिचें मन सांगे कीं छेः असें करणें बरें नाहीं. कारण कमलाकरानें तार मागितली तर ती आपल्याला दाखवावी ही लागणार. आणि मग एवीतेवी सगळा मजकूर कळणार त्यापेक्षां आपणच खरें सगळे सांगितलेले काय वाईट ? मग जें काय व्हायचें असेल तें होईल. असें मनांत आणून तिनें ती तार कमलाकराला दाखविली, तार वाचून कमलाकराच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले आणि तो आपल्या क्षीण आवाजांत ह्मणाला " मला ते येतिलसं वाटलं नव्हतं. " माझ्यावरचा त्यांचा राग नाहींसा झाला हें एक बरं झालं. पण शालिनी तुला काय वाटतं ? ते ह्मणतात तसं करायचं का आपण ? मी आतां काय तुझा दोन घटकेचा सोबती आहे. बघ. शालिनीनें त्याला घट्ट मिठी मारली. तिचा कंठ दाटून आला तिला डोळ्यांपुढें घळघळ अश्रुधारा वाहूं लागल्या. ' कमलाकर असं तुह्मी बोलूं नका. हें पहा असं तुह्मी बोललात ह्मणजे मला वाईट वाटतं. तुह्मी बरे व्हाल. असें कांहीं तरी मनांत भलतेच विचार आणू नका. असें ती स्फुंदतस्फुंदत ह्मणूं लागली. ती कमलाकराला धीर देत होती. पण खरी स्थिति काय होती ती तिला माहीत होती. त्यामुळें एकसारखे हुंदक्यावर हुंदके येत होते ते तिला आवरेनात. ती आपलें मस्तक कमलाकराच्या छातीवर ठेवून स्वस्थपणानें कांहीं वेळ रडली. आणि मग मनं अम्मळ शांत झाल्यावर तिनें कमलाकराकडे एकवार पाहिलें. नंतर ती ह्मणाली, ' कमलाकर, माझी किंवा आपल्याला होणाऱ्या मुलाची तुह्मी बिलकूल काळजी करूं नका. मी तुम्हाला तार दाखवून विनाकारण तुमच्या मनाला त्रास मात्र दिला. ही फार वाईट गोष्ट झाली. पण कमलाकर, तितकीच तुमची इच्छा असली तर मी—पण—समाजासाठीं मी तुमच्या वडलांच्या इच्छेप्रमाणें वागण्यास तयार नाहीं. ती निव्वळ तुमची इच्छा म्हणूनच. पण आजपर्यंत—'

कमलाकर हलकेंच गालांतल्या गालांत हंसला. आणि तो शालिनीच्या पाठीवर हात ठेवून आपल्या क्षीण आवाजांत ह्मणाला. 'शालिनी तूं खरी आर्यकन्या आहेस. तुझें धैर्य कांहीं विलक्षण आहे. आणि त्यामुळेंच मी तुझ्यावर प्रेम करूं लागलों. मी तुला तुझ्या तत्त्वाविरुद्ध एकादी गोष्ट करण्यास कशी सांगेन ? मी तुझं फक्त मन पाहिलं. आणि तूं माझ्या इच्छेसाठीं तत्त्व झुगारून द्यायला तयार झालीस हें पाहून खरोखरच मला फार नवल वाटलं. पण मी तुला तुझ्या

मनाविरुद्ध अशी कोणतीच गोष्ट करायला सांगणार नाहीं.' इतकें बोलल्यामुळें कमलाकराला विलक्षण थकवा आला. आणि तो डोळे मिटून स्वस्थ पडला. शालिनीनें ती सबंध रात्र कमलाकराच्या उशाशीं बसून काढली. तिचें सर्व लक्ष कमलाकराकडे लागून राहिलें होतें. मधून मधून कमलाकर जागा होई. पण बहुतेक वेळ तो आपल्या गुंगींत असे. गुंगींत असतांना त्याचे डोळे अर्धवट मिटलेले असत. त्यामुळें त्याच्या डोळ्यांतला पांढरा भाग तेवढा दिसे आणि घशाची एकसारखी घर घर ऐकूं येई. बाकी त्याची सर्व हालचाल अगदीं बंद होती. प्रत्येक क्षणीं त्याचा अंत अगदीं जवळ येत चालला होता.

पहाटेच्या सुमारास कमलाकराच्या घशाची घर घर मंद मंद होत चालली. शालिनी कमलाकराच्या अंथरुणापाशीं आपला गाल हाताच्या तळव्यावर ठेवून, भिंतीला टेंकून सचिंत बसली होती. तिच्या डोळ्यापुढें तिची दीनवाणी होणारी स्थिती मूर्तिमंत उभी राहिली. आतां या जगांत आपण एकटे ! आजपर्यंत कित्येक वेळां तरी तिनें 'एकटा' शब्द तोंडानें म्हटला असेल, ऐकला असेल, वाचिला असेल, पण आजच्याइतकी त्या 'एकट्या' शब्दानें तिच्या मनाला उदासीनता भासली नव्हती. कमलाकर गेला तर आपण काय करूं याची कांहीं तिला कल्पनाच करतां येईना. कमलाकर नाहीं ह्मणजे आपण नाहींच असें तिला वाटलें. असा विचार करतां करतां तिला खरोखरीच आपण एकट्या आहोंत असें वाटलें. आणि त्या एकटेपणाची भीति वाटून तिनें त्या आवेशांत कमलाकराला एकदम मिठी मारली पण दचकून तीं मागें सरली. पुन्हा त्याच्या मुखाकडे नीट न्याहाळून पाहिलें. पुन्हा एकवार मिठी मारली. शेवटीं तिनें आपले दोन्ही हात त्याच्या गालावर ठेवून त्याला हाक मारली, पण उत्तर कसें येणार ! शालिनीचा जो एक मोठा आधार तोच तिला या जगांतल्या आपत्ती भोगण्यास एकटीला सोडून गेला. शालिनी दचकून मागें सरली. तिचा चेहरा पांढरा फटक पडला. आणि एकाद्या दगडी पुतळ्याप्रमाणें ती कमलाकराकडे पहात स्वस्थ बसली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं सात वाजतां डॉ. सुपेकर पुण्याच्या स्टेशनवर उतरले. ते थेट शालिनीनें जागा घेतली होती तेथें गेले. कमलाकर इहलोक सोडून गेल्याला एक दोन तासच झाले होते. शालिनी अजून कमलाकराच्या बिछान्यापाशींच बसलेली होती. तिचें मुख अश्रूंनीं मलीन झालें होतें. केस अस्ताव्यस्त होते. डोळे रडून रडून सुजले होते. हा प्रकार पाहिल्याबरोबर–

‘ कमलाकर ? माझा कमलाकर कुठें आहे ?’ असें म्हणतच डॉ० सुपेकर कमलाकराच्या बिछान्याकडे धावले. आणि त्यांचा धीर खचून त्यांनीं एकदम बैठक मारली. पण त्या स्थितींत देखील त्यांनीं आपल्या मस्तकावरून हात फिरवीत विचारलें “ पण आधीं कमलाकरानं लग्न रजिस्टर केलं कीं नाहीं ? त्याच्या हातून झालेली चुकी त्यानें थोडया अंशानें तरी भरून काढली का ? का तसाच—?” शालिनीनें, फक्त ‘नाहीं,’ म्हणून सांगितलें. त्यावेळेस तिची आणखी कांहीं बोलण्याची मनःस्थितीच नव्हती.

‘ कां नाहीं केलंन ? ’ असें म्हाताऱ्यानें अगदीं चवताळून विचारिलें. ह्याच्या मुळाशीं तूं आहेस—तूं—तूं माझी तार त्याला दाखवली नाहींस.’

‘ मी दाखवली. पण तुमचें ऐकून आपलें तत्त्व सोडून देण्याचं पातक त्यानीं केलं नाहीं.’

हें ऐकून म्हातारा विलक्षण संतापला. त्यानें एकेक डोळा अस्सला केला. आणि दांत ओंठ खात ते तिला म्हणाले, “ तूं माझ्या मुलाच्या जन्माचें मातेरें केलेंस. तूंच या सगळ्या दुःखाचें कारण आहेस. तुझ्यामुळें निव्वळ तो असा वागला आणि त्यासाठीं मला त्याच्याशीं निर्दयपणानें वागावें लागलें. माझा एवढा हातातोंडास आलेला मुलगा गेला, त्याचं काय तुला ! तूं त्याला मारलंस. तुझ्यामुळें सगळं कांहीं झालं. तर आतां तूं येथून चालती हो. तुझी मुळींच कांहीं जरुरी नाहीं. चल. ही तुमच्यासारख्या.....जागा नाहीं. आपल्यासारख्या वेसवांची वस्ती असेल तेथें आपण चालत्या व्हा.’

## प्रकरण तेरावें.

अशा रीतीनें कमलाकराचा अंत झाल्यावर शालिनी क्षणमात्र हताश झाली. तिनें आपल्या आयुष्यांत येणाऱ्या नाना तऱ्हेच्या अडचणींचीं चित्रें आपल्या डोळ्यासमोर आणून अमकी अडचण आली तर त्यांतून असें सुटूं, अमकं झालं तर अमकं करूं. असें आपल्या मनाशीं ठरवून ठेविलें होतें. पण आपल्या मित्राचा अंत अकस्मात अशा तऱ्हेनें होईल अशी कल्पना देखील तिला शिवली नाहीं; मनाला कधीं जें संकट कधीं येईल अशी नुसती शंका सुद्धां आली नाहीं तेंच संकट एकदम दत्त ह्मणून पुढें उभें राहिलें. वैधव्य आणि त्यांत गर्भावस्था !

त्यांतून पुन्हा आपलं असं दुसरं कोणी माणूस नाहीं. अशा स्थितींत सांपड-ल्यावर कोणती स्त्री कांहीं वेळ तरी हताश होणार नाहीं! हीं संकटं होतीं तीं होतींच. आणि पुन्हा नव्या परिस्थितींत येणारीं संकटं होतीं तीं निराळींच. लग्नविधि न होतां मातृपद येणं! ही एक बाकीच्या संकटांत भरच होती. या परीस्थितींत सोसाव्या लागणाऱ्या हालापेक्षां दुसरे कोणतेही हाल जास्त भयंकर नसतील. हे हाल म्हणजे तोंड दाबून बुक्क्यांच्या माराप्रमाणें असतात. खरें पाहिलें तर कोणीच कांहीं करीत नसतें. पण प्रत्येक ठिकाणीं निमूटपणें अपमान सहन करावा लागतो. शालिनी त्याची मोठी फिकीर करीत होती असें नाहीं, हें खरें, पण आजपर्यंत जो तिचा मोठा आधार, ज्यावर तिची इतकी भिस्त, तोच एकाएकीं नाहींसा झाल्यामुळें तिचें मन क्षीण झालें होतें. आणि त्यामुळें लोकांनीं केलेली निंदा तिला कधीं कधीं दुःसह होत असे. तरी पण तिला आपल्या कृतीबद्दल कधींही पश्चाताप झाला नाहीं. हें असेंच होणार. आणि आपण असेंच सहन केलें पाहिजे. तरच कांहीं झालें तर होईल. अशी तिच्या मनाची खात्री होत चालली. डॉक्टर सुपेकरांनीं निर्दय-पणानें बोलून तिच्या दुःखीत अंतःकरणांवर आपल्या कठोर भाषणानें डागण्या दिल्या नसत्या, आणि आपल्या बोलण्यानें तिच्या मनोविकारांना चलन दिलें नसतें तर शालिनी त्या एकांतवासानें आणि दुःखानें खास मरून गेली असती. पण तसें व्हावयाचें नव्हतें. डॉक्टर सुपेकरांच्या कठोर भाषणानें तिच्या अंगांत संचार झाल्याप्रमाणें झालें. आणि तिनें आपल्या मनाचा कांहींएक निग्रह केला. धैर्य धरून ती पुढें कसें करावयाचें काय करावयाचें याचा विचार करूं लागली. डॉ. सुपेकरांनीं तिला "तुझ्यासारख्या वेसवांची वस्ती असेल तेथें जाऊन रहा." असें म्हटल्या बरोबर ती रागानें लाल झाली. बसल्या जागची ती ताडकन् उठली आणि आपले दोन्ही हात कमरेवर ठेवून ती सुपेकरांच्या पुढें जाऊन उभी राहिली. तिनें कांहीं वेळ त्यांच्या दृष्टीला दृष्टी देऊन अगदीं टक लावून पाहिलें. नंतर ती आपल्या खणखणीत आवाजांत म्हणाली "ही जागा माझ्या मुलाची आहे, तेव्हां आपल्याला इथें राहून मनास वाटेल तसें वागण्याची मुभा आहे असें तुम्हाला वाटत असेल. पण तसं मुळींच नाहीं. जागा माझ्या नांवावर आहे, तेव्हां ती माझी आहे. कमल-कराची नाहीं. आणि घराचा मालक मला जा म्हणेपर्यंत मला येथून हाकलून देण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं. तुम्हाला वाटलं तर खुशाल तुम्ही येथें रहा.

माझी कांहीं तुझाला ना नाहीं. तुझी माझ्या कमलाकराचे वडील म्हणून मला तुम्हाला इथं रहायला जागा देणं प्राप्त आहे. पण इथं रहायचं असेल तर या प्रसंगाला योग्य असंच वर्तन तुम्हाला ठेवलं पाहिजे. आणि तसं नसलं ठेवायचं तर येथून चालते व्हा; तुमची येथें जरूरी नाहीं.' असें म्हणून लगेच तिनें दाराकडे बोट करून जायला मार्ग दाखविला. हे शब्द ऐकतांच कमलाकराचे बाबा जरा नरमले आणि मुकाट्यानें कमलाकराच्या प्रेतापाशीं गेले; आणि हलके हलके त्याच्या स्मशानयात्रेच्या तयारीला लागले. शालिनी थोडा वेळानें शांत झाली. तिचें अंतःकरण दुखानें अगदीं करपून गेलें होतें. तिची आंतल्या आंत विलक्षण तळमळ चालली होती. तिचें शरीर निःशक्त झालें होतें. तिच्या डोळ्यापुढें अंधेरी आली. आणि ती धाडकन् जमीनीवर पडली. त्यावेळेस तेथें दुसरें कोणी नव्हते. डॉ. सुपेकर कमलाकराला पोहोचविण्यास ओंकारेश्वराला गेले होते. शालिनीला शुद्धिवर आणण्यास तेथें जवळपास कोणीच नव्हते. थोड्या वेळानें आपोआपच ती शुद्धिवर आली. शालिनीनें तो सारा दिवस त्या खोलींत बसून तळमळत काढला. दुसऱ्या दिवशीं तीच स्थिति, " तिसऱ्या दिवशीं तीच. असें कित्येक दिवस तरी होऊन गेले पण जिवाची तळमळ म्हणून राहिना. डॉ. सुपेकर कांहीं दिवस तेथेंच होते. पण त्यांच्या सहवासानें तिच्या मनाला काय बरें वाटणार होतें ! मधून मधून झाला तर त्रासच होई, दुसरें तर कांहीं होत नव्हतें. पण एवढेंच ते बरेच जपून वागत असत. त्यामुळें त्यांच्या रहाण्यानें त्रास व्हावयाचा तो बराच कमी होत असे. शालिनीला आपल्या एकांतवासाचा विलक्षण कंटाळा आला होता. डोळ्यांपुढें खंडोगणती मनुष्यप्राणी दिसावे पण त्यांत आपला म्हणण्यास एकही नसावा. हीं केवढी दुःखाची गोष्ट ! मधून मधून तिला फारच उद्विग्नता येई. असें भुतासारखें एकटे रहाण्यापेक्षां मेलेलें बरें, असें तिला वाटे. पण स्वतःवरच्या जबाबदारीची जाणीव होऊन ती आपल्याला पार पाडली पाहिजे. तेवढेंच आज आपलें कर्तव्य ठरलें आहे असें तिला वाटे. एवढेंच नाहीं तर जबाबदारीची आठवण झाली म्हणजे जगण्यास आपल्याला अजून आशांकूर उरला आहे असें वाटून तिला अंमळ बरें वाटे. एक दिवस ही जबाबदारी आपल्याला कशी उत्तम रीतीनें पार पाडतां येईल याबद्दलचा ती विचार करीत होती. आतां कमलाकर नाहीं, तेव्हां आपल्या पुढच्या आयुष्याचा मार्ग आपणच आंखला पाहिजे. आणि तो सुद्धां नीट विचार करून आखला पाहिजे. आतां कमलाकर आपल्याला जेथें तेथें असं कर

आणि असं करूं नको असं सांगायला नाहीं. आपल्या भोंवती शत्रूंचा गराडा पडला आहे. ते शत्रू आपल्या मार्गांत कसकसे कांटे पसरतील आणि आपलें जीवित दुःसह करून टाकतील हें ती पुरें ओळखून होती. तिनें कांहीं दिवस तरी पुण्यांतून न हालण्याचा विचार केला. तिची प्रसुतीची वेळ अगदीं जवळ येत चालली होती. तेव्हां इकडे तिकडे नाचवा नाचवी करणें बरें नाहीं, असें तिला वाटलें. आतां तिची सर्व आशा आपल्या मुलावर होती. तें जगलें वाचलें तर त्याला उत्तम शिक्षण देऊन त्याच्या हातून मानवी सुधारणेस मदत करावयाची हें सध्याचें शालिनीचें ध्येय होतें. असे विचार मनांत आले म्हणजे शालिनीचा चेहरा किंचिन्मात्र प्रफुल्लित होई आणि तिच्या डोळ्यांत विलक्षण तेज चमकूं लागे. कधीं कधीं ते कमलाकरांचें बाळ ज्यावर तिची एवढी मदार होती तें केव्हां एकदां जन्मास येतें आणि आपण त्याला मांडीवर घेऊन खेळवतों, असें तिला होऊन जाई.

प्रसुतीचा काळ जसजसा जवळ येत चालला तसतशी शालिनीला फार काळजी वाटूं लागली. तिच्या जवळपास मदतीस दुसरें कोणीही नव्हतें. तेव्हां बाळंतपणाला हॉसपिटलमध्यें जावें असें तिला वाटे. पण हॉसपिटलमधें जाऊन आधीं व्यवस्था करून यायला पाहिजे होती: कोण करणार! शालिनीमधें तर अगदीं उत्साह राहिला नव्हता. तिच्याच्यानें दगदग तर बिलकुल होत नव्हती. तेव्हां ह्याच खोलींत जें काय व्हायचें असेल तें होईल असें मनाशीं ह्मणून ती सगळा भार ईश्वरावर टाकून तेथेंच राहिली होती. आणखी तिला असें वाटे कीं, जर कदाचित् आपल्याला मरण यावयाचें असेल तर तें कमलाकराला ज्या जागीं आलें त्याच जागीं आलें तर बरें. पण तत्क्षणीं आपण गेलों तर आपल्या बाळाचें कसें होईल, त्याची काळजी कोण घेईल, त्याला लहानाचें मोठें कोण करील वगैरे विचार तिच्या मनांत येत. आणि आपण असा हलगर्जीपणा करतां कामा नये, असें तिचें मन तिला सांगू लागे. आपल्या बाळांत कमलाकराच्या आंगचे गुण असतील, आणि कमलाकरानें ज्याप्रमाणें सुधारणेंत एक पाऊल पुढें टाकलें त्याप्रमाणें आपलें बाळही आणखी कांहीं पाऊलें पुढें टाकून स्त्रीस्वातंत्र्य रक्षण कशावरून करणार नाहीं? असें तिला वाटे त्या मुलाच्याअंगीं काय काय महत्वाच्या गोष्टी करण्याची शक्ति असेल हें कोणी सांगावें! तेव्हां सध्यां आपण निष्काळजीनें वागणें म्हणजे अप-

रोक्ष रीतीनें पाप करणेंच होय. असें वाटून तिनें हॉस्पिटलमध्यें जाण्याचा विचार केला. शालिनीची सर्व भिस्त आतां त्या मुलावर राहिली होती. आपल्याला मुलगी व्हावी अशी शालिनीची पहिल्यापासून इच्छा होती. ह्मणजे जें आपल्याला करतां आलें नाहीं तें ती करील. असें तिला वाटे. आपण तिला प्रत्येक बाबतींत मदत करूं. उत्तेजन देऊं. आणि स्त्रीस्वातंत्र्य मिळविण्यासाठीं जी आपल्याला मदत करतां येईल ती आपण तिला करूं. हेंच आतां आपलें ध्येय असें तिला वाटे. एक दिवस असाच विचार करीत शालिनी स्वस्थ पडली होती. त्यावेळेस डॉ. सुपेकर एक कागद हातांत घेऊन, त्याकडे आपल्या चष्म्यावरून पहात हलके हलके एक एक पाऊल टाकीत शालिनीकडे आले. कमलाकराचे कागद चाळतां चाळतां त्यांना तो कागद सांपडला होता. त्यांच्या मनांतून जें काय कमलाकराचें तेथें होतें नव्हतें तें सगळें आपल्या घरीं न्यावयाचें होतें. ह्मणून ते नेहमीं हें हुसक तें हुसक असें करीत असत. शालिनी मुळींच त्यांच्याकडे लक्ष देत नसे, जें काय त्याना करायाचें असेल तें खुशाल करूं देत असे. याप्रमाणें रोज सामान धुंडाळतां धुंडाळतां आज त्यांना तो कागद सांपडला. कागद आपल्या हातांत धरून व तो शालिनीला दाखवून ते गंभीर मुद्रा करून ह्मणाले " या अक्षरावरून हें कमलाकरानेंच लिहिलें आहे, याबद्दल तुला शंका नाहीं ना ? शालिनीनें कपाळाला आठ्या घातल्या आणि कागदावरच्या अक्षराकडे पाहिलें. तो कागद ह्मणजे कमलाकरानें मरणसमयीं केलेले विल् होतें. त्यांत कमलाकरानें आपल्याजवळ होतें नव्हतें तें सर्व शालिनीच्या नांवानें केलें होतें.

शालिनीजवळ सध्यां प्रसूतीपर्यंत पुरतील इतके पैसे होते. पण त्याकडे तिचें कधीही लक्ष गेलें नाहीं. किंवा कमलाकरानें आपल्याला काय ठेविलें आहे आणि काय नाहीं याकडेही तिचें कधीं लक्ष गेलें नाहीं. तिनें तो कागद पाहिला आणि वाचून खालीं ठेविला. तिला तें विल् पाहून कमलाकराचें आपल्यावर किती प्रेम होतें. त्याला आपल्याबद्दल किती काळजी वाटत होती. एवढेंच कळलें. आपल्याला आपल्या मित्रानें किती पैसा ठेविला आहे, त्यांत आपला, आपल्या मुलाचा चरितार्थ चालेल कीं नाहीं ?. आणि ठेवला असला तर तो किती आहे ? तो आपल्या ताब्यांत येईल का इतर नातेवाइकांच्या ताब्यांत जाईल. बरं तसा जाणार असला तर तो लवकरच आपल्या ताब्यांत घेतला पाहिजे. नाहीं तर आपल्याला भिक्षांदेही करण्याची पाळी

येईल वगैरे विचार मनांत येऊन नवरा मरतो न मरतो तो पैशाच्या तजविजीला लागणाऱ्या बायांपैकीं शालिनी नव्हती. तिनें कमलाकराच्या गुणांना स्वयंस्फूर्तीनें वरिलें होतें. दागिन्यासाठीं विवाह केला नव्हता. विल् पाहून झालें तरी आपला सासरा अजून आपल्या खोलींतून जात कसा नाहीं याचें तिला आश्चर्य वाटलें. तें विल् त्याच्यापुढें ठेवून ती स्वस्थ बसली होती. शालिनी कांहीं बोलत नाहीं, असें पाहून डॉ. म्हणाले, ' हें विल् कमलाकरानें स्वतः आपल्या हातानें लिहिलें आहे. पण त्याचा कांहीं उपयोग नाहीं. जें काय त्यानीं ठेवलें आहे तें तुला मिळणार नाहीं. कारण त्यावर त्याची सही नाहीं. " तेव्हां कुठें शालिनीला त्यांचा विल् दाखविण्याचा उद्देश कळला. पण त्याचं तिला किंचित्‌ही महत्व वाटलं नाहीं. ती नुसतेंच म्हणाली " हो त्यावर सही नाहीं खरीच. "

"हो. तेंच तर सांगायला मी मुद्दाम तुझ्याकडे आलो. सही नाहीं म्हणजे विल् बरोबर झालें नाहीं. कमलाकरानें तुझ्या नांवानें ठेविलेले पैसे तुलाच आतां मिळतील असं नाहीं. त्यावर तुझा कांहीं हक्क चालणार नाहीं. हें मी तुला सांगायला पाहिजे असें नाहीं. पण म्हटलं एकदां सांगितलेलं बरं. म्हणजे कांहीं घोटाळा व्हायला नको. तुला कांहीं मिळणार नाहीं म्हणून मला वाईट वाटतं. पण त्याला काय उपाय आहे ! तूं स्वतः आपली स्थिति जाणून बुजून अशी करून घेतलीस त्याला कोणी काय करावं ? तुझ्याजवळ एक पैसाही नाहीं, असं मला वाटतं. तर हे खर्चायला म्हणून मी तुला ५० रु. देतो, ते घे. त्याबद्दल मग माझी मुलं काय म्हणतील ते म्हणूं देत, तें मी ऐकून घेईन आणखी."

शालिनी एकदम त्यांच्या अंगावर ओरडून म्हणाली "आणखी बिणखी कांहीं नको. आतांपर्यंत बडबड करून मला त्रास दिलात तेवढा पुरे झाला. तुमची इच्छा काय आहे ती मला समजली. तेव्हां त्यासंबंधीं आणखी ज्यास्त कांहीं ऐकण्याची माझी इच्छा नाहीं. आपला सासरा, मुलगा जाऊन १०–१५ दिवस झाले नाहीं तों पैशाची वाटाघाट करीत असलेला पाहून त्याच्या नीच वृत्तीची शालिनीला खात्री आली. तिला अनिवार राग आला. आणि तिनें त्या रागाच्या भरांत तुम्हाला जें काय पाहिजे असेल तें घेऊन येथून चालते व्हा. मला या असल्या बोलण्यानें विनाकारण त्रास देऊं नका, असें सांगितलें.

जा म्हणून सांगायला नको. मी आतां जाणारच आहे. पण तुझी कांहीं तरी तरतूद केल्याशिवाय कसा जाऊं ? तर हे तुला अडीअडचणीच्या वेळेला उपयोगी पडतील." असे म्हणून त्यांनी ती ५० रु. ची. नोट टेबलावर पुढें सारिली आणि ते झटदिशीं निघून जाणार इतक्यांत शालिनी ओरडून म्हणाली "तुमच्या त्या नोटेनें माझें टेबल विटाळूं नका. आधीं ती उचला. नाहींतर मी फाडून तिच्या चिंध्या चिंध्या करून टाकीन. तेव्हां डॉक्टरसाहेब घाबरले आणि शालिनीनें भिरकावलेली नोट नीट जपून आपल्या कोटाच्या आंतल्या खिशांत ठेवून दिली. आणि ज्याचं करावं बरं ते म्हणतं माझंच खरं अशा आशयाचें कांहीं तरी पुटपुटत ते बाहेर गेले.

डॉक्टर बाहेर निघून गेल्यावर शालिनी एकदम आपल्या अंथरुणावर जाऊन पडली. तिचा आतांपर्यंतचा जोम पार कोणीकडल्या कोणीकडे नाहींसा झाला. आणि ती पुष्कळ वेळ अगदीं ओक्सा-बोक्शी रडत सुटली. कमलाकरासारख्या रत्नाची बापाला काडी इतकी किंमत वाटूं नये ही केवढी दुःखाची गोष्ट ! शालिनी कमलाकराची आणि त्याच्या वडलांची मनांतल्या मनांत तुलना करून पाहूं लागली. तो तिला केवढें महदंतर दिसलें. अशा नीच मनोवृत्तीच्या माणसाला असा मुलगा झाला कसा ? याचेच तिला आश्चर्य वाटलें. जसें बीज तसें झाड. याची सत्यता तिला पटेना. शालिनी अगदीं निरपेक्ष बुद्धीनें स्वतःपेक्षां कमलाकराला ज्यास्त मार्क देत असे. कारण ती म्हणे माझा हा गुण स्वभावसिद्ध आहे. पण कमलाकराच्या अंगी तसा गुण नसून निव्वळ आपल्याला एक गोष्ट बरोबर वाटते म्हणून ती करावयाची, ती केली पाहिजे, असे वाटून तो ती करतो. तेव्हां तो केव्हांही माझ्यापेक्षां धैर्यवान आहे. कारण त्याची आज परीक्षा उतरली आहे. माझी आजून तशी उतरली नाहीं. असो.

शालिनीजवळ सध्यां फारच थोडे पैसे होते. आणि ते सुद्धां जेमतेम बाळंतपण उरकेपर्यंत पुरतील इतकेच होते. सिंहगडावर असतांना कमलाकरानें खर्चाकरितां म्हणून कांहीं रक्कम दिली होती. त्यांतलेच कांहीं पैसे तिजजवळ शिल्लक होते. आणि ते आतां तिचेच होते. खरें पाहिलें तर जें काय आतां होतें नव्हतें तें तिचेच होते. पण डॉक्टर सुपेकरांची तिला तें मिळावे अशी इच्छा नव्हती. अर्थात शालिनीही त्यासंबंधीं कांहीं भांडण तंटा करणार नव्हती. कमलाकरानें विल केलेलें तिला माहित होतें. त्यावर पेणसलीनें तारीख वार सुद्धां घातलेला

होता. पण साक्षीदार कोणी न मिळाल्यामुळें सही करण्याचें तसेंच राहिलें. पुढें. तो बहुतेक शुद्धीवर नसेच. तेव्हां विलाची त्याला कधीं आठवणच झाली नाहीं. तरी त्याची खरी इच्छा काय होती हें त्या विलावरून स्पष्ट दिसतच होतें, पण ती इच्छा जाणून सर्व कांहीं शालिनीच्या हवाली करण्याचें औदार्य डॉक्टरांच्या अंगीं नव्हते. असले औदार्य न दाखविण्याचा त्यांचा हेतू फक्त शालिनीनें आपल्याला शरण येऊन " मीं केलें ही चूक केली. मला आतां कसें तरी सांभाळा " असें ह्मणावें एवढाच होता.

आतांपर्यंत शालिनीच्या संबंधीं हकीकत मुंबई पुण्यांत झाली होती. कोणतीही क्षुल्लक गोष्ट असो ती तोंडातोंडी होण्यास अवकाश लागत नाहीं. मग ही तर काय महत्वाची बाब; ह्या गोष्टीवर समाजाची नीति अनिती बऱ्याच प्रमाणानें अवलंबून असते. मग अशी महत्वाची गोष्ट सर्वातोंडी झाल्या खेरीज कशी राहील ? त्यांतून कित्येक दैनिक वर्तमानपत्रांतून शालिनीचा शक्य तितका काल्पनिक चटकदार इतिहास कालमचे कालम भरून, कांहीं संपादकांनीं प्रसिद्ध केला होता. एका संपादकांनें तर ' विसाव्या शतकांतील शकुंतला ' या मथळ्यावर खाली लेख लिहून शालिनीची सर्व पत्रभर टवाळी केली होती. असल्या भोंकण्याला दाद देणारी स्त्री शालिनी नव्हती. अलीकडल्या कांहीं पोट-भरू संपादकांनीं वर्तमानपत्राच्या पवित्र धंद्याला व्यापारी स्वरूप देऊन जो व्यभिचार मांडला आहे त्याची तिला किळस येऊन तिनें असली चटोर पत्रें वाचण्याचें सोडून दिलें होतें

एकंदरीनें पाहता कित्येकांना शालिनीचें वर्तन अगदीं निंद्य वाटे. तर कित्येक त्याकडे अगदीं दुर्लक्ष करीत आणि कांहीं थोडे अगदीं हाताच्या बोटावर मोजतां येतील इतकेच कायतें तिची खरी किंमत ओळखून होते. प्रत्येकजण आप-आपल्या मताप्रमाणें तिला जें पाहिजे तें म्हणत, निंदा करीत, नाके मुरडीत, तिरस्कार दाखवीत. असें चालले होते. ही हकीकत पसरतां पसरतां शालिनीच्या वडलांच्या कानापर्यंत गेली. त्यानंतर त्यानीं तिला एक छोटेखानी पत्र पाठविले त्यांत अगदीं थोडाच मजकूर होता. तो असा.

" मी आजपर्यंत तुझें नांव सोडूनच दिलें होतें. पण परवां जी बातमी मी ऐकली त्यावरून तुला चार ओळी लिहून तुझे डोळे उघडले तर पहावें, असें माझ्या मनांत आलें. तुला मी लहानपणी स्वातंत्र्य दिलें त्याचा तूं चांगला

उपयोग केला नाहींस. तरी पण तूं आपली स्वातंत्र्याची कल्पना इतक्या थराला नेऊन पोंचविशील असें मला वाटलें नव्हतें. झाली ही गोष्ट फारच वाईट झाली. तरी देखील झालेल्या गोष्टीबद्दल पश्चात्ताप करून पुन्हा चांगल्या मार्गानें जाणें तुझ्या हातात आहे, आणि तेवढें तूं करावेंस एवढेंच मला वाटतें. आतां तुला कदाचित् माझ्याकडे यावसें वाटेल. पण तूं मुळींच येऊं नको, एवढें माझें तुला सांगणें आहे. कारण मी सध्यां एक मुलगी सांभाळली आहे, आणि तूं येथें आलीस तर तुझ्या संगतीनें बिघडावयाची. तेव्हां तूं न येणेंच श्रेयस्कर होणार आहे. असो. तो परम दयाळू सर्वव्यापी सर्वसाक्षी परमेश्वर तुला झालेल्या गोष्टीबद्दल पश्चाताप करण्यास लावो एवढीच माझी त्या जगन्नियंत्या-जवळ प्रार्थना आहे.

डॉ. सुपेकर परत मुंबईस गेल्यावर शालिनी एकटीच तेथें रहात होती. वाड्यांत आणखी दोनतीन बिऱ्हाडें होतीं. पण त्यांची शालिनीला सोबत होती अशातली गोष्ट नाहीं. शालिनीची हकीकत समजल्यावर वाड्यातल्या बिऱ्हा-डाना ती तेथें रहाण्यास नको होती. त्यानीं मालकाला सांगून पाहिलें. पण मालक इतका विक्षिप्त होता कीं, जो कोणी अशी तक्रार करूं लागे त्यालाच तुला वाटलं तर तूं येथून जा. मला त्या बाईला घालविण्याची कांहीं जरूर वाटत नाहीं. असें सांगे. त्याचें ‘ सर्व लक्ष नेहमीं देवधर्मांत असे. तो कधीं कोणाच्या आध्यात मध्यांत नसे.’ त्यामुळें शालिनीला बराच कमी त्रास सोसावा लागला. बाकीची वाड्यांतली माणसें जितका ह्मणून तिला त्रास देतां येईल तितका देत असत. त्यांतल्या त्यांत विशेषतः तेथील स्त्रीवर्ग त्रास देण्यांत फार पटाईत होता. तो त्यांचा विशेष दोष होता असें नाहीं. कारण पुष्कळ काम केल्यावर माणसाला विश्रांतीची जरूरी असते. आणि विश्रांति ह्मणजे एकच काम करण्याचा कंटाळा आला म्हणजे दुसऱ्या तऱ्हेच्या कामास लागणें. पण स्त्रियांना एका स्वयंपाकाखेरीज दुसरी कोणतीच कला अवगत नसल्यामुळें लोकांची निंदा करूनच आपली करमणूक करून घ्यावी लागते. तेव्हां त्यांना शालिनी ही गप्पा मारण्यास आणि कुचेष्टा करण्यास चांगलाच विषय झाली होती. कोणी दुसऱ्या बायका त्यांच्याकडे बसण्यास आल्या म्हणजे त्यांना शालिनीची सर्व हकीकत सांगून त्या शालिनीच्या खोलींत मुद्दाम त्यांना घेऊन जात. एकमेकींकडे डोळे मिचकावीत पहात, गालांतल्या गालांत हंसत. कुत्सीत बुद्धीनें कांहीं वेडवाकडे प्रश्न विचारीत आणि फिदी फिदी हांसून निघून जात.

पण शालिनीला त्यांच्या अशा विचित्र वागण्याचा कधींही राग आला नाहीं. तिला आपल्या भगिनींचें भयंकर अज्ञान पाहून आणि कोते विचार ऐकून कींव येई. आणि स्त्रीशिक्षणाबद्दल आणि स्त्रीस्वातंत्र्याबद्दल जास्तच कळकळ वाटे. कांहीं पुरुष मंडळींनीं तिची तेथून उचलबांगडी करण्याचें मनावर घेतलें होतें. त्यांनीं मालकाला शालिनीला हाकलून देण्यास नानातऱ्हांनीं सुचविलें. पण तो भलाभक्कम प्राणी ती गोष्ट मनावरच घेईना, तेव्हां त्यांना चुरमुरे खात स्वस्थ बसावें लागलें. मंळळींची तिला हाकलून देण्यासंबंधीं चाललेली खटपट तिला माहीत होती. आणि कदाचित् त्यांत त्यांना यश येईल अशी तिला भीतीही वाटत होती. पण ईश्वरानें तिच्यावरही मोठी खैरच केली म्हणायची ! कारण बाळंतपणाचे दिवस आतां जवळ आल्यामुळें तिला दुसरीकडे कोठें जाणें शक्य नव्हतें.

मालक दाद देत नाहीं असें पाहून लोकांनीं तिला हाकलून देण्याचा उपाय योजला. त्यांनीं तिच्या दारावर नाहीं नाहीं तें भलतें सलतें लिहून ठेवण्यास सुरवात केली. पण शालिनी बिलकूल न रागावतां मुकाट्यानें लिहिलेलें पुसून टाकी. पण कधीं कधीं दारावर लिहिलेलें आचकट विचकट शब्द लक्षांत न येऊन तसेच रहात तेव्हां ती मंडळी येतां जातां तें मोठ्यांदा वाचून फिदी फिदी हंसत. परंतु शालिनीनें इतकी विलक्षण शांतवृत्ति ठेविली होती कीं, सरतेशेवटीं त्याच लोकांनीं कंटाळून जाऊन लिहिण्याचें सोडून दिलें आणि त्यांची त्यांनाच मग लाज वाटूं लागली.

शालिनीला सध्यां वाचनाखेरीज दुसरा कांहींएक उद्योग नव्हता. ती आपला बहुतेक वेळ वाचनांत घालवीत असे. पण वाचून वाचून सुद्धां कित्येक वेळां तिला कंटाळा येई तेव्हां ती आपल्या खोलीच्या खिडकाशीं आकाशाकडे पहात स्वस्थ विचार करीत बसे. तेव्हां तिला मागच्या गोष्टींची आठवण होऊन तिचे डोळे भरून येत. कमलाकराची ती उज्वल मूर्ती तिच्या डोळ्यांपुढें उभी राही; आणि त्याचे एकेक गुण आठवून आपल्या मनाशीं ती खेद करीत बसे. पुष्कळ वेळां अगदीं निराश होऊन तिला आपल्या जिवाचें बरें वाईट करून घ्यावेंसें वाटे. पण त्या समयीं कमलाकर आपल्याला धीर धर. आशा सोडूं नको असें सांगत आहे असें तिला वाटे. कधीं कधीं कमलाकर आपल्या स्वप्नांत तरी दिसावा आणि त्याची आपली भेट व्हावी या आशेनें ती अंथरुणावर पडे. कधीं कधीं तिच्या इच्छेप्रमाणें कमलाकर तिला दिसेही. आणि मग त्याच स्वप्नां-

तल्या गोष्टी पुन्हा पुन्हा आठवून ती आपल्या मनाचें समाधान करून घेई.

अशा तऱ्हेनें शालिनाचे एकापाठीमागून एक एक दिवस चालले होते. शेवटीं ज्या दिवसाची तिला मोठी धास्ती पडली होती तो दिवस येऊन ठेपला. आणि ती त्या प्रसंगांतून सुखरूप बाहेर पडली. तिला मुलगी झाली ती शालिनीप्रमाणेंच रूपवान होती. फक्त तिचे डोळे तेवढे कमलाकरासारखे घारे होते. बाळंत झाल्यावर शालिनीच्या जिवात जीव आला. तिला आतां जगण्यांत अर्थ वाटूं लागला. मुलीच्या डोळ्याकडे पाहून तिला नेहमीं कमलाकराची आठवण होई म्हणून तिनें तिचें नांव कमलिनी असें ठेविलें.

---

## प्रकरण चवदावें.

कमलिनी एक महिन्याची झाल्यावर शालिनी मुंबईस परत गेली. परंतु पूर्वींच्या आणि सध्यांच्या स्थितींत तिला इतके जमीन अस्मानाचें अंतर दिसून आलें कीं खरोखरच आपण मुंबईस आहों का दुसरीकडे कोठें आहों याची तिला शंका येऊं लागली. तिची स्थिति फारच दैन्यवाणी झाली होती. ती अगदीं निष्कांचन झाली होती. ताबडतोब कोठें तरी नोकरी मिळाल्याशिवाय टिकाव धरणें शक्य नव्हतें. पुन्हा जे ते तिला वाळींत टाकल्याप्रमाणें करीत. ज्या लोकांना आतांपर्यंत शालिनीची आणि आपली ओळख आहे असें सांगण्यांत एकप्रकारचा अभिमान वाटत असे, तेच लोक आतां शालिनीसंबंधीं कोणी कांहीं विचारलें, तर कोण शालिनी ? कोठची शालिनी ? आह्माला तिचें नांव देखिल नाहीं ठाऊक. असें ह्मणून आपला नी तिचा मुळीं सुद्धां संबंध नाहीं, असें दाखवीत. ज्या मैत्रिणी तिच्याकडे वारंवार येऊन तासतास तिच्याशीं गप्पा मारीत बसत त्याच आतां रस्त्यानें कधीं शालिनीला चुकून भेटल्या तर तिच्याकडे ढुंकूनही पहात नसत. दुसरी कोणी ओळखीची माणसें भेटली तर ती लांबूनच तिच्याशीं बोलण्याचा प्रसंग न यावा म्हणून दुसऱ्या वाटेनें निघून जात. लोकांच्या असल्या दुष्ट वर्तनानें शालिनीला वाईट वाटल्याखेरीज रहात नसे. कधीं कधीं तर तिला इतकें वाईट वाटे कीं, ती लहान मुलाप्रमाणें स्वस्थ बसून रडे. मात्र त्यामुळें तिचें मन अंमळ हलकें होऊन तिला जरा बरें वाटे. मुंबईस आल्यावर शेजारच्या बायका कमलिनीकडे बोट दाखवून " ही

कोणाची मुलगी ?" असें बळेंच विचारीत. हेतु एवढाच कीं शालिनी काय उत्तर देते ? कांहीं लपवा छपवी करते कीं काय ? तें त्यांना पहावयाचें असे.

तिनें सर्व गोष्टी जाणून बुजून केल्या होत्या मग ती असली लपना छपवी कशाला करील ! ती "ही माझीच मुलगी आहे." असें त्यांनीं विचारल्याबरोबर सांगे. तेव्हां त्या खजील होत आणि बोलायच्या थांबत. शालिनीचें लग्न झालेलें नाहीं हें सर्वांना माहीत होतें. तेव्हां तेथल्या मंडळींनीं तिला छळण्यास सुरवात केली. ती नळावर पाणी न्यायला आली म्हणजे तिला पाणीच मिळूं देऊं नये, किंवा सगळ्यांनीं तिच्याकडे पाहून फिदी फिदी हसूं लागावें, नाहींतर तिला राग येईल अशा तऱ्हेचें आचकट विचकट तिच्या देखत बोलावें, असा क्रम त्यांनीं चालू ठेवला. कधीं कधीं तर तुमचा आम्हाला विटाळ होतो तर तुम्ही आमच्या मागून पाणी भरीत जा. असें सुद्धां ती मंडळी तिला सांगत. अशा एक ना दोन हजार तऱ्हांनीं त्यांनीं तिचा छळ आरंभिला, तेव्हां शालिनी त्या त्रासाला कंटाळली आणि दुसरीकडे जागा पाहूं लागली. पण चांगल्या वस्तींत थोडक्या रुपयांत सोयीची जागा मिळणें शालिनीला मोठें कठीण दिसलें. एक दोन ठिकाणीं जागा तिच्या मनाजोगी होती. पण तेथें खरी हकीकत सांगून निभावण्याजोगें नव्हतें. तिच्या मनांतून आतां एका ठिकाणीं कोठें तरी रहावयाचें होतें, कारण तिला ह्या जागेंतून त्या जागेंतून आणखी कोणत्या तरी जागेंत, नाचवा नाचवी करण्याचा फार कंटाळा आला होता. आपण त्या नव्या जागेंत गेलों आणि पुन्हा तेथून हालण्याचा प्रसंग आला तर तें बरें नाहीं. आपण आपली खरी स्थिति सांगितली तर तेथील लोक आपल्याला नुसते उभे सुद्धां करणार नाहींत. बरें त्या जागेंत जाऊं नये तर पुष्कळ भाडें भरून जागा घेण्याची आपली आयपत नाहीं. खोटें सांगून तेथें राह्यला जावें तर तेंही बरें नाहीं. अशा मोठ्या अडचणींत शालिनी पडली होती. खोटें बोलावें तरी वाईट; बरें न बोलावें तर पुष्कळ भाडें कोठून भरावें, बरें भरलें तरी तेथले लोक आपली हकीकत कळल्यावर आपल्याला निवांतपणें राहूं देतील हें तरी कशावरून ? तेव्हां सध्याचा त्रास टाळावयाचा असला तर खोटें बोलल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें शालिनीला दिसून आलें. आणि त्याप्रमाणें तिनें करावयाचें ठरविलें. खोटें बोलण्याचें तर तिच्या मोठे जिवावर आलें. पण करते काय ? त्याशिवाय तर तिला या संकटांतून सुटण्यास दुसरा मार्गच नव्हता. तेव्हां तिला आपण विधवा आहोंत असें लोकांना दाखवणें भाग पडलें.

तिनें आपल्या कपाळाला कुंकू लावायचें सोडून दिलें, तेव्हां कुठें तिला एका आळींत जागा मिळाली आणि लोक तिला त्रास देईनासे झाले. इतका कुंकू न लावण्याचा परीणाम झाला. बरी तर बरी ! क्षुल्लक गोष्ट म्हणून चटादिशी करतां आली. आणि बराचसा त्रास वांचवता आला. कुंकू लावायचें सोडून दिलें, आणि शालिनी एकदम पवित्र झाली. तिच्याबद्दल कोणाला संशय आला नाहीं. ती वाईट चालीची आहे असं कोणाला वाटलं नाहीं. किंवा तिच्यामुळें आपली मुलें बिघडतील असें पण कोणास वाटलें नाहीं. पण जर का ती कुंकू लावून आणि आपली खरी खरी हकीकत सांगून तेथें राहिली असती तर बरीक त्यांची मुलें बिघडली असती, आणि शालिनीचें वर्तन वाईट आहे असें त्यांना वाटलें असतें. समाजाला सद्वर्तन खपत नाहीं. दुर्वर्तन खपतें. शालिनी खोटें बोलून तेथें राहिली त्याबद्दल कोणास कांहीं वाटलें नाहीं. पण तेंच जर ती खरें सांगून राहाती तर लोकांनीं तिला चाळींत पाय घालूं दिला नसता. कोणी एकाद्या स्त्रीनें लपून छपून किळसवाणें वर्तन केलें तर तें चालतें, पुरुषानीं तर तें उघड केलें तरी ते स्तुतीस पात्र होतें, पण एकाद्या बाईनें लग्नाचा साधा विधि केला नाहीं तर तिला बहिष्कार पडून तिचा छळ झाल्याशिवाय राहणार नाहीं. आहे कीं नाहीं नवलाची गोष्टी ? जो मनुष्य अनीतीनें वागेल त्याची जगांत वाहावा होते ! आणि तो अनीतीमान असून श्रीमंत असला तर मग तो मुळीं नीतीचा पुतळाच समजला जातो. तेव्हां शालिनीसारख्या सरळ मार्गानें जाणाऱ्या मुलीला आपलें डोकें टेकण्या पुरती सुद्धां कोठें जागा मिळूं नये यांत आश्चर्य तें कसलें ! तेव्हां गिरगांवांतल्या एका चाळींत लहानशा दोन खोल्या मिळायला आपल्या तत्वाची आणि आपल्या सत्याची शालिनीला रूढीच्या होम कुंडांत आहुती करावी लागली. पूर्वीसारखें दादरला किंवा आणखीही दूर कोठें तरी राहून चालण्यासारखें नव्हतें. कारण शालिनीला आपली नोकरी किंवा जें काय दुसरें काम मिळेल तें संभाळून पुन्हा कमलिनीला संभाळावयाची होती.

जागा मिळाल्यावर शालिनी आतां आपण उद्योग काय करावा याचा विचार करूं लागली. बाकीच्या सर्व अडचणींतून ती कशी बशी आत्तांपर्यंत निभावली होती. परंतु पैशाची अडचण दूर होऊन उदरनिर्वाह होणें हेंच मोठें कठीण होतें. पूर्वीं तिनें शिक्षकिणीचें काम केलें होतें, आणि शिकविण्याच्या कामांत तीं चांगली हुशारही होती. परंतु आतां कोणत्याही शाळेला किंवा कोणत्याही सद्‌गृहस्थाला शालिनीसारख्या सच्छील वर्तनाच्या बाईनें मुलांस शिकविणें पसंत पडेना. जे

नकोत ते गुण मुलांच्या अंगांत उतरतील अशी सर्व आईबापांस भीती वाटूं लागली. असो. शालिनी जशी उत्तम शिक्षकीण होती तशीच उत्तम लेखिकाही होती त्यामुळें तिचा पुष्कळ मासिकाच्या संपादकांशीं चांगला परिचय होता. पुष्कळ वेळां ती त्यांच्या घरींही जात असे. परंतु त्यांतील पुष्कळांनीं तिला गरजेच्या वेळेला मदत करण्याचें नाकारलें. तिचे लेखही छापण्याचें, त्यांनीं नाकबूल केले एवढेंच नाहीं तर 'तुम्ही आमच्या घरीं आतां न येणें बरें' असं सुद्धां त्यांनीं तिला सांगितलें. घरांतल्या पुरुष मंडळींनीं असें सांगितल्यावर त्यांच्या विरुद्ध त्यांच्या बायका अणुमात्र जातील याची आशाच नको. त्यांनीं पण आपल्या नेहमींच्या स्वभावाला अनुसरून शालिनीला भेटण्याचें नाकारलें. मेंढ्यांना काय जसें त्यांना वळवावें तशा त्या वळतात. त्याचप्रमाणें स्त्रिया पुरुष हाकतील त्या मार्गानें जात असतात. घरांतले पुरुष सांगतात तें बरोबर नव्हे, असें कोणत्या बाईला कधीं वाटलाहे ? आणि जरी तसें वाटलें तरी त्यांच्या उलट वागण्याची कोणत्या बाईची छाती होते ? बरें तशी एकाद्या बाईनें छाती केलीच तर तिला देमाय धरणी ठाय असें म्हणण्याची पाळी येणार ! तेव्हां पुरुषांच्या मनाविरुद्ध वागण्याचा आविचार एकाही बाईच्या हातून कधीं होत नाहीं. ही कांहीं मोठी आश्चर्याची गोष्ट नाहीं. असो. तरी पण एवढें खरें कीं, जरी या संपादकांनी शालिनीला आपल्या घरांत येण्याचें बंद केलें तरी ते निव्वळ त्यांना तिचें वर्तन गैर अगर वाईट चालीचें वाटत होतें ह्मणून नाहीं, तर समाजाला असें वाटतें ह्मणून. शालिनी आपल्या घरांत येते जाते, आपल्या येथें रहाते, असें लोकांस कळलें तर तें आपल्याशीं संबंध ठेवणार नाहींत. आपल्यालाही शालिनीप्रमाणें वाळींत टाकतील अशी त्यांना भीति वाटली ह्मणून. मनांतून त्यांना तिच्याबद्दल बरीच कळकळ वाटत होती, पण ती उघड दाखविण्याची त्यांची छाती नव्हती. त्यांनीं तिला कांहीं काम मिळून पैसे मिळतील अशी व्यवस्था केली. शालिनी केव्हांही हातीं घेतलेलें काम फार मनःपूर्वक आणि चिकाटीनें करी. तिला पुष्कळ विषयांची चांगली माहीती होती. आपले विचार साधे पण चटकदार भाषेंत मांडण्याची तिची पद्धति वाचकवर्गाचें लक्ष आकर्षित करीत असे. त्यामुळें ती लवकरच प्रसिद्धीस आली. लोक तिच्या लेखांची नेहमीं अपेक्षा करूं लागले. आणि संपादक तिच्या लेखाच्या वारंवार मागण्या करूं लागले. अशा रीतानें ती आपला चरितार्थ चालवूं लागली. याशिवाय आणखी ती शिवणकाम वगैरे कामें करून घरीं बसल्या जे काय पैसे मिळवितां येतील ते मिळवीत असे. शालिनीची लेखनपद्धति पुष्कळांना आवडे, एवढेंच

नाहीं तर तिचें विचारही पुष्कळांना आवडत. तरी पण तिच्या घरीं जाण्या-येण्याचें फारसें धाडस कोणाच्यानें करवत नसे. शालिनीलाही कोणाची गरज वाटत नसे. स्वस्थ चित्तानें आपलें काम करण्यांत ती आपला दिवस घालवी. ज्या शालिनीची पुष्कळांना पूर्वी गरज वाटत असे, तिचीच आतां कोणालाही गरज वाटेनाशी झाली होती असें जरी होतें, तरी त्याबद्दल शालिनीला कधीं फारसें वाईट वाटत नसे. तिला समाजाच्या ढोंगी वर्तनाचा नेहमींच फार तिट-कारा असे. उगीच वरपांगी ह्यः ह्यः करणें तिला मुळींच आवडत नसे. त्यापेक्षां मैत्री नसलेली हजारपटींनें बरी, असें तिला वाटे. तिचा बराचसा वेळ कमलि-नीचें जेवणखाण, कपडेलत्ते करण्यात जाई. आणि उरलेल्या वेळांत ती आपलें लेखन आणि शिक्षण करी. कमलिनी थोडी मोठी झाल्यावर तर तिच्या बोबड्या बोलानें आणि खेळण्यानें शालिनीचें पुष्कळ मनोरंजन होई. तिला आपल्या दुःखाचा विसर पडे. कधीं कधीं शालिनी काम करीत असली म्हणजे कमलिनी पाठीमागून येऊन शालिनीच्या गळ्याला आपल्या गोजीरवाण्या हातांनीं एकदम मिठी मारी. आणि 'याई याई' करून तिच्या मुखाकडे वाकवाकून पाही, आणि पुन्हा दुडदुड मागें पळून जाई. तेव्हां तर शालिनीला स्वर्गीय सुखाचा लाभ झाल्यासारखा वाटे. ती एकदम तिला " अग लबाडे, कुठें ग पळालीस ? " असें म्हणून तिचे दोन्ही चिमुकले हात आपल्या गळ्याभोंवतीं घेऊन एकसारखे तिचे मटामट मुके घेत सुटे. आणि कमलिनी खदखदा हंसूं लागे. मुलें नकोत. मुलांचा त्रास. मुलांची दगदग. असें वाटणाऱ्या स्त्रियांपैकीं शालिनी नव्हती. मुलें असणें ही मोठी देणगी आहे. तीं ज्यांना नकोशीं वाटतात, किंवा ज्यांना नसतात ती माणसें मोठी दुर्दैवी. असें तिला वाटे. आणि जगांतील एका उत्तम सुखाला अंतरल्याबद्दल तिला त्यांची कींव येई. कमलाकराच्या मृत्यूनें शालिनीच्या संसाराची नौका सुकाणू नसल्यासारखी झाली होती. तिनें अंगावर घेतलेलें काम अर्धवट पडलें. तिचें जीवित आतां फक्त कमलिनीसाठीं होतें. ती कमलिनी केव्हां एकदां मोठी होऊन आपल्या तत्वाचा फैलाव करूं लागते असें तिला झालें होतें. तेवढी एक आशा तिला उरली होती. आणि त्याप्रमाणें कमलिनी मोठी होऊन शालिनीचें अर्धवट पडलेलें कार्य तडीस नेण्या-च्या मार्गाला लागली असती; म्हणजे शालिनीला आपल्या सर्व श्रमाचें श्रेय मिळाल्याप्रमाणें वाटलें असतें. शालिनीनें कमलिनीला आपल्या

गरीबीमुळें उत्तम उत्तम वस्तु दिल्या नसतील, किंवा अंगांत घालायला चांगले कपडे केले नसतील पण तिनें एकच इतकी मोठी गोष्ट दिली होती, कीं ती राजाला देखील कधीं मिळाली नसेल. आणि ती गोष्ट म्हणजे जन्मसिद्ध स्वतंत्रता. हा हक्क एकट्या कमलिनीलाच आजपर्यंत मिळाला असेल आणि असा हक्क आपल्या लेकीला दिल्याबद्दल शालिनीला मनापासून फार अभिमान वाटत असे. असो.

हळूं हळूं शालिनीला आपला आणि कमलिचा खर्च भागण्याइतका पैसा मिळूं लागला. त्यामध्यें तिला गरीबींत पण उत्तम तऱ्हेनें रहतां येऊं लागलें. कोणत्याही आचारा विचारांत सुधारणा होते ती पहिल्या प्रथम मुंबईपुण्यासारख्याच ठिकाणीं घडून येते. आणि त्यामुळें मुंबईपुण्यांतलेच लोक इतर ठिकाणापेक्षां ज्यास्त उदारमतांचे असलेले आढळून येतात. त्याप्रमाणें या वेळेस बऱ्याच लोकांनीं शालिनीशीं आपला वागण्याचा कोन अम्मळ बदलला. शालिनीचीं मतें जरी त्यांना पसंत नव्हती तरी तिच्याशीं नुसतें बोलणें चालणें ठेवण्यास विशेषशी हरकत नाहीं, असें बऱ्याच लोकांना वाटूं लागलें होतें, यमूनाबाई, शालिनी पूर्वीं ज्या शाळेंत शिकवीत होती त्या शाळेची हेडमास्तरीण कधीं कधीं रात्रीच्या वेळीं हलकेंच कोणाला न कळवतां शालिनीचा समाचार घेऊन जावयाची. दिवसा ढवळ्या आपण शालिनीला भेटायला गेलों तर लोकांना तें कळेल आणि लोक आपल्याला नांवें ठेवतील, अशी भीति वाटून, त्या आपल्या अंधाऱ्या रात्रीं डोक्यावरून शाल पांघरून कोणी ओळखीचीं माणसें भेटणार नाहींत अशा वेळीं गुपचिप येऊन शालिनीला भेटून जात. पोरवयांत केलीन चूक ! त्याचें काय आतां ! असें त्या आपल्या मनाशीं म्हणत. आणखी कांहीं स्त्रियांची व शालिनीची या चाळींत आल्यापासून ओळख झाली होती. आणि ती ओळख निव्वळ कमलिनीमुळें झाली होती. कमलिनी फार गोड दिसे. तेव्हां चाळींतला प्रत्येक माणूस तिला उचलीत असे. कमलिनीचा बराचसा वेळ शेजाऱ्यांच्या घरांत जात असे. तरी शालिनी फारच क्वचित तिकडे जात असे. कधीं कमलिनीला आणण्यासाठीं म्हणून गेली तरच. नाहींतर ती आपल्या कामांत नेहमीं दंग असे. शालिनीची खरी हकीकत कोणाला फारशी माहीत नव्हती. ती आपली एक गरीब विधवा आहे, पोट भरण्यासाठीं शिवण्याटिपण्याचें काम करते, एवढीच तिच्यासंबंधीं माहिती चाळींतल्या लोकांना होती. ती विद्वान् आहे. तिचें वर्तन फार सरळ व चोख आहे. तिला कधीं कोणाच्या आश्रा-

मध्यांत पडण्यास नको. असें बहुतेकांना वाटत असे. तरी एकंदर तिच्यासंबंधीं बहुतेकांना आदर वाटत असे. आणि ह्मणून कांहीं कांहीं मंडळी तिला मोठ्या आग्रहानें चहाला अगर फराळाला बोलावीत असत. पण हीच जर का त्या माणसांना शालिनीची खरी हकीकत माहीत असती, तर त्यांनीं तिच्याबद्दल एकच गोंधळ उडविला असता; या बाईची संगत फार धोक्याची असें वाटून प्रत्येक पुरुषानें आपापल्या घरांतल्या बायकांना शालिनीकडे न जाण्याबद्दल सक्त ताकीद दिली असती. अंः ! काय पहा. एकच गोष्ट ! पण ती आहे तशी सांगितली तर ती एकाद्या माणसाला बाऊप्रमाणें दिसते. आणि तिलाच थोडें निराळें रूप देऊन ती सांगितली तर ती अगदीं साधी आहे त्यांत भिण्याजोगें कांहीं नाहीं, अशी लोकांची अनुभवानें खात्री होते. आपल्याला निंद्य अशा समाजांत रहाण्याची तें फार दिवसापासून संवय लागून राहिली आहे. त्यामुळें सत्य कसें अगदीं आपल्याला डोळ्यासमोर खपत नाहीं. कोणी एकादा भिकारी दारूड्या आपल्या घरांत येऊं लागेल तर आपण त्याला दारासमोर देखील उभें करणार नाहीं पण तोंच एकदा कानांत मोठी भिकबाळी लटकावून आणि जरीचा फेटा बांधून खूप पिऊन आला तर हें तुमचें घर नाहीं, तुम्ही वाट चुकलांत एवढे शब्द तरी शांतपणानें आपण बोलूं खास. हें कारे बावा? तर तो श्रीमंत ! त्यानीं दहा खून केले तरी त्याला माफ. त्यांतलीच गोष्ट शालिनीची. एकाद्या पुरुषानें लग्न करून त्या बाईच्या जन्माचें मातेरें करून वाटेल तसला अत्याचार केला असता किंवा अनीतीचा मार्ग स्विकारला असता, तरी लोकांनीं त्याला समाजांत मोठ्या दिमाखानें मिरवूं दिला असता. पण एका बाईनें नुसत्या अक्षदा टाकून घेऊन स्वतःची फसवणूक करून घेतली नाहीं म्हणून समाजानें तिला वाळींत टाकली. याला ह्मणावी समाजघटना !

कमलिनी अम्मळ मोठी झाल्यावर शालिनीनें एक पुस्तक लिहिण्यास घेतलें. हें पुस्तक एकाद्या गहन विषयाचें नव्हतें. किंवा टीकात्मकही नव्हतें. तर साधी कादंबरी होती. कादंबरी लिहिण्यात काय ! त्याला काय विद्वत्ता लागते का मोठी बुद्धिमत्ता लागते, कादंबरी म्हणजे काय साळूबाईच्या स्वयंपाकघरांतल्या गोष्टी. त्यांत काय मोठेंसे आहे ? असें वाटून शालिनीच्या कादंबरीचें महत्व कोणी कमी करूं पाहील. पण तशांतली गोष्ट मुळींच नव्हती. कादंबरी लिहिण्याची उत्सुकता स्त्रियांत ज्याप्रमाणें दिसून येते त्यापेक्षां पुरुषांत

कमी प्रमाणानें दिसून येते हें खरें. तथापि ही उत्सुकता दिसून येण्याचें कारण त्यांचें अज्ञान नव्हें. तर त्यांचें समाजांत घडणाऱ्या बारीक सारीक गोष्टीकडे असलेलें लक्ष होय. आणि म्हणूनच एकाद्या स्त्रीनें लिहिलेल्या कादंबरींत जितकें समाजाचें हुबेहुब चित्र वठतें तितकें एकाद्या पुरुषानें लिहिलेल्या कादंबरींत वठत नाहीं. साधारणतः पुरुष केव्हांही एकादें पुस्तक लिहिण्यास घेतो, तेव्हां तें एकाद्या विषयाच्या स्पष्टीकरणार्थ असतें किंवा टीकात्मक असते. आणि जर यदाकदाचित् ती कादंबरी असली तर ती लिहिण्याच्या मुळाशीं पैसे मिळविण्याचा हेतू असतो. शालिनीचा जरी कादंबरी लिहिण्याचा हेतू पुष्कळ अंशी पैसे मिळविण्याचाच होता तरी कोणताही विषय समजावून सांगावयाचा असला काय, किंवा समाजाचीं व्यंगें समाजापुढें मांडावयाची असली तरी काय ती साध्य घरगुती भाषेंत सांगितल्यानें जितका त्याचा परीणाम लहान मुलापासून तों थेट थोर माणसाच्या मनावर होतो तितका दुसऱ्या कोणत्याही लिहिण्याच्या पद्धतीनें होत नाहीं. असें शालिनीचें मत होतें. आणि ह्मणून तिनें कादंबरीच्याच रुपानें समाजांतील व्यंगें समाजापुढें मांडण्याचें ठरविलें. कोणतीही स्त्री पुस्तक लिहीण्यास लागली म्हणजे कादंबरीच लिहीते, याचें कारण स्त्रियानां लहानपणापासून असलेला गोष्टी सांगण्याचा नाद. तेव्हां त्यांना कादंबरी लिहिण्याची कला केव्हांही सहजरित्या अवगत होते. समाजांत नेहमीं चालणाऱ्या व्यवसायांत स्त्रियांस वाटणारी हौस. त्यांच्या अंगाचा चौकसपणा आणि त्यांचे कोमल मनोविकार यामुळें स्त्रियांना कादंबरीतील प्रत्येक देखावा अगदीं हुबेहुब डोळ्यासमोर घडत असल्याप्रमाणें दाखवतां येतो. असो. तेव्हां स्त्रिजातीच्या स्वभावानुसार शालिनीनें पण कादंबरीच लिहिण्यास घेतली. पण तिला लिहिण्यास फारसा वेळ सांपडत नसे. कमलिनीला संभाळून व घरांतलें कामकाज आटोपून अर्धापाऊण तास मिळाला म्हणजे मोठी शिकस्त झाली. तेव्हां कादंबरी लिहून संपायला तिला पांच एक महिने लागले. कादंबरी लिहून संपली तेव्हां कमलिनी आठ महिन्याची झाली होती. कादंबरींतला बहुतेक भाग दुःखाचा होता. वाचतां वाचतां मनुष्याच्या अंतःकरणाला पाझर फुटून रडूं कोसळे. पुष्कळ ठिकाणीं दुःखी विचारांची छटा दिसे. प्रत्येकाला दुःख होतच असतें. आनंद कोणाला होत असेल तर तो एकट्या मूर्खाला. मूर्ख माणसें तेवढींच आरामखुर्चीवर बसून आपल्या जीवाला म्हणतात कीं, " हे

जीवा जिवंत आहेस तोंपर्यंत खा, पी आणि चैन कर. दुसऱ्यांच्या दुःखाकडे लक्ष देऊं नकोस. सगळे आंधळे, पांगळे, मुके, थोटे, गरीबगुरीब मरूं देत बेटे! त्यांचयाशीं काय करायचें आहे तुला! तूं का उगीच त्यांच्याबद्दल वाईट वाटून घेऊन आपल्या सुखाची मती करतोस! हा मूर्ख बिचारा आपला सदा सर्वकाळ आनंदी! मग धडधडीत पुढें प्रेत का पडलें असेना त्याच्या अंतःकरणाला कधीं धक्का म्हणून पोचायचा नाहीं. अशा मनुष्यांच्या स्वार्थीपणाला कशाची उपमा द्यावी! तो मोठ्या ऐटीनें आपल्या अरामखुर्चीवर बसून समोर पडलल्या प्रेताकडे पाहून म्हणेल "याला कोण काय करणार! ती देवाची करणी आहे. जगांत कोणी दुःखी तर कोणी सुखी; कोणी गरीब तर कोणी श्रीमंत असें चालावयाचेंच. ही ज्याच्या त्याच्या मागील कर्मांचीं फळें असतात, आणि तीं तो प्राणी भोगीत असतो. मग त्याबद्दल आपण इतकें वाईट वाटून घेण्याचें काय कारण? पण असें जेव्हां तो म्हणतो तेव्हां कोण-ताही शहाणा माणूस त्यांतला गर्भितार्थ काय आहे तो तेव्हांच ओळखून, आपल्या मनाशीं म्हणतो कीं, हं ह्या बेट्याच्या मनांतून कांहीं या मृताच्या कुटुंबाला मदत करावयाची नाहीं म्हणून हा मुद्दाम आपल्या डोळ्यावर झापडें ओढून घेत आहे. तेव्हां आपल्या परीनें आपल्याला जितकें या दुःखी कुटुंबाचें दुःख हलकें करतां येईल तितकें करावें आणि स्वस्थ बसावें. असो.

एकंदर शालिनीच्या कादंबरींत दुःखाची अगदीं परमावधी झाली होती. मानसीक दुःखाचा जेथें तेथें अगदीं अतिरेक झालेला दिसे. त्यांत ज्या बाईनें आपलें सर्व आयुष्य आपल्या कांहीं ठाम मताकरितां खर्ची घातलें होतें, अशा बाईनें अनुभव आणि मनोविकार हे उत्तमप्रकारें दाखविले होते. कादंबरींत ठिकठिकाणीं लेखकाला समाजाबद्दल वाटणारी कळकळ दिसून येत होती. ही कादंबरी शालिनीनें आपल्या कमलिनीकरितां लिहिली होती. कादंबरी पुरी लिहून झाली तेव्हां शालिनीनें तीं भीतभीतच एका मासिकाच्या संपादकाकडे पाठवून दिली. भीतभीत पाठविण्याचें कारण एवढेंच कीं कदाचित् संपादक असलो कादंबरी छापण्यास तयार होणार नाहीं, असें तिला वाटत होतें. पण सुदैवानें त्या माणसानें तसें कांहीं ह्मटलें नाहीं. तो स्वतः मोठा विचारी होता. तेव्हां अर्थातच समाजाला सुधारणेंत एक पाऊल पुढें नेण्याची संधि त्याला मिळाली तर तो सहसा हातची जाऊं देत नसे. ही कादंबरी छापल्यानें आपला

फायदा कांहींएक न होतां उलट झाला तर तोटाच होईल असें तर त्याला वाटलें होतेंच; एवढेंच नाहीं तर कादंबरी हातीं पडताक्षणींच भराभर आपले वर्गणीदार कमी होतील याबद्दलही त्याची खात्री होती. तरी कशाची पर्वा न करतां बेधडक कादंबरी छापण्याचें काम त्यानें आपल्या मनावर घेतलें. एक महिन्यानें कादंबरी छापून प्रसिद्ध झाली. लोक आतां कसकशा टीका करतात याकडे शालिनीचे डोळे लागून राहिले होते. एक महिना होऊन गेला. तरी कोठेंही कादंबरीवर आलेला अभिप्राय किंवा टीका शालिनीच्या वाचण्यांत आली नाहीं. पण एक दिवस सहज ती समुद्रावरून फिरून घरीं परत जात होती. कमलिनी तिच्या कडेवर होती. ती आपली कमलिनीशीं हलके हलके लडिवाळपणें बोलत किंवा तिनें विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देत चालली होती. तिचें लक्ष आजूबाजूस फारसें नव्हतें. इतक्यांत शाळेंतले दोन विद्यार्थी मोठ्यांदा कांहीं तरी वाचीत तिच्या शेजारून गेले. त्याबरोबर तिचें लक्ष त्यांच्याकडे गेलें. त्या दोघांपैकीं एकाच्या हातांत एक दैनिक होतें. आणि तो दुसऱ्याला त्यांतील नुसते मथळे मोठ्यांदा वाचून दाखवीत होता. त्यांत "एका बाईनें लिहिलेली प्रगतीपर कादंबरी." असा एक त्यानें वाचला. त्याबरोबर शालिनीला हें कांहीं तरी आपल्याच कादंबरी-संबंधानें असावें असें वाटलें. शालिनीला तें दैनिक विकत घेण्याची इच्छा झाली. तिनें आपल्या पोलक्याचा खिसा चाचपून पाहिला, त्यांत दोनच पैसे होते. आणि तेवढीच किंमत बरोबर त्या दैनिकाची होती. तिला आनंद झाला. आलिकडे दोन पैसे खर्च करावयाचे तरी देखील शालिनीच्या फार जिवावर येई. पण आज तिनें दोन पैसे खर्च करून तावडतोब तें दैनिक विकत घेतलें, आणि घाईघाईनें त्या कादंबरीसंबंधानें लिहिलेला मजकूर एकदां वाचून टाकला. तो मजकूर तिच्याच कादंबरीसंबंधानें होता. आणि तो तिला आवडला होता हें तिच्या आनंदी चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होतें. पण ह्यावरून तिच्या कादं-बरीची कांहीं अगणित स्तुती केली होती असें समजण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण ती कादंबरी लोकांना तशी आवडण्यासारखी नव्हतीच. पण उगीचच्या उगीच टीका करावयाची ह्मणून केलेली नव्हती. त्या दैनिकांत पुढें लिहिल्या-प्रमाणें लिहिलें होतें. ' कु. शालिनीबाई गोडबोले यानीं लिहिलेली कादंबरी नुकतीच छापून प्रसिद्ध झाली आहे. कादंबरी लिहिण्याची धाडसी, भाषा-सौंदर्य वगैरे उत्तम प्रकारें साधलें आहे. परंतु कादंबरी धड सामाजिकही नाहीं किंवा ऐतिहासिकही नाहीं. ती कसली आहे हें एक शालिनीबाईच जाणोत.

ऐतिहासिक म्हणावी तर अशी कोणी कधीं स्त्री पूर्वकालीं होऊन गेलेली माहीत नाहीं. बरें सामाजिक म्हणावी तर इतक्या विक्षिप्त कल्पनांचीं स्त्री या जगांत होईल असें संभवनीय वाटत नाहीं. परंतु एवढें खरें कीं कादंबरी एकंदर फारच मनोरंजक झाली आहे. या कादंबरींतील बाईची कष्टमय कथा एकदां वाचण्यास सुरवात केली म्हणजे शेवटपर्यंत ती वाचल्याखेरीज रहावत नाहीं. परंतु त्यांत सांगितलेलीं तत्वें कोणत्याही माणसाच्या आयुष्याचा घात करणारीं आहेत, यांत बिलकूल शंका नाहीं. तरीपण त्यांमधील चटकदार वर्णनें आणि भाषाशैली फारच उत्तम साधलीं आहेत. शालिनीला यापेक्षां ज्यास्त आणखी कांहीं नको होते. आपल्याला कादंबरी लिहून साधावयाचें होतें तें साधलें. धोंडा बरोबर ठिकाणीं लागला याबद्दल तिला बरें वाटलें. त्या दिवशीं तिला फार आनंद झाला. काम व्हायला पाहिजे होतें तें झालें, असें वाटून तिला फार समाधान झालें. लोकांनीं आपल्या कादंबरीवर कितीही टीका केली तरी आतां फारसें वाईट वाटण्याचें कारण नाहीं. आपली कादंबरी जगांत आतां कायम रहाणार असें शालिनीला वाटलें. पण अरेरे! किती भ्रामक कल्पना ही ! किती थोडी पुस्तकें या जगांत पुष्कळ काळपर्यंत टिकाव धरीत असतील ? दरवर्षी खंडोगणती कादं-बऱ्या लिहिल्या जातात, पण त्यापैकीं उत्तम अशा किती ठरतात !आणि उत्तम ठरल्यावर देखील सगळ्या काळच्या लोकांना प्रीय होणाऱ्या अशा किती अस-तात ! प्रत्येक दिवशीं शालिनीचें लक्ष आपल्या कादंबरीवर काय टीका येते किंवा काय अभिप्राय येतो याकडे असे. परंतु तिच्या इच्छेप्रमाणें असें कधींच तिला कांहीं वाचावयास मिळालें नाहीं. बहुतेक पुस्तकालयांत या कादंबरीचा प्रवेश झालेला दिसत होता. परंतु ती शाळेंतल्या मुलांनीं वाचण्यालायकीची नाहीं अशी एकंदर लोकांची समजूत झालेली दिसत होती. अशी समजूत होण्याचें कारण समजायला कांहीं फारसें कठीण नाहीं. या कादंबरींत खरा नीतीचा मार्ग दाखविला होता. त्यांत इतर कादंबऱ्याप्रमाणें उगीच फाजील वर्णनें किंवा चारगटपणा नव्हता, म्हणून ती कादंबरी मुलांमुलींनीं वाचण्याच्या नालायकीची ठरली. आणि त्यांत नीतीचा मार्ग दाखविला होता म्हणूनच वाचकवर्गाच्या त्यावर उड्या पडत नव्हत्या. या कादंबरीनंतर शालिनीनें गोष्टी लिहिण्या-पलीकडे दुसरें कांहींच लिहिलें नाहीं. कादंबरी लिहिणें जितक्या उत्तम तऱ्हेनें लिहिणें शक्य होतें तितक्या उत्तम तऱ्हेनें तिनें लिहिली होती. पण ती

लोकांस पसंत पडली नाहीं. आतां शालिनी "कमलाबाईनीं मुरकत मुरकत चहाचा पेला पतीराजांच्या टेबलावर आणून ठेवला, आणि तो पतीराजानें मोठ्या प्रेमानें घेऊन, आपल्या प्रिय पत्नीच्या कडेवर असलेल्या बंड्याच्या गालांत हलकेंच लडीवाळपणानें मारून म्हटलें, "कायरे गुलामा एव्हांपासून तुला चहा हवा नाहीं का ?" नाहींतर कमलाबाई पतीराजांचें जेवण आटोपल्यावर पतीराज्यांच्या मुखांत विडा देऊन, व त्यांच्या अंगांत कोट चढवून त्यांच्या पायांत बूट घालण्यास अगदीं एका पायावर तत्पर होत्या." अशा गोष्टी लिहूं लागली. तेव्हां त्या भराभर खपूं लागल्या. तेव्हां तिला कळून चुकलें कीं प्रत्येक गोष्टींत चहाचा पेला; बंड्या, बूट, विडा असें कांहीं तरी आलेंच पाहिजे. नाहींतर त्याखेरीज गोष्टच नाहीं. असो.

या गोष्टी शालिनीला आवडत नसत, पण पोट भरण्यासाठीं ह्मणून त्या तिला लिहाव्या लागत. आणि तशा गोष्टी लिहिल्या तरच तिला आपल्या कमलिनीचें कसेंबसें ठीक ठाक तरी करतां येई. आणि कमलिनीचें नीटनेटके करणें जरूर आहे. त्यासाठीं आपल्याला कोणताही मनाविरुद्ध गोष्ट करावी लागली तरी केली पाहिजे. असें शालिनीला अलिकडे वाटूं लागलें होतें. कारण तिला अलिकडे असा अनुभवच येऊन चुकला होता कीं, कोणतेंही काम करण्यास हातीं घ्या, त्यांत लबाडी, लुच्चेगिरी, नीचपणा, हलकटपणा असें कांहीं तरी असल्याखेरीज रहातच नाहीं. आणि हा हलकटपणा आपल्या एकटीच्यानें नाहींसा होणें शक्य नाहीं. आपल्यास जसें सत्यानें, न्यायानें वागावेसें वाटतें, तसें जगांतील प्रत्येक माणसास वाटण्यास, जगाची सबंध रहाटीच बदलली पाहिजे. ही रहाटी बदलण्यास आपली कमलिनी आतां काय मार्ग काढते तें पाहूं. असें मनाशीं म्हणत शालिनी कमलिनी मोठी होण्याची वाट पहात राहिली.

---

## प्रकरण पंधरावें.

——:०:——

पांच सहा वर्षे गेली. शालिनीच्या आयुष्यांत विशेषें महत्वाचें असें कांहीं घडलें नाहीं. या सहा वर्षांत सांगण्यासारख्या फक्त एक दोनच गोष्टी घडल्या. आणि त्या थोडक्यांत सांगितल्या ह्मणजे पुरे आहेत.

बरेच दिवस झाले. शालिनीच्या वडलांचा आणि तिचा संबंध तुटल्यासारखाच झाला होता. तिचे वडील तिला कधीं एक बोटाची चिठी देखील पाठवीत नसत; आणि आतां यापुढें त्यांचें कधीं पत्र येईल किंवा त्यांना भेटण्याचा कधीं योग येईल असें शालिनीला वाटलेंही नव्हतें. ते एकमेकाला आतां विसरल्यासारखेंच झालें होते. परंतु एक दिवस सहज क्रॉनिकल चाळतां चाळतां, आबासाहेब कीर्तने येत्या रविवारी प्रार्थना समाजाच्या मंदिरांत संध्याकाळीं उपासना चालवितील. अशा अर्थाचा मजकूर शालिनीच्या दृष्टीस पडला. मजकूर वाचतांच शालिनीला विलक्षण आनंद झाला. आबाना भेटण्याची तिला फार इच्छा झाली. तरी पण ते आपल्याशीं बोलतील न बोलतील अशी शंका येऊन, उपासनेला जावें अगर न जावें यासंबंधीं तिचा एक निश्चय होईना, शालिनीनें मजकूर वाचला त्याच्या दुसऱ्या दिवशींच रविवार येत होता. संध्याकाळ होत आली. शालिनीला आबांना भेटण्याची अनिवार इच्छा झाली. तिच्यानें घरांत बसवेना, असा सुयोग आलेला घालविला तर आबांची नी आपली या जन्मात तरी पुन्हा गांठ पडणें शक्य नाहीं. ते आपल्याशीं बोलले नाहींत तर निदान आपल्याला त्याना बघण्यास तरी मिळेल असें वाटून शालिनी कमलिनीला घेऊन ठरलेल्या वेळीं प्रार्थना समाजाच्या मंदीरांत गेली. शालिनीला थोडा उशीर झाला होता. उपासनेला आरंभ झाला होता. आबासाहेब व्यासपीठावर बसले होते. त्यांचा पोषाख पांढरा होता. त्यांची पांढरी शुभ्र दाढी त्यांच्या छातीवर रुळत होती. त्यांचा चेहरा गंभीर असून श्रोत्यांच्या मनांत त्यांच्याबद्दल एक प्रकारची पूज्यबुद्धि उत्पन्न करण्यासारखा होता. त्यानीं आपले डोळे मिटून घेतले होते. व आपले दोन्ही हात एकात एक घालून ते सावकाश सावकाश एक एक शब्द अगदीं मोठ्यांदा आणि स्पष्ट बोलत होते. सर्व श्रोतृवर्गाचें चित्त त्यांच्या बोलण्याकडे लागलें होतें. कोणी नुसती कुजबूज देखील करीत नव्हतें कीं, इतकडचें तिकडे हालत नव्हतें. मंदिरांत जिकडे तिकडे शांतता असून त्यानीं उच्चारलेले शब्द तेवढे थेट अगदीं दारापर्यंत ऐकूं जात होते. त्यांचा प्रत्येक शब्द अगदीं अंतःकरणापासून उमटत होता. त्यांच्या प्रत्येक शब्दागणीक मंदिरांतल्या प्रत्येक व्यक्तीला अलभ्य लाभ होत असल्यासाखा वाटत होता. त्यांच्या विचारांशीं श्रोत्यांचे अगदीं तादात्म्य होऊन श्रोते तेवढ्या क्षणापुरते तरी नीतीच्या अशा उच्च शिखरावर हळू हळू चढत होते. शालिनीला त्यांच्या प्रत्येक वाक्याची सत्यता पटत होती. इतके उच्च

विचार असून ते कृतींत कसे येत नाहींत. एवढेंच तिला आश्चर्य वाटलें. उपासना आटोपल्यावर प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर समाधान वाटल्याचें चिन्ह दिसत होतें. उपासना आटोपली. श्रोतृमंडळी आपआपल्या घरीं परत जाऊं लागली. शालिनीच्यानें बरीक तेथून लवकर पाय काढवेना. कारण आबा अजून गेले नव्हते. आपण दाराबाहेर उभें रहावें आणि आबा बाहेर पडले म्हणजे त्यांच्याशीं बोलावें, असें वाटून त्यांच्या येण्याची वाट पहात शालिनी दाराबाहेर उभी राहिली. आबासाहेब दाराशीं आले. नेहमींप्रमाणें त्यांचा चेहरा हंसतमुखच होता. त्यांनीं दुरून शालिनी दाराशीं उभी असलेली पाहिली होती. शालिनीच्या भोंवती भोंवती हिंडत असलेल्या कमलिनीकडे विशेष त्यांचें लक्ष गेलें होतें. परंतु दाराशीं उभी असलेली स्त्री आपली मुलगी शालिनी असें बरीक त्यांच्या लक्षांत आलें नव्हतें. आबासाहेब दाराशीं आले तेव्हां शालिनीनें त्यांच्याशीं बोलण्याचा प्रयत्न केला. परंतु तिच्या तोंडातून शब्दच स्पष्ट बाहेर येईनात. ती कांहींतरी म्हणाल्यासारखा त्यांना भास झाला. म्हणून त्यांनीं मागें वळून शालिनीकडे पाहून विचारले "आपण कांहीं मला म्हणालांत का? शालिनी त्यांच्याकडे पहात सद्गदीत स्वरांत म्हणाली " आतां, मला ओळखली नाहींत तुम्ही ? आबासाहेब दचकून मागें सरले. ते थोडावेळ तिच्याकडे पहात राहिले. शालिनीची ती भयंकर स्थिति पाहून त्यांच्या काळजाचें पाणी झालें. आपल्या हूड तरूण सुस्वरूप शालिनीला इतक्या लवकर म्हातारपणाची कळा आलेली पाहून त्यांना आतोनात वाईट वाटलें. आपल्या समोर उभी असलेली स्त्री आपली हूड हट्टी शालिनी असें समजतांच त्यांचा चेहरा एकदम गंभीर झाला. शालिनी यावेळेस सारी आठ्ठावीस वर्षांची होती. पण ती चाळीशीच्या सुमारास आलेल्या बाईप्रमाणें दिसत होती. काळजीनें आणि दुःखानें तिच्या चेहऱ्यांत इतका विलक्षण फरक झाला होता.

ती अजून सुरेख दिसे. पण तो सुरेखपणा तारुण्यांत दिसणाऱ्या सुरेखपणा सारखा नव्हता. अलिकडे तिचा चेहरा फार गंभीर आणि सात्विक दिसे. आबासाहेबांनीं तिच्याकडे एक मिनीट पाहिलें, आणि लगेंच ओळख पटली असें वाटून ते मोठ्या आश्चर्यानें म्हणाले" कोण? शालिनी !" हो शालिनीच मी." बराच वेळ गेला. कोणीच कांहीं बोललें नाहीं. दोघेंही एकमेकांकडे पहात

उभी राहिली. आबासाहेबांना शालिनीची दया आल्यासारखें दिसलें. शालिनीला पाहून त्यांना आनंदही झाल्यासारखा दिसत होता. ते म्हणाले शालिनी, तुला मी एकच गोष्ट विचारतों. त्याचें उत्तर माझ्यां मनाजोगं मिळालें तर पुढें तुझ्याशीं बोलेन. नाहींतर आपला मार्ग आहे तोच बरा." "विचारा मला बरोबर दिसेल तें मी उत्तर देईन."

"बरोबर दिसेल तेंच दे मी तुला दुसरं एकादं दे. असं म्हणत नाहीं. मला एवढंच विचारायचं आहे कीं, तुला झाल्या कर्माचा पश्चात्ताप झाला का ?" " बाबा, कर्म कसलं ? झालं काय ? आणि पश्चात्ताप तो काय म्हणून व्हायचा ? जी गोष्ट अगदीं बरोबर माझ्या मनाला पटली तीच मीं केली. मी जी गोष्ट करते ती वाईट, असं माझ्या मनाला वाटतं तर ना पश्चात्ताप करावयाचा ? पश्चात्ताप करण्याजोगी निंद्य गोष्ट मी केली आहे असं मला तरी निदान वाटत नाहीं. आपल्याला भेटून पुष्कळ दिवस झाले. मला आपल्याला भेटावेसें वाटलें, तसेंच तुह्माला पण वाटेल असें मला वाटलं होतं. पण तसं कांहीं दिसत नाहीं."

"शालिनी तुला भेटावेसें वाटत नाहीं. ही गोष्ट खरी तरी आहे का ? परंतु तूं जी गोष्ट केलीस ती मला पसंत नाहीं; एवढंच नाहीं तर ती समाजाच्या दृष्टीनें विघातक आहे अशी माझी ठाम समजूत आहे. आणि म्हणूनच जोंपर्यंत तुझी तशी खात्री होत नाहीं, तोंपर्यंत मला तुझ्याशीं कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवावासा वाटत नाहीं. तूं फार मोठी चूक केली आहेस. आणि त्याबद्दल तुला कधीं ना कधीं तरी पश्चात्ताप होईल. याबद्दल मुळींच संशय नाहीं. तुला पश्चात्ताप होईपर्यंत तरी मला तुझ्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. तर आतां घरीं जा. उगीच उशीर होईल. आणि मी काय म्हणतो याचा नीट विचार कर.

यावर शालिनी कांहींएक बोलली नाहीं. कमलिनीचा हात धरून ती घरीं जाऊं लागली. तिला आपल्या वडलांचा फार राग आला. ते इतके निर्दय असतील असें तिला वाटलें नव्हतें. घडलेल्या प्रसंगाबद्दल तिला अतिशय वाईट वाटलें. तिचे हात ओंठ सर्व अंग थरथर कांपत होतें. ते कमलिनीच्या लक्षांत आलें. पण तिला त्याचा कांहींच उलगडा पडला नाहीं. शालिनी आपल्या दुःखाचा उमाळा मनांतल्या मनांत गिळून टाकण्याचा प्रयत्न करीत होती. ती आपल्या मनाशीं घडलेल्या प्रसंगाचा विचार करीत मुकाट्यानें चालली होती. आपल्या आईची अशी स्थिति पाहून कमलिनीला चमत्कारीक

झालें. थोडा वेळ गेला. कमलिनीला आईची अशी स्थिति पाहून बरें वाटेना. तिनें तिचा हात हलवून तिच्या तोंडाकडे पहात विचारलें. "आई, कोण ग तो पांढऱ्या दाढीचा बुवा ? शालिनीचें तिच्या बोलण्याकडे लक्ष नव्हतें. तेव्हां कमलिनीनें पुन्हा एकदां हात हलवून तेंच विचारलें. आणि " तो मोठा चांगला दिसतो नाहीं ? " असें आणखी ती ह्मणाली. तेव्हां शालिनीचें लक्ष तिच्याकडे गेलें. आणि ती तिला उचलून आपल्या कडेवर घेऊन ह्मणाली. " ते ते ! ते तुझे आजोबा हो. " कमलिनीनें तेवढें ध्यानांत ठेवलें. आणि आजोबा या शब्दावरच ती विचार करूं लागली. त्या दिवशीं घडलेला सर्व प्रकार तिच्या ध्यानांत होता. आणि ती मधून मधून त्यासंबंधीं आपल्याशींच विचार करीत असे. दुसऱ्या कोणाचा आजोबा पाहिला ह्मणजे तिला आपल्या आजोबांची आठवण होई. आणि आपले आजोबा आपल्याजवळ का रहात नाहींत ? असें तिला वाटे. आपले आजोबा किती तरी श्रीमंत दिसत होते. आणि आपण इतके गरीब कसे ? बरं ते आपले आजोबा असून आपल्या आईशीं बोलणार का नाहींत ? वगैरे प्रश्नानीं कमलिनीला बुचकळ्यांत पडल्यासारखें झालें. याच वेळेपासून कमलिनीच्या मनांत निरनिराळे प्रश्न उद्भवण्यास आणि संशय येण्यास सुरवात झाली. शालिनीला भेटल्यानंतर सुमारें दोन वर्षांत आबासाहेब कीर्तने वारले. शालिनीला पश्चात्ताप होऊन ती आपल्याकडे येईल अशी त्यांना आशा वाटत होती. बरेच दिवस झाले. तरी शालिनीला अजून केल्या कर्माचा पश्चात्ताप होत नाहीं हें पाहून त्यांना फार वाईट वाटलें. त्यांना तिचा फार राग आला. आणि मरतेसमयीं आपल्या इस्टेटीपैकीं त्यांनीं तिला एक छदामही ठेवला नाहीं. आपली सर्व इस्टेट त्यांनीं चार पांच संस्थाना देऊन टाकली. मुलीच्या दुष्कृत्यामुळें आबांना इतक्या लवकर मृत्यु आला असें पुष्कळांस वाटत होतें. आबांच्या मृत्यूची वार्ता ऐकून शालिनीच्या मनाला फार धक्का बसला. आपण आपल्या वडलांना फार दुःख दिलें, असें तिला देखील वाटलें. परंतु कोणत्याही गोष्टींत सुधारणा करावयाची ह्मणजे अशा बारक्या सारक्या अडचणी नेहमीं यावयाच्याच. त्याला भिऊन आपण वागूं लागलों तर जगाचें पाऊल सुधारणेंत कधींच पुढें जावयाचें नाहा. असें तिला वाटलें. झाल्या गोष्टीला उपाय नव्हता; परंतु आपल्या वडलांची आणि आपली शेवटची भेट झाली नाहीं. मृत्यूसमयीं त्यानीं आपल्याला तार पाठवून बोलाविलें नाहीं. याबद्दलच तिला फार वाईट वाटलें.

आतां तिला खरोखरच कमलिनीशिवाय प्रेमाचें माणूस असें कोणी उरलें नव्हतें. तिची आतां एकच इच्छा उरली होती आणि ती म्हणजे कमलिनीनें उच्च शिक्षण मिळवून आपल्या गुणांनीं, आपल्या कृत्यानीं स्त्रीयांची मार्गदर्शक व्हावें, आणि आपले अर्धवट पडलेलें काम शेवटास न्यावे. कमलिनीचें आणि आपलें स्वःताचें रुकुठुकू चालविण्यापुरता पैसा मिळविण्यांत शालिनीचा सर्व वेळ जात असे. आणि त्याबद्दल तिला कधींहीं वाईट वाटत नसे.

---

## प्रकरण सोळावें.

यापुढें शालिनीला पुष्कळ अडचणी आल्या. अगदींच आल्या नाहींत असें नाहीं. कमलिनी आठ एक वर्षांची झाली त्यावेळेस अशीच एक गोष्ट घडली. एक दिवशीं शालिनीनें कमलिनीला निरोप पोंचविण्याकरितां म्हणून एका ठिकाणीं पाठविलें होतें. निरोप पोंचवून कमलिनी परत आली. त्यावेळेस चाळीशीं मोटार उभी होती. ती पाहून कमलिनीला आश्चर्य वाटलें. मोटार पहात ती तेथेंच उभी राहिली. तिनें मोटार पूर्वीं कधीं पाहिली नव्हती असें नाहीं. पुष्कळ वेळां रस्त्यांना जातायेतांना मोटारी पाहिल्या होत्या. परंतु अजून तिनें कधीं स्वतःच्या चाळींत किंवा आसपासच्या चाळींत कोणी मोटारींतून आलेलें पाहिलें नव्हतें. तेव्हां एवढ्या चांगल्या मोटारींतून कोण आणि कोणाकडे आले आहे हें पहाण्याची तिला इच्छा झाली. कमलिनीचा ओढा श्रीमंत असे, कोण श्रीमंत माणसाकडे फार आहे, कोण गरीब आहे, कोणाच्या इथं काय काय सुंदर वस्तु आहेत, कोणाच्या येथें काय नाहींत हें ती फारच बारकाईनें पहात असे. आपल्या इकडे घरीं मोटार ठेवण्याइतके श्रीमंत कोणीच नसून आज ही मोटार कोणाची ? हें समजण्याची तिला फार इच्छा झाली. ती अगदीं मोटारीला हात वगैरे लावून मोठ्या बारकाईनें पाहूं लागली इतक्यांत तिच्या घरीं भांडीं घासायला येणारी मोलकरीण तिच्या जवळून गेली. तिला पहातांच कमलिनीनें लगेंच विचारलं "जयाबाई कोण आलं आहे ग मोटारींतून ?"

" ती आपली ठमाबाई नाहीं का जोशांची तिला तपासायला डॉक्टर सुपेकर आला आहे वाटतं. " असें म्हणूनं जयाबाई पण तेथेंच उभी राहिली.

कमलिनीनें लगेंच आपलें बोट आश्चर्यानें तोंडावर ठेवलें आणि डोळे मोठाले करून ती जयाबाईला म्हणाली, " इतक्या मोठ्या डॉक्टराला बोलावलं ? डॉक्टर मोठे श्रीमंत दिसतात नाहीं ? थोडावेळ थांबून लगेच ती म्हणते "जयाबाई, कोण कोण डॉक्टर ते ? काय त्यांचं नांव सांगितलंत आत्तां ? " "सुपेकर" जयाबाईनें अगदीं हलक्या आवाजांत सांगितलें.

"जयाबाई किती छान मोटार आहे ! असल्या मोटारींतून हिंडायला किती गम्मत वाटत असेल नाहीं ? "

जयाबाई नुसती हंसली; आणि डॉक्टर मोटारींत बसायला येत आहेत असें पाहून झट्‌दिशी दूर जाऊन उभी राहिली. परंतु कमलिनी तेथेंच उभी राहिली. कमलिनी डॉक्टरांच्याकडे अगदीं टक लावून पहात होती. डॉक्टर सुपेकर दिसण्यांत मोठे भव्य होते. पुन्हा त्यांचा पोशाखही कमलिनीचें लक्ष वेधण्याजोगाच ऐटीचा होता. डॉक्टरांच्याकडे पाहिल्याबरोबर श्रीमंत मनुष्य दिसण्यात असावा तर बरोबर असाच असावा असें तिला वाटलें. आणि पुन्हा एकदां मोठ्या अभिमानानें त्यांच्याकडे पाहून ती मोठ्या आनंदानें खुदकन हंसली. कमलिनी आपल्या आईप्रमाणेंच सुरेख असून मोठी गोजीरवाणी दिसे. पुन्हा ती अगदीं मोटारजवळ उभी होती. ह्मणून डॉक्टरांचें तिच्याकडे चट्‌दिशीं लक्ष गेलें. डॉक्टरानीं कमलिनीच्या गालावरून मोठ्या प्रेमानें हात फिरवून विचारलें " बाळ तुझं नांव काय ? तेव्हां पुन्हा हंसून आणि मान थोडी वाकडी करून कमलिनीनें आपलें नांव सांगितलें.

सुपेकरानीं पुष्कळ वेळ कमलिनीकडे निरखून पाहिलें. तिच्याकडे पाहिल्यावर त्यांना कांहीं तरी जबर संशय आला. त्यानीं पुन्हा तिला तिचें नांव विचारलें. तिनें तें पहिल्यासारखेंच सांगितलें. त्यानीं तिच्या डोळ्याकडे आणखी थोडें निरखून पाहिलें. आणि त्यांची खात्री झाली. कमलिनीला पाहून आजोबांचें अंतःकरण द्रवलें. हा एका रक्ताचा परिणाम कीं काय तें न कळे. परंतु त्या मुलीबद्दल त्यांना एकाएकीं प्रेम वाटूं लागलें एवढें खरें. आणि त्यानीं तिला वर उचलून तिचा मुका देखील घेतला. मोटार ड्रायव्हर मोठ्या आश्चर्यानें हा सर्व प्रकार पहात होता. शेवटीं डॉक्टरानीं आपल्या पाकीटांतून एक गिनी काढून कमलिनीच्या हातावर ठेवली. आणि ' ही घे तुला खाऊला ' असें ह्मणून, आणि पुन्हा एकदां तिला कुरवाळून ते मोटारमधें

बसले. मोटार ड्रायव्हरनीं आपल्या शेजारीं बसलेल्या पट्टेवाल्याकडे पाहून डोळे मिचकावलें, आणि दोघेंही एकमेकाकडे पाहून हंसलें. आजच्यासारखा आनंद आजपर्यंत कमलिनीला कधींच झाला नव्हता. कमलिनीनें गिनी अजून पाहिली नव्हती, तिनें ती गिनी अगदीं गच्च हातांत धरून ठेविली आणि आईकडे जाण्यासाठीं धूम ठोकली. सगळी गम्मत आईला केव्हां सांगू असें तिला झालें होतें. ती आपल्या घरीं गेली त्यावेळेस शालिनी लिहीत बसली होती. कमलिनी एकदम तिच्या मांडीवर जाऊन बसली. आणि उजव्या हातानें तिच्या गळ्याला मिठी मारून ती आपल्या डाव्या हाताची मूठ हलकेंच उघडून ह्मणाली " आई तुला एक गम्मत दाखवूं ? " असें ह्मणून तिनें आपली मूठ अर्धवट उघडून पुन्हा गच्च दाबून घेतली.

" पाहूं पाहूं काय आहे तें ? " असें ह्मणत शालिनीनें हलकेंच तिची मूठ सोडविली; आणि गिनी पहाताच कोणी दिली ही तुला ? " असें जरा घाबरून तिनें विचारलें.

कमलिनीनें सर्व घडलेली हकीकत सांगितली. आणि शेवटीं ती म्हणाली " आई, त्या डॉक्टरांचं नांव सुपेकर हो. तुला ठाऊक आहेत का ते ? कित्ती कित्ती श्रीमंत आहेत आई ते ! "

शालिनीच्या एकदम सर्व लक्षांत आलें. ती गिनी पाहून शालिनीला फार वाईट वाटलें. तिच्या हातांतली गिनी घेऊन " ही मी सध्यां पेटींत ठेवतें. मग संध्याकाळीं तुला दुसरी देईन अं " असें म्हणून तिनें तिच्या हातांतली ती गिनी घेतली, आणि संध्याकाळीं दुसरी एक गिनी आणून तिनें कमलिनीला दिली. आणि डॉक्टर सुपेकरांची गिनी पाकीटांत घालून तिनें परत पाठवून दिली. कमलिनीकडून आपल्या गुलामगिरीचा समूळ पाया नाहींसा करावयाचा आहे, तेव्हां तिला होईल तितकें सोन्यापासून किंवा लालूचीपासून अलिप्त ठेवलें पाहिजे. नाहींतर श्रीमंतीच्या मोहाला बळी पडून तिचें कर्तव्य ती करणार नाहीं. अशा शालिनीला भीति वाटत होती. परंतु कमलिनीला डॉक्टर सुपेकरानीं गिनी दिल्यावेळेपासूनच तिला ते फार आवडूं लागले. आणि पुढें जरी तिची आणि त्यांची भेट झाली नाहीं, तरी तिला त्यांचा कधींही विसर पडला नाहीं. डॉक्टरांची आठवण झाली, म्हणजे त्यांची खूप वाखाणणी करून कमलिनी पुन्हा पुन्हा त्या दिवशींचीच गोष्ट शालिनीला सांगे. आणि मी कधीं आजारी

पडलें, तर त्या डॉक्टरानाच बोलाव अं ! असें ती म्हणे. कमलिनीला पाहिल्या दिवसापासून डॉक्टर सुपेकर एकसारखे त्या पोरीबद्दल विचार करीत बसत. तिला पाहिल्यावेळेपासून त्याना कमलाकराची फार आठवण होऊं लागली. तिच्यांत आणि त्याच्यांत विलक्षण सौम्य आहे असें त्यांना वाटलें. तिचे डोळे, तिचे हंसणें, बोलणें, चालणें थेट सर्व कमलाकरासारखे होतें याबद्दल त्यांची खात्री झाली. आणि म्हणून त्यांना ती कमलाकराचीच मुलगी असावी अशी शंका आली. तिला आपल्या घरीं रहावयाला आणावेसें त्यांना वाटलें. पण मन जरा काचरूं लागलें. लोक काय म्हणतील त्यांना भीति वाटूं लागली. प्रत्यक्ष आपली नात ! पण तिला आपल्याकडे कशी आणावी याची त्यांना पंचाईत पडली. कमलाकरानें असा कांहीं विचित्र प्रकार केला नसतान तर नसतं झालं ? पण करायचं काय ? असं कांहीं झालं नसतं, तर आज ती पोर, माझ्या इथें प्रत्यक्ष माझ्या मांडीवर बसून खेळत असती. त्या दुष्टेनें माझ्या पोराला अगदीं मोहिनी घातली; आणि त्याला अक्कलशून्य केलें. तेवढं लग्न केलें असतेन् तर सगळ्यांनाच सुख लागलें असतें. पण नशीबी नाहीं त्याला कोण काय करणार ! असा विचार करतां करतां शेवटीं कमलिनीला कसें तरी करून आपल्या येथें राहाला आणावी असा डॉक्टरांनीं विचार केला. आणि एक दिवस त्यांनीं शालिनीच्या घरीं जाण्याचा हिय्या केला. ते तिच्या घरीं गेले, तेव्हां शालिनी कुठें बाहेर गेली होती. शेजारच्या बिऱ्हाडांत चौकशी केल्यावर, “ त्या इतक्यांत येतील त्यांची येण्याचीच वेळ झालीच आहे. असे एका गृहस्थानें सांगितलें. त्या गृहस्थानें त्यांना आपल्या खोलींत बसण्यास सांगितलें. डॉ० सुपेकरानीं थोडा वेळ वाट पहाण्याचा विचार केला. ते त्या गृहस्थाच्या खोलींत जाऊन बसले. बोलतां बोलतां त्या गृहस्थानें आपल्या कुटंबाची आणि शालिनीबाईची थोडी बहूत ओळख असल्याचे सांगितले. शालिनी बराच वेळ परत आली नाहीं. तेव्हां डॉक्टरानीं त्या माणसाला आपल्या विश्वासांत घेतलें. आणि हलके हलके त्याच्याकडून शालिनीसंबंधाची हकीकत काढून घेतली परंतु त्यांना कळायला हवी होती ती गोष्ट कळली नाहीं. तेव्हां डॉक्टर म्हणाले या शालिनीबाई माझ्या लांबच्या नातलग आहेत. त्याना पैशासंबंधीं नेहमीं अडचणी येत असतील अशी माझी समजूत आहे. पण प्रत्यक्ष त्यांना पैसे देऊं लागलों तर त्या घेणार नाहींत. तर त्यांना मदत कशी करावी अशा मी पंचाईतींत आहे. तुम्ही

त्यांच्या अगदीं शेजारी रहातां तेव्हां मला वाटत तुम्हाला त्यांच्या अडचणी कळवून घ्यायच्या म्हटलं तर सहज कळवून घेतां येईल. मी आपला मनुष्य तुमच्याकडे वारंवार पाठवीत जाईन आणि तुम्हाला जर एकादवेळेस कांहीं कळलं तर त्याला सांगत जा. म्हणजे त्याना नकळत मला मदत करतां आली तर करीन. आज शालिनीबाई भेटल्या नाहींत हें एकप्रकारें बरंच झालं. त्यामुळें मला तुमच्याशीं बोलायला तरी सांपडलं. असें म्हणून डॉक्टरसाहेब त्या मनुष्याकडून आपल्याला शालिनीबद्दलची माहिती देण्याचें अभिवचन घेऊन जाऊं लागले. त्या गृहस्थानेंही डॉक्टरसाहेब जातां जातां आपल्या कुटुंबाची आणि शालिनीबाईंची चांगली ओळख आहे, तेव्हां आपण म्हणतां त्याप्रमाणें मी आपल्याला सर्व कांहीं सहज कळवीन असें सांगितले. आणि पुन्हा शालिनीबाईंना तशीं कांहीं अडचण आली तर आह्मी येथें आहोतच त्यांना मदत करायला. तेव्हां तुह्मी विलकुल त्यांची काळजी करूं नका. असेंही तो म्हणाला. शालिनीबाई स्वभावानें फार चांगल्या आहेत. त्या कधीं कोणाच्या आध्यामध्यांत नसतात. आपलं काम बरं कीं आपण बरं, असा त्यांचा मार्ग आहे. तेव्हां."

'हरकत नाहीं. असं असलं तर असंच असायला पाहिजे.' असें म्हणत डॉक्टर गेले.

पुढें कांहीं दिवसांनीं कमलिनीला एका पाठीमागून एकेक अशी दोन तीन दुखणीं आलीं. पहिल्याप्रथम डांग्या खोकल्यानें प्रवेश केला. डांग्या खोकल्यापाठीमागून गालगुंड, गालगुंडामागून घसा दुखणं, अशी परंपरा लागली होती. सगळी रात्र शालिनीला जागून काढावी लागत असे. असे कितीक दिवस तरी चाललें होतें. औषध देऊन देऊन शालिनी अगदीं कंटाळून गेली. परंतु कमलिनीच्या प्रकृतीला आराम म्हणून वाटेना. रोज दुखण्याचा मान पहावा तो जास्तच. या अशा दुखण्यामुळें शालिनीच्या हातून पैसे मिळविण्याचें काम होईना. रोज खर्च पहावा तो नेहमींपेक्षां दुप्पट. आणि आधार पहावा तर एक कवडीही नाहीं. शालिनीला काम करण्यास मुळीं फुरसतच सांपडेना. सर्व वेळ कमलिनीची सुश्रूषा करण्यांत जावयाचा. शालिनीची अशी दशा झालेली पाहून, त्या गृहस्थानें ही गोष्ट डॉक्टराना जाऊन कळविली. कमलिनीला तुह्मी एकदां स्वतः येऊन पाहाच. असें तो ह्मणूं लागला. तरी डॉक्टर कांहीं दिवस आलेच नाहींत. तेवढ्या दिवसांत एकंदर सर्वच गोष्टी फार वाईट

थराला जाऊन पोहोंचल्या. शालिनीजवळ डॉक्टरचें बिल् देण्यासही पैसे राहिले नाहींत. सर्व कांहीं उधार आणावें लागे. शालिनीचीं एक दोन कामें सुटली. एका वर्तमानपत्रांत निव्वळ स्त्रियांसाठीं ह्मणून कांहीं लेख लिहिले जात असत, तें काम शालिनीच करीत असे. परंतु वेळाच्या अभावामुळें आतां तें तिला करतां येईना. तेव्हां दुसऱ्या एका बाईला तें काम देण्यांत आलें. हें काम सुटून एक दोन दिवस झाले नाहींत तोंच दुसऱ्या एका ठिकाणीं शालिनीला टाईप राईटींगचें काम होतें तेंही गेलें. याप्रमाणें तिला जेवढा कांहीं थोडाबहुत पैशाचा आधार होता तो सर्व गेला. शालिनी मोठ्या संकटांत पडली. आधीं मुंबईची वस्ती. जेथें पैशावांचून एक पाऊल टाकण्याची देखील मारामार, अशा ठिकाणीं मुळींच काम न करतां दोन माणसांचा उदरनिर्वाह कसा चालावा !

पोरीचें दुखणें असें हें तऱ्हेवाईक ! पैशाची ही अशी नड ! परंतु शालिनी कोणाजवळ एक कवडीही मागावयास गेली नाहीं. शालिनीची अशी ही दुर्दशा पाहून पुन्हा एकदां त्या गृहस्थानें डॉक्टरांना कळविलें. शालिनीची हकीकत ऐकल्यावर, डॉक्टरांना थोडासा आनंद झाला. "बरी चांगली आतां सांपडली आहे. आतां पाहूं कसे काय पैसे फेकून देते ती !" असें ते स्वतःशींच म्हणालें. आतां कमलिनी आपल्या ताब्यांत आलीच. असें त्यांना वाटलें. ही संधि साधून डॉक्टर दुसऱ्या दिवशीं शालिनीकडे गेले. कमलिनी अतिशय आजारी होती. कमलिनीला दुसऱ्या एका डॉक्टरचें औषध चालू होतें. घरांत गेल्यावर शालिनीला न विचारतांच डॉक्टर कमलिनीला तपासून पाहूं लागले. "तेव्हां तिला दुसऱ्या डॉक्टरचें औषध चालू आहे. तुह्मीं आणखी तपासण्याची गरज नाहीं" असें शालिनीला एकदां म्हणावेसें वाटलें. परंतु तिच्याच्यानें तसें म्हणवेना. कमलिनी अतिशय आजारी होती. आणि डॉ. सुपेकरांनीं औषध दिलें तर ती लवकर बरी होईल अशी शालिनीची खात्री होती. तेव्हां तिनें अगदीं ओंठावर आलेले शब्द माघारी घेतले, आणि मुकाट्यानें स्वस्थ बसली. कमलिनीनें सुपेकरांना ताबडतोब ओळखलें. त्यांना पहातांच ती हंसली. तिनें आपले दोन्ही हात त्यांना मिठी मारण्यास पसरले. आईनें डॉ. सुपेकरांना बोलावलें ह्मणून तिला फार आनंद झाला. "मला गिनी दिलेल्या सुपेकर डॉक्टरांना बोलाव." असें ती मधून मधून ह्मणे. परंतु शालिनी तिकडे दुर्लक्ष करी. आज डॉक्टर स्वतः होऊनच आले तेव्हां शालिनीला फारसें वाईट वाटलें नाहीं. कमलिनीला

तपासून झाल्यावर डॉक्टर तिच्या केसावरून हात फिरवीत म्हणाले, "कमलिनी आतां लवकर बरं व्हायचं ना ?"

कमलिनी पुन्हां एकदां हंसली.

नंतर शालिनीकडे पाहून ते म्हणाले "तिला इतक्या घाणेरड्या जागेंत ठेवून उपयोगी नाहीं. पुन्हा तिची सर्वच व्यवस्था यापेक्षां जरा ज्यास्त चांगली पाहिजे. नंतर ती दोघें बोलत बोलत बाहेर वऱ्हाड्यांत गेली. तेथें त्यांचें आणखी कांहीं बोलणें झालें.

डॉक्टर म्हणाले. "कमलिनीला माझ्याकडे राह्यला धाडली तर बरं होईल. मी तिला माझी नात असं समजून संभाळीन. अशी तिची रहाण्याची व्यवस्था झाली तर तिचं चांगलं होईल. तिला उत्तम परिस्थितींत रहातां येईल, उत्तम शिक्षण मिळेल सर्व कांहीं उत्तम होईल. तुह्माला कधीं तिला भेटावेसें वाटेल तेव्हां मी तिला तुमच्याकडे एकाद वेळेस धाडीत जाईन. तुह्माला देखील वाटलं तर मी महिना पंधरा रुपये देत जाईन. झालं गेलं तें आतां विसरून जा. आणि त्या पोरीला माझ्याकडे पाठवा. ती पोर फार नाजूक आहे. तिला अशा या दारिद्र्यावस्थेंत राहून मुळींच उपयोगीं नाहीं. तुह्मी आपल्याकडून कितीही उत्तम व्यवस्था ठेवलीत तरी ती तुमच्यानें होणं नाहीं."

हें डॉक्टराचें बोलणें ऐकून शालिनीला फार वाईट वाटलें. महिना पंधरा रुपये स्वीकारायचें तर तिच्या नुसतें मनांतही आलें नाहीं. कमलिनीला आपल्या आजाच्या घरीं जें सुख मिळेल तें आपल्या इथें मिळणें शक्य नाहीं. तेव्हां निव्वळ तिच्या हितासाठींच म्हणून तिला तिकडे धाडावें असें शालिनीच्या मनांत आलें. असा विचार मनांत यायला एकच कारण झालें होतें. आणि तें म्हणजे पहिल्या तारखेला नोटांची बिंडली यायच्या ऐवजीं बिलांची बिंडली तिच्या दृष्टीस पडली. तिच्या डोळ्यापुढें अंधेरी आली. आणि एक क्षणभरच ते एवढें ह्मणताहेत तर कमलिनीला त्यांच्याकडे धाडायला काय हरकत आहे ? असें तिला वाटलें. परंतु लगेच तिला वाटलें कीं, एकदां कमलिनी आपल्या हातांतून गेली ह्मणजे गेली. मग तिचा नी आपला पुन्हा संबंध सुद्धां यावयाचा नाहीं. मग ती आपली कोणी नाहीं, आणि आपण तिचें कोणी नाहीं. असें होईल. आणि इतकें करून शेवटीं कमलिनीला आपल्या सासऱ्याच्या हवालीं करावयाची, तर आजपर्यंत एवढी दगदग सोसली कशाला ? आणि इतकें

दुःखांत आयुष्य कंठलें कशाला ? असेच दिवस काय सदोदीत रहाताहेत ? आजपर्यंत दिवस काढले तसे हेही काढूं. सारे दिवस काय सारखेच असतात ? कांहीं बरे, कांहीं वाईट असें चालावयाचेच. असा विचार शालिनीचा चालला आहे इतक्यांत डॉक्टर पुन्हा ह्मणतात.

"कसला एवढा विचार करतां ? त्या मुलीसाठीं माझा एवढा जीव तुटतो ह्मणून मी तरी म्हणतों. नाहींतर अशाला कोण विचारीत होतं ! माझ्याकडे धाडलींत तर तिचं बरंच होईल. कांहीं वाईट व्हायचं नाहीं.

हो, तें सर्व खरं. पण मला तसं वाटलं पाहिजे ना ! तुमच्याकडे रहायला येण्यांत तिचें कल्याण आहे, हें तुमच्या दृष्टीनें झालं. पण मला तसं कुठें वाटतं आहे ? कमलाकरांना आणि मला जो मार्ग पसंत त्याच मार्गानें आम्ही आपल्या मुलीला वाढविणार. तो मार्ग तुह्माला पसंत आहे का ? ते आमचे स्वातंत्र्याचे विचार तुह्माला कबूल आहेत का ? नाहींत. मग तुमच्याकडे धाडून काय उपयोग ! ती माझी मुलगी आहे, तेव्हां तिला लहानाचें मोठं करणं, तिला देतां येईल तितकें शिक्षण देणं, तिला एक उत्तम नागरीक करणं हें माझं काम आहे. आणि तें मीच केलं पाहिजे. नाहींतर मी तिला जन्म दिला कशाला ? माझं कर्तव्य मींच केलं पाहिजे तें दुसऱ्यानें करून नाहीं चालावयाचं. जें शिक्षण आम्हा दोघांना पसंत नाहीं असं शिक्षण देणाऱ्यांना मी आपली मुलगी कधींही देणार नाहीं. मग त्यानीं मला हजार नाहीं लाख्खो रुपये दिले तरी त्याचा काय उपयोग ! माझ्या मनाप्रमाणें माझी मुलगी शिकल्यानें मला जो आनंद होणार आहे तो आनंद काय ते लाख रुपये मिळण्यानें होणार आहे ! तुम्ही तिला शिकवणार काय ? तर तुझी आई वाईट आहे, आणि तुझा बापही तसाच होता. हेंच ना ! कांहीं नको. असल्या माणसानें दिलेले पैसे मला नकोत. ते मला घ्यावयाचे नाहीत. आणि अशा माणसाकडे मला माझी मुलगी धाडायची नाहीं समजलांत. जा. आणि पुन्हां तुम्ही मला असली लालूच दाखवायला येऊं नका. माझं जे व्हायचं असेल तें होईल. माझी मुलगी जगायची असेल तर जगेल नाहींतर नाहीं जगणार ! आतां मोठा तिच्याबद्दल प्रेमाचा पुळका आला आहे ! आणि तिच्या जन्माच्या वेळेस कुठें गेला होता ! तेव्हां कमलाकरांनीं पैसे ठेवले होते ते कसे घेऊन गेलात. तेव्हां नाहीं त्यांच्या मुलीची कींव आली ती !

" बरं पुरें पुरें ! तुझ्या घरीं न बोलावता आलों म्हणून तुला फारच फावलं. तुझ्या मुलीचच कल्याण त्याच्यांत आहे म्हणून मी तरी म्हटलं. मला कशाला नाहींतर नसती भानगड पाहिजे आहे ? " असें म्हणून डॉक्टर रागारागानें निघून गेले.

डॉक्टर गेल्यावर शालिनी आपल्या खोलींत गेली. तिनें आपलें पैशाचें पाकीट उघडून पाहिलें. त्यांत एक दिडकीही नव्हती. आतां कमलिनीनें दूध मागितलें तर तिला कोठचें दूध देऊं ! असें ती मनाशींच म्हणाली. " हाय ! देवा भगवाना ! गरीबाचा कोणी वाली नाहीं. सत्याची कोणाला चाड नाहीं. " असे उद्गार तिच्या तोंडून बाहेर पडले. ती कमलिनीच्या अंथरूणापाशीं गेली. कमलिनीला झोप लागली होती. शालिनी तिच्या अंगावर हात फिरवीत तिच्याकडे प्रेमपूर्ण नेत्रांनीं पाहूं लागली. तिचें डोकें विचारानें, दुःखानें आणि काळजीनें अगदीं भणाणून गेलें होतें. कमलिनीला बराच वेळ झोप लागली होती. थोड्या वेळानें शालिनी उठली. तिनें आपल्या टेबलाच्या पुढांतून कागद पेन्सील काढली. आणि ती कमलिनीच्या बिछान्याशीं बसून लिहूं लागली. मनांत जें जें कांहीं येत होतें तें तें ती सर्व लिहीत सुटली. रात्रीचे बारा वाजले तरी शालिनी लिहीत होती. आपल्या भोंवती काय चाललें आहे आणि काय नाहीं, याकडे तिचें मुळींच लक्ष नसावें असें दिसत होतें. अखेर बारा वाजायच्या सुमाराला तिचें लिहिणें संपलें. तिनें त्या कागदाची घडी करून एका पाकीटांत घातली. आणि उजाडल्यांबरोबर तें पाकीट एका वर्तमान पत्राच्या संपादकाकडे तिनें पाठवून दिलें. लेख शालिनीच्या अगदीं मनाप्रमाणें लिहिला गेला होता. तो छापण्यासाठीं पाठविण्याचें ठरलें. परंतु शालिनीच्या मनाला चैन म्हणून पडेना. कमलिनी झोपेंत एकसारखी विव्हळत होती. तिच्या उशाशीं शालिनी समोरच्या कोनाड्यांत जळत असलेल्या दिव्याकडे पहात विचार करीत होती. पहाट होत आली, परंतु शालिनीला झोप येण्याचें चिन्ह दिसेना. इतक्यांत कोणीतरी शेजारच्या खोलींत अभंग म्हणू लागले. तो सुस्वर ध्वनी कानीं पडतांच तिलाही अभंग म्हणून ईश्वराची प्रार्थना करण्याची इच्छा झाली. तिनें आपले हात जोडले. आणि ती ईश्वराची आराधना करण्यांत अगदीं तल्लीन होऊन गेली. मनसोक्त अभंग म्हणून झाल्यावर तिनें एक दीर्घ निश्वास सोडला आणि तिनें एकाद्या आपल्या समोर असलेल्या माणसाशीं बोलावें त्याप्रमाणें ईश्व-

राला हाक मारून मोठ्या केविलवाण्या स्वरांत म्हणू लागली " ईश्वरा, ही सृष्टी तूं निर्माण केलीस असें सगळे लोक समजतात. आणि मलाही तसेंच वाटतें पण तुझी करणी इतकी निष्ठुरपणाची कशी? त्यांत इतका अमंगळपणा कसा? हें मला कोणी समजावून सांगेल तर किती बरें होईल! तूं गरीबांचा वाली. तूं गरीबांचा कनवाळू असं लोक समजतात. परंतु कितीक गरीब लोकांची याबद्दल खात्री होत असेल! मला तर वाटतं येथें गरीबांचा कोणी वाली नाहीं. प्रामाणीकपणाची कोणाला चाड नाहीं, सत्याची दुनीया नाहीं: जगाचा मार्ग एक आणि तो ह्मणजे अन्यायाचा. माणसानें एक अन्यायानें तरी वागलं पाहिजे. नाहींतर अन्याय सोसला तरी पाहिजे. हें असें विचित्र जग उत्पन्न करण्याची काय गरज होती. हें बा ईश्वरा तूझें तूंच जाणोस. इतक्यांत " आई " असा शब्द शालिनीच्या कानीं पडला. आणि ती लगेच काय काय " काय बाळ? तुला कसं आतां वाटतं?" असें ह्मणत तिला आपल्या मांडीवर उचलून घेऊं लागली.

---

## प्रकरण सतरावें.

कमलिनी दहा वर्षांची झाली, त्यावेळेस शालिनीच्या आयुष्यांत एक मोठी गंमतीची गोष्ट घडून आली. कमलिनीची स्थिति अलिकडे बरीच बरी झाली होती. तिला कोणत्याही गोष्टीचा अलीकडे विशेष त्रास नसे.

आतां ती बऱ्याच ठिकाणीं जाऊं येऊं लागली होती. अर्थात त्यापैकीं बऱ्याच लोकांना तिची खरी हकीकत माहीत नसे. तिच्या प्रेमळ गोड स्वभावामुळें लोकांना ती आवडे आणि ह्मणून ते तिला आपल्या घरी बोलावींत. परंतु एक घर असें होतें कीं तेथें तिची खरी हकीकत माहीत असून देखील त्या घरांतली माणसें तिला मोठ्या आग्रहानें बोलावून नेत. शालिनीचे वर्तमान पत्रांतले मासीकांतले वगैरे ठिकाणचे लेख वाचून एका गृहस्थाला तिच्याबद्दल आदर वाटूं लागला होता. या गृहस्थाच्या मनांत शालिनीची आणि आपली ओळख व्हावी असें फार दिवसापासून होतें. आणि त्याप्रमाणें एक दिवस योग घडून आला. गृहस्थ दिसण्यांत मोठा तरतरीत दिसे. तो कमलाकरापेक्षां वयानें जरा लहान होता. जवळ जवळ शालिनीच्याच वयाचा होता ह्मटले तरी

चालेल. मनुष्य मोठा हुशार आणि होतकरू होता. त्याचे विचार शालिनीसारखेच स्वतंत्र असत. सामाजीक कामांत त्याचें फार लक्ष असे. शालिनी-बद्दल त्याच्या मनांत विलक्षण पूज्यबुद्धि आणि आदर वसत होता. तिच्या शुद्ध अंतःकरणाची त्याला खात्री पटली. तिचा सरळपणा, तिचे प्रगल्भ विचार, तिचें सौंदर्य वगैरे गोष्टींमुळें त्याचें तिच्यावर हळू हळू प्रेम बसलें. पुष्कळ वेळां ही गोष्ट शालिनीजवळ बोलावी. असें त्याला वाटले. परंतु तिला असें विचारलें तर कसें काय वाटेल याचा त्याला अंदाज करता येईना. शालिनीच्या वर्तनावरून पुष्कळ वेळां त्याला असें वाटे कीं हिला असें कांहीं आपण विचारले तर तिला फार वाईट वाटेल. कदाचित ती आपल्याशी बोलाचालायचें देखील कमी करील. आणि पुष्कळ वेळां त्याला असें वाटे कीं कांहीं नाहीं. तिला बिलकुल असें कांहीं वाटणार नाहीं. तिला आपण विचारतांच आपल्या म्हणण्यास रुकार देईल.

प्रभाकराचें असें मत झालें यांत विशेष नवल नाहीं. पुष्कळ वेळां एकादी विधवा स्त्री जरा आनंदीत दिसली म्हणजे तिच्या बद्दल आपण आपलें असें मत करून घेतो. अशा बाईनें एकादवेळेस जरा चैनीच्या गोष्टी केल्या तर आपल्याला चमत्कारीक वाटतें. ती आपल्या मृतपतीला विसरली, तिला आतां त्याच्याबद्दल कांहीं वाटत नाहीं असें आपण म्हणूं लागतो. आपण नेहमींच तिला दुःखी पहातो म्हणून तिनें एकादवेळेस जरी अशी गोष्ट केली तरी ती आपल्या डोळ्यांत भरते. आणि तिला आपल्या पतीबद्दल कांहीं वाटत नाहीं असें म्हणतो. परंतु असें म्हणायच्या वेळेस तिच्या पतीला वारल्याला किती दिवस झाले याचा विचार आपण करीत नाहीं. तिचा पती वारल्यापासून किती नानाविध गोष्टी घडल्या आपण याकडेही कधीं लक्ष देत नाहीं. आणि विनाकारण तिच्या पदरीं निष्ठुरपणाचा दोष लावतो. एकाद्या विधवा स्त्रीनें पुनर्विवाह केला तर तिला आपल्या पहिल्या पतीबद्दल कांहीं वाटत नाहीं असें समजणें अगदीं चुकीचें होईल. तिनें आपल्याला सुख लागेल अशा कांहीं गोष्टी केल्या तर त्याबद्दल तिला दोष देणें केव्हांही अविचाराचे होईल. कारण मनुष्यप्राण्याची जन्मतःच आपल्याला सुख मिळेल अशा गोष्टी करण्याकडे ध्यान असते. तेव्हां या नियमाला विधवा स्त्रीच कशी अपवाद होऊं शकेल? आपले आईबाप वारतात तेव्हां नाहीं कुठें आपण वैराग्य घेत? आईबाप वारले

तरी एकावरएक अशीं लग्न करून लाडू झोडतोच कीं नाहीं! मग एकाद्या बाईचा नवरा वारला असताच तिनें एवढें वैराग्य काय ह्मणून धरावे? काळ जसजसा जातो तसतसा आपल्याला गतगोष्टीचा विसर पडत जातो. मग तो मनुष्य आपल्याला कितीही प्रिय असला तरी त्याची आठवण तितकी तीव्र रहाणे कधींच शक्य नाहीं. असो.

पहिल्या पहिल्यांदा प्रभाकराला शालिनीबद्दल वाटत असलेलें प्रेम तिच्याजवळ व्यक्त करूं नये असें वाटे. शालिनी अगदीं दुःखानें होरपळून गेली आहे. तिच्यांत आतां कांहीं राम उरला नाहीं तिला ऐहिक सुखाची आतां विशेष आवड नाहीं. तेव्हां अशा वेळीं आपण तिला ही कल्पना सुचविली तर ती तिला विषाप्रमाणें कडू वाटेल असें प्रभाकराला वाटे. परंतु शालिनी वारंवार प्रभाकराला आपल्या घरीं बोलावी. तेव्हां त्याला स्वतःचा तिच्याबद्दल झालेला समज गैरसमज आहे असें वाटे. आपल्या सहवासांत शालिनी असली ह्मणजे ती आपलें दुःख विसरून जाते. तिच्या तोंडावर एक तऱ्हेची टवटवी दिसते. अशी प्रभाकराची पक्का समजूत झाली. प्रभाकरालाही शालिनीच्या खोलींत बसून गप्पा मारण्यांत एकप्रकारचा विलक्षण आनंद होई. संध्याकाळीं घरीं परत जाण्याची वेळ झाली ह्मणजे त्याचे पाऊल तेथल्या तेथेंच गुटमळूं लागे. तो "आतां जातो. आतां जातो" असें म्हणत सहज एक अर्धा तास तरी तेथें घालवी. शालिनी क्वचित कधीं जरा त्याच्याजवळ आली तर त्याच्या अंगावर रोमांच उठत. पुढें पुढें न कळत तो शालिनीचें अंतःकरण आपल्याकडे वळेल, तिचें आपल्यावर प्रेम बसेल अशा तऱ्हेनें वागूं लागला. शालिनीचें त्याच्याशीं फारच मोकळें वर्तन असे तरी त्याला आपलें प्रेम शालिनीपाशीं व्यक्त करण्याचें धैर्य होईना.

शालिनीची हकीकत ऐकून पुष्कळ लोक तिच्यासंबंधीं आपली भलतीच समजूत करून घेत. आणि तिच्याशीं लघळपणा करावा ह्मणून तिच्या घरीं जात. त्यांना वाटे पुनर्विवाह करण्याचा दोष माथी न घेतां आपला कार्यभाग साधायला हें ठिकाण बरें आहे. परंतु शालिनी इतकी चाणाक्ष होती की ती मनुष्याला पहाताच त्याचा आपल्याकडे येण्याचा हेतु काय आहे तो ओळखी, आणि त्याला बसायला खुर्ची वगैरे देऊन आपल्या वक्तृत्वानें त्याच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घाली. असें झालें म्हणजे या खोलींतून एकदां बाहेर केव्हां पडतो असें बिचाऱ्यांना होऊन जाई. परंतु प्रभाकराची अशी गोष्ट नव्हती. तो स्वभावानें फारच

भिडस्त असे. तो शालिनीकडे तिनें बोलावल्याशिवाय किंवा तसेंच जरुरीचें काम असल्याखेरीज येत नसे. त्याचें तिच्यावर प्रेम होतें. परंतु शालिनीशीं त्याचें वर्तन फारच सभ्यपणाचें असे. बरीच दाट ओळख झाल्यावर तीं दोघें सभेला, व्याख्यानाला, फिरायला वगैरे ठिकाणीं एकत्र जाऊं लागलीं.

पुढें पुढें दर रविवारीं तीं दोघें वसई वांद्रा, नाहींतर कुर्ला अशा ठिकाणीं जात आणि सबंध दिवस तेथें मजेंत घालवून मग घरीं परत येत. शालिनीला अजून देखील पूर्वीप्रमाणें लोक काय ह्मणतील याची भीति वाटत नसे. पूर्वीप्रमाणेंच अजून देखील तिच्या आपल्या बरोबर वाटेल तसें वागावयाचें असा तिचा निश्चय असे. मग अंधळ्या रुढीला धरून चालणाऱ्या जगाची ती फिकीर बाळगीत नसे. एक दिवस अशींच तीं दोघे पहाटेच्या गाडीनें वांद्र्यास जावयास निघालीं. वांद्र्याच्या स्टेशनवर उतरल्यावर पायींच समुद्रावर जाण्याचा त्यानीं विचार केला. मनाला आल्हाद देणारी प्रातःकाळची थंडी पडली होती; समुद्राला जातांना दुतर्फा लागणाऱ्या बंगल्यांतून अगदीं शांत होतें. फार झालें तर एकादा गडी नाहींतर एकादा कुत्रा कोठल्या कोठल्या बंगल्यांतून दिसे. कमलिनीही या वेळेस त्यांच्याबरोबर होती. तिला आज फारच गम्मत वाटत होती. ती त्या दोघांचे हात धरून मधोमध चाले नाहींतर मधेंच त्यांच्या खूप पुढें पळत जाई, आणि मग त्यांची वाट पहात उभी राही. पुष्कळ चालून गेल्यावर त्यांना समुद्र दिसूं लागला. पॉईंटला पोंचल्यावर समुद्रकाठीं असलेल्या लहानशा टेकड्यावर सूर्याचीं कोवळीं उन्हें पडूं लागलीं. शालिनी आणि प्रभाकर एका दगडीबाकावर बसून समुद्राच्या लाटाकडे पहात होते. कमलिनी थोडा वेळ त्यांच्यापाशीं बसली. पण लवकरच तिला कंटाळा आला. आणि ती समुद्रकाठीं असलेल्या खडकावर जाऊन खेळूं लागली. तिनें शंख शिंपल्या, गुळगुळीत गोटे वगैरें खिशांत भरण्याचा सपाटा चालविला होता मधून मधून ती एकादा फारच सुरेख शंख मिळाला आहे असें वाटल्याबरोबर पळत पळत जाऊन शालिनीला दाखवून येई. आणि पुन्हा आपल्या शोधण्याच्या कामाला लागे. त्यामुळें त्या दोघांना एकांत बोलण्यास मधून मधून बराच वेळ मिळे. आज हवा फार सुखकारक होती. टेकडीवरच्या लहान लहान रोपट्यांतून बारीक बारीक फुलपांखरें उडत होतीं. त्या फुलपांखरांकडे पाहून दोघांनाही फार आनंद झाला. फुलपांखराला पाहून शालिनी म्हणाली "हे प्राणी किती सुखी!" या प्राण्यांना आपल्या अल्प

आयुष्यांत जितकें सुख मिळतें तितकें आरण या जगांत शंभर वर्षें जगून देखील आपल्याला मिळत नाहीं. तिनें त्यांतलें एक पांखरूं पकडलें आणि प्रभाकराला तें दाखवीत ती म्हणाली " पहा हें किती सुंदर आहे तें ! हें सौंदर्य देखील त्याला स्वातंत्र्यामुळेंच मिळालें आहे. स्वातंत्र्य आणि सौंदर्य हीं एका ठिकाणीं असतात ! " एकीकडे तुह्मी स्वातंत्र्याची महती गातां अहां, आणि एकीकडे त्या बिचाऱ्याला बंदीवासांत ठेवतां आहां, हें काय ? या बिचाऱ्याला सोडून. त्यानें असा काय अपराध केला आहे. ' खरंच गडे ' असें ह्मणून शालिनीनें त्याला सोडून दिलें. आणि ती कौतुकानें त्या पाखरांकडे पहात राहिली. तितक्याच किंबहुना ज्यास्त कौतुकानें प्रभाकर तिच्या चेहऱ्याकडे पाहूं लागला. आणि त्यानें थोड्या वेळानें मनांत घोळत असलेला प्रश्न तिला विचारला.

शालिनीला हा असा एकाएकीं प्रश्न आलला पाहून फार चमत्कारिक वाटलें. लज्जेनें तिचा चेहेरा बदलला. ते शब्द कानीं पडल्याबरोबर आज कित्येक दिवस तिच्या चेहऱ्यावर आनंद दिसला नव्हता तो दिसूं लागला. तिचें प्रभाकरावर कमलकराप्रमाणेंच प्रेम होतें. परंतु ती तें कधीं दिसूं देत नसे. तिनें प्रभाकराचें आभार मानले. ती ह्मणाली.

" प्रभाकर तुह्मी हा प्रश्न विचारलांत याबद्दल मला फार आनंद झाला, परंतु मला तुह्माला नाहीं म्हणणंच भाग आहे. कारण हें पहा, मला ज्या तऱ्हेनें लग्न करणें आवडतें त्या तऱ्हेनें लग्न करण्यास तुम्ही तयार होणार नाहीं, अशी माझी कल्पना आहे.

प्रभाकरानें थोडा विचार करून म्हटलें " माझें तसें मत आहे. पण मी तुम्ही ह्मणतां तसं करण्यास तयार होणार नाहीं खरा. त्यावरून मी लोकापवादाला भितों ह्मणून तयार नाहीं असं बरीक समजूं नका. तुह्मी म्हणतां ती गोष्ट सध्यांच्या परिस्थितींत कृतींत आणण्यासारखी नाहीं. असें मला वाटतें. देशांतल्या एकंदर मुलांची जबाबदारी जेव्हां सरकार आपल्या अंगावर घेईल, आणि स्त्रियांना प्रत्येक बाबतींत पुरुषासारखेच हक्क मिळतील तेव्हां तुह्मी ह्मणतां अशी गोष्ट होणं शक्य आहे. त्याशिवाय तुह्मी म्हणतां अशा तऱ्हेनें लग्न करणें केव्हांही स्त्रीला धोक्याचेंच आहे. तत्वासाठीं भांडणें आणि हाल सोसणें ही गोष्ट चांगली आहे हें सर्व खरें. पण हाल सोसण्याचा उपयोग जर होत नसेल तर तें काय म्हणून उगीच सोसायचें ?" शालिनीला प्रभाकराच्या म्हणण्यांत किंचित् तथ्य वाटलें. परंतु तें ती कबूल करीना.

" आजपर्यंत निव्वळ ह्यामुळें तुह्मी आपलें आयुष्य दुःखांत तरी सुखांत कां घालवीत नाहीं ? " असें प्रभाकर म्हणाला.

शालिनी मोठ्या संकटांत पडली. आज कित्येक दिवसांनीं प्रभाकरासारखा मित्र तिला लाभला होता. त्याच्या सहवासानें तिचें आयुष्य बरेंच सुखांत चाललें होतें. तेव्हां अशा माणसाशीं आपण लग्न केलें तर आपले दिवस फारच सुखांत जातील व कमलिनीचेंही त्यामुळें उत्तम होईल. असें तिला वाटलें. आणि एकवार प्रभाकराला ' हो ' म्हणावें असें तिला वाटूं लागलें. परंतु आणखी एक मिनी-टभरच तिनें विचार केला. आणि आपल्या मनोविकारावर विजय मिळविला. नंतर ती आपल्या मनाचा पक्का निश्चय करून प्रभाकराच्या चेहऱ्याकडे पहात ह्मणाली " प्रभाकरपंत, आपण वयानें मोठें झालों म्हणजे या जगांत कोणत्याही एकाद्या चांगल्या गोष्टीचा प्रसार करावयाचा ह्मटलें तर किती कठीण काम आहे हें आपल्या ध्यानांत येऊं लागतें. जन्मतःच सुधारणा-प्रिय असणाऱ्या मनुष्यप्राण्याचा जन्म असल्या रानटी समाजांत होणें या सारखी दुसरी दुर्दैवाची गोष्टच नाहीं. असें मला वाटतें. जगाच्या कटू अनुभवानें, या प्राण्याचे पुष्कळसे चांगले गुण आंतल्या आंत नाहींसे होतात. बाहेरच्या संकटांना भिऊन तो ते बाहेर पडूं देत नाहीं. आणि पुढें वय मोठें झाल्यावर सर्वच बाबतींबद्दल निरिच्छा उत्पन्न होते. आपल्यांत असणाऱ्या गुणांची तीव्रता मंदावूं लागते. आणि कांहीं कांहीं वेळेस, तर ते गुणही दुःखाग्नीत करपून जातात. कांहीं वर्षांपूर्वी मला तुह्मी हाच प्रश्न विचारला असतात आणि विधि करण्याची जरुरी सांगू लागला असतात, किंवा तुझी तत्वं गटारांत फेकून दे, सत्याकडे पाठ फिरव, धडधडीत अन्यायानें वाग अणि या जगांतले सुख उपभोग ह्मणून सांगितले असतेत तर मी आजच्या सारखी उत्तर द्यायला वेळ लावला नसता. एकदम नाहीं ह्मणून सांगून केव्हांच मोकळी झालें असतें. परंतु सध्यांची माझी स्थिति फार कठीण आहे. तुह्मी ह्मणतां तसं करून एकदां या दुःखांतून मोकळं व्हावं असं मला वाटतं. पण तें निव्वळ सुखाच्या लालसेमुळें आहे याबद्दल माझी खात्री आहे. माझं सध्यां तुमच्यावर जसें प्रेम आहे तसेंच कमला-करावरही होतें. मग जी गोष्ट मी कमलाकरासाठीं केली नाहीं ती मी तुमच्यासाठीं तरी काय म्हणून करावी हा प्रश्न आहेच. आतां मला तुमच्या मनाप्रमाणें करावेसें वाटतें, तें निव्वळ मोहामुळें. पण असल्या मोहाला बळी पडण्यांत कांहींच अर्थ नाहीं. या वेळेस मी तुम्ही म्हणतां तसें केलें, तर आत्तापर्यंत मी सोसलेले हाल

सगळं व्यर्थ गेले. मी आपले आत्तांपर्यंतचे सर्व आयुष्य फुकट घालविलें असं होईल. आज मी तुमच्याशीं लग्न केलें, तर माझ्या वडलांच्याच वेळेस तुझं तत्व मोठें आड आलं होतं आणि आतां. कुठं गेलं ? " असें कमालिनी मला केव्हांही विचारील मग मी तिला काय सांगू ? माझ्या अशा वर्तनाबद्दल कमलिनी मला केव्हांही जबाब विचारील. आणि तेव्हां माझ्या वर्तनांत तिला विसंगतपणा दिसून आला तर ती माझी फारच चांगली परीक्षा करील. जें मी कमलाकरासांठीं केलें नाहीं तें मी तुमच्यासाठीं करावें काय ? छे. ! असा धडधडीत अन्याय होणें कधींच शक्य नाहीं. "

"मग काय ? शेवटीं-नाहींतर ? " प्रभाकरानें मोठ्या निराशेनें विचारलें.

"कमलाकर आणि मी राहिलों तसें रहावयाचें नसलें तर नाहीं. "

सध्यां कांहीं सांगूं नको. आणखी थोडा विचार कर आणि मग सांग पण नाहीं म्हणूं नको. असें प्रभाकर विनवूं लागला.

ज्या तत्वासाठीं आपलें सर्व आयुष्य आपण हालांत काढले, तें तत्त्व सोडून द्यावयाचें नाहीं याबद्दल शालिनीचा पक्का निश्चय झाला. " तुह्मी माझा आतां नाद सोडून या. तुह्मां म्हणतां तसं होणं कालत्रयीं शक्य नाहीं. " असें शेंवटीं तिनें प्रभाराला ठासून सांगितलें.

प्रभाकरला तिचें म्हणणें पसंत पडलें नाहीं. तो फार खिन्न झाला. घरीं परत जातांना तो शालिनीला म्हणाला " शालिनीबाई, यापुढें तुह्मी माझ्याशीं यापूर्वी वागत होतां तशाच वागलना ? असें विचारल्याबद्दल तुह्माला राग आला नाहीं ना ? "

" राग येण्याचें काय कारण ? आणि तुमच्याशीं निराळें वागण्याचें तरी काय कारण ? तुह्मी असें विचारलेत ह्मणून तुह्मी कांहीं वाईट ठरत नाहीं. आणि पुन्हा प्रभाकरपंत मित्रांची किंमत न वाटण्या इतके मित्र मला नाहींत. तुह्मीच एकटे अहांत. आणि तेवढेच माझ्या जन्मापर्यंत पुरले तरी मला बस्स आहेत; पुढल्या रविवारीं नेहमींप्रमाणेंच या आणि आम्हाला फिरायला घेऊन जा. "

"मी ह्मणतों तसं झालं असतं तर फार छान झालं असतं; पण तुमच्या मनांत नाहीं तेव्हां आतां नाहींच. आणि यापुढेंही मी लग्न करणें कधीं शक्य नाहीं."

हें शब्द ऐकल्याबरोबर शालिनी म्हणाली "हें काय कांहींतरी वेड्यासारखं बोलतां ?असं म्हणणं अगदीं चुकीचं आहे. आणि खोटंही आहे. हें मी

सांगतें. ब्रह्मचर्यव्रत स्त्रीनें देखील पाळूं नये, मग पुरुषानें तर नाहींच नाहीं पाळूं. असं ह्मणणं सृष्टीनियमाच्या विरुद्ध आहे. मला माझ्या मनाजोगा माणूस मिळत नाहीं, म्हणून मी अशी एकटी राहिलें आहे. जो मनुष्य ब्रह्मचर्य व्रत पाळतो म्हणतो तो तसें पाळीत नाहीं हें खात्रीनें समजावें. असलीं माणसें सभ्यपणाच्या पांघरुणाखालीं अगदीं निंद्य कर्मे करीत असतात, कडकडीत ब्रह्मचर्य व्रत पाळणारे पुरुष फार विरळा. मला बरें वाटावें म्हणून तुह्मी असें करणार असाल तर त्यापासून मला मुळींच आनंद होणार नाहीं. तुमच्या मताशीं जिचीं मतं जुळतील अशी एखादी स्त्री तुह्मास मिळेल, इतके निराश होण्याचें काय कारण ? ”

प्रभाकर कांहीं बोलला नाहीं. तीं दोघे आपल्याशींच विचार करीत घरीं निघून गेली.

---

## प्रकरण अठरावें.

शालिनी इतकी उदार मताची आणि निःस्वार्थी होती तरी शेवटीं आपली स्त्री ती स्त्रीच ! पुढें कांहीं दिवसांनीं प्रभाकराचें दुसऱ्या एका मुलीशीं लग्न ठरलें तेव्हां तिच्या मनाचा आकुंचितपणा दिसून आला. ही आनंदाची बातमी प्रभाकरानें तिला सांगितल्याबरोबर तिची स्थिति विलक्षण झाली. तिचा चेहरा पांढरा फटफटीत पडला. तिच्या डोळयांत अश्रू उभे राहिले, तिला प्रभाकराचा राग आला, ती त्याच्याशीं तुटकपणानें वागूं लागली. प्रभाकराला शालिनीला वाईट वाटलेलें समजलें. तो पुढें तिच्याशीं कांहीं न बोलतां निघून गेला.

तो गेल्यावर शालिनी आपल्याशींच विचार करीत बसली. आपण प्रभाकराशीं अशा तऱ्हेनें वागल्याबद्दल तिलाही वाईट वाटूं लागलें, ती आपल्या मनाची पुष्कळ समजूत घालूं लागली परंतु वाईट वाटल्याखेरीज रहावेना. हा सर्व परिणाम आजपर्यंत चालू असलेल्या गुलामगिरीचा आहे, याबद्दल तिची खात्री झाली. या स्वार्थी प्रवृतीनें जितका मनुष्याचा नाश झाला असेल तितका दुसऱ्या कोणत्याच गोष्टीनें झाला नसेल. महान महान स्त्रीपुरुषांना देखील या स्वार्थी बुद्धीनें कधीं सोडलें नाहीं तर शालिनीची काय कथा ! ही दुष्ट स्वार्थी

बुद्धि आपल्या मनांतून घालविण्यासाठीं शालिनी हरप्रयत्न करीत होती. परंतु वाईट वाटत होतें तें वाटल्याखेरीज राहीना.

जगांतला प्रत्येक पुरुष जोपर्यंत आपलें प्रेम असलेल्या स्त्रीला "तुझें माझ्यावर प्रेम असे तोंपर्यंतच माझ्याशीं बायको या नात्यानें वाग. पुढें वागूं नको असें ह्मणणार नाहीं तोंपर्यंत ही स्वार्थबुद्धि जगांतून कधींही नाहींशी होणें शक्य नाहीं. जोंपर्यंत नवरा आपल्या बायकोला " तुझें माझ्यावर प्रेम नसलें आणि दुसऱ्या एकाद्या पुरुषावर असलें तर खरी गोष्ट दडवूं नको. माझ्यावर वरपांगी प्रेम दाखवून माझ्याजवळ राहूं नको. ज्या मनुष्यावर तुझें प्रेम नाहीं, तो मनुष्य तुला नको, ज्या मनुष्याबद्दल तुला आदर वाटत नाहीं, असल्या मनुष्याच्या स्पर्शानें आपला देह विटाळून घेऊं नको. असल्या मनुष्याला आपला देह विकून स्वतःच्या मुलांना अन्याय करूं नको. आपलें पातीव्रत्य राख. तुला मी हवा असेन तोंपर्यंतच तूं माझी बायको ह्मणून वाग. आपल्या सदसद्विवेक बुद्धीला ज्यास्त महत्व दे. ढोंगीपणा सोडून दे. लोकांची भीति बाळगूं नको. स्वाभाविक शुद्ध प्रेमाचा जिकडे ओघ असेल तिकडे तो जाऊं दे. असें म्हणणार नाहीं तोंपर्यंत मनुष्याची सुधारणा झाली नाहीं. मनुष्य गुलामगिरींतून सुटला नाहीं हें खात्रीनें समजावें. त्याचप्रमाणें जोंपर्यंत स्त्री आपल्या पतीला " माझ्यावर प्रेम असलें तरच माझ्याशीं पती या नात्यानें वाग. मी कोणत्याही प्रकारानें तुझ्यावर ताबा चालवूं पहाणार नाहीं. तुझ्या गळ्यांत लोढणं असल्याप्रमाणें वागणार नाहीं. " असें ह्मणणार नाहीं तोंपर्यंत जागाची खरी सुधारणा झाली नाहीं. आणि जोंपर्यंत अशी सुधारणा होणार नाहीं, तोंपर्यंत एकमेकाच्या बायका पळवणें, प्रेमासाठीं खून होणें, वेश्यांशी संख्या वाढणें यासारखे अनन्वीत प्रकार जगांतून कधींही नाहींसे होणें शक्य नाहीं. तर उलट त्यांची संख्या कदाचित् चक्रवाढव्याजानेंच वाढत जाईल. मत्सरा सारख्या वाईट प्रवृत्ति, मनुष्यमात्राचा जलाल विषाप्रमाणें नाश करतात. असले दुर्गुण जगांतून पार नाहींसे झाले तरच मनुष्यप्राणी कसोशीला उतरला ह्मणावयाचा. हे दुर्गुण आपले पूर्वज जे वानर त्यांच्या अंगचे आहेत. आणि ते आपल्यांत अजून थोड्या बहूत प्रमाणानें दिसून येतात. हे दुर्गुण जोंपर्यंत मनुष्यात दिसून येतील तोंपर्यंत तो रानटी स्थितींतच आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तेव्हां आपलें वर्तन मनुष्यप्राण्याला शोभेल असेंच असणें केव्हांही हितावह आहे. असे अनेक दुर्गुण मनुष्याप्राण्यांत आहेत, त्याचा जितका खल करावा तितका थोडाच आहे.

स्वदेशाभिमान हा अशाच दुर्गुणांपैकीं एक आहे. स्वदेशाभिमानाची दुर्गुणांत गणना केली न जातां सद्गुणांत केली जाते हें जरा नवलाचें आहे. स्वदेशाभिमानाला सद्गुण ह्मणतां येईल; परंतु त्याची जेव्हां स्वार्थासारख्या दुर्गुणाशीं तुलना केली जाईल तेव्हांच फक्त. दोन्ही दुर्गुणाच तुलना करतांनाच त्याला आपण कदाचित् सद्गुण ह्मणूं. या पलीकडे त्याला ज्यास्त महत्व देण्याचें कारण नाहीं. कारण स्वदेशाभिनान ह्मणजे तरी शेवटीं काय तर तर स्वार्थबुद्धीच. माझा देश! मग तो बरा असो, वाईट असो, कसाही असो. तो ह्मणूनच त्याला चांगला ह्मणावयाचें असेल तर फारच उत्तम ! मग तो " माझ्या अंगचा दुष्टपणा असला ह्मणजे चांगला आणि दुसऱ्याच्या अंगचा असला ह्मणजे वाईट." असें ह्मणण्यासारखेंच आहे. तेव्हां माझा देश ह्मणून त्यावर प्रेम करणें केव्हांही चुकीचेंच होईल. स्वार्थबुद्धींत आणि देशाभिमानांत एवढाच फरक कीं पहिल्यांत एका व्यक्तीपुरताच विचार केलेला असतो, आणि दुसऱ्यांत अनेक व्यक्तींच्या समूहातर्फे विचार केलेला असतो. पुष्कळ वेळां तर जे आपल्याला देशाभिमानी म्हणवीत असतात, ते अनेक व्यक्तींच्या हिताचा देखील विचार करीत नसतात, तर निव्वळ आपला वडेजाव व्हावा, आपल्याला पदव्या मिळाव्यात, आपल्या हातांत सर्व सत्ता यावी एवढ्याच इच्छेनें स्वतःस देशाभिमानी म्हणवून घेण्यांत फुशारकी मारतात. प्रत्येक ठिकाणीं मी आणि माझा ! माझा देश आाण दुसऱ्याचा देश ! माझें सैन्य आणि दुसऱ्याचें सैन्य ! सर्व जडजमीन बळकावण्याचा माझा हक्क दुसऱ्याचा नाहीं मी इतर राष्ट्रावर ताबा चालविणार ! दुसऱ्यानें चालवितां उपयोगी नाहीं. परंतु असें कोणी म्हणत नाहीं कीं जें न्याय, ज सत्याला धरून त्या देशाच्या वतीनें मी भांडेन. चांगला मनुष्य केव्हांही असेंच करण्यास तयार होईल. मग तो देश माझा का लोकांचा हें तो पहात बसणार नाहीं, चांगल्या मनुष्याला आपण ज्या देशांत जन्मलों त्या देशानें न्यायानें वागावें असेंच वाटेल, आणि तसें आपल्या देशाचें धोरण असावें एवढ्यासाठींच तो अविश्रांत धडपड करील. पोकळ देशाभिमान उराशीं धरून बसणार नाहीं. परंतु असा नीतीचा मार्ग जो मनुष्य स्वीकारील त्याची चहा स्वदेशाभिमान्याप्रमाणें होणार नाहीं. त्याचे बांधव त्याची गणना केव्हांही वाईट लोकामधेंच करतील.

स्वदेशाभिमानापेक्षांही वाईट दुर्गुण ह्मणजे आपलाच एकट्याचा हक्क आपल्या देशांतील बहुतेक मालमत्तेवर असावासा वाटणें. स्वदेशाभिमानांत स्वार्थापलीकडे कांहीं थोडाबहुत तरी विचार केलेला असतो.

परंतु सर्व मालमत्ता माझ्याच हातांत असावी आणि दुसऱ्यानीं मरावे. असें जेव्हां वाटतें तेव्हां तर उघड उघड स्वार्थापलीकडे कांहींच हेतू नसतो. मग माझा देश आणि दुसऱ्याचा देश हा भाव पार नाहींसा होऊन मी आणि दुसरा एवढाच भाव शिल्लक रहातो. ईश्वरानें सृष्टी निर्माण केली. तेव्हां आपण सर्व ईश्वराची लेकरें. मग सृष्टींतल्या सर्व वस्तु सर्वांना सारख्या का बरं नाहीं द्यावयाच्या ? बापावर सर्व मुलांचा सारखाच हक्क. बाप कांहीं शहाणा मुलगा आणि आडाणी मुलगा असा भेद करीत नाहीं. मग एकानें वाटेल तशा चैनी भोगाव्या आणि त्याच्याच भावानें उपाशी मरावें. असें कसें ? तेव्हां ईश्वर बिश्वर कोणीं नाहीं. उगांच त्या बिचाऱ्याला मधें ओढायचे, झाले. ईश्वरानें सर्व कांहीं निर्माण केलें ह्मणावयाचे पण सर्व कांहीं माझे. आणि मी सर्वांचा स्वामी. ही गोष्ट खरी.

कितीं जमीन जुमला असला तरी पुरत नाहीं. जितकीं जगांतली संपत्ती त्याला आपलाशी करितां येईल तितकी त्याला हवीच. पुष्कळ संपत्ती आपल्या ताब्यांत कशी येईल या चिंतेत तो असतो. बरं एवढा पैसा मिळून तरी त्याची तृप्ती होते का ? छेः ! त्याचें नांव नको ! ज्याच्यामुळें एवढीं संपत्ती मिळते त्या बिच्याऱ्या मजूरवर्गाच्या कष्टमय स्थितीचा एक दिवस तरी बिचाऱ्याच्या मनांत येत असेल तर शपथ ! ते लेकाचे मरेनात ! माझे यथास्थित झाले ह्मणजे झाले. हा मनुष्याचा स्वार्थी स्वभाव नाहींसा झाला पाहिजे. आणि या स्वार्थी स्वभावा बरोबरच गुलामगिरीला चाट मिळाली पाहिजे. सर्वांत कोणता वाईट प्रघात असेल तर तो गुलामागिरीचा. तूं तुझ्याकरितां जन्मला नाहींस, तर माझ्या-करितां मी तुझ्या शरीरावर, मनावर हक्क चालवीन. तूं चालविता उपयोगी नाहीं. सुदैवानें गुलामगिरीची चाल बरीचशी बंद झाली आहे. तरी पण अजून कांहीं बाबतींत दिसून येतें. आणि मुख्यत: दिसून येतें ह्मणजे चालू लग्न पद्धतींत. या पद्धतीनें बाप मुलीला न विचारता आपल्या मनाप्रमाणें तिचे पाहिजे त्या उपटसोंब्याशीं लग्न लावून देतो. पुढें लग्न झाल्यावर नवरा आपल्या बायकोच्या देहावर वांटेल तसा ताबा चालवूं शकतो. मग नवरोजीनें आपल्या बायकोला खुशाल काठ्यांनीं अगर सोट्यांनीं बडवून काढावें. केस धरून फरफर ओढावी. उपाशी ठेवावें. काय लागेल तें करावें. एवढेंच ती मरणार नाहीं अशी काळजी घ्यावी. कारण तसा कांहीं एकाद वेळेस प्रकार झाला तर स्वतःवरच गुदरायची. नवऱ्यानें बायकोला जीव जाई तो मारली,

तरी तिऱ्हाईत कोणी मधें पडणार नाहीं. हो ! बरोबरच आहे. कसा पडेल ? कारण बायकोला मारण्याचा हिंदूधर्मानें त्याला हक्कच दिला आहे. एखाद्या वेडप्यानें विचारलें कीं " का हो हे बायकोला मारतात ? " तर लोक त्याला हंसतील; आणि ह्मणतील " अरे गृहस्था केलं असेल तसं तिनें कांहीं, ह्मणून मारीत असेल. उगीच का कोणी कोणाला मारतो ! कांहीं काम बरोबर केलं नसेल, नाहींतर भातांत खडा निघाला असेल. ह्मणून मारलं असेल. अशा तऱ्हेनें लोक त्याची तरफदारी करूं पहातात. पण तेंच जर का एखाद्या बाईनें, विड्या फुंकून फुंकून घराची भिंत काळी केल्याबद्दल अगर विड्याची थुटकं सर्व घरभर टाकून घाण केल्याबद्दल नवरोजींना खाऊ दिला तर ? ......तर ती गोष्ट ! अबब ! अशी गोष्ट ऐकून लोक जिथल्या तेथें थिजूनच जातील मला वाटतं. यापेक्षां गुलामगिरी गुलामगिरी ती आणखी काय असायची आहे आपल्याप्रमाणेंच स्त्रियांना आत्मा आहे, इच्छा आहेत हें पुरुष विसरून जातात. आणि स्वतःच्या मनाला बरें वाटेल तसें त्यांना वागवतात. कोणी आपल्या बायकांचे पायच वाढून देत नाहींत तर कोणी त्याना रस्त्यानें बुरखा घेतल्या खेरीज जाऊं देत नाहींत. तर कोणी त्यांच्या पायांत दोन दोन शेराच्या बिड्या आडकवून ठेवतात. असो. ही स्थिति स्वतः स्त्रियांनींच सुधारली पाहिजे. असें शालिनीला वाटलें. प्रभाकराचें लग्न ठरलें तर मला इतकें वाईट वाटण्याचें आणि निराश होण्याचें कांहींच कारण नाहीं कदाचित् हे पिढ्यान् पिढ्या अंगांत रुजलेले गुण एकदम जाणार नाहींत त्याला कांहीं काळ जावा लागेल. कदाचित् आपल्याला इतकें वाईट वाटण्याचें कारण आपली परिस्थिति देखील असूं शकेल. अगदीं स्वतंत्र विचाराच्या व्यक्तीला अशा या समाजांत रहाणें फार कठीण. प्रत्येक व्यक्ति समाजाची घटक असते. तेव्हां स्वतंत्र विचाराची व्यक्ति जरी झाली तरी तिला समाजापासून प्रत्येक बाबतींत. तुटकपणें वागणें फार कठीण जाते. समाजांतल्या आणखी कांहीं व्यक्ति शालिनीप्रमाणेंच वागणाऱ्या असत्या तर तिची स्थिति यापेक्षां निराळी असती. प्रभाकर दुसऱ्या मुलीशी लग्न करणार म्हणून आज तिला वाईट वाटत होतें. तसें कदाचित् वाटलें नसतें. सध्यां प्रभाकर काय तो एकटाच मित्र म्हणायला होता. आणि तोही आतां आपण गमावणार. ही भीति शालिनीला वाटत होती. परंतु तिनें विचार केला; आणि आपल्याला वाईट वाटत असलेली तिनें कधींही प्रभाकराला अगर त्याच्या बायकोला दिसूं दिलें नाहीं. मरेपर्यंत शालिनीची आणि प्रभाकराची उत्तम मैत्री राहिली.

---

# प्रकरण एकोणिसावें.

मध्यंतरी कमलिनीचें बाल्य संपून ती चांगली प्रौढावस्थेस येऊन पोंचली. ती शालिनीसारखीच दिसण्यांत सुरेख होती. तिचा बांधा चांगला उंच सडपातळ असून चेहरा मोहक दिसे. परंतु शालिनीच्यांत दिसून येणारें सौजन्य आणि तरतरीतपणा तिच्यांत दिसत नसे.

आजपर्यंत शालिनीनें खस्ता खाऊन कमलिनीला मोठी केली. जिवाचीं काडं करून कमलिनीला योग्य शिक्षण मिळावें ह्मणून खटपट केली. आणि आपल्या कमलिनीनें एकाद्या अद्वितीय स्त्रीप्रमाणें स्त्रीस्वातंत्र्य संघ काढून आपल्या भगिनींना बंदीवासांतून मुक्त करावें अशी आशा केली. परंतु कमलिनी मोठी झाली आणि आपल्या आईजवळ आपले एक विचार सांगूं लागली तेव्हां शालिनीला विलक्षण दुःख झालें. आजपर्यंत एवढ्या प्रेमानें उराशीं बाळगून ठेवलेल्या आशांचा सरवरवा भंग झाला, याबद्दल तिची खात्री झाली. ज्या मुलीवर तिच्या सगळ्या आशा अवलंबून होत्या जी मुलगी आपलें अर्धवट पडलेलें काम तडीस नेईल असें वाटत होतें, तीच मुलगी अगदीं कल्पनेच्या बाहेर अशा कोत्या विचारांची निघाल्यावर शालिनीला दुःख कां होणार नाहीं? यापेक्षां शालिनीच्या काळजाला घरें पाडणारें असें दुःख तें कोणतें होतें? आपल्या पोटीं इतक्या कोत्या विचारांची मुलगी जन्मास आली हें पाहून शालिनाला राहून राहून आश्चर्य वाटे. आपल्या मुलीचे विचार एकाद्या साधारण माणसाप्रमाणें असावेत ह्मणजे काय! ती अशी कशी निघाली! ती दुसरीकडे कोठें जाऊन हें शिकली कीं काय? वगैरे पुष्कळ विचार शालिनीनें केला. परंतु कमलिनीचे असे विचार बनण्यास वंशपरंपरेशिवाय तिला दुसरें कोणतेंच कारण दिसेना. डॉ. सुपेकरांच्या बरेचसे अंगचे गुण तिच्या अंगीं दिसून येत असत. वंशपरंपरेनें चालत येणाऱ्या गुणांचा माणसाच्या स्वभावावर जितका परीणाम होतो तितका दुसऱ्या कोणत्याच गोष्टीचा होत नाहीं. एकाच आईबापाच्या पोटीं जन्मास आलेली मुलें किती तरी भिन्न भिन्न विचारांची निपजतात. एक भाऊ अगदीं नव्या विचारांचा तर दुसरा भाऊ अगदीं जुन्याचा कट्टा अभिमानी तर तिसरा अगदींच कांहीं निराळा निघतो. तिघे तर एकाच तऱ्हेच्या शिक्षेंत वाढलेले! एकाच आईचें दूध प्यालेले! परंतु त्यांच्यांत इतके

थोरलें वैचित्र्य दिसून येतें, याला काय म्हणावयाचें ! तेव्हां आईबाप जसे असतात तशींच मुलें निघतात असें कांहीं निव्वळ नाहीं. मागील सर्व पिढ्यांचा नवीन प्राण्यावर थोडाबहुत तरी परिणाम घडत असतो. मुलें चांगली निपजणें अथवा न निपजणें हें नुसत्या आईबापावरच अवलंबून नसतें. किंवा नुसत्या भोंवतालच्या परीस्थितीवरही अवलंबून नसतें. आतां परिस्थितीचा कांहींच परिणाम घडत नाहीं असें नाहीं. घडतो. पण तो फारच थोडा असतो.

याप्रमाणें कमलिनीच्या वर्तनांत फारच लहानपणापासून कोते विचार, रुढ चालीला धरून वागण्याची आवड, पैशाची हाव, फाजील लाजाळूपणा वगैरे गुण दिसूं लागले होते. ती लहानपणापासून अगदीं नव्या वातावरणांत वाढलेली ! परंतु तिचे विचार अगदींच तिला न शोभणारे असे होते. यामुळें मायलेकींच्या विचारांत जमीनअस्मानाचें अंतर पडूं लागलें. आणि आपल्या आईच्या मनाविरुद्ध वागण्याची पाळी कमलिनीवर वारंवार येऊं लागली. आपल्या मुलांचे स्वभाव आपल्याला हवे तसे बनविणें ही आईबापाच्या हातची गोष्ट नाहीं. एवढें शालिनीला कळून चुकलें. कमलिनीला अगदीं लहानपणापासून आपल्या आईच्या विचारापेक्षां शेजारणी-पाजारणींचेच विचार ज्यास्त पसंत पडत. कमलिनीचा रुढ विचाराकडे ओढा होता हें शालिनीच्या पूर्वीच लक्षांत आलें होतें. परंतु अजून लहान पोर आहे, समजूं लागल्यावर सर्व कांहीं ठीक होईल. असें तिला वाटे. श्रीमंत माणूस म्हणजे कमलिनीचा देव ! रावसाहेब रावबहादूर, चाकर नोकर, गडी माणसें गाड्या घोडीं, दाग दागिनें यासारखे कमलिनीला कांहींच प्रीय नसेल. गरीब माणूस पाहिला कीं कमलिनी त्याला कसपटाप्रमाणें वागवी. अशा तऱ्हेचें कमलिनीचें वर्तन पाहून शालिनीला फार दुःख होई. परंतु सध्यां कमलिनी लहान आहे. लहानपणीं काय मूल दुसऱ्याचें पाहतें तसें करतें. पाहिलें असेल कोणाचें म्हणून करीत असेल. जाईल पुढें ही संवय. अशावर गेलें. परंतु थोड्याच दिवसांत कमूबाई मोठ्या झाल्या. आणि जवळ एक फुटकी कवडीही नसतां त्यांचा तोरा जशाचा तसाच कायम राहिला. तेव्हां ही बालपणची खोड नसून, आपल्या मुलीच्या अंगीं हा उपजतच दुर्गुण आहे असें शालिनीला कळून चुकलें. स्वभावानें चांगला, शहाणा, शिकलेला असा माणूस कमलिनीच्या फारसा पसंतीस पडत नसे. पण तोच एकादा

३७ ब. नारायण पेठ, पुणे

संस्थानिक, श्रीमंत, पदवीधर, सावकार, व्यापारी असा म्हणजे तो कमलिनीला आवडलाच ह्मणून समजायला हरकत नाहीं. ही कमलिनीला असलेली पैशाची हाव पाहूनही शालिनीला फारसें वाईट वाटत नसे. तिला या गोष्टीकडे काना डोळा करतां येई. परंतु शालिनीला सर्वांत वाईट वाटे तें याबद्दल कीं कमलिनीला अमूक गोष्ट बरोबर किंवा चुकीची याबद्दल कांहींच वाटत नसे. जें समाज करतो तें बरोबर; आणि जें करीत नाहीं तें चुकीचें एवढेंच तिला वाटे. ती स्वत: कोणत्याच गोष्टीचा विचार करीत नसे. खाणेंपिणें आणि कपडालत्ता मिळविण्यांतच सारा जन्म घालविणाऱ्या माणसांपैकीं कमलिनी होती. शालिनीला वाटत होतें तसलें काम करण्याची तिची मुळींच इच्छा नव्हती. तेव्हां शालिनीची निराशा होणें अगदीं साहाजिक होतें. आत्तांपर्यंत तरी कमलिनीच्या दृष्टीनें शालिनी प्रत्येक बाबतींत नापासच झाली होती परंतु शालिनीची अजून खरी परीक्षा होती ती पुढेंच होती. आजपर्यंत आपल्या प्रत्येक कृत्याचा जबाब आपल्याला कमलिनीसमोर द्यावा लागेल हें सतत मनांत बाळगून शालिनीनें आपलें वर्तन ठेविलें होतें. आपल्या वर्तनांत विसंगतपणा दिसतां कामा नये असें तिला नेहमीं वाटे. आणि त्यासाठीं ती नेहमीं काळजी घेई. आपण कितीही चोख रीतीनें वागलों, आणि कमलिनीला कोणत्याही बाबतींत अन्याय होऊं नये ह्मणून काळजी घेतली तरी तिला आपला मार्ग पसंत पडणार नाहीं असें शालिनीला आतां खात्रीपूर्वक वाटत होतें. शालिनीनें जी गोष्ट केली ती बरी का वाईट हें समजण्याजोगी कमलिनी आतां मोठी झाली होती. आपली स्थिति आसपासच्या मुलींपेक्षां बरीच निराळी आहे, असें तिच्या आतां लक्षांत येऊं लागलें होतें. तिच्याकडे बोटें दाखवून कुजबुजतांना लोकांना पुष्कळ वेळां तिनें पाहिलें होतें. परंतु आजपर्यंत तिला ते असे का कुजबुजतात हें कळून घेण्याची जरुरी वाटली नाहीं इतर मुलांना कायद्याचा शिक्का मिळालेला आहे. असें अलिकडे कमलिनीला वाटूं लागलें होतें. ती आडून आडून शालिनीजवळ त्यासंबंधीं चौकशी करी. तेव्हां शालिनीनें एक दिवस तिला आईबापांच्या कर्तव्याविषयीं आपल्याला बरोबर वाटत असलेलें तत्व तिला सांगून टाकलें. परंतु शालिनीनें सांगितल्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. आपल्या मुलावर आपल्याला हवी हवी तशी छाप बसवितां येईल किंवा आपल्या मनाप्रमाणें त्यांचे स्वभाव बनवितां येतील हें जें आईबापांना वाटत असतें तें पुष्कळ

वेळां चुकीचें ठरतें. प्रत्येक माणसाच्या स्वभावांत कांहींना कांहीं खुब्या असेत. आणि या खुब्या आपण बदलूं ह्मटलें तरी त्या बदलणें कधींही शक्य नसतें.

कमलिनी अगदीं लहानपणापासून शालिनीपेक्षां फार निराळ्या स्वभावाची होती. शालिनीनें आपल्याकडून तिला पुष्कळ शिकवावयाचें तें शिकविलें परंतु त्याचा कांहींही उपयोग झाला नाहीं. कमलिनीनें आपल्या आजोबांना अगदीं लहान असतां प्रार्थनासमाजांत पाहिलें होतें. त्या प्रसंगाची तिला नेहमीं आठवण होऊन मनांत संशय येई. ते आपले आजोबा असून त्यांची नी आपली पुन्हा कधींच कशी गांठ पडली नाहीं ? आपले आजोबा इतके श्रीमंत असून आपण इतके गरीब कसे ? आपल्याला अंगांत घालायला साधे सुद्धां चांगले कपडे नसा-वेत, आणि आपले आजोबा पाहिले तर थेट साहेबाच्या पोशाख केलेले ! हें असें कसें याचें तिला नेहमीं गूढ पडलेलें असे. कमलिनी मोठी होत चालली तसें तिला हें कोडें उलगडण्याची ज्यास्तच आतुरता वाटूं लागली. आपले आजोबा इतके श्रीमंत असून आपल्याला कधींच कसे पैसे पाठवीत नाहींत ? निदान आईला तरी तिकडे कसे घेऊन जात नाहींत ? ते तर स्वभावानें फार चांगलें आहेत असें आपण ज्याच्या त्याच्या तोंडून ऐकतों, आणि हें असें कसें काय होतें याचें तिला फार नवल वाटे. बरं आपल्या बापाची हकीकत तर आपली आई आपल्याला कांहींच सांगत नाहीं. तेव्हां आपले आजोबा आपल्या आईला अशा रीतीनें वागवतात तेव्हां त्याला तसंच कांहींतरी कारण असलं पाहिजे असें तिच्या मनाला एकसारखें वाटूं लागलें. पहिल्यापहिल्यांदा कमलिनीला फक्त असें वाटे कीं, आपली आई सुधारक मताची आहे म्हणून बाकीचे लोक तिच्याशीं फारसा संबंध ठेवीत नसतील. परंतु पुढें पुढें तिला आपले आजोबा इतक्या जुन्या पंथाचे आहेत असें तिला वाटेना. कारण आजोबा प्रार्थनासमाजीस्ट आहेत हें तिला कळलें होतें. आजोबांचें नी आपल्या आईचें आज बरें असतें तर किती चांगलें झालें असतें ! आईच्या कांहीं तरी चुकीमुळें अगर हट्टामुळें आज आपलें भयंकर नुकसान होत आहे. हें तिच्या कसं लक्षांत येत नाहीं. हट्टच असला तर वागलं थोडसं लोकांच्या मतानें ह्मणून काय झालें. आज इतक्या लोकांना वाटतें तें चुकीचें आणि हिला वाटतें तेवढेंच खरें कीं काय ! सर्व अकलेचं भांडवल देवानें हिलाच दिलें आहे कीं काय ? कमलिनीनें पुष्कळ आपल्या डोक्याला त्रास दिला. परंतु कांहीं तिला हें गूढ उकलेना.

... टी ग्रंथ... ३२७१, नारायण पेठ, पुणे

आपली आई एकटीच रहाते, याला कांहींतरी जबरदस्त कारण असलें पाहिजे याबद्दल तिच्या मनाची खात्री झाली. परंतु आईला विचारण्याचें धाडस तिच्या-च्यानें करवेना. एक दिवसें आपल्याशींच विचार करीत असतां तिच्या मनांत असें आलें कीं, आपल्या आजोबांचें आडनांवही कीर्तने आणि आपलें आडनांवही कीर्तने हें कसें काय ? तेव्हां तिनें शालिनीला विचारलें "आई, आजोबांचं आणि आपलं आडनांव एकच कसं ग ? तुझं लग्न काय तुझ्या चुलतभावाशीं झालं हो ? कमलिनीचा असा चमत्कारिक प्रश्न ऐकून शालिनी चपापली. तिचा चेहरा एकदम् बदलला. कमलिनीनें असला प्रश्न पूर्वी कधींच विचारला नव्हता. तेव्हां तिच्या मनांत आपल्याबद्दल कांहीं संशय उत्पन्न झाला असावा असें तिला पक्कें वाटलें.

शालिनीनें आपल्या कापऱ्या आवाजांत उत्तर दिलें. "नाहीं. पण आज तूं असा कां बरं प्रश्न विचारलास ? "कारण" कमलिनी जरा लाजून ह्मणाली "मला असं वाटलं कीं आपलं नी तुझ्या आबांचं आडनांव एकच कसं ? सासरचं आणि माहेरचं आडनांव एकच नसतं. पण तुझं तर एकच आहे.

याच वेळेस कमलिनीला सर्व कांहीं सांगून टाकावें असें शालिनीला वाटलें नाहीं. तुझे वडील माझ्या नात्याचे नव्हते, एवढेंच सांगून तिनें विषय बदलला. परंतु ही गोष्ट कमलिनीच्या संशयाला ज्यास्तच कारणीभूत झाली.

शालिनी कमलिनीला घरींच शिकवीत असे; शाळेंत गेल्यानें तिचा वेळ चांगला जाईल, आपल्या बरोबरीच्या मुलींबरोबर वेळ गेला तर तिला बरें वाटेल असें वाटून तिनें कमलिनीला शाळेंत घातलें. कमलिनीला शाळेंत घेण्यासंबंधीं पहिल्यांदा थोडी कुरकुर झाली, पण फारसा ह्मणण्यासारखा त्रास झाला नाहीं. कमलिनीच्या क्लासांतल्या मुली बहुतेक जुन्या विचाराच्या होत्या. तेव्हां कमलिनी त्यांच्या संगतीनें ज्यास्तच जुन्याची अभिमानी बनली. वर्गांत पुष्कळ मुलींच आणि तिची चांगली गट्टी असे. त्यांच्या बोलण्यावरून आपल्या आईसंबंधीं त्यांना बरीच माहिती असावी असें तिच्या लक्षांत आलें होतें. त्या मुली नेहमीं कमलिनीजवळ शालिनीसंबंधीं फार बारका-ईची चौकशी करीत. या मुलींची इतकी बारकाईनें चौकशी करण्याचा हेतू चांगला नाहीं, हें तिच्या लक्षांत आल्यावर ती त्यांच्या प्रश्नाचीं उत्तरें देण्याची टाळा-टाळ करूं लागली. परंतु हा काय घोटाळा आहे हें जाणण्याची तिला फारच

उत्सुकता झाली. आपली आई लहानपणीं कोणाबरोबर पळून तर गेलेली नसावी? असा तिला संशय आला. आणि तिला अतिशय राग आला. आत्तां ताबडतोब जाऊन आईला काय तें समक्ष विचारावें आणि एकदां या त्रासदायक संशयाचा निकाल लावून टाकावा असें तिला वाटलें. परंतु शालिनी समोर दिसतांच तिच्याच्यानें विचारण्याचें धैर्य होईना. आपल्या आईचें वर्तन चांगलें नसावें अशी तिची दिवसेंदिवस खात्री होऊं लागली आणि त्याचमुळें आपल्याशीं कोणी संबंध ठेवीत नाहीं किंवा आपल्याला कोणी घरीं बोलावीत नाहीं असें तिला वाटूं लागलें. आपल्याला कोणाकडे जातां येतां येत नाहीं हें पाहून तिला फार वाईट वाटे. आपलें नुकसान होत आहे तें आपल्या आईमुळें होत आहे अशी तिची बालंबाल खात्री झाली. तिला आपल्या आईबद्दल तिरस्कार वाटूं लागला. तिनें शालिनीशीं धड बोलणें चालणं सोडून दिलें. कमलिनीचें आपल्या आई-वरचें प्रेम उडत चाललें. आईबापांचें आपल्या मुलांवर जितकें प्रेम असतें, तितकें मुलांचे त्यांच्यावर नसतें; हा जरी नेहमींचा सिद्धांत आहे तरी कम-लिनीच्या प्रेमाची कडी कांहीं वरचढच होती. कमलिनी बरीक शालिनीच्या हृदयरूपी कोंदणांत बसविलेल्या हिरकणीप्रमाणें होती. कमलिनी आपल्याशीं इतकी निष्ठूरपणानें वागते हें पाहून तिच्या मनाला फार वाईट वाटे. आपल्या अशा तुटक वर्तनानें आईला किती दुःख होतें तें कमलिनीला कळत नसे. आणि त्या वयांत तिला कोणी कितीही सांगितलें असतें, कितीही उपदेश केला असता तरी तिला आईच्या प्रेमाची किंमत कळली नसती. ती किंमत तिला स्वतःला मुलें झाल्यावर कळली असती. बालपण संपून कमलिनी मोठी झाल्यावर तिला थोडें बहूत समजूं लागलें; आणि त्या वेळेपासून तिच्या मनांत आईविषयीं गैरविश्वास, नावड हळू हळू उत्पन्न होऊं लागली. पहिल्या पहिल्यांदा ती आपल्या मनांत आईबद्दल असलेला तिरस्कार उघड दाखवीत नसे. परंतु अलिकडे सर्व कांहीं आपलें नुकसान होत आहे तें आईमुळें; आपल्याला गरीबींत रहावें लागतें, तें आईमुळें; आपल्याला कोणी बोलावीत नाहीं तें आईमुळें; असें तिला वाटे. आपल्या सर्व दुःखाचें कारण आपली आई अशी तिची खात्री झाली होती. ह्मणून तिला तिचा विलक्षण राग येत असे. आपल्या बरोबरीच्या मुली किती ऐटींत असतात ! आपले कपडे वाईट, आणि आपली परिस्थिति दरिद्री म्हणून त्या आपली कशी मानहानी करितात, कशी हेटाळणी करितात ! या सर्व त्रासाचें मूळ कारण आपली आई ! आपली आई

अशी विचित्र नसती तर आज आपण आपल्या आजोबांकडे असतों. आणि मग सध्यां सोसावी लागत असलेली मानहानी आपल्याला सोसावी लागली नसती. आपल्या मुलांचें अकल्याण चिंतणारी आई काय उपयोगी ! असें ती मोठ्या रागानें मनांत म्हणे, आणि स्वस्थ बसे.

---

## प्रकरण विसावें.

कमलिनीला नुकतें कोठें सतरावें वर्ष लागलें होतें. अशा समयीं तिच्या आयुष्यांत एक फार मोठी महत्वाची गोष्ट घडून आली. कमलिनीच्या वर्गांतल्या एका मैत्रीणीचें आपल्या गावीं येऊन रहाण्याचें अत्याग्रहाचें तिला बोलावणें आलें. कमलिनीला आजपर्यंत कधीं कोणी आपल्या घरीं बोलावलें नव्हतें लहानपणापासून घरांत ती एकटीच वाढलेली होती. तिच्याबरोबर खेळायला अगर बोलाचालायला तिच्याबरोबरचीं भांवडें नव्हतीं. तिचें बालपण अत्यंत एकांतवासांत गेलें होतें. ज्याच्याजवळ मन मोकळें करून बोलतां येईल असें तिला कोणीही नव्हतें. तेव्हां तिला हें अत्याग्रहाचें बोलावणें आलेलें पाहून विलक्षण आनंद झाला. तिला आनंदाच्या उकळ्यावर उकळ्या फुटूं लागल्या.

शालिनीकडे लोक येत जात ते सर्व तिच्या विचारांचे असत. त्यापैकीं कोणी वर्तमानपत्राचा संपादक. तर कोणी कलाभिज्ञ असा असावयाचा. त्यांचे बोलण्याचे विषय कमलिनीला न समजणारे असत. पुन्हा ते श्रीमंत. तेव्हां त्यांच्या येण्यानें कमलिनीला विशेष गंमत वाटत नसे. शालिनीनें कमलिनीला कधींच कोठें नेली नव्हती, किंवा कांहीं पहाण्यासारखीं ठिकाणें दाखविलीं नव्हतीं, किंवा तिच्या मनाला बरें वाटेल असें कांहीं केलें नव्हतें; अशांतली गोष्ट नव्हती. तिला जितकें करणें शक्य होतें तितकें ती करीत असे. दर मे महिन्यांत शालिनी तिला प्रेक्षणीय असें एकादें ठिकाण पहाण्यास नेई. परंतु आज मैत्रीणीकडे रहावयाला जाण्याच्या कल्पनेनें जितका तिला आनंद होत होता, तितका तिला पूर्वी कधींच झाला नव्हता. कमलिनीच्या वर्गांत दोन वऱ्हाडांत रहाणाऱ्या मुली होत्या. त्या इकडे मुंबईस बोर्डींगमध्यें रहात असत. त्यांची आणि कमलिनीची फार दाट मैत्री होती. कमलिनी दिसण्यांत मोठी सुरेख असल्यामुळें पुष्कळांचें लक्ष तिच्याकडे आपोआपच वेधलें जात असे.

आणि ती सुरेख असल्यामुळेंच पुष्कळांना ती आवडत असे, त्याचप्रमाणें या दोन मुलींना ती फार आवडत असे. या दोघी मुली वऱ्हाडांतल्या एका नामांकित आणि श्रीमंत वकीलाच्या होत्या, त्यामुळें कमलिनीला त्या फार आवडत. त्यांचें आडनांव फाटक होतें. त्यांचा बाप नागपूरला वकिली करीत असे. त्यांचा बाप अतिशय श्रीमंत होता. त्यांना रावबहादुरीही मिळाली होती. शाळेंत देखील वत्सला फाटक आणि कुळा फाटक यांचा मोठा बडेजाव असावयाचा. त्या बोर्डिंगांत रहात होत्या, तरी पण त्या दोघींनाच एक स्वतंत्र खोली दिलेली होती! त्यांचीं लुगडी कितीतरी भारी किंमतीचीं आणि तऱ्हतऱ्हेचीं असत. वत्सलेचें पहावें तर रोज नवीन लुगडें. आज एक तऱ्हेच्या सोन्याच्या बांगड्या हातांत असावयाच्या, तर उद्यां दुसऱ्याच. अशा तऱ्हेची त्यांची ऐट असे. शाळेंतील प्रत्येक मुलीला आपली वत्सलेशीं नाहीं तर बकुळेशीं मैत्री व्हावी असें वाटे. त्या दोघी मुलींशीं मैत्री असण्यांत मुलींना मोठा मान वाटे. तेव्हां वत्सलेची आणि आपली इतकी मैत्री आहे हें पाहून कमलिनीला फार आनंद झाला. कमलिनी आणि वत्सला दोनाच्या सुट्टींत नेहमीं आपले हात एकमेकींच्या खांद्यावर टाकून या वर्गांतून त्या वर्गांत, त्या वर्गांतून या वर्गांत अशा हिंडत रहावयाच्या. त्या अशा हिंडूं लागल्या म्हणजे इतर खालच्या वर्गांतल्या मुली त्यांच्याकडे जरा भीतियुक्त दृष्टीनें पहात असावयाच्या त्या इंग्लीश सातवींत असल्यामुळें कोणाला त्या आपल्यापेक्षां हुशार म्हणून लाज वाटे तर कोणाचा वत्सलेचा ऐटबाज पोशाख पाहून जीव दडपून जाई. शाळेंतल्या लहान लहान मुलींना तर वत्सलाताई अतिशयच प्रीय होती, बहुतेक प्रत्येक लहान मुलगी अकरा वाजतां शाळा भरण्याच्या वेळीं वत्सलेला गुडमॉर्निंग ही करून जावयाचीच. बाहेरून शाळेंत येणाऱ्या मुली बहुतेक रोज वत्सलाताईला तर तऱ्हतऱ्हेचीं सुवासिक फुलें मोठ्या प्रेमानें आणून देत असा जिचा बडेजाव, त्या मुलीनें कमलिनीला घरीं रहाण्यास बोलाविल्यावर तिला कां आनंद वाटूं नये ?

फाटक वकिलासारख्या श्रीमंताच्या येथें रहावयाला जावयाचें म्हणजे कांहीं साधें काम नव्हतें त्यांच्या घरीं जावयाचें म्हणजे खर्चाचें काम होतें. वत्सलेच्या इथें रहावयाला जायचें म्हणजे आपल्याला नवीं लुगडीं पाहिजेत असें कमलिनीला वाटूं लागलें. त्याप्रमाणें आपलीं पोलकींही कसल्यातरी ओबडधोबड कापडाचीं

गिवलेलीं आहेत. तीं त्यांच्या येथें घालण्यास वाईट दिसतील. तेव्हां आईजवळ एकदां ही गोष्ट काढावी, असें कमलिनीच्या मनांत आलें. परंतु आईजवळ लुगडीं घ्यावयाला पैसे नसले तर ती आपल्याला " मुळींच जाऊं नको. " असें ह्मणेल. अशी कमलिनीला भीति वाटत होती. आणि असें तर कमलिनीला मुळींच व्हावयाला नको होतें. आपण गरीब. फाटकांच्या इथें सर्वच कांहीं भपका असेल असें वाटून कमलिनीला त्यांच्या येथें जाण्याची थोडी लाज वाटूं लागली. ती रोज फाटकांच्या येथें कसें असेल आपण तेथें कसें वागू वगैरे संबंधीं विचार करीत असे. वत्सलेसारखें आपण श्रीमंत असावें असें तिला फार वाटे. परंतु तसें होणें किती अशक्य आहे असें वाटलें म्हणजे तिच्या मनाची फार निराशा होई.

शालिनीलाही कमलिनीला तिच्या जाड्याभरड्या कपड्यानिशीं फाटकांच्या येथें धाडण्यास बरें वाटेना. कमलिनीच्या फाटकांकडे राहावयाला जाण्याचा बेत नक्की झाल्यावर शालिनीनें कमलिनीसाठीं साधारण बऱ्यापैकीं दोन महेश्वरी लुगडीं विकत आणिली आणि शिंप्याकडून दोन फ्याशनेबल पोलकींही शिवून घेतलीं. एवढे चार कपडे करण्यांत शालिनीची होती नव्हती तेवढी सगळी पुंजी सरून गेली. परंतु असें आपण प्रत्येक वेळेस पैशाकडे पाहूं लागलों तर कमलिनीची हौस कशी पुरावी ! आपली काय नेहमींच अशी स्थिति असणार ! लुगडीं आणल्यावर शालिनीनें त्यांतलें एक घडी मोडून कमलिनीला नेसण्यास सांगितलें. कमलिनी थोड्या वेळानें तें लुगडें नेसून व अंगांत नवीन शिवल्यापैकीं पोलकें घालून, शालिनीपुढें येऊन उभी राहिली. आज कमलिनीच्या चेहऱ्यावर हास्य झकझकत होतें. ती आज नित्यापेक्षां आपल्या आईशीं मोठ्या प्रेमानें आणि सलगीनें बोलत होती. कमलिनी त्या पोशाकांत फारच सुरेख दिसत होती. शालिनी थोडावेळ तिच्याकडे पहात राहिली. त्यावेळेस कमलिनीकडे पाहून, मीठ मोहऱ्या घेऊन तिची दृष्ट काढावी असें क्षणभर तिच्या मनांत आलें. कमलिनीचा तो आनंद पाहून तिच्या मनांत असें आलें कीं कमलिनीसाठीं तरी अपण आपल्या सासऱ्याकडे जाऊन ते कमलिनीला संभाळण्यास तयार असले तर त्यांना तिला संभाळूं द्यावी. कमलिनी सारख्या रत्नाला हें आपलें दारिद्र्य शोभत नाहीं. आपली मुलगी एखाद्या नक्षत्राप्रमाणें सुरेख आहे. परंतु माझ्या दुर्दैवानें तिला असल्या

दारिद्र्यांत रहावें लागत आहे. कमलिनीकडे पहातां पहातां तिनें घट्ट तिला पोटाशीं धरिलें आणि " बाळ काय तुला कमी पडलं असतं–पण ' असें ती गहिंवरून ह्मणाली. शालिनीच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिलेले पाहून कमलिनीला कसेसेंच झालें. कमलिनीला आपल्या आईबद्दल फारशी माया वाटत नसे, तरी तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिलेले पाहून आपण विनाकारण आपल्या आईला त्रास देतों असें वाटलें. कमलिनीची ती बावरलेली मुद्रा पाहून शालिनीनें चट्‌दिशीं आपले डोळे पुसले आणि कमलिनीच्या गालावरून हात फिरवीत ती ह्मणाली ' कमूबाळ, आणखी कांहीं तुला नको ना ! सांग. संकोच करूं नको. मजजवळ पैसे नसले तरी मी प्रभाकरपंतांच्या जवळून उसने घेईन.' कमलिनी लगेच ह्मणाली " आई मला आणखी कांहीं नको. इतकें नसतें तरी देखील चाललें असतें. " आईच्या डोळ्यांतले अश्रू पाहून आज हे कमलिनीच्या तोंडून उद्गार निघाले होते. कमलिनीला आईचा मनापासून राग येत असे. परंतु तो तिच्या गरीबीकरितां येत नसून तिच्याबद्दल वाटत असलेल्या संशयाबद्दल येत असे त्या संशयामुळेंच ती शालिनीशीं वाईट वागे. कमलिनीला श्रीमंतीची, पैशाची हाव होती; नव्हती असे नाहीं. परंतु तेवढ्यासाठीं ती आईशीं तुटकपणें वागे असें नाहीं. मुख्य कारण आईच्या वर्तनाबद्दल वाटत असलेला संशय ! आणि दुसरें तिच्या वर्तनानें स्वतःचा होत असलेला तोटा.

कमलिनीचा नागपूरला जाण्याचा दिवस येऊन ठेपला. त्या दिवशीं सकाळपासून एकसारखी कमलिनी धांदलींत होती. निघेपर्यंत तिची एकसारखी गडबड चालली होती. आजचा दिवस तिला विलक्षण सुखाचा वाटत होता. तिचे तेजस्वी डोळे आणि काळे कुरळे केंस यांनीं तर नेहमींच ती सुरेख दिसे. परंतु आजच्या आनंदित वृत्तीनें तिच्या सौंदर्यांत जमीन अस्मानाचा फरक पडला होता. कमलिनी नागपूरला जाण्यास जितकी उत्सुक होती, तितकीच शालिनी तिला पाठविण्यास नाखूश होती. मुलगी सासरीं जातांना आईला जसें वाईट वाटतें तसेंच त्यावेळेस शालिनीला वाईट वाटलें. कमलिनी परत यावयाची होती. पुन्हा फारही दिवस रहावयाची नव्हती. तरी पण शालिनीच्या मनाला बरें वाटेना. कमलिनी आपल्यापासून दूर जायला इतकी उत्सुक कशी ? याचेंच तिला फार नवल वाटलें. कमलिनीला कधींच कुठें जावयाला मिळत नसे. मुलांना आपल्या बरोबरीच्या मुलांत जावेसें खेळावेसें वाटतें. तेव्हां हें आयतें आलेलें बोलावणें

तिनें नाकारलें नाहीं. तिनें आपली स्वतःची इच्छा बाजूला ठेवून कमलिनीला आपल्या मैत्रीणींच्या घरीं चार दिवस रहाण्यास पाठविलें.

कमलिनीनें आपल्या कल्पनेनें फाटकांच्या बंगल्याचें चित्र रेखाटलें होतें, तसाच तो बंगला मोठ्या ऐटीचा होता. घरांत सर्व तऱ्हेची ऐट होती. स्वयंपाकी, गडी, ब्राह्मण, गाडी घोडा सगळें कांहीं होतें; जेवायचें ताट वाटी, पाणी प्यावयाचें भांडें रुप्याचें असे. बायका पुरुष सर्व मंडळी एकत्रच जेवायला बसत. कमलिनी तेथला थाट पाहून बिलकूल गांगरून गेली नाहीं. अगदीं रोजच्या संवयीच्या गोष्टीचें जसें वाटावें तसेंच तिला तेथें वाटलें. ती तेथें अगदीं मोकळ्या मनानें वागे. वास्तविक अशा घरांत रहाण्यासच ती योग्य होती. आपली आई अशी चमत्कारिक नसती तर जवळ जवळ आपण आज अशाच स्थितींत असतो असें तिला वाटलें. तीन दिवस नागपुराला राहून झाले नाहींत तोंच कमलिनी अगदीं तेथें रुळली. ती इतकी तेथें घरोब्यानें वागूं लागली कीं ती कोणी फाटकांच्याच कुटुंबापैकीं आहे असें सहज पहाणाऱ्या माणसाला वाटलें असतें. नागपुराला काय तो पहिल्याप्रथम कमलिनीला आपल्या बरोबरीच्या मुलींशीं मिसळून वागण्याचा प्रसंग आला. फाटकांच्या घरीं पुष्कळ मुलीं खेळायला जमत असत. त्याखेरीज वत्सलेच्या भावाचेही कांहीं मित्र येत असत. त्यांतल्या कांहींशीं वत्सलेची चांगली ओळख असे. तेव्हां कमलिनीचीही खेळतां खेळतां सहजरित्या त्यांच्याशीं ओळख झाली. ही सर्व मुलें वेळ सांपडेल तेव्हां पत्ते, सोंगट्या ब्याडमिंटन वगैरे खेळ खेळण्यांत घालवीत. सुट्टीचे दिवस असल्यामुळें कोणी त्यांना रागें भरत नसे. आणि चार दिवस मुलें घरीं रहाण्यास येणार म्हणून त्यांचे बरेच लाडही होत असत. थोड्याच दिवसांत कमलिनीची सर्व मंडळीशीं चांगली ओळख झाली. त्यांतल्या त्यांत तिची एका मुलाशीं ज्यास्त ओळख झाली. त्याचें खेळणें, चालणें, बोलणें सर्वकांहीं कमलिनीला फार आवडे. त्याचें नांव वसंत होतें. वसंत जसा देखणा आणि चलाख होता, तसाच फार गमत्याही होता. तो खेळायला नसला तर कोणत्याही खेळाला रंग चढत नसे, आणि कोणालाही खेळण्यास हुरूप वाटत नसे. त्याचें बोलणें इतकें गमतीचें असे कीं सर्व मित्र मंडळीची हंसून अगदीं पुरे वाट होई. वसंत सर्वांचा फार आवडता होता. तो नागपुरच्याच एका प्रख्यात फॉरेस्ट ऑफीसरचा मुलगा होता. पुढें एक दिवस वत्सला आणि कमलिनी अशा दोघीजणीच कमलिनीच्या बिछान्यावर संध्याकाळच्या वेळेला बोलत बसल्या होत्या. वत्सलेच्या

मनांत कांहीं विचार येऊन ती मधेंच गालांतल्या गालांत हंसली. थोडा वेळ गेल्यावर अशीच पुन्हा आणखी एकदां ती हंसली. तेव्हां कमलिनीला आपल्यालाच ही हंसत आहे असें वाटून तिनें वत्सलेचे दोन्ही हात घट्ट आपल्या हातांत धरिले आणि तिच्याकडे टक लावून पहात ती म्हणाली "बाईसाहेब, आतां आपण या हंसण्याचे कारण सांगितल्याखेरीज आपल्याला सोडणार नाहीं हं !" असें म्हणून कमलिनीनें तिचे दोन्ही हात घट्ट पकडून धरिलें.

वत्सला ज्यास्तच हंसूं लागली आणि कांहीं नाहीं ग मला सहज हंसूं आलें असें म्हणूं लागली.

"अस्सं ! अस्सं ! सहज हंसूं आलें नाहीं ? हासं अं ! सहज हंस बरं ! असें म्हणत कमलिनीनें एक दोन गुद्दे तिच्या पाठींत ठेवून दिले.'

"त्यावर वत्सला" नको बाई असा मला त्रास देऊं सांगतें. असें म्हणत कमलिनीच्या तावडींतून निसटून पलंगाच्या दुसऱ्या टोकाशीं जाऊन तिच्याकडे पहात हंसत बसली.

कमलिनी एकीकडे वत्से, बघ अं ! खोड मोडीन अं तुझी. वात्रटपणा करते आहेस पण ! अशी धमकी देत होती.

" मग सांगूच तर कमू तुला मी कां हंसते ती ? असें जरा पुढें सरकून वत्सला म्हणाली.'

" हं सांग. " कमलिनी जरा उत्सुकतनें म्हणाली.

" हें बघ—"

" काय बघ ? "

" मला वाटतं, कीं वसंतांचं आणि तुझं हं हं होईल. "

काय वात्रट आहेस ग ? कशावरून ग ?

कशावरून ? हं बाईसाहेब ! आह्माला काय डोळे नाहींत ? तुझं त्याच्यावर प्रेम बसलं नाहीं ?

माझं त्याच्यावर लाख प्रेम असेल पण त्याचं माझ्यावर असलं पाहिजे ना ?

" अग तुझ्यावर त्याचं प्रेम आहे हें मी सांगतें. "

कांहीं तरी बोलतेस हो वत्से तूं ! माझ्यांत काय ग असं आवडण्यासारखं आणि प्रेम करण्यासारखं आहे ? "

हं बाईसाहेब, पुरे करा अं हें आपलें आतां ढोंग. जणुं काय वसंताचें आपल्यावर असलेलें प्रेम आपल्याला कळलेंच नसेल नाहीं !

बरं पण ! पुरे आतां हा विषय ! असे ह्मणून कमलिनी दुसरेच कांहीं बोलूं लागली. वसंतासारख्या मुलाचें आपल्यावर प्रेम बसावें ह्मणजे कांहीं लहान सहान गोष्ट नाहीं. असें कमलिनीला मनापासून वाटत होतें. वत्सलेप्रमाणें तिलाही तसा संशय आला होता. परंतु तिला असें वाटे कीं आपलें त्याच्यावर प्रेम आहे, ह्मणून त्याचेंही आपल्यावर आहे असें आपल्याला वाटत असावें.

कमलिनीनें बोलतां बोलतां मधेंच विचारलें " वत्से, वसंत काय शिकला आहे ग ? "

' नको ना आपल्याला तो विषय ? मग आतां कशाला विचारतेस ? आणि तुला ग कशाला आतां त्याची चौकशी ?'

हें ग काय वत्से तुझी अशी थट्टा ! आपल्या सगळ्यांच्याच शिकण्याच्या गोष्टी निघाल्या होत्या ह्मणून त्याचं ही सहज विचारलं. तर तुझं आपलं भलतंच !

पण कमू, असं रागवायला काय झालं ? मी तुला सांगत नाहीं असं का ह्मटलं ? आणखीसुद्धां या कामांत माझी तुला मदत लागली तर माग हो. मी ती मोठ्या आनंदानें करीन. त्याची तुला बारीक सारीक माहिती पाहिजे असेल तर नको मला सांगायला ? बरं सांगूं का माहिती ? सांगतेच तर अं ! ऐक.

कांहीं नको सांगूं. कमलिनी रागानें ह्मणाली.

नको कसं सांगूं ! नाहींतर आणखी तुझा पारा झटेल. हें बघ तुझा वसंत कीं नाहीं एका फॉरेस्ट ऑफिसरचा मुलगा आहे. पुन्हा बापाचा अगदीं एकुलता एक. समजलीस. पण तो तुला शिकलाहे किती तें पाहिजे आहेना ? तें मी अगदींच विसरून गेलें होतें. तो यंदा बी. ए. च्या परिक्षेला बसणार आहे. आणि परीक्षा पास झाल्यावर त्याचा आय्. सी. एस. होण्याकरितां विलायतला जाण्याचा बेत आहे. त्याच्या बापाला चांगला हजार रुपये पगार आहे. पुन्हा वसंत एकुलता एक. तेव्हां सगळ्या इस्टेटीची वारस तूंच आहेस. त्यांचा लौकिकही तसाच आहे. सगळ्या नागपूर गावांत अण्णासाहेब पुरधरे माहीत नाहीं असा एकही मनुष्य नाहीं. इतके ते प्रख्यात आहेत. आणखी काय पाहिजे ?

" तुला कोणी एवढं तरी सांगायला सांगितलं होतं ! तर आणखी काय पाहिजे ह्मणून विचारतेस ? कमलिनी रागाचा आव आणून ह्मणाली.

" आहा ! काय पण रागाचं सोंग आणतें आहे ! मनांतून तर गुदगुल्या होताहेत !

वत्से, पुरे तुझी अं बडबड आतां ! मला तुझा खरंच फार राग आला आहे.

" कमू, तुला आणखी एकच गोष्ट समजायला पाहिजे असेल नाहीं ? तुझा कांहीं वसंत कांहीं वयानें फार मोठा नाहीं अं ! आमच्या मनोहराएवढाच आहे. आत्तां त्याला बावीस तेवीसावं वर्ष असेल एवढंच आणि तुझा वसंत......

" काय ग वत्से एकसारखं तुझा वसंत, तुझा वसंत चालवलाहेस ! " असें म्हणून कमू तेथून रागानें उठून गेली.

कमलिनी दिसण्यांत सुंदर, हुशार आणि शिकलेली होती, तेव्हां ती कोणालाही सहज आवडण्यासारखी होती. वसंत देखणा, वयानें लहान, शिकलेला आणि स्वभावानें फारच ममताळू असून श्रीमंत बापाचा एकुलता एक मुलगा होता. तेव्हां त्या दोघांचे एकमेकावर प्रेम बसले यांत काय नवल ?

फाटकांच्या येथें रोज अनेक बेत होत, त्याप्रमाणें एक दिवस वनभोजन करण्याचा बेत झाला. वनभोजनासाठीं कोठें जावें काय जावें असा विचार करतां करतां शेवटीं आंबाझरीवर जावें असें सर्वांनुमतें ठरलें. ठरल्याप्रमाणें सकाळीं आठ वाजायच्या सुमारास सर्व मंडळी अंबाझरीवर गेली. आठच वाजून गेले होते. परंतु ऊन चांगलेंच रखरखीत होतें तशा त्या रखरखीत उन्हांत त्या अंबाझरीच्या स्वच्छ पाण्याकडे पाहून सर्वांच्याच मनाला फार आराम वाटला. अंबाझरीवर पोहोंचल्यावर पहिल्याप्रथम चहा घेण्याचें सर्व मंडळींनी ठरविलें. तेव्हां सर्व मंडळी जवळच टेंकडीच्या पायथ्याशीं असलेल्या आंबराईंत शिरली. तेथें सर्वांनीं मिळून हंसत खेळत चहा तयार केला. चहा तयार झाल्यावर त्यांनीं तो घेतला, आणि मंडळी पिठलं भात तयार होईपर्यंत मन मानेल तशी इकडे तिकडे भटकूं लागली. वत्सलेचे आईबाप आणि त्यांच्याच सारखी आणखी जी एक दोन वयातींत माणसें होतीं, ती तेथेंच आंबराईंत गप्पा गोष्टी करीत बसली. मुलें तेवढी बाहेर इकडे तिकडे हिंडत होतीं कोणी अंबाझरीच्या काठीं जाऊन बसलीं होतीं तर कोणी पुलावर जाऊन शोभा पहत होतीं. कमलिनी आणि वसंत अंबराईंतच अगदीं एकीकडे जाऊन बसली होती. त्या दोघांचें निघाल्यावेळेपासून हित गुज चाललें होतें. वसंतानें आपल्या बागेंतलीं कमलिनीसाठीं आणललीं फुलें तिच्यापुढें केलीं. त्यांतलें एक त्यानें तिच्या हातांत वासाकरितां दिलें आणि "या दुसऱ्या फुलांचें नांव काय ? तुला माहीत आहे का ? असें तो विचारूं लागला.

हो नसायला काय झालें ! असें ह्मणत त्याच्या हातांतलीं फुलें ती घेऊं लागली त्याच्या हातांतून ती फुलें घेतां घेतां त्यांतल्या कांहीं फुलांच्या पाकळ्या झाल्या. तेव्हां वसंत हंसत हंसत कमलिनीला ह्मणाला " आमच्या फुलांची इतकीच ना किंमत ! "

" इतकीच कशी असेल ! यापेक्षां खातरीनेंच त्यांची ज्यास्त किंमत आहे. " कमलिनी फुलाकडे पहात ह्मणाली.

" ज्यास्त ह्मणजे किती ? तें तर सांगशील."

असें वसंतानें ह्मणतांच कमलिनीनें तीं आपल्या हृदयाशीं धरिलीं.

" इतकी त्यांची किंमत आहे ना ! मग मला वाटतं त्यांतलं हें एक गुलछडीचें फूल असं तुझ्या अंबाड्यांत घालायला बिलकुल हरकत नाहीं. " असें ह्मणून वसंतानें आपल्या हातानें तिच्या आंबाड्यांत एक फूल खोंवलें. नंतर वसंत म्हणाला " कमलिनी यावरून मी काय समजायच ? "

काय समजायचं ह्मणजे ? मला नाहीं समजत तुला काय विचारायचं आहे तें !

" मला काय विचारायचं आहे ? मला एवढंच विचारायचं आहे कीं तुझं माझ्यावर प्रेम आहे ना ?

कमलिनीनें प्रेमपूर्ण नेत्रानें त्याच्याकडे पाहिलें. आणि लाजून खालीं मान घालून ती म्हणाली " हो मला वाटतं आहेसं."

" कमू, खरंच तूं हें बोलतेस ना ? तूं खरंच माझी होणार ना ? होणार ना ? होणार ना ? सांग लवकर सांग. नाहींतर इतक्यांत कोणी आपल्याला बोलवायला येईल असें वसंत मोठ्या आतुरतेनें म्हणाला.

कमलिनीनें मानेनें होय म्हणून सांगितलें.

वसंतानें लगेच पुढें होऊन, कमलिनीचें लज्जित मुख वर करून तिच्या गुलाबी गालावर आपल्या प्रेमाची खूण ठेवून दिली. आणि पुन्हा एकदां त्यानें तिच्या हातांतल्या फुलांचें नांव विचारलें.

" ती म्हाणाली फॅरगेट मी नॉटची फुलें दिसतात. "

" हो तीच आहेत. ही माझ्या प्रेमाची खूण म्हणून तुजजवळ ठेवून दे. "

---

## प्रकरण एकविसावें.

त्या दिवसापासून नागपूरमध्यें वसंताचें कमलिनीशीं लग्न होणार असें ज्याच्या त्याच्या तोंडून ऐकूं येऊं लागलें. कोणी म्हणे चार पांच दिवसांत त्यांचा वाङ्निश्चय होईल. कोणी म्हणे अजून थोडा अवकाश आहे. कमलिनीच्या आईला वसंताचे वडील विचारतील आणि मग ती हो म्हणाली तर होईल. आईच्या संमतीशिवाय कमलिनी कसें लग्न करील? अशी फाटकांच्या मित्र मंडळींत एकसारखी वाटाघाट चालू असे. कमलिनीच्या मनांत एकदां ही सर्व हकीकत पत्रांतून आईला कळवावी असें आलें. परंतु पुन्हां तिला वाटलें कीं मुंबईस परत गेल्यावरच काय तें करावें. कदाचित् पत्रांतून सांगितल्यानें तिचा गैरसमज होईल. आणि ती आपल्या सगळ्या बेताचा हिरमोड करील. तेव्हां कमलिनीनें मुंबईस गेल्यावरच आईला सर्वकांहीं कळवावयाचें ठरविलें. कमलिनीचे पुढचे दिवस वसंताबरोबर पुढचे बेत करण्यांत आणि भात्री सुखस्वप्नांत केव्हांच निघून गेले.

नागपुरास कमलिनीचे पहिले कांहीं दिवस वसंताच्या मूकप्रेमांत गेले. वसंताशीं आपलें लग्न झालें तर आपण किती सुखी होऊं! पण आपल्याला इतकें सुख कुठलें मिळायला! आपली मनीशा कोठली पूर्ण व्हायला! आजपर्यंत कधीं कोठली आपली इच्छा पूर्ण झाली नाहीं तर हीच कशी होईल! असें वाटून तिच्या मनाला त्रास होई; आतां ती भीति गेली होती. वसंतानें होऊन कमलिनीला पसंत केलें होतें. त्याचें तिच्यावर प्रेम होतें, तिचें, त्याच्यावर होतें. परंतु एकाच गोष्टीची कमलिनीला अजून भीति वाटत होती. आणि ता ह्मणजे अपली आई या सुखांत कांहीं विघ्न आणणार नाहीं ना! परंतु ही भीति तिच्या सुखस्वप्नाच्या आड फारशी येत नसे.

ही बातमी आईला कळल्यावर आपलें लग्न किती थाटांत होईल, आपली आई हौशी नाहीं, पण वसंताचे वडील हौशी आहेत. पुन्हा त्यांच्याजवळ पैसाही रग्गड आहे, तेव्हां आपल्या लग्नांत कमतरता कशाचीच पडणार नाहीं. वसंताच्या वडलांचा लौकिक फार मोठा आहे! तेव्हां किती मोठमोठे लोक आपल्या लग्नाला जमतील! किती चांगलीं चांगलीं बक्षिसें, आपल्याला मिळतील!

किती सोन्यामोत्यांचे दागिने आपल्या अंगावर पडतील! वगैरे वगैरे विचार कमलिनीच्या मनांत एकसारखे चाळत. स्वर्गसुखप्राप्तीच झाली असें तिला वाटूं लागलें. आपल्या आकांक्षेप्रमाणें आपण मोठ्या दर्जाला जाऊन पोहोंचणार ह्मणून ती आपल्याला धन्य समजूं लागली.

पुढें एक दिवस वसंतानें कमलिनीला आपल्या घरीं येण्याचा अतिशय आग्रह केला. तेव्हां कमलिनी त्याच्याबरोबर गेली. त्यावेळेस वसंताचे आई, वडील दोघेंही घरीं होतीं. त्यांना आयतीच कमलिनी पहावयास मिळाली. कमू सुस्वरूप असल्यामुळें दोघांनाही पसंत पडली. कमलिनी देखतच थोड्या वेळानें वसंतच्या आईनें तिच्यांत एक खोड काढली. कमलिनीच्या घरची चौकशी वगैरे केल्यावर ती वसंतच्या वडलाकडे पाहून ह्मणाली "ही मुलगी आपल्या वसंतालाला मोटी नाहीं का होणार! त्याला कशी तेरा चौदा वर्षांची मुलगी पाहिजे. पुन्हा तिच्या आईची गरिबी! अशांत माझी हौस कशी पुरायची! वसंत आपला एकटाच मुलगा! मग त्याच्या लग्नाच्या वेळेस हौस पुरवून घ्यायची नाहीं तर केव्हां! आपल्या घरांत काय दहा पांच कार्यें व्हायचीं आहेत तर मग म्हणतां येईल कीं नाहीं तर दुसऱ्या कार्यांत मी आपली हौस पुरवून घेईन." असं एकसारखं तिचें बोलणें चालू झालें. वसंतचे वडील कांहींच बोलले नाहींत. त्यांनीं तिकडे लक्ष्यच दिलेंच नाहीं. मुलीच्या आईला विचारून वसंत इंग्लंडला जायच्या आंत त्याचं लग्न करावयाचें असा त्यांनीं विचार केला.

घरीं चहापाणी झाल्यावर वसंत कमलिनीला आपला धनतुलीवर असलेला बंगला दाखविण्यास घेऊन गेला. वसंताचें लग्न झाल्यावर त्यानें आपल्या पत्नीसह ह्या बंगल्यांत रहावें असें ठरलें होतें. कमलिनीला बंगला दाखविल्यावर वसंतानें विचारलें. "कमलिनी, या बंगल्यांत रहायला तुला आवडेल का?"

"हो, आवडेल. पण माझं नशीब इतकं मोठं कुठं आहे?"

"का नसायला काय झालं? तुझ्या मनांत असलं म्हणजे झालं."

"आतां इतक्यांतच तुझी आई काय म्हणाली तें ऐकलं नाहींस का! त्यांच्या मनांतून तुझं माझ्याशीं लग्न होऊं नये असं आहे. मग ..."

अं! त्याचं काय तूं घेऊन बसलीस! माझ्या मनांत ज्या मुलीशीं लग्न करायचं असेल तिच्याशींच मी करणार."

वसंताच्या या उत्तरानें कमलिनीला धीर आला. आणि तिच्या मनाला बरें वाटलें.

कमलिनीची सुट्टी संपली. कमलिनीचा मुंबईला परत जाण्याचा दिवस येऊन ठेपला. त्या दिवशीं संध्याकाळीं वसंत कमलिनीला भेटावयास यावयाचा होता. वसंतचें आणि कमलिनीचें लग्न व्हावयाचें आहे असें कळल्यापासून वत्सला, बकूळ दूर कोठें तरी कांहीं तरी निमित्त काढून निघून जात आणि त्या दोघांना एकांत बोलण्यास अवसर देत. त्या दिवशीं वत्सलेची आई कमलिनी बरोबर, फराळाचें देण्यासाठीं तें करण्यांत गुंतली होती. वत्सलेचे वडील क्लबांत गेले होते. तेव्हां वसंत आणि कमलिनी दोघेंच बोलत बसली होती. पांच वाजल्या पासून ते आठ वाजेपर्यंत त्यांच्या खोलीकडे कोणीही फिरकले नाहीं.

वसंत आला तेव्हांच आज वसंतची वृत्ति बरोबर नाहीं असें कमलिनीला वाटलें. वसंत तिच्याशीं नेहमीं पेक्षां कमी ममतेनें किंवा तुटकपणानें वागत होता अशांतली गोष्ट मुळींच नव्हती. परंतु त्यांच्या एकंदर वृत्तींत पुष्कळ फरक झाला होता. हें खरें. त्याची नेहमींची उल्हासित वृत्ती आज कोठच्या कोठें मावळून गेली होती. तो नेहमींप्रमाणें मोकळ्या मनानें बोलत नव्हता. बोलताना तो मधून मधून थांबत असून अर्धवटच बोलणें सोडीत होता, जीभ चावीत होता. आणि मधून मधून विचारलेल्या प्रश्नांचीं भलतींच उत्तरें देत होता. या सर्व वर्तनावरून वसंत आज आपल्यापासून कांहींतरी महत्वाची गोष्ट लपवून ठेवीत आहे. असा कमलिनीला संशय आला. तेव्हां कमलिनीनें त्याला स्पष्ट असल्या वर्तनाचें कारण विचारलें.

"कांहीं नाहीं, तूं आतां जायचीस म्हणून मला कसें तरी होत आहे" अशी त्यानें थाप ठेवून दिली. परंतु वसंताला नेहमीं थाप मारण्याची संवय नसल्यामुळें त्याला ती गोष्ट साधली नाहीं. थाप मारतांना तो अडखळला आणि कमलिनीला ज्यास्तच संशय आला. कमलिनी त्याच्याजवळ गेली. आणि डोळ्यांत आसवें आणून म्हणाली, वसंत, कांहीं तरी तूं माझ्यापासून लपवून ठेवीत आहेस. मी जाणार म्हणून तुला वाईट वाटत असेल, मी नाहीं म्हणत नाहीं, परंतु वाईट वाटण्याचं हें लक्षण नाहीं. तूं माझ्यापासून कांहीं तरी दवडतो आहेस हो ना ?

तें एकल्याबरोबर वसंताच्या चेहऱ्यांत एकदम फरक पडला.

" कांहीं नाहीं ग " असें तो चाचरत म्हणाला.

तरी कमलिनीची खातरी पटली नाहीं कमलिनी जरा रागानें मागें सरली. ती थोडा वेळ आपल्याशींच विचार करीत स्वस्थ बसली. वसंतही कांहीं बोलला नाहीं.

'वसंत तूं का असं करतोस? तुला काय कोणी सांगितले ? तूं माझ्याबद्दल कांहीं ऐकलं आहेस का? ऐकलं असशील तर माझ्यापासून आतां कोणतीही गोष्ट लपविण्यांत फायदा नाहीं.'

'तुला तें समजायला पाहिजे असलें तर मी सांगतों. पण उगीच तुला वाईट वाटेल. माझा त्यावर बिलकुल विश्वास नाहीं. काल बाबांना कोणी तरी सांगितलं. जें सांगितलं तें तुझ्यासंबंधीं मुळींच नाहीं. तुझ्या कुळाविषयीं ते कायसेसें म्हणत होते. पण मला त्याच्याशीं काय करायचें आहे ! ' कमलिनीचा चेहरा पांढराफटक पडला. तिचा घसा दाटून आला. तिच्याच्यानें पुढें बोलवेना. आईसंबंधीं याला कांहीं तरी कळलें असावें असा तिला संशय आला. आपल्याला जें अजून गूढ आहे तें याला कळलें ! आपल्या लग्नांत अडथळा येणार अशी तिला भीति पडली ! तिच्या डोळ्यापुढें अंधार दिसूं लागला.

'एकंदर आपल्या लग्नांत अडथळा येईल असंच कांहीं तरी ऐकलं आहेस ना ?' असें तिनें त्रासून विचारलें.

' असं कांहीं नाहीं. परंतु आणूं म्हटलें तर अडथळा येईल. '

त्याबरोबर ती वसंतपासून दूर जाऊन मोठ्या अभिमानानें उभी राहिली. तिचा चेहरा लाल झाला, छाती धडधड करूं लागली आणि तिला वसंतचा एकंदर बेत डळमळीत दिसूं लागला. त्यामुळें तिला वसंतचा थोडा राग आला. वसंतला शालिनीची गोष्ट ऐकल्यापासून बरें वाटत नव्हतें हें खरें. परंतु कमलिनीशीं लग्न करण्याचा बेत त्याचा कायम होता. कमलिनी खरोखरच रागावली असें पाहून त्याला वाईट वाटलें आणि तो तिच्या जवळ जाऊन तिची समजूत घालूं लागला. परंतु कमलिनीला ज्यास्तच अभिमानाचा झटका आला आणि ती त्याचा हात हिसडून दूर उभी राहून म्हणाली, "वाईट कुळांतली मुलगी केल्यानें तुझ्या नांवाला विनाकारण बट्टा लागेल. ही एकंदर गोष्ट काय आहे त्याची मला बरोबर माहिती नाहीं. त्याचा मी पूर्ण तपास करीन आणि मग तुला माझा नक्की बेत कळवीन, तोंपर्यंत आपलें लग्न ठरलें नाहीं. तूं आणि मी दोघेही स्वतंत्र आहोंत. आपण कोणत्याही वचनानें बांधलों गेलों नाहींत," हें

ती इतक्या अभिमानानें आणि धिटाईनें बोलली कीं ही दुसरी शालिनीच आहे कीं काय असा क्षणभर भास झाला असता.

वसंतानें पुष्कळ तिची समजूत घालून पाहिली परंतु ती आपला हट्ट सोडीना. तिचें एक ह्मणणें कीं 'मी घरीं जाऊन आईपाशीं या संबंधानें सर्व कांहीं चौकशी करीन आणि मग पत्र धाडून तुम्हाला माझा काय बेत आहे तो कळवीन तोंपर्यंत तुझा माझा कांहीं संबंध नाहीं. आपण आपलें वचन मोडलें तरी चालेल.' असें ह्मणून ती झट्दिशीं त्या खोलींतून निघून गेली.

---

## प्रकरण बाविसावें.

दुसऱ्या दिवशीं कमलिनी नागपूरहून मुंबईस जाण्यास निघाली. ती स्टेशनवर जाऊन आगगाडीच्या डब्यांत जाऊन बसली तेव्हां गाडी सुटायला जवळ जवळ पंधरा मिनीटें अवकाश होता. वसंत पुन्हा तिची भेट घेण्याकरितां स्टेशनवर आला होता. त्यानें आपल्याबरोबर तिला देण्यासाठीं एक फुलांचा गुच्छहा आणिला होता. तो त्यानें तिच्या हातांत दिला. परंतु कमलिनी त्याच्याशीं फारसें कांहीं बोलली नाहीं. गाडी सुटायच्या वेळेस हलकेच खिडकीवर असलेल्या हाताचें बोट दाबून तो ह्मणाला "कमू वचन दिलेलं मोडतां उपयोगीं नाहीं. बरं का ! "

कमलिनी मान जोरानें हलवून ह्मणाली. " नाहीं. नाहीं. खरी हकीकत कळल्याखेरीज कांहीं नाहीं. " असें ती म्हणत होती इतक्यांत गाडी सुटली. आणि वसंतला पुढें बोलतां आलें नाहीं. त्या दिवसभर कमलिनीला चैन पडली नाहीं. मुंबईला पोहोंचेपर्यंत ती एकसारखा विचार करीत होती. ती तो प्रश्न जों जों उलगडूं पाही तों तों तिला ज्यास्तच त्रास होई. आपल्या आईनें केलं तरी काय असावं ! कीं ज्यामुळें लोकांना आपल्याशीं संबंध ठेवूं नये असं वाटतं. छे ! छे ! असली आई नसलेली पतकरली. आपल्या लेकीच्या जन्माचें मातेरें करणारी. आपल्या लेकीच्या सुखावर पाणी सोडणारी आई ! असल्या आईला आई ह्मणण्यापेक्षां महामाया झटलेलें काय वाईट !

कमलिनीचें आज पुष्कळ दिवसापासून आपल्या आईवरचें प्रेम उडालेलें होतें. ती तिच्याशीं कसें तरी पटवून घेई एवढेंच ! आणि या गोष्टीनंतर तर ती तिची वैरीच बनली. तिचा द्वेष करूं लागली.

कमलिनी मुंबईस यावयाची होती, त्याच दिवशीं, प्रभाकर शालिनीकडे कांहीं कामाकरितां आला होता. कमलिनी केव्हां येणार ? तिची प्रकृती कशी काय आहे ? वगैरे चौकशी प्रभाकर करीत असतां, त्याचें बोलणें " कमलिनीनें अजून तुम्हाला तिच्या स्वतांच्या जन्मासंबंधीं कांहींच विचारलें नाहीं का ? " येथवर विचारण्यापर्यंत गेलें.

' नाहीं. कां ?' शालिनी म्हणाली. 'नाहीं. मी आपलं सहज विचारलं, म्हणा, आज नाहीं तिनें विचारलं, तरी उद्यां ती हें विचारणारच. तेव्हां तुह्मी तिला काय सांगाल ? '

'काय सांगायचं ? जी खरी गोष्ट आहे ती सांगायची. '

' असं सांगाल तर तें कमलिनीला आवडणार नाहीं. तिला तुमचा राग येईल. '

" आला राग तर आला. म्हणून तिला खोटें सांगावयाचें कीं काय ! खोटें बोलण्यानें आणि लपवाछपवानें कोणताही फायदा होणार नाहीं. " असें ती बोलतें आहे, इतक्यांत तिला कमलिनी आल्याचा भास झाला. म्हणून ती झटदिशीं उठलीं आणि दाराशीं गेली. तितक्यांत कमलिनीही दाराशीं आली. कमलिनी दिसतांच, शालिनी तिला भेटण्यासाठीं झटदिशीं पुढें गेली. परंतु तिचा हात झिडकारून देऊन ती एकदम फणकारून म्हणाली " मला हात लावूं नको. मला एका गोष्टीचा खुलासा करावयाचा आहे. आणि ती गोष्ट आतांच मी तुला विचारणार आहे. त्याचें उत्तर समाधानकारक मिळालें तर बरें. नाहीं तर मी तुझी कोणी नाहीं आणि तूं माझी कोणी नाहींस. "

कमलिनीचें हें भाषण ऐकून शालिनीचा चेहरा पांढरा फटफटीत पडला. हा सर्व प्रकार चालला असतां प्रभाकर केव्हां निघून गेला हें दोघींही मायलेकींना कळलें नाहीं. शालिनीनें कमूला खालीं बसण्यास सांगितलें आणि ती तिला म्हणाली ' कमू जरा शांत हो. तुला पाहिजे आहे तें मी सर्व तुला सांगेन. परंतु जरा दम धर. आत्ताच गाडींतून आली आहेस तर आंग धू जेवण आटप? आणि मग मी तुला सर्व सावकाशपणें सांगेन. '

' छे ! छे ! मला माझ्या प्रश्नाचें उत्तर मिळाल्याशिवाय मी कांहीं खावयाची नाहीं '

'बर हरकत नाहीं. कमू. असं रागवायला काय झालं ? जे काय तुला विचारायचें असेल तें विचार. ' असें अगदीं शांतपणानें तिच्या पाठीवरून हात शालिनी फिरवीत म्हणाली. 'मला एवढेंच विचारायचें आहे कीं तुझें माझ्या वडलांशीं लग्न झालें होतें का ? '

या प्रश्नाचें उत्तर देण्याची शालिनीची तयारी होती. तरी पण ती कमलिनीची क्रुद्ध मुद्रा पाहून तिचा चेहरा पांढरा फटफटीत पडला, तिच्या ओंठावरची रक्तिमा नाहींशी होऊन ते थरथरूं लागले. आणि तिला आतां आपण खालीं पडतो कीं काय असें वाटलें, म्हणून ती थोडा भिंतीचा आधार घेऊन तशीच बसली. कमलिनी तितक्यांतल्या तितक्यांत दोनदां सांग सांग म्हणाली, " अशी घाबरूं नको. मी सर्व कांहीं सांगतें. मला सांगण्याची भीति वाटत नाहीं किंवा लाजही वाटत नाहीं. पण तूं इतकी रागावलेली पाहून खरोखरीच मला फार दुःख होत आहे. पण आतां त्याला उपाय नाहीं मला सर्व तुला सांगितलें पाहिजे. आणि त्याबद्दल तूं मला दोन शिव्या दिल्यास तरी त्या सहन केल्या पाहिजेत. मी तुझ्या वडलांशीं लग्न केलें नव्हतें हें खरें. तसें न करण्याला मला कांहीं कारण होतें. आणि तें कारण म्हणजे माझें तत्व तें तुला माहीत आहे. त्यासंबंधीं मी तुझ्याजवळ पुष्कळ वेळां बोललें आहे. मला कोणत्याच चालू पद्धतीनें लग्न करणें पसंत नव्हतें. चालू असलेल्या पद्धतींपैकीं कोणत्याही पद्धतीनें लग्न केलें तरी स्त्री-पुरुषाची थोडी तरी गुलाम बनते अशी माझी खातरी आहे. तेव्हां ही गुलामगिरी नाहींशी करण्यास कोणताही दुसरा तिसरा मार्ग योग्य नसून मी पत्करला हाच मार्ग योग्य आहे अशी माझी खातरी झाली; आणि म्हणून हा मार्ग मी स्वीकारला. त्याबद्दल मला कोणाचीही आणि कशाचीही भीति वाटत नाहीं. आणि तूंही या आपल्या लग्न पद्धतीसंबंधानें नीट विचार केलास तर मी केलें हें मुळींच वावगें केलें नाहीं याबद्दल तुझी खातरी होईल.

कमलिनी एकदम तिरस्कारानें " अं " करून म्हणाली " जन्मांत माझें असे मत व्हायला नको ! या तुझ्या तत्वामुळें तर माझ्या सर्व जन्माचा नाश झाला आहे. मग आणखी मी आपलीं मतं अशीं करून घेऊन मी आपल्या मुलाबाळांचा कशाला नाश करूं ? "

'म्हणे तत्व ! काय पण तत्व ! असलीं तत्वं चुलींत नेऊन का नाहीं घातलींस ! या तुझ्या तत्वामुळेंच तर आज तूं माझ्या सर्व जन्माचें मातेरें केलें आहेस.' असें म्हणत थोडा वेळ अशीच ती तिच्याकडे तिरस्कारानें पहात चडफडत बसली. नंतर ती दांत खात चवताळून म्हणाली, 'ज्याला आपल्या मुलीची तिळमात्र काळजी नव्हती असा हा बाप तरी कोण होता ? '

'कमू, कमू, जें तुझें नुकसान झालें असेल, त्याबद्दल मी तुझी क्षमा मागतें. पण मेल्या माणसावर रागावण्यांत आतां काय अर्थ आहे ? त्यांना दोष देऊं नको. सर्व दोष तुला द्यावयाचा असेल तर मला दे. तुझे वडील फार चांगले होते. त्यांच्यासारखा मनुष्य मिळणं फार विरळा. तर अशा चांगल्या माणसाला तो आपली बाजू सांगायला असमर्थ असतां दोष देण्यांत काय अर्थ अहे. '

"बरं, पण अशा लोकांचा घात करणाऱ्या चांगल्या माणसाचं नांव तरी काय ? आणि मला माझ्या बापाकडची कोणी नात्याची मंडळी आहेत किंवा नाहींत ? "

'आहेत. डॉ. सुपेकर तुझे आजोबा होतात, ते कमलाकरांचे वडील. कमलाकर हें तुझ्या वडलांचं नांव ' 'काय ! डॉक्टर सुपेकर माझे आजोबा ! अशा मोठ्या घराण्यांत माझा जन्म होऊन माझी ही अशी दशा ! याला कारण कोण ? माझा जन्म कुमार्गानें झालेला म्हणून ना सुपेकर मला विचारीत नाहींत ? तुम्ही त्यांच्या नांवालौकिकाला काळिमा फासलांत मग त्यांनीं तरी काय म्हणून मला विचारावें ? तुमचं सर्व ठीक झालं. पण मला आतां त्याबद्दल सर्व मानहानी आणि हाल सोसावे लागताहेत ! त्याचं काय तुम्हाला ! ' तिच्याच्यानें पुढें बोलवेना. तिला शालिनीचा मनस्वी राग आला. ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. आज दोन दिवस तिला या विचारानें भयंकर ग्रासलें होतें. आणि आतां ही गोष्ट कळल्यावर तर तिचें डोकें फिरून गेलें. वसंताशीं लग्न होणें आतां तिला अशक्य वाटूं लागलें. शालिनी तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करूं लागली. पण व्यर्थ. ती ज्यास्तच तिच्या अंगावर उसळून जाऊन म्हणाली, ' पुरे पुरे ठाऊक आहे तुला कितपत माझ्याबद्दल वाटतें तें ! '

'कमू, मला कसं वाटणार नाहीं ? मी कांहीं झालं तरी तुझी आई आहे. माझेच कांहीं झालें तरी तुझ्यावर ज्यास्त प्रेम असणार. '

'हो आहे ठाऊक ! किती माझ्याबद्दल तुला प्रेम वाटतं तें ! आणि कसली आई तूं आहेस ती ! अशा तऱ्हेनें माझ्या जन्माचं मातेरं केलंस, त्यापेक्षां मला लहानपणींच मारलं असतंस तर कुठें बिघडत होतं ! मग मला अशी ज्याच्या त्याच्या पुढें मान तरी खालीं वाकवावी लागली नसती. म्हणे आई ! अहाहा काय पण आई ! तुला आई कोण म्हणेल ! मी तर कांहीं म्हणत नाहीं. मी तुला एक दुष्ट चांडाळीण समजतें." 'समज. त्याबद्दल मला राग वाटत नाहीं. तूं

बोलशील तें मला निमूटपणें सहन केलें पाहिजे. पण जरा शांत हो. दोन घास खा. आणि थोडा वेळ नीज. म्हणजे तुला अंमळ बरें वाटेल. ”

कमलिनी कांहीं केल्या तिचें ऐकेना. ती तिला एकसारखी झिडकारीत होती. “ तूं आतां माझ्याशीं बोलूं नकोस. मला तुझें बोलणें ऐकायला नको. माझं जें काय आतां व्हायचं असेल तें होईल. ” असें म्हणत शालिनीपासून दूर सरून बसत होती. आणि शालिनी तिला एकसारखीं आपल्याजवळ घेऊन कुरवाळून शांत करण्याचा प्रयत्न करीत होती. कमलिनीची स्थिति तिच्या लक्षांत आली. ती कमलिनीचे केस मागें सावरीत म्हणाली “ कमू, इतकी माझ्यावर रागावूं नको. तुझें अकल्याण व्हावें किंवा माझा स्वार्थ साधावा म्हणून कांहीं मी अशी वागलें नाहीं. ”

‘ बरं बरं मला आणखी ज्यास्त कांहीं ऐकायला नको ! ’

‘ ऐकायला नको कसं ? तुला सर्व हकीकत कळायला हवी होती म्हणून ना तूं मला आज विचारलंस ? मग आतां मी सांगतें तें ऐकून घे. मी लग्न विधि केला नाहीं, तेव्हां माझ्या मुलाबाळांचें कोणत्याही प्रकारें फारसें नुकसान होईल असं मला वाटलं नाहीं. आणि अजूनही तुझं विशेषसं नुकसान झालं आहे असं मला वाटत नाहीं. पैशाच्या बाजूनें तुझें थोडें बहुत कांहीं कमी पडत असेल, आणि कधीं कधीं माझ्यासंबंधीं दुसरे वाईटसाईट बोलत असतां तें ऐकून घ्यावं लागत असेल. पण आतां त्यासंबंधीं तुला एवढें वाईट वाटण्याचें कारण नाहीं. तू आतां चांगला समजुतदार झाली आहेस तेव्हां तुला या गोष्टीकडे सहज दुर्लक्ष करतां यावें. गरीबी काय आज आहे. उद्यां तूं चांगली शिकलीस नोकरी करूं लागलीस म्हणजे कांहीं आपल्याला अशाच स्थितींत रहावं लागणार नाहीं. बरं माझ्या-संबंधीं कोणी कांहीं म्हणत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करावें. कांहीं चोरून वाईट गोष्ट करावयाची होती म्हणून तर मी लग्नविधि केला नाहीं असं नाहींना ? मला विधींत अर्थ वाटत नाहीं, त्यामुळें उगीच दोन माणसांना जन्माचें एकमेकाचें गुलाम केलें जातें, त्यामुळें स्वातंत्र्य जातें म्हणून मला विधि नको होता आणि म्हणून मी तो केला नाहीं. यांत कोणत्याही तऱ्हेची वाईट लांछनास्पद गोष्ट मीं केली आहे असें मला वाटत नाहीं आणि त्याबद्दल लोक मला कांहीं म्हणाले तरी तुला त्याबद्दल लाज वाटण्याचें कारण नाहीं; किंवा वाईट वाटण्याचेंही कारण नाहीं. ’

"वाईट वाटण्याचें कसें कारण नाहीं? मला हीं तुझीं स्वातंत्र्याची मतंच पसंत नाहींत. विधि केल्यानें स्वातंत्र्य जातें असें तुझ्यासारख्या स्वैरवृत्तीच्या बयांनाच तेवढं वाटत असेल." "बाकी आमच्यासारख्या—असेल तसंही असेल. पण त्यावेळेस माझ्या मुलांना माझी हीं मतं इतकी विषाप्रमाणें भासतील असं मला वाटलं नव्हतं."

असं वाटलं नव्हतं तर मी अगदीं तुमच्याच मताची होईन असं तरी वाटलं होतं का? मला जन्म द्यावयाचा होता तर तो योग्य रीतीनेंच द्यायला पाहिजे होता. लोकांच्या जिवावर उदार होऊन असले ढंग करण्याचें कांहीं कारण नव्हतें.'

"कमू, काय तूं हें बोलतेस! कांहीं विचार करून तरी बोलते आहेस का? कसले मी ढंग केले?—पोरी तुझ्यासाठीं ना मी इतक्या हालांत दिवस काढले! नाहींतर कमलाकर मेल्यावर मला जगून काय करावयाचें होतें! तूं मोठी होशील, तूं माझ्याचप्रमाणें स्त्रीस्वातंत्र्यासाठीं झटशाल असं वाटून मी हे सगळे दिवस तुझ्या आशेवर दुःखांत काढले! माझ्या मुलीला आपल्या आईचें धैर्य पाहून आनंद वाटेल असें मला वाटलें. माझी मुलगी माझ्या शिक्षेत वाढलेली इतक्या भिन्न विचाराची होईल असें मला कसें वाटावं? अशी स्वतंत्र विचाराची आपली आई असल्याबद्दल तुला लाज वाटेल असें मला कसें कळावें? अशी स्वतंत्र विचाराची आई असल्याबद्दलच तुला धन्यता वाटेल असें मला वाटलें होतें. पण तुला तिची किंमत नाहीं."

"काय ह्मणून मला तुझी किंमत वाटावी? तूं आपल्या कृत्यानें माझ्या सर्व आयुष्याचा नाश केला आहेस. आणखी आतां—" असें ह्मणून ती हुंदके देऊन रडूं लागली पुढें तिच्यानें बोलवेना.

"आणखी काय? कमलिनी तुला वाटलं तर माझी चूक झाली असं ह्मणते. वाटलं तर क्षमा मागते. पण बाळ तूं अशी रडूं नको."

'रडूं कशी नको. तुझ्यामुळें—तुझ्यामुळें आतां मला वसंताला......'

'कोण हा वसंत? त्याचा नी तुझा संबंध काय? काय तुझ्या मनांत आहे? सगळं सांगशील कीं नाहीं?' काय सांगूं? कमलिनी चिडून ह्मणाली. 'माझं वसंतवर प्रेम आहे. तुझी ही हकीकत त्यांच्या कानावर गेली आहे माझ्याशीं त्यांनीं आतां लग्न केलें तर बरें वाटणार नाहीं.' हलके हलके नागपुरला घडलेली सर्व

हकीकत कमलिनीनें आईला सांगितली. शालिनीनें स्वस्थ चित्तानें ऐकून घेतली आणि ती म्हणाली " वसंतचें तुझ्यावर खरें प्रेम असलें तर आपल्या आई-बापांचं तो कधीं ऐकणार नाहीं. तो तुझ्याशींच लग्न करील. "

त्यावर कमलिनी कांहींच बोलली नाहीं. दोघी मायलेकी आपल्याशींच विचार करीत स्वस्थ बसल्या होत्या. मधेंच कमलिनीच्या मनांत कांहीं विचार येऊन ती झटदिशीं उठली. आणि स्लिपर घालून ती बाहेर जाण्यास निघाली. शालिनीनें भिऊन ' कमू, कुठें जातेस ? ' असें विचारलें.

" वसंतला तार करायला जातें, " असें म्हणत ती झटदिशीं बाहेर गेली. मी सर्व हकीकत आपल्या आईला विचारली. ती तूं म्हणतोस तशीच आहे. अशा स्थितींत तुझें लग्न माझ्याशीं झालें तर तें तुझ्या आईला न आवडणें अगदीं बरोबर आहे. तेव्हां तूं मला दिलेलें वचन पाळण्याचें कारण नाहीं. अशा अर्थाची तार करून कमलिनी परत आली. थोड्या वेळांतच तारेचा उलट जबाब आला. पूर्वीच्या बेतात कांहीं फरक करावयाचा नाहीं. तूं आपलें वचन मोडतां कामा नये. सविस्तर हकीकतीचें पत्र येईल. तार वाचून कमलिनीला अंमळ बरें वाटलें, तरी सर्व बेत सिद्धीस कितपत जाईल याची तिला शंकाच वाटत होती. तो सबंध दिवस मायलेकींचा अतिशय दुःखांत गेला. साऱ्या रात्रींत दोघींचाही डोळ्याला डोळा लागला नाहीं. दोघींही आपल्याशींच रडत दुःख करीत अंथरुणावर पडल्या होत्या.

---

## प्रकरण तेविसावें.

——:०:——

सकाळचे साडेनऊ वाजून गेले होते. डॉ. सुपेकर नुकतेच प्रातर्विधी आटोपून क्रॉनिकल वाचीत इजीचेअरवर पडले होते. इतक्यांत एक नोकर " आपल्याकडे एक बाई आली आहे. तिला आंत धाडून देऊं का ? असें डॉ. साहेबांच्यापाशीं येऊन विचारूं लागला व लगेच त्यानें एक लहानशी चिठ्ठीही त्यांच्या हातांत दिली. त्यावर नुसते ' कमलिनी केळकर ' एवढेंच नांव लिहिलेलें होतें. त्यांचा चेहरा खुलला. शेवटीं आपला जय झाला. असें त्यांना वाटलेसें दिसलें. त्यांनीं गड्याला ' त्या बाईला पाठवून दे ' असें सांगितलें.

शालिनी चांगल्याच संकटांत सांपडली असावी! त्याखेरीज या पोरीला कसली ती आपल्या घरीं येऊं देते! बहुतेक पैशांच्या अडचणींत सांपडली असावी. बरी चांगली खोड मोडली. आतां कसें आपोआपच नाक घाशीत यावें लागलें, पण तिला मी आतां एक कपर्दीकही देणार नाहीं. पाहूं आतां काय करते ती! आणि कसे हिला भलतेच विचार उराशीं बाळगून जगांत वागतां येतें! फार झालें तर त्या पोरीला मदत करीन. हे शेवटचे शब्द त्यांनीं मोठ्यांदा उच्चारले आणि ते कमलिनीच्या कानीं गेले. कमलिनी आधींच येऊन दाराआड उभी होती. तिला सुपेकरांच्या खोलींत जाण्याची भीति वाटत होती. ते आपल्याशीं धड बोलतील कीं नाहीं! का आपलें नांवगांव कळल्याबरोबर जा म्हणून सांगतील, आणि असें सांगितलें म्हणजे मग काय करावयाचें! अशा विचारांत ती तेथें एक मिनीटभर उभी होती इतक्यांत डॉक्टरांच्या तोंडाचे शब्द तिच्या कानीं पडले; आणि हे आपल्याच संबंधीं उच्चारलेले असावे असें वाटून तिला खोलींत पाऊल टाकण्याचा थोडा धीर आला. ती डॉक्टरांच्या समोर उभी राहिली. ते आपल्याच विचारांत होते. आणि शालिनीची चांगली खोड जिरली. शेवटीं तिला झकत आपल्याकडेच नाक घाशीत यावें लागलें, असें वाटून आपल्याशींच हंसत होते, इतक्यांत सुंदर अशीं सोळा सतरा वर्षांची मुलगी त्यांच्यापुढें उभी असलेली त्यांना दिसली. तिची ती उंच सडपातळ नाजुक मूर्ती पहातांच त्यांना शालिनीची आठवण झाली. परंतु लगेच तिचे ते काळेभोर केस आणि पाणीदार डोळे दिसतांच त्यांना कमलाकराची आठवण झाली. कमलाकराची आठवण होतांच त्यांना तीस वर्षां पूर्वींच्या एक एक आठवणी होऊं लागल्या. कमलिनीचें बोलणें चालणें बरेंच कमलाकरासारखें होतें. तेव्हां ती बोलत असतां कमलाकरच आपल्याशीं बोलत आहे कीं काय असें त्यांना वाटलें. जों जों ते तिच्या एकेका अवयवाकडे पाहूं लागले तों तों ती त्यांना पुष्कळशी कमलाकरासारखीच दिसूं लागली आपल्या कमलाकराची एवढीच काय ती मुलगी! आपला वंश चालवायला मुलगा मुळींच नाहीं! हें पाहून त्यांना फार वाईट वाटलें आतां करावयाचें झालें तर हिचेंच करावयाचें! दुसरें आपल्याला आहे कोण! असें वाटून त्यांनीं कमलिनीला मोठ्या प्रेमानें “काय काम आहे?” असें विचारलें आणि तिला बसण्यास खुर्ची दिली.

"आजोबा, माझं काय काम असणार !" एवढेंच बोलून ती थांबली. तिनें आपली मान खालीं घातली. आणि दोन्ही हातांनीं तिनें आपलें तोंड झांकून घेतलें. तिला अतिशय लाज वाटली.

डॉ. सुपेकरांनीं पुन्हा 'काय काम आहे' म्हणून विचारलें.

'मी आपली नात आहे.'

'माझी ? अस्सं ! मग काय तुझं म्हणण आहे ?'

कमलिनी आपली नात आहे, त्याबद्दल त्यांना नेहमीं बरें वाटे. परंतु तेंच ती मी आपली नात आहे. असें म्हणाल्याबरोबर त्यांना कसेंच वाटूं लागलें.

"मला खरी खरी हकीकत काल कळली. याच्याआधीं मला कांहींच माहीत नव्हतें. नाहींतर मी तिच्याजवळ कधीं राहिलें नसतें. आणि आतांही मला तिच्या घरीं राह्यला नको आहे. तेव्हां माझी आपल्याला एकाद्या चांगल्या ठिकाणीं रहाण्याची सोय करतां येईल का ?"

" एकाद्या चांगल्या ठिकाणीं कशाला ? मी आपल्या स्वतःच्याच घरीं तुला ठेऊन घेण्यास तयार आहे. मी याच्या आधींही ही गोष्ट तुझ्या आईजवळ काढली होती. परंतु तिला आपल्या मुलीला माझ्यासारख्या वाईट माणसाजवळ ठेवायची नव्हती !'

" आतां मी यायला तयार आहे." 'मग ये. वाटेल तेव्हां ये. पाहिजे तर आज ये. माझी केव्हांही हरकत नाहीं. बरं पण तुला ही गोष्ट कशी काय कळली ? तिनें होऊनच सांगितली का ?' ' नाहीं. ती होऊन कशाला सांगते आहे ! मला जिथें तिथें तिच्या या असल्या करण्यानें खालीं मान घालावी लागे, म्हणून म्हटलं एकदां खरी हकीकत काय आहे ती विचारूनच घ्यावी. म्हणून काल तिच्या तोंडावरच विचारलें. तो लोक म्हणतात तसंच अगदीं. त्याबरोबर माझ्या अंगाचा संताप झाला. मला तेथें एक क्षणभर देखील राहूं नये असें वाटलें, पण मी एकटी जाणार कोणाकडे ! आणि मला आपल्या घरीं ठेवून घेणार कोण ! काल तिनें आपण कोण तेंही सांगितलें. तेव्हां म्हटलं एकदां सर्व लाज बाजूला ठेवून आपल्याला विचारून पहावें.'

" पोरी तुला लाज वाटण्याचं काय कारण ग ? तुझा त्यांत काय अपराध आहे !"

"पण माझी आई आहे ना ती !"

"आई असली म्हणून काय झालें ! त्याबद्दल तुला कशाला लाज वाटायला पाहिजे ! मग एकूण तिनें एवढ्या काळजीनें तुला वाढविलें त्याचा कांहींच उपयोग नाहीं झाला तर ! माझी मुलगी माझ्याच विचारांची होईल असें तर तिला खात्रीनें वाटत होतें. आणि त्यासाठीं ती किती तरी धडपड करीत होता."

"ती पुष्कळ माझ्या मनांत तसले घाणरडे विचार भरवीत होती परंतु त्याचा कांहीं उपयोगच झाला नाहीं. तिच्या कल्पना मला पहिल्यापासूनच पसंत नव्हत्या. ती आपली कांहीं तरी वागते झालं. तिच्याकडे येणारे तिचे मित्र मित्र आणि त्यांचीं मतें त्यांचा तर मला अगदीं पहिल्यापासून तिटकारा होता. मला समजायला लागल्यापासून मी आपली नेहमींच त्यांच्यापासून लांब लांब रहातें."

त्याबरोबर आजोबांनीं लगेच " शाबास ! शाबास ! " असें म्हणून तिच्या पाठीवर शाबासकी दिली. " फार छान केलंस. फार शहाणपणानें वागलीस. तूं तिच्या तावडींत सापडूं नयेस अशी फार इच्छा होती. तिनें तुला माझ्याकडे पाठवावें आणि तूं माझ्याजवळ रहावेंस अशी माझी पहिल्यापासून इच्छा होती पण तिनें माझें ऐकलें नाहीं." डॉक्टराच्या या भाषणानें कमलिनीची भीति अगदीं पार नाहींशी झाली. तिनें हलकें हलकें आपली सगळी हकीकत सांगण्यास सुरवात केली.

नागपुराला वत्सलेकडे राहायला गेल्यावर आपली आणि वसंताची कशी ओळख झाली, वसंताचें आपल्यावर कसें प्रेम जडलें, त्याच्या वडलांनीं आपल्या लग्नाला कशी संमति दिली, आणि आतां आईच्या या असल्या करण्यानें त्याचे वडील कसे मागें घेताहेत. वगैरे सर्व हकीकत तिनें डॉक्टरांना सांगितली. "मला ही आईची हकीकत पहिल्याप्रथम नागपुरास कळली. मला अतिशय राग आला. याच्या आधींच मला फार दिवसापासून असा कांहींतरी घोंटाळा असावा असें वाटत होतें. पण तो केवळ संशयच होता. म्हणून मी तिला कधीं समक्ष विचारलें नाहीं. परंतु यावेळेस माझ्याच्यानें रहावेना. मी ताबडतोब मुंबईस येण्यास निघालें. आणि आल्याबरोबर तिला प्रत्यक्ष सर्व हकीकत विचारली. पण ऐकतें तों तीच मोष्ट

खरी ! त्याबरोबर मला तेथें एक क्षण देखील राहूं नये असें वाटलें. पण असें वाटलें म्हणून जाणार कुठें आणि करणार काय ! झकत तिथेंच रहावें लागलें. ”

कमलिनीच्या प्रत्येक शब्दागणिक डॉक्टरांचा चेहरा खुलत होता. कमलिनी अगदीं शुद्ध अंतःकरणाची आहे. तिच्या मनावर शालिनीच्या विचारांचा बिलकूल परिणाम झालेला नाहीं. तिचें बोलणें चालणें एकाद्या उच्च कुलांतल्या मुलीला शोभेसेंच होतें. कमलिनीला आईच्या वर्तनाचा विलक्षण तिटकारा आला आहे, याबद्दल त्यांची खात्री झाली आणि त्यांना एकप्रकारें बरें वाटलें. त्यांना कमलिनीची कींव आली आणि ते कमलिनीच्या पाठीवर हात फिरवून म्हणाले, “ बाळ कांहीं हरकत नाहीं. अगदीं भिऊं नको. मी सगळी तुझी नीट व्यवस्था करतों. ” असें म्हणून त्यांनीं पुन्हा एकदां सगळा इतिहास आपल्या मताप्रमाणें तिला सांगितला. “ कमलाकर किती सद्वर्तनी आणि सच्छील होता आणि या बयानें कशी त्याला भुरळ पाडून आपल्या कचाटींत पकडलें तें तूं आतां पहा. ” असें डॉक्टर म्हणाले आणि कमलिनीनें एक दीर्घ निश्वास टाकला.

“ तुला लहानपणींच माझ्याकडे पाठविण्यासाठीं मी तिला किती किती प्रकारानें सांगितलें पण तिनें एकही दिवस ऐकलें नाहीं. आतां तूं खुशाल ये. हें सगळें कांहीं तुझें आहे त्याबद्दल कोणी मला कांहीं म्हणालें तरी हरकत नाहीं. तुझें कोणाशीं तें लग्न जुळलें होतें, आणि आतां फिसकटलें आहे, तें देखील पुन्हा आपण जुळवून आणूं. ” कमलिनीनें ताबडतोब डॉक्टरांच्या घरीं येऊन रहावें; पुन्हा शालिनीचें तोंड देखील पाहूं नये असें ठरलें. ‘ मी त्या वसंताच्या वडलांना पत्र धाडतों. तूं पाहिजे तर त्याला स्वतःला पत्र धाडून सविस्तर हकीकत कळव, असें डॉक्टर म्हणाले. त्याबरोबर कमलिनी वसंताला पत्र लिहिण्यास बसली. तिनें साध्यां भाषेंत खुलासेवार सर्व हकीकतीचें पत्र लिहिलें. तिनें त्यांत डॉक्टर सुपेकराची बरीच माहीती दिली होती. ‘ ते स्वतः तुझ्या वडलांना पत्र धाडणार आहेत, आणि त्यांच्या मनांतून आपलं लवकरच लग्न व्हावं असं आहे, तरी पण वसंत जोंपर्यंत माझी आई जिवंत आहे तोंपर्यंत आपलं लग्न होऊं नये असें मला वाटतें. ’ असें एक शेवटीं तिनें वाक्य लिहिलें होतें.

## प्रकरण चोविसावें.

डॉ० सुपेकरांकडे रहाण्याचें ठरल्यावर कमालनी आपलें सामान आणण्या करितां म्हणून घरीं परत गेली. संध्याकाळचे साडेपांच सहा वाजण्याची वेळ झाली होती. कमलिनी आईला न विचारतांच सुपेकरांकडे गेली होती. सर्व दिवसभर शालिनीनें तिचा शोध केला, पण कुठें पत्ता लागला नाहीं. कदाचित् आपण इकडे शोध करीत असूं आणि ती तिकडे घरीं येऊन बसली असेल असें वाटून ती पुन्हा आपल्या खोलींत आली होती. परंतु कमलिनी तेथें नव्हती. ती अगदीं हताश झाली. तिचे हात पाय गळले. तिनें धाडकन आपलें अंग बिछान्यावर टाकलें. त्या भयंकर काळजीमुळें आणि श्रमामुळें तिच्या अंगांत ताप भरला होता. जिवाची एकसारखी तगमग होत होती. आणि कोणाला सांगूं, कुठें हिला शोधूं, काय करूं असें होत असतां तिला सुपेकरांची आठवण झाली. आणि तिकडे तर ही कदाचित् गेली नसेल ना ? असें वाटून तिच्या मनांत थोडीशी आशा उत्पन्न होते आहे इतक्यांत कमलिनी आली. मग तर तिच्या आनंदाला पारावारच राहिला नाहीं. ती पुढें गेली. आणि तिच्या पाठीवरून हात फिरवीत ह्मणाली, कमू, आज सकाळपासून कुठें बरं गेली होतीस ? '

त्याबरोबर आईचा हात झिडकारून कमलिनी म्हणाली " का ? आज एवढं प्रेमाचं भरतंसं आलं ?" "अग, कांहीं खाल्लं नाहींस, प्यायली नाहींस म्हणून ह्मणतें. तुला भूक नाहीं का लागली ? कमू, तूं अशीच का छळणार मला आतां ? सबंध दिवस तुला शोधून शोधून माझे पाय मोडून गेले बरं. तुला वाटेल तिथें जा. मी तुला नको नाहीं ह्मणत. पण निदान मी एक अमक्या ठिकाणीं जाते आहे एवढं सांगून जायला तर कोणाची हरकत नाहीं ?"

"आतां पुन्हा तुला माझा शोधच करण्याची पाळी यायची नाहीं. उद्यांपासून मी जाणार आहे आपल्या आजोबांकडे रहायला. आज त्यांच्याचकडे मी गेलें होतें. कालपासून घडलेली सर्व कांहीं हकीकत त्यांना मी सांगितली. आणि त्यांच्याकडे रहाण्याविषयींची माझी इच्छाही त्यांना मी दर्शविली. तेव्हां ' ते माझ्याकडे रहायला ये. मी तुझा सांभाळ करतों.' असें ह्मणाले. आणि त्याप्रमाणें उद्यांपासून मी त्याच्याकडे रहायला जाणार. आत्तां मी हें माझें सामानसुमान न्यायला

आलें आहे. " 'कमू ! तूं कुठें जाणार ! कोणाकडे जाणार ह्मणतेस बाळ ! कमू, मला तूं सोडून जाणार ! ज्यानें मळा ऐनप्रसंगीं वाईट रीतीनें वागवलें अशा माणसाकडे जाणार ! माझ्याबद्दल तुला कांहीं वाटत नाहीं ! माझी तुला नुसती कींवही येत नाहीं ! हायरे देवा ! ईश्वरा !' असें म्हणून तिनें आपलें डोकें समोरच्या टेबलावर आदळून घेतलें. तिला सारासार विचार राहिला नाहीं. आतां या अंतःकरणाची तगमग कशी बंद करावी ! या आत्म्याला नेऊन कुठें गाडावें ! आणि याची कशी शांती करावी. एवढाच विचार तिच्या मनांत सारखा घोळूं लागला.

कमलिनी आपलें सामान हुसकण्याच्या आणि आवरण्याच्या सावरण्याच्याच धांदलींत होती. तिनें आईकडे ढुंकूनही पाहिलें नाहीं. परंतु टेबलाच्या खणांत तिच्या कांहीं अभ्यासाच्या वह्या होत्या. ह्मणून ती टेबलाजवळ गेली. आणि " मला माझ्या वह्या घेऊं दे. बाजूला हो." असें ह्मणूं लागली.

शालिनी आपले दोन्ही हांत तिच्या खांद्यावर ठेवून तिच्याकडे करुणपूर्ण दृष्टीनें पाहूं लागली.

" माझं सामान तरी मला आतां घेऊन देतेस कीं नाहीं ! " असें ह्मणत कमलिनीनें धाडकन आपलं पूड ओढलं आणि त्यांतल्या वह्या काढून ट्रंकेपाशीं टाकून दिल्या.

" कमू माझ्याशीं तूं किती निष्ठूरपणानें वागतेस याची कांहीं कल्पना ! तुझी सगळी दया माया कुठें गेली ! माझं दुःख बघून तुला किंचितही दुःख होऊं नये इतक्या कठोर अंतःकरणाची तूं कशी झालीस ! आजपर्यंत तूं मोठी होशील, शहाणी होशील आणि माझ्या श्रमाचें चीज करशील या आशेवर मी दिवस कंठले. जिवाची परवा न करतां, लागेल तसे हाल सोसून तुला लहानाची मोठी केली. माझ्या श्रमाचें चीज होईल, मी हातीं घेतलेलें कार्य माझी मुलगी तडीस नेईल, आपल्या आंगचें पाणी दाखवील या आशेवर मी होतें, पण आतां कसली आशा ! आणि आतां कोणासाठीं जगावयाचें आणि कशासाठीं ! आतां माझ्यानें जिवंत रहाणें शक्य नाहीं. "

‘ अं: ! शक्य नसायला काय झालं ! आजपर्यंत नाहीं जगलीस ! काय तुझे थोडे हाल झाले ! त्यांतून सुद्धां वाचलीस मग आतां न जगायला काय झालं ! आमचें एकदां पुरें वाटोळें नको का व्हायला ! तूं मेलीस म्हणजे माझं एकाद वेळेस लग्न होईल, मला थोडंसं सुख लागेल; तें तुझ्याच्यानें कसं पहावेल ! ’

‘ हाय—कमू ! ’ शालिनी बेशुद्ध होऊन जमिनीवर पडली.

कमलिनीनें तिकडे लक्षच दिलें नाहीं. तिनें आपली ट्रंक वळकटी आणि पुस्तकें एका कोपऱ्यांत नीट व्यवस्थीत ठेवलीं. आणि ती आंतल्या खोलींत जाऊन निजली. शालिनी कांहीं वेळानें आपोआपच शुद्धीवर आली. तिनें कसें बसें आपलें अंथरुण पसरलें. आणि ती निजली. पण निजली कसली ! अंथरुणावर तळमळत पडली होती. कांहीं वेळानें ती उठली. टेबलापाशीं जाऊन खुर्चीवर बसली. आणि नोटपेपर काढून ती एक पत्र लिहूं लागली.

माझ्या लाडक्या कमूस,

तूं हें माझ्या हातचें शेवटचें पत्र पहाशील तेव्हां मी या जगांत नसेन. माझ्यामुळें तुला होत असलेला त्रास चुकेल. आणि तुला पूर्ण स्वातंत्र्य मिळेल. माझी एकच इच्छा उरली आहे आणि ती म्हणजे तूं सुखी व्हावीस एवढीच. मघांच्या तुझ्या बोलण्यावरून मी जिवंत असल्यामुळें तुला सुख मिळत नाहीं. असें मला कळून आलें. वसंताचें आणि तुझें लग्न होत नाहीं तें माझ्यामुळें. तर कमू, मला आतां जगून काय करायचें ! जेव्हां माझी तुला कधीं आठवण होईल, आणि माझा राग येईल, तेव्हां एवढें ध्यानांत ठेव कीं जें मी केलें तें मी आपल्या अल्पबुद्धीप्रमाणें व्हावें म्हणूनच केलें. त्यापासून कदाचित तुला त्रास झाला असेल, मी नाहीं म्हणत नाहीं. पण तें मी निव्वळ माझ्या स्वार्थी सुखासाठीं केलें असें समजूं नको. या तऱ्हेनें जन्म देण्यांतच मी आपल्या मुलीला उत्तम तऱ्हेचें बक्षिस देत आहे असें मला त्यावेळेस वाटलें. आणि अजून देखील तसेंच वाटत आहे. परंतु हीच गोष्ट किती तऱ्हानीं मी तुला सांगितली तरी तूं माझ्यावर विश्वास ठेवणार नाहींस आणि माझ्या बोलण्याची तुला सत्यता पटणार नाहीं. हें मी जाणून आहे. तरी पण माझी तुला एकच विनंती आहे, आणि ती तूं मान्य कर. तूं मला कितीही शिव्या दिल्यास तरी तुझ्या वडलांना तूं या बाबतींत मुळींच दोष देऊं नको.

माझ्या चुक्यामुळें तुझं जें कांहीं नुकसान झालं असेल त्याबद्दल मी तुझी क्षमा मागते. आणि तेवढी तूं मला मेल्यावर करशील अशी मी आशा करते.

कमलिनी, तूं मोठी होशील तेव्हां माझ्याचसारखी होशील असं मला वाटलं होतं. आंधळ्या जगाला ज्या गोष्टी दिसत नाहींत त्या तुला दिसतील आणि याबद्दल तूं माझे आभार मानशील असें मला वाटलें होतें. हीच माझी चूक झाली त्या चुकीबद्दल मला चांगलें शासन मिळालें. मी मेल्यावर त्याबद्दल मला दोष देऊं नको. कारण त्यावेळेस माझी बाजू मला तुझ्यापुढें मांडतां येणार नाहीं. असो. मला योग्य वाटलें त्याप्रमाणें मी सत्याच्या आणि न्यायाच्या मार्गानें चाललें. माझ्या सबंध आयुष्यांत मी सत्याच्या मार्गाला कधींही सोडलें नाहीं. कितीही संकटें आलीं तरी आपला मार्ग सोडावयाचा नाहीं. हा तर माझा निश्चयच होता. आणि त्याकरितां हे हाल सोसण्याची मी आपली तयारी केली होती; परंतु माझ्या मुलीला माझ्यामुळें इतका त्रास होईल, मी तिला नकोशी वाटेन असें मला कधींच वाटलें नव्हतें. आपल्याला कोणत्या तऱ्हेनें मरण येणार हें आधीं कोणालाच सांगतां येत नाहीं. मला अशा तऱ्हेनें मरण यावयाचें होतें. आतां माझी घटका भरत आली आहे. मी कसलेंही आयुष्यांत दुष्कर्म केलें नाहीं याबद्दल माझी खातरी आहे. माझा जो हेतु तो मी थोडा तरी सिद्धीस नेला. यांतच मला समाधान आहे. माझें कार्य संपलें. आतां माझें या जगांत कांहीं काम नाहीं. कमू, मी मरावं अशी तूं इच्छा करावीस यासारखी मला दुसरी शिक्षाच नाहीं. पण आपल्या प्रिय माणसासाठीं मरण ह्मणजे कांहींच नाहीं. तूं सतत सुखी असावेंस एवढीच माझी ईश्वराजवळ मागणी आहे. माझें तुझ्यावर होतें तसेंच प्रेम आहे. बरं आहे कमू, आतां मी जातें. माझें पत्र वाचल्याबरोबर जाळून टाक; माझ्या मृत्यूची चौकशी होईल त्यावेळेस दाखविण्यासाठीं मी दुसरी चिट्ठी लिहून ठेवली आहे. ती दाखव. बरं आहे. जाते !

तुझी आई
शालिनी.

"कमू इतकें मी तुला लिहिलें तरी अजून माझा जीव तुझ्यापाशीं कां घुटमळतो ?"

पत्र पूरें झाल्यावर शालिनीच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू आले. तिनें तें पत्र आपल्या हृदयाशीं घट्ट धरलें. त्याचें अनेक वेळां चुंबन घेतलें. नंतर तें खालीं ठेवून चौकशीच्या वेळेस दाखविण्यासाठीं दुसरी चिठ्ठी लिहिली. एकदां कमलिनीच्या खोलींत जाऊन तिचें दर्शन घेऊन आली. नंतर ती पांढरें शुभ्र पातळ नेसली. तिनें कमलाकराची आठवण केली. तिच्याजवळ असलेला त्याचा लहानसा फोटो तिनें आपल्या गळ्यांत बांधला. वसंतानें कमलिनीला दिलेल्या गुच्छांतलीं दोन पांढरी गुलाबाचीं फुलें काढून तिनें आपल्या हृदयाशीं पदराला खोचून ठेवलीं; हेतु हा कीं निदान वसंतानें दिलेल्या फुलासाठीं तरी कमू आपल्याला मिठी मारील. ती थोडावेळ कमलाकराचा फोटो आपल्या हृदयाशीं घट्ट धरून बराच वेळ रडली. नंतर तिनें टेबलाच्या पुडांतून एक लहानशी डबी काढली. त्यांत आफूची गोळी होती ती तिनें गिळून टाकली. आणि ती स्वस्थ अंथरुणावर जाऊन मरणाची वाट पहात पडली.

शालिनीसारख्या व्यक्ती जन्मास येतात त्या उगीच येत नाहींत. असल्या व्यक्तींच्या मरणामुळेंच जग सुधारणेंत एक पाऊल पुढें टाकीत असतें. कमू दुसऱ्या दिवशीं निजून उठून बाहेरच्या खोलींत येऊन पहाते तों आपल्या आईचें शरीर लाकडाप्रमाणें झालेलें! आईच्या मुखाकडे स्तब्ध पहाण्याखेरीज आतां काय उरलें होतें!!

समाप्त.